मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
(जिल्हा वाचनालय)

मा खंड

मासिकाचे नांव — पैसा फंड 3

संपादक —

मासिक क्रमांक — सन — १९०३ १९०४

अंक —

(महिने) १९०३ ६,८,९,१०,११,१२, १९०४ १,२,३,४,५,६



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

जुनी मासिके (संदर्भ)

वर्षास आगाऊ वर्गणी फक्त ८ आणे. ट. ख. ३ आणे.

# "पैसा फंड"

## मासिकपुस्तक.

वर्ष १ लें.] जुलै, १९०२. [अंक १ ला.

### विषयानुक्रमणिका.


| विषय. | पान. |
|---|---|
| उद्देश | १ |
| पैसा फंडाची निरखानिरख | ५ |
| पैसा फंडाच्या रिपोर्टांचें परीक्षण | ८ |
| वर्तमानसार | १२ |


मालक,

**अंताजी दामोदर काळे.**

मुख्य ऑफिसः—मुंबई.

संपादक,

**एकनाथ गणेश भांडारे.**

किंमत १ आणा.

'विजय' छा० माधवबाग मुंबई.

# रिपोर्ट प्रसिद्ध करण्यास मदत दिली त्यांचीं नांवें.

| | रु० |
| --- | --- |
| मुंबई येथील एक श्रीमंत गृहस्थ .... .... | १० |
| " " एक प्रसिद्ध गृहस्थ .... .... | ५ |
| सुप्रसिद्ध नाटककार माधवराव पाटणकर ... .... | ५ |

सदरहू तिन्ही गृहस्थांचे मी अंतःकरण पूर्वक उपकार मानतों.

अं. दा. काळे.

---

"पैसा फंड" मासिक पुस्तकाच्या मुंबईतील वर्गणी दारांनीं आपली वर्गणी पुरंदरे आणि कंपनी बुकसेलर माधव बाग यांजकडे भरून पावती घ्यावी. बाहेरगांवीं आम्हीं तूर्त खालीं लिहिलेल्या गांवीं एजंट नेमले आहेत, त्यांजकडे त्या त्या गांवच्या लोकांनीं वर्गणी भरावी.

उंबरगांव—केशव त्र्यंबक कारुळकर.

डाहाणू—नानूभाई नरोत्तम आढिया.

आगाशी—महादेव चिंतामण पेंडसे.

मालगुंड—गोविंद विनायक केळकर.

राईभायंदर—मोरो सदाशिव मराठे.

कोल्हापूर—शंकर वासुदेव परांजपे.

चिपळूण—गजानन मोरेश्वर दातार.

( जादा "पैसा फंड" ता ३।३।०४ )

## आनंदाची बातमी!

लोकमान्य

### बाळ गंगाधर टिळक

# पैसा फंडाचे खजिनदार

यांच्या

# अपिलांचा निकाल.

'सत्यमेव जयते'।



'रत्नदीपस्याहि शिखा वात्ययाऽपि न नश्यति'।

महाराष्ट्राचेंच नव्हे तर सगळ्या भरतभूमीचें शिरोरत्न असे जे भूमंडलमंडनैकतिलक होऊन राहिलेले विद्वज्जन-पूजित **बाळ गंगाधर टिळक** यांच्या वरील २।३ वर्षेपर्यंत लोळत पडलेल्या खटल्याचा आजरोजीं दुपारीं शेवटचा निकाल होऊन त्यांना हायकोर्टानें दोषमुक्त ठरविलें, हें कळविण्यास आह्मांस अत्यानंद वाटतो. खालच्या कोर्टानें दिलेला निकाल व शिक्षा रद्द करून सरकारनें **रा० टिळक** यांजपासून पूर्वीच वसूल केलेला १००० रुपये दंड त्यांना परत देण्यांत यावा, असा हायकोर्टाचा हुकूम सुटला आहे. **रा. टिळक** यांचा ज्या खटल्यांत एकसारखा विनाकारण छळ होत होता, त्याचा शेवट समाधानकारकरीतीनें झाला, हें पाहून कोणाच्या अंतःकरणास आनंदानें भरतें येणार नाहीं ? सूर्यचंद्रावर एखादे वेळीं दग आले ह्मणजे ते त्यांच्या आंगचेच आहेत व ह्मणून ते कधींही जाणार नाहींत, असें मानणें चुकीचें नव्हे काय ?

**रा. टिळक** यांचें २।३ वर्षांचें नष्टचर्य संपलें, ह्याबद्दल जगन्नियंत्या परमेश्वराचे आह्मी अन्तःकरणपूर्वक आभार मानितों. त्याचप्रमाणें चीफ जस्टिस सर लॉरेन्स जेन्किन्स व जस्टिस बॅटी या उभयतांनीं दाखविलेल्या धैर्याबद्दल व निःपक्षपातीपणाबद्दल त्यांचें अभिनंदन केल्यावांचून आमच्यानें राहवत नाहीं.

---

'विजय' छापखाना, मुंबई.

# "पैसा फंड"

## मासिकपुस्तक.

वर्ष १ ले. ]   ता० १ जुलै. सन १९०३.   [ अंक १ ला.

## उद्देश.

अशक्य तें तुह्मां काय देवराया ॥

—तुकाराम

पूर्वीचे दिवस आठविले आणि आजकालचे दिवस पाहिले ह्मणजे आपल्या हिंदुस्थानाविषयीं मोठी निराशा उत्पन्न होते आणि असें वाटतें कीं, ज्यांनीं आपल्या बुद्धिबलानें, बाहुबलानें व कर्तबगारीनें त्याला एकदा वैभवाच्या अत्युच्च शिखरावर नेऊन बसविलें व सांप्रतच्या भरभराटीच्या शिखरास पोंचलेल्या राष्ट्रांस ज्यांनीं केवळ नग्नावस्थेंत गुरांचीं कातडीं पांघरतांना पाहिलें त्यांचेच आह्मी वंशज असतांना त्याच हिंदुस्थानदेशास मरणोन्मुख असा पाहत रहावें, हें आश्चर्य नव्हे काय? शरीरांत ताजें रक्त विपुल असलें ह्मणजे त्यांत जसा जोम व उत्साह असतो तद्वत् राष्ट्रांत पैसा व

बुद्धिमान् आणि कर्तृत्ववान लोक असले ह्मणजे त्यांत जोम आणि उत्साह असतो. दुर्दैवानें ह्मणा अथवा आमच्या शैथिल्यानें ह्मणा प्रस्तुत तो जोम आणि तो उत्साह आमच्यांतून अजिबात नांहींसा झाला आहे. कोठें कोठें स्वाभिमानाची ठिणगी स्फुरण पावलेली भासमान होते. परंतु रक्तहीन जसें शरीर तद्वत् साधनहीन तो स्वाभिमान होय, यामुळें आमच्या राष्ट्रांतील प्रत्येक विचारी पुरुष आपल्या देशाची सांप्रतची स्थिति पाहून तळमळत आहे. व्यापार, धंदा, उद्दीम, कारखाने, संस्था, कला, कौशल्य, सावकारी, शिक्षण वगैरे कोणीकडेही आम्हीं डोकावून पाहिलें म्हणजे आमच्या देशामध्यें केवळ धुगधुगी राहिली आहे असेंच वाटतें. त्यामुळें हा आमचा देश केव्हां नामशेष होईल याचा नेम नाहीं; आणि आपण अथवा आपलीं मुलें यांच्या देखत त्यानें राम ह्मणणें हें अत्यंत कष्टप्रद व दुःखमय होय. तथापि अशा दुःखांतही येवढें बरें आहे कीं, आमच्यांत अझून बुद्धिमान् लोक बरेच आहेत. तसेंच आपल्या देशाची चोहोंकडून झालेली निकृष्टावस्था पाहून खरोखर तळमळणारे लोकही पुष्कळ आहेत. परंतु एका पैशावांचून ते गाय झाले आहेत! त्यावांचून त्यांचे उदात्त विचार, दिव्य कल्पना व भगीरथ प्रयत्न जागचे जागींच जिरत आहेत आणि केवळ त्या पैशावांचून आपलें सुंदर राष्ट्र आज निराशारूपी महासागरांत अजिबात बुडत चाललें आहे. परंतु जरी तें बुडत चाललें आहे तरी परकीयांना, त्यांत त्यांच्या पुरता

अजून पुष्कळ राम आहे अशी खात्री असल्यावरून त्यांनीं त्यास पारतंत्र्यरूपी नांगरानें जखडून टाकिलें आहे. त्यामुळें तो बिचारा हिंदुस्थानदेश त्या निराशारूपी महासागरांत इतस्ततः हेलकावे खात राहिला आहे. तो इतका कीं, साधारण मनुष्यानें त्याची जर प्रस्तुतची दैन्यावस्था पाहिली तर त्याबद्दलची त्याची सर्वस्वीं निराशा झाल्यावांचून कधींही राहणार नाहीं. परंतु नाहीं. तुकाराम महाराजांनीं म्हटल्या प्रमाणें प्रभूला अशक्य असें कांहीं नाहीं. म्हणून त्याला अनन्य भावें शरण जाऊन आपल्या राष्ट्राच्या भरभराटीच्या उद्योगास लागणें, आपलें कर्तव्य आहे असें समजून, प्रत्येकानें आपापल्या शक्त्यनुरूप देशकार्य करीत गेलें पाहिजे. अथवा कायावाचा मनेंकरून जे कोणी तें करीत असतील, त्यांच्याकडे नव्हे, तर त्यांच्या केवळ उद्देशाकडे पाहून त्यांस त्यांनीं अंतःकरणपूर्वक मदत दिली पाहिजे, म्हणजे आज नाहीं उद्यां आपणांस खात्रीनें यश येईल.

शरीरांत जर ताजें रक्त नाहीं तर जसें शरीर चालावयाचें नाहीं तद्वत् राष्ट्रांत जर पैसा नाहीं तर त्याचे हातून कोणतेंही राष्ट्रीय कार्य होणें नाहीं असें आम्हीं वर म्हटलेंच आहे. म्हणून प्रस्तुत तिकडे सर्वांनीं लक्ष देणें अवश्य होय. आपला पैसा परदेशांत गेला व आपण दरिद्री झालों; ही गोष्ट जरी आज प्रत्यक्ष दिसत असली तरी सर्वांनीं मनावर घेतल्यास राष्ट्रीयफंड जमणें अशक्य नाहीं. या फंडाचा कोणावरही भार घालावयाचा नाहीं. पण ज्याला

आपल्या देशाचें परमावधीचें दारिद्र्य दिसत असतांही संसृतिभार वाहण्याच्या हेतूनें महिन्याचे महिन्याला कांहीं तरी मिळवावेंच लागतें, अशा सामान्य मनुष्याला आपलें राष्ट्रीय कार्य म्हणून त्याकडे आरंभीं वर्षाच्या कांठीं निदान एक पैसा देण्यास जड जाईल, किंवा संकट पडेल अथवा वाईट वाटेल असें मुळींच नाहीं. हिंदुस्थान देश हा आपला आहे असें ज्यांस खरोखर मनापासून वाटतें असे लोक आज कोट्यावधी आहेत; आणि ह्या कोट्यावधी लोकांनीं दरवर्षास राष्ट्रीय फंडाकडे आरंभीं जरी एकच पैसा दिला, तरी त्याचे लक्षावधी रुपये दरवर्षी होण्याचा संभव असून त्या लक्षावधी रुपयांतून अनेक देशकार्यें व्हावीं आणि त्यांकडे ह्या मासिकपुस्तकाचा उपयोग व्हावा म्हणजे तत्संबंधाची चळवळ ह्यांतून वारंवार प्रसिद्ध होऊन ती पैसाफंड देणारांस कळावी हा हें मासिक पुस्तक काढण्याचा मूळ हेतु. आणि म्हणूनच याचें नांव "पैसाफंड मासिक पुस्तक" असें ठेविलें आहे. वस्तुतः पैसाफंडाच्या कामास यापूर्वींच सुरुवात झाली आहे. आणि पैसा फंडाचे यथार्थ उत्पादक रा० रा० अंताजी दामोदर काळे हे तें काम मोठ्या आस्थेनें करीत आहेत. परंतु त्यांची खटपट, तीस मिळणारें लोकांकडून प्रोत्साहन, त्यांच्या परिश्रमानें जमा झालेल्या पैशाची निरवण वगैरे गोष्टी आणि व्यापारधंदा, उद्यमकला, शेतकी वगैरेवर मधून मधून विद्वान् लोकांचे मार्मिक लेख प्रसिद्ध करून हिंदुस्थानच्या गंगाजळीचा मार्ग सर्वांस दाखविणें, वर्तमान पत्रांतून केवळ

अशक्य होतें. ह्मणून ती उणीव भरून काढण्यासाठीं हें मासिक पुस्तक काढणें भाग पडलें. त्याला लोकांनीं एकदां आपलें म्हटलें आणि आमच्या उद्दिष्ट कार्यास त्यांनीं हात-भार लावण्याचा निश्चय केला म्हणजे आमचें कर्तव्य आम्हां-लाही बजाविण्यास मोठीच उमेद येणार आहे. आणि आम-च्या देशाविषयीं सर्व लोकांच्या मनांत पूर्ण कळवळा उत्पन्न करून तो सच्चिदानंद प्रभू त्यांचे ठायीं पैसाफंडा विषयीं विशेष प्रेरणा करो व राष्ट्रीय फंड हें नांव यथार्थ करण्याचा सुदिन तो लौकरच आणो अशी त्याची प्रार्थना करून आम्ही पुढें पाऊल टाकितों.

---

# "पैसा फंडाची" निरवानिरव.

शिरोलेखांतील शेवटच्या शब्दावर आजच येथें दोन शब्द लिहिणें ह्मणजे 'बाजारांत तुरी व भट भटणीला मारी' अशा पैकींच हास्यास्पद होणार आहे हें उघड आहे. पण पैसा हा शब्दच असा कांहीं चमत्कारिक आहे कीं, तो दुर्जनास 'मुखमस्तीति वक्तव्यम्' चा मार्ग पूर्णपणें खुला करतो. सबब केवळ राष्ट्रहिताकडे लक्ष देऊन ज्यांनीं आप-णाला "पैसा फंड" गोळा करण्यास सर्वस्वीं वाहून घेतलें आहे अशा रा. काळे सारख्या गृहस्थांच्या खटपटी संबंधानें व त्यांनीं गोळा केलेल्या वर्गणी संबंधानें कोणालाही

विनाकारण भ्र काढतां येऊं नये व कोणाचाही गैरसमज होऊं नये ह्मणून तत्संबंधाचा येथें कांहींसा उल्लेख करणें भाग आहे.

हिंदुस्थानची लोकसंख्या जसजशी वाढत आहे तसतसें त्याचें दारिद्र्यही वाढत चाललें आहे. पण पहिलीनें मनावर घेतल्यास ती दुसऱ्याचा तेव्हांच पराभव करूं शकणार आहे. आणि तसें व्हावें येवढ्याकरितां तर "पैसा फंडा" चा जन्म. तेव्हां सकृद्दर्शनीं पहिला प्रश्न असा उद्भवतो कीं, पैसा पैसा ज्या अर्थी वार्षिक वर्गणी आहे त्या अर्थी ती रा० काळे सारख्यांच्या खटपटीनें सहज वसूल होण्याचा संभव आहे. पण पुढची वाट? त्याचें उत्तर:--कोणतेंही राष्ट्रीय कार्य पूर्णपणें तडीस नेणें आहे तर त्याला थोडे पैसे पुरत नाहींत. आणि पुष्कळ पैसे जमेपर्यंत ते नुस्ते वसूल करणें येवढेंच कायतें रा. काळे या सारख्यांचें काम. सबब त्यांच्या व त्यांच्या सारख्या इतर सद्गृहस्थांच्या निरपेक्ष खटपटीनें जो पैसा वसूल होईल तो प्रस्तुत पांचशें रुपये जमेपर्यंत केसरीकारांजवळ जमा राहील व त्याची व्यक्तिशः पोंच "पैसा फंड" मा० पु० तून येईल. इंग्रजसरकारची राज्यव्यवस्था सामान्यतः अशी आहे कीं, खेडेगांव पाटील कुळकर्ण्यांचे ताब्यांत, अनेक गांवें मिळून झालेला तालुका मामलेदाराचे ताब्यांत, अनेक तालुक्यांचा बनलेला जिल्हा कलेक्टराचे ताब्यांत, कलेक्टर्स कमिशनरांचे ताब्यांत व कमिशनर्स इलाखाधिपति ह्मणजे गव्हरनरांचे ताब्यांत. त्याचप्रमाणें पैसा

फंडाची मोर्चे पांचशें रुपयांवर गेली ह्मणजे लोकांचा ज्यांचेवर पूर्ण विश्वास आहे, जे खरोखर लोकप्रिय आहेत, लोकहित हें ज्यांचें ब्रीद आहे, किंबहुना कविकुलगुरूनें ह्मटल्याप्रमाणें लोकांकरितांच ज्यांचा जन्म आहे अशा धुरीणांच्याच हातीं हा पैसा देणें आहे व त्यांच्याच विद्यमानें जिल्हा-कमेटी, तालुका व गांव कमेटी स्थापन होऊन पैसा फंडाचा वसूल जेणेंकरून सुरळीत व बिनबोभाट पार पडत जाईल अशीच व्यवस्था लागेल अशी आशा आहे.

आतां पैसाफंडाचा विनियोग ज्याअर्थी राष्ट्रीय कामाकडे व्हावयाचा आहे त्या अर्थी तो गोळा करण्यास **सुबोध पत्रिकेनें** ह्मटल्या प्रमाणें अनेक **काळे** उत्पन्न झाले पाहि-जेत हें खरें आहे. पण ते जोंपर्यंत उत्पन्न होत नाहींत व आपल्या कुटुंब सौख्यावर पाणी सोडून स्वतःला या कामासाठीं वाहून घेत नाहींत तोंपर्यंत आमच्या एकाच **काळधांनीं** कंबर बांधून हातीं घेतलेलें कार्य तडीस नेलें पाहिजे व आपल्या जोमाप्रमाणें तें ते तडीस नेण्याचा यथाशक्ति यत्न करीत आहेत ही मोठ्या संतोषाची गोष्ट आहे. विशेष लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही आहे कीं, रा. काळे यांच्या खटपटीचा परिणाम लहान लहान मुलांवर सुद्धां होऊन ते आपण होऊनच पैसा फंड गोळा करूं लागले आहेत. आणि वर्ड्स्वर्थ कवीनें ह्मटल्या प्रमाणें Child is the father of man ह्या ह्मणीचा मोठ्या मनुष्यांचे मनावर कांहींतरी इष्ट असा परिणाम होईलच.

तेंव्हां इतक्यांच्या परिश्रमानें जमत असणाऱ्या पैसाफंडाचा दुर्विनियोग होईल अशी कोणीही स्वप्नांत सुद्धां कल्पना करूं नये.

सारांश, 'पैसाफंडा' च्या निरवानिरवी विषयीं सर्वांनीं स्वस्थ असावें व रा. काळ्यांचीच वाट न पाहतां **केसरीकार**, पुणें, डाक्तर देशमुख, मुंबई; अथवा दुसऱ्या कोणाही नामांकित गृहस्थाकडे सर्वांनीं ही राष्ट्रीय वर्गणी पाठविण्यास सुरवात करावी अशीं त्यांस आग्रहपूर्वक विनंति आहे. आणि जे कोणी "पैसा फंडाचा" पहिला वार्षिक रिपोर्ट पाहतील त्यांना तर ह्या अत्यंत अवश्यक अशा राष्ट्रीय सत्कृत्यास यथाशक्त्या मदत देण्याचा विलक्षण हुरूप येऊन त्याचें रूपांतर कायमच्या निश्चयांत होईल अशी आशा आहे. परमेश्वर आमची ही आशा सफल करो.

---

# नवीन पुस्तकें.

## 'पैसा फंडाचा' पहिला वार्षिक रिपोर्ट.

सदरील रिपोर्टाची एक प्रत रा. रा. अंताजी दामोदर काळे यांनीं आमचेकडे अभिप्रायार्थ पाठविली तिचा, आम्ही आभारपूर्वक स्वीकार करून विहंगमदृष्टीनें तिचें निरीक्षण करितों.

पण तसें करण्यापूर्वी येथें एकदोन गोष्टी वाचकांस कळविल्या पाहिजेत. एक तर "पैसा फंड" ह्या मासिक पुस्तकाचे मूळ उत्पादक रा. काळे हे होत. आणि प्रस्तुतचा रिपोर्ट लिहिलेला आहे त्यांनींच. तेव्हां ह्या रिपोर्टाचें निरीक्षण करितांना 'गुळाचा गणपती आणि गुळाचाच नैवेद्य' होईल अशी कदाचित् कोणाला शंका येईल. पण तसें त्यांनीं समजूं नये. कारण प्रस्तुत मासिक पुस्तक जरी त्यांचें आहे आणि ते जरी त्याचे उत्पादक आहेत तरी संपादक आणि उत्पादक ह्या व्यक्ति अगदींच भिन्न आहेत. दुसरी गोष्ट अशी आहे कीं, रणभूमीचे मैदानांत, तालीमबाजाचे आखाड्यांत, आणि वाग्देवीच्या साम्राज्यांत कोणीही कमी अधिक दर्जाचे स्त्रीपुरुष उभे राहोत, त्या सर्वांची योग्यता सारखी समजली जाते. तेथें आपपरभाव मुळींच राहत नाहीं. ह्मणून आपल्या कृतींतील गुणदोषदिग्दर्शन यथार्थ व्हावें अशी ज्याची उत्कट इच्छा असेल त्यानेंच वाग्देवीच्या साम्राज्यांतील पुस्तकपरीक्षणरूपी भट्टींत आपली सुवर्णरूपी कृती तावून सुलाखून घ्यावी. गुण असल्यास तें बावनकशी सोनें ह्मणून ठरेल, व दोष असल्यास त्याप्रमाणें तिची विल्हेवाट लागेल. मात्र पुस्तकपरीक्षणरूपी भट्टी जो लावील त्याला ती साधली तर या तोंडाच्या दवडलेल्या वाफेचा उपयोग. कारण कृती काय आणि भट्टी काय सर्वांनाच साधते असें नाहीं. असो. ज्या फंडांत पैसा दिला तरी चालतो तो पैसा फंड! त्याकरितां

गेल्या ह्मणजे १९०२ सालीं रा. काळे यांनीं जो दीर्घ प्रयत्न केला त्याची हकीकत या रिपोर्टांत आहे. ती वाचली ह्मणजे एका सुभाषितकारानें ह्मटल्याप्रमाणें:—

परोपकाराय फलंति वृक्षाः ।
परोपकाराय वहंति नद्यः ॥
परोपकाराय उदेति भानुः ।
परोपकाराय सतां विभूतयः[1] ॥

रा. काळे यांचा जन्म आपल्या राष्ट्रा करितां आहे असें वाटूं लागतें आणि हा रिपोर्ट जोंजों वाचीत जावें तोंतों ही कल्पना अधिकाधिक दृढ होत जाते. नाहींतर जळेना तो देश ! करायचें काय आपल्याला त्याच्याशीं ? आपलें खुशाल खावें, प्यावें आणि चैन करावी ! या कल्पनेचे मनुष्यरूपी मृग आमच्या आर्यावर्तारण्यांत थोडे आहेत असें नाहीं. आणि ते पुष्कळ आहेत म्हणूनच परकीय देशांतील व्याध इकडे येऊन त्यांवर अचुक बाण मारतात आणि त्यांचें सर्वस्व घेऊन जातात ! तरी त्यांचे डोळे उघडत नाहींत ! ! ! यांत त्यांचा अपराध नाहीं. हें केवळ आमच्या देशाचें दुर्दैव होय. त्याचा पाडाव यत्नवादी होऊन केला पाहिजे. आणि तेवढ्याच करितां म्हणजे आपलें जें, परकीय लोक परकीय देशांत घेऊन गेले आहेत तें परत

१ गोल्डस्मिथनेंही एके ठिकाणीं असेच उद्गार काढिले आहेत:—

"And wiser he, whose sympathetic mind"
"Exults in all the good of all mankind"

आणण्याचें राहो घटकाभर एकीकडे, पण जें अगदीं थोडें आपल्या पाशीं आज उरल्याचा भास मात्र होत आहे तेव-ढ्यांतून जरी एकएक थेंब गोळा करून त्याचा सद्व्यय केला तरी पुष्कळ आहे. आणि आम्हांला आज जी हजारों काळ्यांची जरूर आहे ती येवढ्याच साठीं. दारिद्र्यानें आपणास गिळलें आहे व परवशतेनें आपले हातपाय फारच बळकट जखडून टाकले आहेत. तेव्हां अशा स्थितींतून मान वर करावयाची म्हटली तर त्याला रा. काळ्यांची अंगीकृत मात्राच रामबाण उपाय आहे. आणि ' सर्वारंभा-स्तंडुलाः प्रस्थमूलाः ' ही म्हण ध्यानांत घेतली म्हणजे ( त्या मात्रारूपी ) फंडाचें महत्व कळून येईल. कारण त्यावरच देशाचें अस्तित्व, उन्नति, वैभव, शांतता, आणि वेदान्त अवलंबून आहेत. असो.

रा. काळे यांची स्थिति आणि प्रस्तुतचा रिपोर्ट पाहिला ह्मणजे ह्या रिपोर्टाबरोबर त्यांचें अभिनंदन न करण्या इतका कोणी कृतघ्न असेल असें वाटत नाहीं. ता० २२ अक्टोबर १९०१ पासून ता० २६ आगस्ट १९०२ पर्यंत घरची कांहीं काळजी न वाहतां एकशें पस्तीस गांवें हिंडून लोक-मत अनुकूळ करून पैसा फंडाविषयीं त्यांचे मनांत काय-मची प्रेरणा करून सोडणें सामान्य काम नव्हे. या कामांत रा. काळे यांना पुष्कळ ठिकाणीं यश मिळत गेल्यानें एक दोन ठिकाणीं आलेल्या अडथळ्याबद्दल वाईट वाटतेसें प्रस्तुत रिपोर्टावरून दिसतें. (अपूर्ण.)

# वर्तमानसार.

**आरा**—येथें मोठ्या लोकांचें एक लग्न होतें. तेथें नाचा करितां एक मंडप उभारला होता. नाच चालला असतां मंडपास आग लागून त्यांत २।२ मडमा जळून गेल्या. नवऱ्या मुलीचे केंस जळले व सुमारें ७५ इष्टमित्र मंडळीला इजा झाली ईश्वरी कोप!

**दरोडा**—नागपुरा नजीकच्या बांधा बाजारांतील प्रसिद्ध शेट गुलबारी मल यांच्या वरावर नुकताच २५ काबुली पठाणांनीं रात्रीच्या वेळीं हल्ला करून घरांतील मंडळीस चांगलासा मार देऊन १० हजारांचा विषय लांबविला! रयतेपाशीं हत्यारें नसल्यामुळें तिचें रक्षण करणें हें मायबाप सरकारचें काम आहे.

मि. **टाटा**—हे महाबळेश्वराहून मुंबईस येत असतां सातारा येथें उतरले होते. तेव्हां त्यांस तेथील युनियन क्लबकडून पानसुपारी देण्यांत आली. या दानशूर गृहस्थास पहाण्यासाठीं पुष्कळ लोक जमले होते.

**नाशीक**—येथील वेश्यांची वस्ती शहरच्या भरवस्तींतून काढून टाकण्याबद्दल मुंबई सरकारानें ठराव प्रसिद्ध केला असून त्याची अंमलबजावणी चालली आहे. हें सरकारचें कृत्य वाईट असें कोण म्हणेल ?

## "पैसा फंड" मासिक पुस्तकाच्या वर्गणीची पोंच.

| | | |
|---|---|---|
| रा. रा. विष्णू हरी बर्वे–मुंबई | .... .... | ०८ |
| रा. रा. सदाशिव वासुदेव परांजपे–परळ | .... | ०११ |
| रा. रा. शंकर काशिनाथ बर्वे–जालगांव | ... | ०११ |
| रा. रा. शंकर वासुदेव परांजपे–कोल्हापूर | .... | ०११ |
| रा. रा. विनायक शिवराम पिंपुटकर–उंबरगांव | | ०८ |
| रा. रा. मोरेश्वर महादेव मुळे–उंबरगांव | .... | ०८ |
| रा. रा. नारायण विनायक कारुळकर–उंबरगांव | | ०८ |
| रा. रा. महादेव चिंतामण पेंडसे–आगाशी | | ०८ |
| रा. रा. शिवाजी महादेव म्हात्रे–आगाशी | .... | ०८ |
| रा. रा. नरोत्तम लालजी अढिया–डाहाणू | .... | ०८ |
| श्री.रा. रा. आपाजी रामचंद्र शेवडे राई (रत्ना०) | | ०११ |

सदरहू गृहस्थांप्रमाणेंच इतर वर्गणीदारही आगाऊ वर्गणी पाठवून आह्मांस आभारी करतील अशी आशा आहे.

अं. दा. काळे.

व्ही. के. लोंढे यांचें

# बालामृत.

सांप्रत सर्वत्र आमचेंच बालामृत खपतें याचें कारण इतर बालामृता प्रमाणें यानें जंतविकार उत्पन्न होत नाहीं व अनुभवीक गुणकारी अशा वनस्पतीनें बनविलेलें असल्यामुळें लहान मुलांच्या सर्व प्रकारच्या रोगांवर अत्यंत गुणकारी असून मुलांस सशक्त करणारें अप्रतीम आहे. ज्यास्त न लिहितां एकवेळ वापरूनच पाहण्याविषयीं विनंति आहे. किंमत १ बाटलीस १२ आणेच असून उत्तम गुणास फक्त तीन बाटल्या लागतात.

आमचीं सर्व प्रकारचीं अत्यंत गुणकारीं औषधें विक्रीस तयार आहेत. हीं औषधें एक वेळ वापरल्या अंतीं त्यांच्या गुणाबद्दल खात्री होईल.

**अडत**—आम्हीं मुंबईतील हरएक तऱ्हेचा माल माफक कमिशन घेऊन वेळच्वेळीं बाहेरगांवीं रवाना करितों. आमच्या चोख व्यवहाराबद्दल पुष्कळ लोकांची खात्री झाली आहे. व्यवहारांतीं पूर्ण खात्री होईल.

☞ प्रसिद्ध ठिकाणीं एजंट्स पाहिजेत.

**वि. के. लोंढे, पोष्ट–गिरगांव, मुंबई.**

ठाणे मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या ...
१०।८।

वर्षास आगाऊ वर्गणी फक्त ८ आणे. ट. ख. ३ आणे.

# "पैसा फंड"

## मासिकपुस्तक.

वर्ष १ लें.] आगष्ट १९०३. [अंक २ रा.

### विषयानुक्रमणिका.

| विषय. | पान. |
| --- | --- |
| विनंती | १३ |
| स्फूट | १९ |
| नवीन पुस्तकें | २१ |
| पैसा फंड व रा. काळे | २२ |
| वर्तमानसार | २५ |

---

व्यवस्थापक,

**पुरंदरे आणि कंपनी.**

माधवबाग:—मुंबई.

संपादक,

**एकनाथ गणेश भांडारे.**

किंमत १ आणा.

'विजय' छा० माधवबाग मुंबई.

## पत्राचा सारांश व त्यांस उत्तर.

रा. रा. **मोरो सदाशिव मराठे,** राई;–लिहितात कीं, (१) " उद्देश या सदराखालीं लिहितांना " पैसाफंडाची" चळवळ तो देणारांस कळावी, हा हें मासिक पुस्तक काढण्याचा ' मूळ हेतु ' असें लिहिलें आहे; त्यांत ' मूळ हेतु ' चे जागीं ' हा एक पहिला हेतु ' असें हवें होतें.... (२) जो सर्वांसाठीं श्रम करण्यास एका पायावर मानापमान, प्रवासाचे श्रम, घरची काळजी सोडून तयार, त्यांचे ( रा. काळे यांचें ) कुटुंबाचें पोषण करावयाचें कोणी ? त्यांच्या सारख्याच लोकांनीं..... हें ज्या थोड्या माणसांस समजतें, तीं निरनिराळ्या रीतीनें मदत करीत आहेत व पुढेंही करतील असा भरंवसा वाटतो.........तरी ती मदत अपुरी आहे व तशा मदतीनें रा. काळ्यास परावलंबन वाटतें, ह्मणून त्यांस मदत व्हावी• हा दुसरा हेतु या मासिक पुस्तकाचा ( असावा ) निदान एक हजार वर्गणीदार झाल्याशिवाय काळ्यांचे प्रपंचास मदत होईलसें वाटत नाहीं..... (३) हल्लीं जरी काळे हे ह्या मासिक पुस्तकाचे मालक आहेत व अखेरपर्यंत तेच असावेत हें रास्त आहे तरी त्यांस दरमहा २०।२५ रुपये पडत पर्यंत हें त्यांचें आहे. पण जास्त पैदास होऊं लागली कीं, ती पैसाफंडासाठीं वाहून घेणारास मोबदला ( ह्मणून ) हक्कानें मिळावयाची आहे हा एक ( या मा. पु. चा तिसरा हेतु ( असावा. ) प्रथमच हेतु स्पष्ट झाले ह्मणजे पुढें त्या बाबतींत कोणाचा

बोल राहणार नाहीं व गैरसमज होणार नाहीं. हें त्यांचें माझें स्पष्ट बोलणें होऊन ठरलें आहे. व ते रा. काळ्यांनीं या मा.पु.द्वारें सर्वांस जाहीर करावें असें मला वाटतें' वगैरे.

यांवर आमचें उत्तरः—(१) या मा. पु. चा ' मूळ हेतू ' पैसाफंडाची चळवळ तो देणारास कळावी असें जें आह्मी लिहिलें आहे तेंच बरोबर आहे. विशेष माहिती करितां दुसरीकडे दिलेला लेख पहावा. (२) जे सद्गृहस्थ रा. काळे यांचे कुटुंबास मदत करीत आले व करतात त्याबद्दल त्यांचे ते फार ऋणी आहेत. तथापि त्यांचे व त्याचप्रमाणें स्वतःला जे कोणी महात्मे निरपेक्षबुद्धीनें पैसाफंडास वाहून घेऊन तत्प्रीत्यर्थ भगीरथ प्रयत्न करतील त्यांचे कुटुंब पोषणाकडे या मा. पु.ची शिल्लक दिली जाईल, पण अशा गोष्टीला आपण ह्मटल्याप्रमाणें वर्गणीदार पुष्कळ झाले पाहिजेत. (३ )याचें उत्तर वर दिलेंच आहे. विशेषतः दुसरीकडे दिलेल्या लेखानें व आपणांस दिलेल्या ह्या उत्तरानें सर्वांचा ' गैरसमज ' दूर होईल अशी आशा आहे.

आपल्या प्रेमपूर्वक सूचनांबद्दल आह्मीं आपले उपकार मानितों. असाच लोभ असावा.

---

**साभार पोंच**—राजापूर सं० कंपनीचे मालक मि. राणे यांनीं या मासिक पुस्तकास ५ रु० व रा. लक्ष्मण गणेश मुळे यांनीं १ रु० मदत केली, याबद्दल व्यवस्थापक त्यांचे फार फार उपकार मानितात.

# वर्गणीची पोंच.

## मुंबई

आणे.

रा. रा. गजानन चिंतामण देव. ८
,, बळवंत विष्णु परचुरे. ८
,, भास्कर नारायण परचुरे. ८
,, विष्णु विठ्ठल हेले. ८
,, कृष्णाजी विष्णु जोशी. ८
,, विश्वनाथ कृष्ण रानडे. ८
,, के. टी. डोंगरे. ८
,, जी. के. देवधर. ८
,, गोपाळ त्र्यंबक गाडगीळ ८
,, कृष्णाजी गणेश मुळे. ८
,, वासुदेव धोंडदेव निमकर ८
,, वामन रामचंद्र जोशी. ८
,, दामोदर हरी देउसकर. ८
,, धोंडो काशिनाथ फडके. ८
,, नारायण मोरेश्वर कर्वे. ८
,, श्रीपाद गंगाधर जोशी. ८
,, मोरेश्वर केशव केळकर. ८
,, कृष्णाजी भिकाजी सोहोनी ८
,, महादेव बळवंत बापट. ८
,, कृष्णाजी नारायण काळे. ८
,, रघुनाथ कृष्ण सांवले. ८
,, बेडेकर, पटवर्धन आणि कंपनी. ८
,, वामन गोपाळ काळे. ८
,, दामोदर कृष्ण कानडे. ८
,, विष्णु नारायण जोशी. ८
,, केशव भिकाजी ढवळे. ८
,, कृष्णाजी नारायण कर्वे. ८
,, पांडुरंग शास्त्री पिटकर. ८
,, छोटालाल शामजी. ८
,, मोरेश्वर सखाराम मोने ८
,, से. मराठी ग्रंथ संग्रहालय. ८
,, लक्ष्मीकांत अनंत जोशी ८
,, नागेश जिवाजी निमकर ८
डॉ. जी. बी. पटवर्धन ८
डॉ. जे. आर. मुरकुटे ८
रा. रा. पाटणकर आणि मंडळी. ८
,, दामु अण्णा वेलणकर. ८
,, विष्णु पांडुरंग तेंडुलकर ८
,, महादेव नागेश जोगळेकर. ८
,, मोरेश्वर रघुनाथ शितुत. ८
,, त्रिंबक रावजी ओक. ८
,, हरी केशव आचार्य. ८
,, भार्गव शिवराम काळे. ८
,, मोरो पांडुरंग निमकर ८
,, गजानन मोरेश्वर जोशी. ८
,, हरी सखाराम तेरे. ८
,, रघुनाथ शंकर गोखले. ८

बाकीची पोंच पुढील खेपेस.

# "पैसा फंड"

मासिकपुस्तक.

वर्ष १ लें.] आगष्ट, सन १९०३. [अंक २ रा.

## विनंति.

कणशः क्षणशश्चैव विद्यामर्थं च साधयेत्

देशबांधव हो! आपला देश अत्यंत दरिद्री झाला आहे. सुमारें तीस कोट प्रजेपैकीं आज चार कोट प्रजा उपाशी मरत आहे. देशांतील सर्व धंदे परकियांनीं आटोपले आहेत. सुईच्या दोऱ्यापासून मोठ्यामोठ्या इमारती, कारखान्यांपर्यंत मानवीगरजा भागविण्याचा त्यांणीं जणुं मक्ताच घेतला आहे. आणि आम्हीही असे खमंग बनलों आहोंत कीं त्यांना गिऱ्हाइकांची वाण ह्मणून पडूं द्यावयाचीच नाहीं! या आमच्या ऐदीपणानें आमच्यांतील कर्तबगारी नाहींशी झाली आहे. आम्ही कमालीचे ऐष आरामी, मिजाशी, सुखाभिलाषी व आळशी झालों आहों. जोंपर्यंत मेहनत न करतां सुखानें खावयास मिळून टाकठिकीनें राहतां येईल तोंपर्यंत त्या गोष्टीस मागें न सरण्याची

संवय आमच्या हाडांमांसांत खिळून गेली आहे. त्यामुळें आह्मी नौकरीचे बंदे गुलाम बनलों आहों. तीवांचून सुख दुसऱ्या कशांत नाहीं अशी आमची समजूत होऊन बसली आहे. परंतु देशहिताच्या दृष्टीनें ती अत्यंत घातक आहे. आणि तिचाच परिणाम आज रोज उपाशीं मरणाऱ्या आमच्या चार कोट लोकांस अंशतः भोगावा लागत आहे असें ह्मटल्यास हरकत नाहीं. उद्योगधंद्यांवरचें आमचें मन उडालें. ' कलौ संघे शक्तिः ' या वचनावरील आमचा विश्वास नाहींसा झाला. व ज्याला जसें वाटेल तसें तो मनसोक्त वर्तूं लागला. यामुळें आमच्यांतील एकी नाहींशी झाली. आह्मी हतवीर्य बनलों. आणि आजचा दिवस अब्रूनें गेला, उद्यांचा कसा जाईल या विवंचनेंत आह्मी पडलों !

इकडे देशस्थिति पाहिली तर ती सुद्धां चांगली आहे असें नाहीं. आमचे धंदे जसे परकीयांनीं आटोपले आहेत तद्वत् आमच्या राष्ट्रीय स्वातंत्र्याचाही त्यांच्या सत्तेनें पूर्ण खग्रास करून टाकला आहे. जमिनीची मशागत करण्यास अथवा शेतसारा भरण्यास बिचारे शेतकरी असमर्थ झाले आहेत. वारंवार पडणाऱ्या दुष्काळांत पैशाचा अति भयंकर दुष्काळ सारखी भर घालीत आहे. आणि त्यामुळें केवळ प्राण वाचविण्यासाठीं अगदींच थोड्याशा रोजमुऱ्याकरितां भर उन्हांत खडी फोड फोडून त्यांचे हातास फोड येत आहेत. स्वतंत्र धंदे करण्यास भांडवल मिळेनासें झालें आहे. पैशाच्या व्यवहारांत प्रत्यक्ष बापाचा विश्वास मुलास येईनासा

झाला आहे. नोकऱ्या कराव्या तर त्या कोठें मिळत नाहींशा झाल्या आहेत. आणि परदेशीं वसाहत करण्यास जावें तर दक्षिण आफ्रिकेंत व आस्ट्रेलियांत आपल्या लोकांची कोण पायमल्ली होत आहे हें आपण वर्तमानपत्रांतून वाचितच आहों !

परकीयांनीं धंदे काढले तर त्यांचे देशबांधव त्यांना उत्तेजन देतात आणि ते धंदेवालेही हातीं घेतलेला धंदा मोठ्या हुरूपीनें भरभराटीला आणून सोडतात. पण आमच्यांत तसें होत नाहीं. आधीं आमच्यांत मोठ्या प्रमाणावर धंदे अगर कारखाने फारसे निघत नाहींत: आणि निघाले तर ते चिरस्थायी होत नाहींत. ह्मणून धंद्यांत भांडवल घालण्यासही फारसें कोणी धजत नाहीं. यामुळें कष्टाळू अशा गोरगरिबांची उपासमार होते. त्यांना उद्योगाची व नोकरीची वाण पडते. आणि मग शेवटीं ‘ न्याय्यं वा विपरीतं वा ’ ते वाटेल तो मार्ग पतकरून आपल्या जठराग्नीस शांत करितात.

सारांश, कोणीकडेही पाहिलें तरी उद्वेग व नाउमेद यांखेरीज कांहींएक दिसत नाहीं. पण असें कां असावें हा मोठा विचार करण्यासारखा प्रश्न आहे. आणि त्याचा विचार आमच्या देशबांधवांनीं करण्याची वेळ हीच आहे. त्यांपैकीं अनेकांनीं आपापल्यापरी या प्रश्नाचा विचार करून ज्यांना जी दिशा सुचली त्यांनीं त्या दिशेनें यथाशक्ति प्रयत्न करून पाहिले. पण त्यांत त्यांस ह्मणण्यासारखें यश

आलें नाहीं. कित्येकांच्या मतें याचें मूळ कारण आमच्यांत धमक, उत्साह, करारीपणा व एकी नाहीं हें होय. पण या कारणशोधकांनांही आमचा असा प्रश्न आहे कीं, ती धमक, तो उत्साह, तो करारीपणा व ती एकी आमच्यांतच तेवढी कां नसावी? याचें कारण 'आमचें दारिद्य' आहे असें आमच्या अल्पमतीस वाटतें. तेव्हां त्या दारिद्याचा आपण विचार करणें अवश्य नाहीं काय? अवश्य आहे. पण आमचें दारिद्य व्यक्तीला दाद देणारें नव्हे. तेव्हां तें आमचें आह्मींच घालविलें पाहिजे हें उघड आहे. येथें आह्मीं या शब्दाचा अर्थ आमचें राष्ट्र असा समजावयाचा. राष्ट्रांत अनेक ज्ञाति असतात. ज्ञातींत अनेक समाज असतात. समाजांत अनेक कुटुंबें असतात आणि कुटुंबांत अनेक व्यक्ति असतात! ह्मणजे पर्यायानें असें ह्मणावयाचें कीं, राष्ट्र ह्मणजे अनेक व्यक्ति. जेथें प्रत्येक व्यक्ति दरिद्री होत चालली आहे तेथें तिचें राष्ट्र कधींही श्रीमंत असूं शकणार नाहीं. ह्मणून जर प्रत्येक व्यक्ति मनावर घेईल तर कुटुंबाचें कल्याण होऊं शकेल. आणि याच सरळ रीतीनें राष्ट्राचेंहि कल्याण होणें शक्य आहे. सबब अवतरणभागीं ह्मटल्याप्रमाणें पैसा पैसा करून जर आपण अर्थ निष्पन्न करण्याचा दृढ निश्चय केला तर तो सहज होऊं शकणार आहे.

वाचकहो! आपण हिंदु असा, मुसलमान असा, इंग्रज असा अगर ख्रिश्चियन असा; हिंदुस्थान हें आपलें राष्ट्र

आहे; त्यांत आपल्याप्रमाणें आपल्या पुढील पिढ्यांस सुखानें नांदतां यावें; स्वतः उद्योगधंदे करून त्यांना पूर्ण सुखाचा उपभोग घेतां यावा; व निदान त्यांच्या या भावी सुखाचें तरी आपण अंशतः कारण व्हावें असें आपणांस वाटत असेल—आणि तसें आपणांस वाटत असलेंच पाहिजे अशी आमची खातरी आहे— तर 'थेंबें थेंबें तळें सांचे' या ह्मणीकडे लक्ष द्या. आणि केवळ पैशाकरतांच जर आपली आज बहुतेक प्रत्येक बाबींत पीछेहाट होत आहे तर वर्षाच्या काठीं प्रत्येक व्यक्तीनें या राष्ट्रीय फंडास मदत नको का करीयला?

कोणी ह्मणेल या पैसाफंडानें हिंदुस्थानासारख्या अवाढव्य राष्ट्राला द्रव्याचें सहाय्य तें कितीसें होणार? हा प्रश्न विचाराचा आहे. पण त्याचें उत्तर मात्र त्या पृच्छकांचे अंशतः समाधान करणारें आहे. रा. ब. रघुनाथ महादेव केळकर, हे गेल्या मे महिन्याचे ग्रंथमालेंत ह्मणतात कीं "प्रत्येक मनुष्यानें एक वर्षभर पर्यंत निदान एक पै द्यावी. पै देणें भिकाऱ्यासही कठीण पडणार नाहीं. हिंदुस्थानची प्रजा ३० कोटी आहे. त्या मानानें २५०००००० आणे ह्मणजे १५६२५०० रु. दरमहा होतात. कमी जास्ती वसूल होईल असें मानिलें तरी दीड कोट रुपये एक वर्षांत होऊं शकतील." केवढी दांडगी रक्कम ही! अशा रीतीनें रक्कम जमल्यास आमच्या देशांतील पुढाऱ्यास संस्था चालविण्याचे कामीं जो मनस्वी त्रास होतो तो सहज टळेल.

रा. ब. केळकर हे दरमहा एक पै याचितात. ती कांहीं वावगी नव्हे. पण दूरवर विचार करून सध्यां आह्मी आपल्या याचनेचें प्रमाण दर चार महिन्यांस एक पै असें ठेविलें आहे. त्यामानानें वर्षास ४६,८७,५०० रु. होतात. ही सुद्धां रक्कम लहान आहे असें नाहीं. व चार महिन्यानें एक पै देण्यास अत्यंत कंगाल भिकारीही मागें सरेल असें वाटत नाहीं. तेव्हां या अत्यंत अल्प प्रमाणापासून वसूल होणाऱ्या रकमेचा व्यय देशोन्नतीच्या कामीं योग्य रीतीनें होत आहे, व त्यापासून आपलें हित होण्याचा फारच बळकट संभव आहे, अशी एकदां सर्वांची खात्री झाली म्हणजे रा. ब. केळकरांचें प्रमाण अमलांत आणण्यास उशीर लागेल असें मुळींच नाहीं.

मात्र येथें पुन्हां आमच्या देशबांधवांस द्विरुक्तीपूर्वक विनंति आहे ती हीच कीं ज्याप्रमाणें आपण धार्मिक, सामाजिक अथवा राष्ट्रीय सण पाळून त्या दिवशीं कर्तव्य ह्मणून करावयाच्या गोष्टी मोठ्या तत्परतेनें, कोणी सांगितल्या शिवाय, अथवा स्वतःच्याच प्रेरणेनें करतों; त्याच प्रमाणें आमच्या देशबांधवांनींही हें राष्ट्रीय देणें अवश्य समजून आपण होऊन आपल्या गांवांतील पुढाऱ्यांकडे तें दिलें पाहिजे व त्यांनींही आपल्या कर्तव्यास जागून ती रक्कम तालुका कमेटीच्या स्वाधीन केली पाहिजे अथवा ती सांगेल तशी त्यांनीं तिची व्यवस्था लाविली पाहिजे. एकदां या राष्ट्रीय वर्गणीस सुरुवात झाली म्हणजे लोकांचे विश्वा-

सास पात्र असे पुढारी पुढें येतील, कमिट्या स्थापन होतील, सर्व होईल. मात्र देशबांधव हो ! आपण आपल्या कर्तव्यास एकदम आरंभ करा.

तुमचा धर्म, तुमचा पंथ, तुमची ज्ञाति, तुमचे विचार, तुमचे आचार व तुमची कुलपरंपरा कोणती ही असो, तिचा आपण अभिमान राखा. पण आपल्या देशाचें दारिद्य जें सार्वत्रिक पसरलें आहे त्याचा मात्र परिहार आपण सारे एकदिलानें करूं या. त्यांत तुमचें जरी नसलें तरी तुमच्या भावी पिढ्यांचें खात्रीनें कल्याण आहे. तें कसें हें दाखविणें अवश्य आहे. परंतु आजच्या लेखाचा तो विषय नाहीं. सबब ती कामगिरी पुढील खेपेस बजाविण्याचें आश्वासन देऊन हें विनंति कलम खालीं ठेवितों.

## स्फुट.

**पैसाफंडाचा विनियोग**—या सदराखालीं ता. २१।७ १९०३च्या **केसरींत** N. B. R. यांनीं एक लहानसाच पण मोठा चटकदार लेख लिहिला आहे तो आमच्या वाचकांनीं पुन: पुन्हा वाचून विचार करण्यासारखा आहे. N. B. R. ह्मणतात ‘ प्रत्येक मनुष्यानें थोडें नुकसान सोसलें असतां अगणित देशकार्य होऊं शकतें. ’ या उदात्त तत्वावर रा. काळे यांच्या पैसाफंडाची कल्पना बस-

विलेली आहे. व ' हें तत्व जसजसें समाजांत जास्त प्रमाणानें फैलावत जाईल, तसतसा आपल्या देशाचा भावी उत्कर्ष जवळ येईल असें विचारी लोकांस वाटूं लागलें आहे. ' अक्षरशः खरें आहे. पण नुसतें 'वाटून' उपयोग नाहीं. त्या दिशेनें तसे निरपेक्षबुद्धीनें सतत प्रयत्न झाले पाहिजेत. अशा प्रयत्नांपासून ' पैसा पैसा ' करून राष्ट्रीय फंड जमण्यास फार कालावधि लागणार नाहीं. पण त्याचा योग्य ' विनियोग ' होण्याचीच मोठी पंचाईत आहे असें N. B. R. यांस वाटतें. ह्मणून पैसा ' फंडाच्या कांहीं भागाचा विनियोग' 'योग्यरीतीनें होण्यासाठीं त्यानीं आपले कडून ज्या सहा सात सूचना केल्या आहेत, त्या सर्व विचारांत घेण्यासारख्या आहेत. आणि त्यानीं त्या केवळ लोकहिताकडे लक्ष देऊन विचारपूर्वक केल्या आहेत ह्याबद्दल आह्मी त्यांचे फार आभार मानितों. तितका फंड जमला व तशा इलाखानिहाय वजनदार कमिट्या स्थापन झाल्या ह्मणजे N. B. R. यांच्या सूचनांचा खरोखर योग्य विचार होईल इतकेंच त्यांना आज सुचवून ठेवणें पुरे. मात्र त्यांच्या या लेखानें रा. काळे यांचेवर केवढी जबाबदारी आहे व दिवसानुदिवस ती किती वाढत जाणार याचाही विचार रा. काळे यांनीं करावा असें आह्मी त्यांस सुचवून ठेवितों.

# नवीन पुस्तकें.

## 'पैसा फंडाचा' पहिला वार्षिक रिपोर्ट.

(मागील अंकावरून पुढें चालू.)

विशेषतः नाशिक येथें रा. नीळकंठराव पाटणकर वकील बी. ए. एल्. एल्. बी. यांनीं रा. काळ्यांची जी संभावना केली तीबद्दल त्यांना फारच वाईट वाटल्याचें दिसत आहे. व तिचा कळस 'हलकटपणा' या शब्दांत झाला अशी त्यांची कल्पना आहे. पण याबद्दल रा. काळे यांनीं मुळींच उल्लेख करावयास नको होता. तसें झाल्यानें रा. पाटणकरांची योग्यता पाटणकरांनाच दिसून आली असती. उल्लेख केल्यानें नसत्या गोष्टीला महत्व दिल्यासारखें होतें. रा. पाटणकरांचें अध्यक्षी वक्तृत्व व रा. काळे यांची कृति हीं लोकांपुढें आहेत. तेव्हां त्याचा उलगडा व्यक्तिविशेषापेक्षां लोकांनींच करणें बरें असें आह्मांला वाटतें. तथापि रा. काळे यांची कल्पना जर अशी झाली असेल कीं, 'नाशिक येथें माझें नासिक (नाक) कापलें' तर त्यावर आह्मीं पुढील सुभाषिताचें मलम मोठ्या आनंदानें लावून ती जखम भरून काढितों:—

कनकभूषणसंग्रहणोचितौ
यदिमणिस्त्रपुणि प्रणधीयते
न स विरोति न चापिहि शोभते
भवति योजयितुर्वचनीयता ।

ह्मणजे सोन्याच्या कोंदणांत बसविण्याजोगा जो रत्नाचा अलंकार त्याला जर एखाद्यानें लोखंडाच्या कोंदणांत बसविलें तर तें रत्न रडतें असें नाहीं; तर योजकाच्या चातुर्याची मात्र चर्चा होते! आणि ज्यांनीं आपल्यास लोकहिताला वाहून घेतलें त्यांनीं तर तुकाराम महाराजांनीं ह्मटल्या प्रमाणें ' मानापमानाचें गोत्रें। अवघें गुंडाळुनि ठेवावें ' हें वाक्य नेहमीं लक्षांत बाळगलें पाहिजे. त्याखेरीज त्यांचे कृतीचा इष्ट परिणाम कोणावर कधींही होणार नाहीं. ते काळ्यांची जितकी निर्भत्सना करतील तितकी अंगीकृत कामगिरी रा. काळ्यांनीं निरपेक्ष बुद्धीनें अधिक बजाविली पाहिजे. ह्मणजे आज नाहीं उद्यां रा. पाटणकरांचें नाशिक पाटणकरांनाच भोंवेल!

---

# पैसाफंड व रा. काळे.

"पैसाफंड" मासिक पुस्तकाच्या दुसऱ्याच अंकांत शिरोभागीं दिलेला व्यक्तिविषयक लेख लिहावयाची पाळी येईल असें ' मालक ' आणि ' संपादक ' यांपैकीं कोणासही वाटलें नव्हतें. परंतु पहिला अंक बाहेर पडल्यावर बिचाऱ्या ' मालका ' संबंधानें जे तर्ककुतर्क निघावयास लागले आणि त्यांच्या उगमाचें स्थान सामान्य नाहीं असें जेव्हां आढळून आलें तेव्हां प्रस्तुत सारख्या व्यक्तिविषयक लेखास, आहे त्या अकुंचित जागेचाच थोडासा भाग द्यावा

लागत आहे ही केवळ निरुपायाची गोष्ट. "पैसाफंड" मासिक पुस्तक काढण्याचा मूळ उद्देश काय आहे हें प्रथमांकांत आलें आहे. असें असतां त्या उद्देशास भलतेंच रूप देण्याचा बूट निघावा, 'मालका' च्या निरपेक्ष प्रयत्नास निव्वळ थोतांड ह्मणावें, आणि प्रस्तुत मासिकपुस्तक 'पैसाफंडाच्या' नांवाखालीं केवळ उदरंभरीपणाचें लक्षण आहे ह्मणून त्यांची समजूत व्हावी ही मोठीच सखेदाश्चर्याची गोष्ट होय! तरी बरें आहे कीं, बिचाऱ्या मालकानें १२९ गांवें हिंडून पैसा पैसा करीत जो फंड केवळ राष्ट्रीय ह्मणून जमा केला तो परभारे 'केसरी' कडे पोंचता करून व करवून आपण आपला नांवानिराळा राहिला. इतकेंच नाहीं तर त्यांची व त्यांच्या कुटुंबाची अत्यंत दैन्यावस्था पाहून ज्या त्यांच्या अनोळखी व अकारण स्नेह्यांनीं त्यांच्या कुटुंब पोषणासाठीं व प्रवास खर्चासाठीं द्रव्यरुपानें मदत केली त्याचा सुद्धां त्यानें पैसाफंडाच्या प्रथम वार्षिक रिपोर्टांत पैन् पै हिशेब प्रसिद्ध केला आहे. असें असतां कांहीं बड्या बड्या धेंडांनीं वरच्या सारख्या भलत्याच शंका घेणें सर्वथैव अनुचित होय. पुन्हां एकवार येथें आह्मीं स्पष्टपणें असें ह्मणून ठेवितों कीं, पैसा फंड हा सार्वजनिक उर्फ राष्ट्रीय आहे. त्याला भारतवर्षांतील प्रत्येक ज्ञातींतील प्रत्येकानें मदत करणें अवश्य आहे. त्यावर कोणत्याही व्यक्तिविशेषाची सत्ता नाहीं. असें असतां जर कोणी अन्यायानें त्याचा अपहार करील, त्यापैकीं एखादी

पै सुद्धां जर कोणी खिशांत टाकील अथवा जेणेंकरून ह्या राष्ट्रीय कार्यास धक्का बसेल किंवा तत्संबंधानें लोकांचा भलताच ग्रह अगर अविश्वास उत्पन्न होण्याजोगें जर कोणी वर्तन करील तर त्याचा परिस्फोट कोणाचीही मुर्वत न धरतां या मासिक पुस्तकांतून केला जाईल. मग ते 'पैसाफंडाचे उत्पादक' रा. काळे असोत अगर इतर कोणी असोत. दुसरें, हें मा. पु. काढण्यांत रा. काळे यांचा अंतस्थ हेतु असा आहे कीं, या मा. पु. चा सर्व प्रकारचा खर्च वजा जाऊन जी थोडीशी शिल्लक उरेल तिची त्यांचे कुटुंबाचे चरितार्थास व जमल्यास प्रवास खर्चास मदत व्हावी. देशकार्य झालें तरी काय झालें? सर्वथैव परावलंबी बनून प्रवास न करणें चांगलें असें रा. काळ्यांस वाटतें. पण या कृत्यास निदान तीन हजार तरी कायमचे आश्रयदाते पाहिजेत. सुदैवानें त्यांची संख्या अधिक वाढल्यास त्या अधिक उत्पन्नांतून रा. काळे हे स्वतःसाठीं सोन्याचीं घरें खात्रीनें बांधणार नाहींत! तर त्याचा विनियोग त्याच्याच प्रमाणें जे कोणी स्वतःला पैसाफंडोत्पादनास निरपेक्ष बुद्धीनें वाहून घेणारे निघतील त्यांच्या प्रवासाकडे व कुटुंब पोषणाकडे केला जाईल. आजला जीं वर्तमानपत्रें व मासिक पुस्तकें आपापल्यापरीनें देशकार्य करीत आहेत त्यांच्या मालकांचा असा उद्देश असल्याचें बहुधां कोणी ऐकलें नसेल. पण निरुपाय जाणून असा थोडासा खुलासा करावा लागला. शिवाय पैसाफंडाप्रमाणें पैसाफंड मा. पु. चाही जमाखर्च आमच्या

आश्रयदात्यांपुढें ठेवीत गेल्यास वस्तुस्थितीची त्यांस तेव्हांच खात्री पटेल. आणि वरील उघड उघड हेतूकडे लक्ष देऊन ते व त्यांचे इतर मित्र ह्या पैसाफंडास हस्तें परहस्तें केवळ देशकार्य ह्मणून यथाशक्ति सहाय्य करीत जातील अशी आशा आहे.

---

# वर्तमानसार.

—जपानांत सध्यां एकंदर सोळा इंडियन विद्यार्थी आहेत. त्यांपैकीं एकट्या बंगाळांतून गेलेले आठ आहेत. मद्रास इलाख्यांतील कोणी नाहीं.

—पोष्टांतून मनीआर्डरच्या ऐवजीं पुष्कळ लोक नोटा पाठवितात, त्या पाठविण्याची कायद्यानें मनाई करण्याचा सरकारचा विचार आहे.

—मिरजमळा येथील श्री. गिरजाबाई साहेब या आपली स्वतःची सुवर्णतुला करणार आहेत. बाईसाहेबांचें वजन शंभर रत्तल जरी भरलें तरी चार हजार तोळेपर्यंत ही तुला जाईल. ह्मणजे सरासरी हा धर्म एक लक्षपर्यंत जाणार आहे. येवढ्या मोठ्या रकमेचा योग्य विनियोग झाल्यास चांगलें.

—इंग्लंडरूपी महासागरास हिंदुस्थानांतील ज्या द्रव्यरूपी महानद्या मिळतात त्यांचा वार्षिक जलसंचय ४५ कोटी होतो !

—लॉर्ड नॉर्थब्रुक यांचे कारकिर्दीत जो लष्करी खर्च १६कोट रु. होता तो लॉर्ड कर्झन यांचे धर्मराज्यांत २७ कोटीपर्यंत वाढला आहे व त्यांतच दक्षिण आफ्रिकेंत कायमच्या ठेवल्या जाणाऱ्या २५००० सैन्याचा व सोजीरांच्या वाढव्याचा खर्च मिळविला तर हाच लष्करी खर्च ३० कोटी वर वाढेल असें ह्मणतात ! नशीब हिंदुस्थानचें ! !

—गेल्या मे महिन्यांत कलकत्याच्या टांकसाळींत शेचाळीस लक्ष, सोळा हजार, नऊशें शायशी रु. किंमतीची चांदी आणली व शहात्तर लक्ष पंचवीस रुपयांचें नाणें पाडण्यांत आलें.

—मुंबई इलाख्याची शिक्षणपरिषद यंदां पुणें येथें भरणार आहे.

तिच्या व्यवस्थापक मंडळीनीं इतका मोठा फंड जमविला आहे कीं त्यांतून एक लक्ष मुसलमान विद्यार्थ्यांचें प्राथमिक शिक्षण, ३००० चें इंग्रजींत मध्यम प्रतीचें शिक्षण व १०० च्या उच्चप्रतीच्या शिक्षणासाठीं एक कॉलेज इतक्यांची सहज तजवीज व्हावी !

--गेल्या सात वर्षांत कानडा वसाहतीचा व्यापार दुणावला आहे. १८९६ सालच्या व्यापारापेक्षां गेल्यासालचा व्यापार ५ कोटी डॉलरांनीं अधिक आहे.

--रा. गोविंद नारायण पोतदार, बी ए. यांना मुंबई येथील हिंदु एज्युकेशन फंडांतून तीनवर्षें पर्यंत दरमहा ५० रुपये स्कालरशिप मिळाल्यामुळें ते ता. १८ जुलई १९०३ रोजीं जपान मेल स्टीमर कंपनीचे " बांबे मरु " नांवाचे बोटीनें जपानास निघून गेले. रा. पोतदार हे टोकिओ इंपीरियल युनिव्हर्सिटीमध्यें अप्लाइड केमेस्ट्री अथवा व्यवहारिक रसायनशास्त्र हा विषय शिकण्या करितां गेले आहेत. हे अक्कलकोटचे रहिवासी असून त्यांचा अभ्यास दक्षिण हैद्राबाद येथील कॉलेजांत झाला आहे.

—रा. अंताजी दामोदर काळे, हे मा. पु.ची वर्गणी वसूल करण्यासाठीं डहाणू, उंबरगांवाकडे गेले होते, ते हल्लीं येथें आले आहेत. गणपती पर्यंत त्यांचा मुक्काम येथेंच आहे.

---

अगदीं विलायती प्रमाणें- जी. एस. रानडे यांचें

सुंदर { **मेंथाल.** } बाटलींत.

गुणांबद्दल अनेक डाक्टर लोकांचीं सर्टिफिकिटें मिळालीं आहेत. किंमत ४ आणे.

**पत्ताः—जी. एस्. रानडे,** गिरगांवांत मंगळ. वाडीसमोर.

अनुभवांतीं पुष्कळ लोकांच्या पसंतीस उतरलेलें

**व्ही. के. रानडे यांचें सुवासिक कापशीचें तेल.**

किंमत ४ आणे. व्यापाऱ्यांस भरपूर कमिशन.

**पत्ता—व्ही. के. रानडे** गिरगांव अंग्र्याची वाडी मुंबई.

# वाचा ! वाचा ! वाचा !

"काळपत्रांतील निवडक निबंध" भाग १ ला किं. ०८

" सद्यस्थिति " पैसाफंडाचे उत्पादक रा. काळे यांनीं लिहिलेलें किं. ०८

" संसारचित्र " चटकदार कादंबरी किं. ०४

वरील पुस्तकें पैसाफंड. मा. पुस्तकाच्या वर्गणीदारांस लायब्ररींयांस व विद्यार्थ्यांस अनुक्रमें ०६, ०७, ०२ आण्यांस मिळतील इतरांस भरपूर किंमत पडेल व्ही.पी.नें पाठवूं.

" निळी काळी शाई " १०० पुड्यांस किं.रु. १

१ रु. ची शाई घेणारास " संसारचित्र " फुकट.

१॥ रु. ची शाई घेणारास " काळपत्रांतील निबंध " बक्षीस.

२ रु. ची शाई घेणारास " सद्यस्थिति " इनाम.

३ रु. ची शाई घेणारास " पैसांफंड" मा. पुस्तक एकवर्ष फुकट मिळेल.

प्रती फार थोड्या शिल्लक आहेत. ग्राहकांनीं त्वरा करावी. इतर शालोपयोगी पुस्तकें वगैरे पाठवूं. पैसे आगाऊ. उत्तराकरितां टिकीट पाहिजे.

**परचुरे, लेले आणि कंपनी,**

शाईचे कारखानदार व कमि. एजंटस

चंद्रबाग गिरगांव,

मुंबई.

# वर्गणीदारांस सूचना.

१ पत्रव्यवहार करतेवेळीं उत्तराकरितां टिकीट पाठवावें. टिकीट अगर कार्ड नसल्यास उत्तर मिळणार नाहीं.

२ मोबदला पत्रें व पुस्तकें व वर्गणी पुरंदरे आणि कंपनी, व्यवस्थापक "पैसा फंड" मा. पु. माधवबाग मुंबई या पत्त्यावर पाठवावी.

३ नवीन वर्गणीदारांनीं अंक व्ही.पी. नें मागवावा. कारण वर्गणी आगाऊ आहे. व्ही.पी.चार्ज १-२ आणे करण्यांत येईल.

४ दुसरा अंक पोंचतांच वर्गणी पाठविण्याची व्यवस्था आमचे उदार आश्रयदाते करतील अशी आशा आहे.

५ अंक व्ही. पी. नें पाठविण्याबद्दल कळविल्यास तशी व्यवस्था होईल.

६ जेथें निदान सहा वर्गणीदार एकाच नावावर अंक मागवतील तेथें फक्त ८ आणे मूळ वर्गणी घेतली जाईल. ट. ह. २ आणे पडणार नाहीं.

७ एक पैशांत अंक पाठविण्याची पोष्टाकडून परवानगी मिळेपर्यंत एक अंक घेणारास दोन महिन्यांचे अंक एकदम पाठविले जातील. दरमहा अंक पाहिजे असल्यास ६ आणे ट. ह. द्यावें लागेल.

**अंताजी दामोदर काळे**

मुख्य मालक व्यवस्थापक,

'पैसा फंड' मासिकपुस्तक.

वर्षास आगाऊ वर्गणी फक्त ८ आणे. ट. ख. ३ आणे.

# "पैसा फंड"

## मासिकपुस्तक.

वर्ष १ लें. ] सप्टेंबर १९०३. [ अंक ३ रा.

### विषयानुक्रमणिका.


| विषय. | पान. |
|---|---|
| आह्मी व आमच्या भावी पिढ्या ............ | २७ |
| शेतकी ............................... | ३४ |
| कविता................................ | ३७ |
| स्फूट ............................... | ३८ |
| वर्तमानसार .......................... | ३९ |


व्यवस्थापक,

**पुरंदरे आणि कंपनी.**

माधवबाग:—मुंबई.

संपादक,

**एकनाथ गणेश भांडारे.**

किंमत १ आणा.

'विजय' छा० माधवबाग मुंबई.

# वर्गणीदारांस सूचना.

१ आगष्टच्या अंकांत सूचना केल्या आहेत, त्या जरूर पहाव्या.

२ अद्यापि पुष्कळां कडून वर्गणी आली नाहीं. या महिन्यांत वर्गणी न आल्यास अंक व्ही. पी. नें पाठविण्यांत येईल.

३ खालीं लिहिलेल्या गांवीं जे एजंट नेमले आहेत, त्यांजकडे त्या त्या गांवच्या लोकांनीं वर्गणी भरावी व ती एजंटांनीं पुरंदरे आणि कंपनी म्यानेजर "पैसा फंड" माधवबाग मुंबई यांजकडे पाठवावी.

खत्तलवाडा—प्राणजीवण माणेकलाल वाणी.
नारगोळ—विनायक शिवराम पिंपुटकर.
मरोली—रामचंद्र विठ्ठल सांवले.
शिरगांव }
भिलाड } —मोरो श्रीधर आरेकर.
घोलवड—कृष्णाजी मोरेश्वर मुसळे.
के. माहिम—जनार्दन त्र्यंबक दांडेकर.
वसई—गणेश रामचंद्र मराठे.
पंढरपूर—दत्तो बळवंत गांडाळे.

अंताजी दामोदर काळे.

मालक व मुख्य व्यवस्थापक.

# ज्ञानदान ग्रंथमाला.

ह्मणजे धार्मिक ज्ञानाचे व हल्लींच्या काळीं स्वदेशहित साधक ज्ञानाचे ग्रंथ केवळ कागद छपाई व बांधणी यांच्या मूळ किंमतीला देणारी ग्रंथमाला सुरू करण्यासाठीं मदत पाहिजे आहे. पण ती फुकट नको. योग्य मोबदला देऊन मदत मागावयाची आहे. ती अशी–

**स्वदेशाभिमानमिश्रण**—नामक वनस्पतींचें चूर्ण उत्कृष्ट वीर्यवर्धक–शीघ्र स्वप्नावस्था प्रतिबंधक--नित्य स्त्रीसेवनाचे दुष्परिणाम ह्मणजे--त्रासिक स्वभाव बनणें–उमेद व तकवा नसल्यासारखें वाटणें–कंबर ढिली पडणें किंवा दुखणें–यांचें नाशक--मूळव्याधीची पीडा शामक व वीर्याचा पातळपणा नाहींसा करणारें आहे.

**स्वाभिमान पाक**—वरील मिश्रण उत्तम गुणावह होण्यास हा पाक मदत करितो. यानें क्षुदा प्रदीप्त होतें. अन्न पचतें–शौच शुद्धी होते–रक्त शुद्ध होतें. मेंदूला पुष्टी येते व डोळ्यांत थंडाई व तेज येतें.

हीं दोन्हीं औषधें विवाहित व अविवाहित स्थितींत अत्यंत अवश्य व उपयोगी आहेत. ज्ञानदानग्रंथमाला लवकर सुरू व्हावी या इच्छेनें मी हीं दोन्हीं औषधें २१ दिवस पुरेशीं फक्त सव्वा रुपयाला देणार आहें. तरी सशक्त व वीर्यवान होऊं इच्छिणाऱ्या स्वदेशभक्तांना जर औषध घेणें असेल तर त्यांनीं हींच औषधें घेतल्यास आत्महित साधून स्वदेशहित साधेल. हीं औषधें मुंबई व पुणें येथील ग्राहकांस एक रुपया पांच आण्यांत घरपोंच मिळतील. त्यांनीं मला पत्र पाठवून आपली इच्छा व पत्ता कळवावा.

**महादेव चिंतामण पेंडसे.**

आगाशी–तालुका वसई.

# वर्गणीची पोंच.

—०००—

**मुंबई.** आणे.

रा. रा. चितळे साठे आणि कं० ८
रा. गजानन जयराम जोशी ८
,, आत्मा० शिव० दिवाड० ८
,, काशि० आत्मा० मुळे. ८
,, गणेश पर० तेरे देसाई. ८
,, सिता० दिन० जोगळे० ८
,, व्ही. के. लोंढे.
,, लक्ष्मण गणेश बाठे. ८
,, जी. एस. मुकादम. ८
,, लक्ष्मण कशाबा बुटे. ८
,, जी. एस्. रानडे. ८
,, नारा० पांडु० जोगळेकर ८
,, रामभाऊ बज्जाबा बराठे. ८
,, बाळकृष्ण लक्ष्मण पाठक. ८
,, त्रिंबक नारायण आपटे. ८
,, गोपाळ वासुदेव शेंबेकर ८
,, रामचंद्र भास्कर पटवर्धन ८
,, डी. एन् कोतवाल. ८
,, मोरे० रामकृष्ण पुराणिक ८
,, बळ० भिकाजी काहु० ८
,, वासुदेव सदाशिव वैद्य. ८
,, रघुनाथ कृष्ण मुळे. ८
,, विनायक दादोबा पुरंदरे. ८
,, शंकर विठोबा अकोलकर ८
,, निळकंठ भाऊशेट गांधी. ८
,, तुकाराम पुंडलिक शेट्ये. ८

रा. रा. नागो काबाजी कारुळकर ८
,, नरहर लक्ष्मण गणपुले. ८
,, गोविंद हरी पेंढरकर, (दादर.) ८
,, विठ्ठल राजाराम दलाल. ८
,, हरी रामचंद्र सोनी. ८
,, चिंतामण कृष्ण साठे. ८
,, भार्गव विनायक जोशी. ८
,, रघुनाथ मोरेश्वर काकवी ८
,, भार्गव महादेव बिवलकर ८
,, पांडुरंग रामचंद्र जोशी. ८
,, धोंडोपंत अत्रे तारमास्तर ८
,, गोपाळ गोविंद खरे. ८
,, केशव विष्णु टुलू. ८
,, कृष्णा० सदा० चांदोर० ८
,, विरेश्वर चिंतामण विरकर ८
,, डी. आर. जोशी. ८
शेट के. बी. मोहनदास. ८
रा. रा. काशि० विठोबा वेरळकर ८
,, जी. डी. जोशी. ८
,, धोंडो विठ्ठल गुर्जर. ८
,, लक्षुमण चिंतामण काळे ८
,, दत्तोपंत ताटके. ८
,, गोपाळ सखाराम मराठे. ८
,, महा० त्र्यंबक देवस्थळी ८
,, काशिनाथ नरहर साठे. ८
,, रामचंद्र चिंतामण सुगंधी ८

,, कृ० चिंता० फणसटकर. ८
,, एस्. के. जोशी. ८
,, बळवंत रामचंद्र पराडकर ८
,, वासुदेव गोविंद पंडित. ८
,, आत्मा० आबाजी भिसे. ८
,, विनायक मोरेश्वर साठे. ८
,, नारायण भिकाजी आपटे ८
,, केशव वामन पेठे. ८
,, गणेश दामोदर काळे. ८
,, नारा० महे० नामजोशी. ८
,, सांव० सदा० येवलेकर. ८
,, अनंत लक्ष्मण असलेकर ८
शेट देवजी विरजी. ८
,, द्वारकादास धरमसी. ८
रा. रा. कृष्णाजी दिनकर डोंगरे. ८
,, धोंडो काशिनाथ खांबोटे ८
,, गोविंद लक्ष्मण गोखले. ८
,, द्वारकानाथ वामनराव. ८
,, विष्णू भास्कर दांते. ८
,, दत्तात्रय गणेश कर्णिक. ८
,, चिंता० बल्लाळ जोगळे० ८
,, केशव महादेव केळकर. ८
डॉ. डी. एन्. गाडगीळ. ८
,, गोविंद रामचंद्र जोशी. ८
,, वासुदेव नारायण शितुत. ८
,, वासुदेव परश० केळकर. ८
,, हरी रामचंद्र ओक. ८
,, संभाजी लक्ष्मण भगत. ८
,, भालचंद्र विष्णु जोशी. ८

## बाहेर गांवची पोंच.

रा. रा. परशराम राम० पेडणेकर ( सांवतवाडी ) ११
,, गोपाळ विष्णु महाजन ( कोळथरें ) ११
,, नारायण वासुदेव शेंबेकर ( पाचेरी आगर ) ११
,, रामचंद्र बापूजी देव ( पेण ) ११
,, साबाजी रामकृष्ण सुखटणकर ( आचरें ) ११
,, विठ्ठल कृष्ण जोशी ( चिकोडी) ११
,, विनायक चिंतामण ओक ,, ११
,, व्ही. गोखले सेक्रे० लायब्ररी ,, ११
शेट रामचंद्र गिरधारी मारवाडी ( अंजनगांव) ११
रा. रा. विष्णु धोंडदेव गाडगीळ ( विजापूर ) ११
शेट केशव भगूजी ( एरणपुरा मारवाड ) ११
रा. रा. डी. व्ही. लिमये (हेगादेवान कोट. म्हैसूर ) ११
,, रामचंद्र विनायक चौघुले ( जळगांव ) ११
,, पांडूरंग रामचंद्र निमकर ( अलिबाग ) ११
रा. रा. निळकंठ व्ही. देशपांडे. ( शहाबाद. ) ११
,, जनार्दन त्र्यंबक दांडेकर. ( केळवें माहिम) ११
,, धोंडो काशि० सप्रे. (कसोप) ११

,, वासुदेव बाळकृष्ण काळे. ( चव्ये ) ११
,, यशवंत नारायण मराठे. ( परळ ) ११
,, यशवंत नारायण चौघुले ( वांद्रें ) ११
शेट बाळकृष्ण सोनशेट विश्वेकर. ( वांकेड ) ११
रा. रा. श्रीधर विश्वनाथ गोडबोले. ( आणगांव ) ११
,, बाळकृष्ण नारायण इंगळे. ( पंढरपूर ) ११
,, हरी बापू जोगळेकर. ( आवास ) ११

## राई-एजंट रा. मोरोपंत मराठे मार्फत

रा. रा. प्राणजीवन पुरुषोत्तम. ८
,, रा. मोरो सदाशिव मराठे ८
,, हरी वासुदेव भावे ८
,, वासुदेव हरी गोखले ८
,, सिताराम बाळ० देसाई ८
,, विष्णु सदा० घोटीकर ८
,, विना० त्र्यंब० जोगळेकर ८
,, लक्ष्मण सदा० मराठे ८
,, गोपाळ सदा० मराठे ८
,, माणेकचंद पुरु० वाणी ८
,, जनार्दन दिन० कुंटे ८
,, त्रिं० नारा० भातखंडे ८
,, विना० विठ्ठल अधिकारी ८
,, मुरारजी रघुनाथ ८
,, लखमीदास त्रिभुवन ८
,, प्रभा० लक्ष्मण मराठे ८
,, भिका० बाळ० देसाई ८
,, मथुरालाल सरूपचंद ८
,, सरूपचंद निहालचंद ८
,, शिमय्या गोविं० आप्री ८

## उंबरगांव एजंट मार्फत.

रा. रा. पांडुरंग हरी मुळे. ८
,, बाबुराव कृष्ण तेरे ८
,, परशराम गोविंद देवधेकर. ८
,, नारायण महादेव जोशी. ८
,, परशं० गंगाधर कारुळकर ८
,, गोपाळ त्र्यंबक कारुळकर. ८
,, लक्ष्मण विष्णु जोशी. ८
शेट हरीवल्लभ परमानंद वाणी. ८

## खत्तलवाडा एजंट मार्फ०

शेट भिमाजी कानाजी मारवाडी. ८
,, भोगि० माणेक० वाणी. ८
,, नान० चतरा० मारवाडी. ८
शेट किला जेठा वाणी. ८
,, डाया नाना कापडी. ८
,, करसन प्राणजीवन वाणी. ८
,, वन ०भिका० भवसार. ८
,, लल्लू अमृतलाल वाणी. ८
,, मोती गिरधर भवसार. ८
,, पितांबर परसोत्तम लोहार. ८
,, भगवान डाया कणबी. ८
,, गोवन पितांबर लोहार. ८
,, प्राण० परसोतम लोहार. ८
,, हिमत० उदे० मारवाडी. ८
,, विठ्ठल गोपाळ भंडारी. ८
,, भाणा झिणा गोली. ८
रा. रा. गोविंद रामचंद्र मेहेंदळे. ८
श्री० माध० भिकाजी पिंपुटकर, ८
रा. रा. वामन महादेव ढापरे. ८
,, दत्तात्रय त्रिंबक ढापरे. ८
,, पांडुरंग महादेव कराडकर ८
विनायक गोपाळ चांफेकर. ८

"पैसा फंड"

मासिक पुस्तक.

वर्ष १ लें.] सप्टेंबर, सन १९०३. [अंक ३ रा.

# आह्मी व आमच्या भावी पिढ्या.

मागील अंकीं आमच्या सद्यःस्थितीचें जरी किंचित् दिग्दर्शन झालें तरी या छोटेखानी मासिकपुस्तकांत तिचें हुबेहुब वर्णन करणें आमच्या शक्ति बाहेर आहे. ती वर्णन करण्यास आमच्या आर्यावर्ताचे वृद्ध राजर्षि दादाभाई नवरोजी सारखे राजकारणपटु, इतिहासज्ञ, बहुश्रुत, विद्वान्, स्पष्टवक्ते व शांत मनुष्य पाहिजेत. त्यांनीं पॉव्हर्टी ऑफ इंडिया ह्मणजे 'हिंदुस्थानचें दारिद्र्य' या नांवाचा ग्रंथ नुकताच प्रसिद्ध केला आहे. त्यावरून आह्मी दारिद्र्यानें किती गांजून गेलों आहों व राष्ट्र या दृष्टीनें किती खालावलों आहों याचा उत्कृष्ट बोध होऊन उद्यां आमचें होणार कसें, हा चिंताग्रस्त प्रश्न डोळ्यापुढें उभा राहतो. सदरील ग्रंथांत अतिशयोक्ति मुळींच नाहीं. जें आहे तें प्रत्यक्षास प्रमाण आहे.

ज्यांना इंग्रजी येत नसून आपल्या अवाढव्य देशाच्या दारिद्र्याची कल्पना नाहीं अथवा आह्मी दरिद्री कसे

झालें व अद्यापि तसे कां राहिलों याची समाधानकारक मीमांसा करितां येत नाहीं, अशा लोकांचा आपल्या देशांत फारच मोठा भरणा आहे. हा भरणा अर्थात् अशिक्षित अशा मागसलेल्या लोकांचा असणार हें उघड आहे. जन्मदारिद्र्यानें ते उद्योगधंद्यास व स्वोदरपोषणास महाग झाले, ह्मणून त्यांच्या हातीं जर सदरील ग्रंथांचीं साररूपी भाषांतरें अल्प किमतींत दिलीं व त्यांच्या कानीं-कपाळीं त्यांच्याच हालअपेष्टांची ओरड केली तर खरोखर त्यांचीं अंतःकरणें दुःखानें करपून जातील आणि त्यांच्या हल्लींच्या कष्टमय स्थितींतून पार पडण्याचा स्वल्प तरणोपाय त्यांना कोणी सांगितल्यास तो करण्यासाठीं ते एका पायावर उभे राहतील! अहो! ज्यांचें रोजचें उत्पन्न जवळ जवळ तीन पैशांवर येऊन बसलें आहे त्यांच्या दारिद्र्याची आणखी कमाल ती कशी व्हावी? अशा लोकांनीं सुशिक्षित व्हावें कसें, उद्योगधंदा करावा कसा, व स्वावलंबन शिकावें कसें? त्यांचा आयुष्यक्रम ह्मटला ह्मणजे ओली कोरडी मिळेल तशी भाकरी मिळवून खावी, आणि 'शय्या भूमितले दिशोऽपि वसनं' करून दिवस काढावे हाच. ही त्यांची शोचनीय स्थिति त्यांच्या सुशिक्षित देशबांधवांस कळत नसेल असें नाहीं. ती त्यांना चांगली कळते व प्रत्यक्ष दिसते. परंतु इलाज काय?

तशांत विशेष दुःखाची गोष्ट ही आहे कीं, एकवेळ सरड्याची धांव कुंपणापर्यंत तरी जाईल, पण आमच्या

सेवाधर्मतत्पर सुशिक्षित बांधवांची मजल तेथपर्यंत सुद्धां जात नाहीं! त्यामुळें आम्ही तोंड असून मुके, व डोळे असून अंध झालों आहों! आमच्या बुद्धिसर्वस्वाचा सर्वथैव उपयोग फक्त कागदांचे घोडे नाचविण्यांत होत आहे! यांत आमचा दोष नाहीं. तर तो आमच्या दारिद्र्याचा होय. फरक येवढाच कीं, अडाणी लोकांची रोजची प्राप्ति जी तीन पैशांची ह्मणून सांगण्यांत आली ती यांची फार झाली तर तीन आण्यांची असेल. पण जेथील लोकसंख्या शेंकडा ऐशीं शेतकरी आहेत, तेथील बाकीचे वीसही त्यांच्याप्रमाणें दरिद्री असल्यास नवल नाहीं! आणि या दारिद्र्यानेंच आमचें पाऊल प्रत्येक गोष्टींत मागें पडत आहे. अंगीं कर्तृत्वशक्ति असली, आचार विचारांत मेळ असला आणि सार्वजनिकहिताची कळकळ असली ह्मणजे त्याला पैशाची उणीव पडत नाहीं असें कोणी ह्मणतील, पण त्यांत अर्थ नाहीं. कारण आमच्या कर्तृत्वशक्तीनें आह्मांस अजिबात सोडलें आहे. सार्वजनिक कळकळ केवळ शब्दांत येऊन राहिली आहे आणि आचार व विचार यांच्यांत निदान आमच्या देशामध्यें तरी केव्हांच छत्तिसांचा आंकडा पडलेला आहे! अशी जेथें स्थिति आहे, तेथील बहुतेक पांढर्‍यावर काळें करणारा वर्ग ‘ कृतांजलिभोष ’ व्हावा आणि त्यामुळें बाकीचे लोक अन्नास महाग व्हावे यांत आश्चर्य तें कोणतें? परंतु येवढी गोष्ट मात्र खरी आहे कीं, आहे या स्थितींतच जर आमचा देश ‘ धन्योऽहं ’

लागून स्वस्थ राहिला तर त्याला कायमचें स्वस्थ रहावें लागेल. पण तें इष्ट नाहीं. राष्ट्र या दृष्टीनें जरी आपण आज आसन्नमरण होऊन पडलों आहोंत तरी उरलेलें आयुष्य कसें तरी रेटूं. परंतु 'आपल्या देशाची सांप्रतची स्थिति' आहे अशीच आपण कायम ठेविली व आपण आपल्या सामर्थ्याप्रमाणें ती सुधारण्याचा कांहींच प्रयत्न केला नाहीं तर आपल्यामागें आपल्या भावी पिढ्यांची काय वाट लागेल याचा विचार करणें अवश्य आहे. विचाराप्रमाणेंच आचार करूं तेव्हांच आपल्या पिढीचे पाय जमिनीवर लागतील. नाहीं तर तिचे हाल कुत्रा सुद्धां खाणार नाहीं.

ह्मणून राजमान्य मार्गानें आपण आपली सांपत्तिक स्थिति सुधारली पाहिजे. संपत्ति सर्वांस हवी आहे; या गोष्टींत कोणाचाही मतभेद नाहीं. ह्मणून सर्व देशबांधवांची या कामीं एकी होणें अवश्य आहे. तिचा हेतु येवढाच कीं, सध्यां जशी आह्मांला प्रत्येक गोष्टींत परकीय देशाकडे पहात बसण्याची व क्रयविक्रयादि निमित्तांनीं आपली कमाई त्यांच्या खिशांत ओतण्याची संवय लागली आहे ती कालेंकरून नाहींशी व्हावी. आह्मी होऊन आपलीं हुशार व होतकरूं मुलें परदेशांत पाठवून कलाकौशल्यांत तरबेज करून आणावीं, त्यांच्या विद्यमानें देशी व्यापारधंदा उदयास आणावा, सर्वांस उद्योगमग्न व उत्साहप्रिय करून सोडावें आणि दुष्काळासारख्या भयंकर प्रसंगीं गोरगरिबांस

मदत करावी, हे मुख्य हेतु साधले तर आपण आपल्या भावी पिढ्यांच्या सुखाचा मजबूत पाया रोंविला असें होईल. आणि हें कार्य इतकें सुरेख, अवश्य व सार्वजनिक आहे कीं, त्यांत मतभेद होण्याचा संभवच नाहीं.

पण या सर्व गोष्टी पैशाच्या आहेत. आणि दिवसानुदिवस आपण तर त्याए परके होत चाललों. तथापि दारिद्र्यार्णवांत बुडत असलेल्या प्रत्येक हिंदुस्थानवासियानें जर पैसारूपी गवताच्या काडीचा आधार धरला तर त्याची बरीच मोठी गंजी होऊन तिच्या आधारानें बरेच प्राण वांचतील. कदाचित् या गंजीचा आपणास व्हावा तसा उपयोग होणार नाहीं, पण आपल्या भावी पिढ्यांस तिचा खात्रीनें उपयोग होईल. राष्ट्र या दृष्टीनें आपली रोजची कमाई जरी तीन पैसे धरली तरी वर्षाच्या अखेरीस तिची बेरीज सोळा रुपये चवदा आणे होते. यांतून प्रत्येकानें आरंभीं राष्ट्रहिता करितां अवघा एक पैसा देण्याचा निश्चय केल्यानें बरेंच मोठें कार्य साधेल. आणि त्या कार्याचा परिणाम अंशतः आपल्याच हयातींत आपल्यास व बहुतेक अंशीं आपल्या मागें आपल्या भावी पिढ्यांस इष्ट असाच होईल.

'कवडी कवडी जोडके, निधन होत धनवान्' असा हिंदींत एक दोहरा आहे. आणि प्रस्तुत स्थलीं आपण तो लक्षांत ठेवण्यासारखा आहे. शाळा, सभा, उत्सव, देव, देवळें, संस्था, कथा, पुराणें, नाटकें, प्रदर्शनें वगैरे अनेक प्रसंग आपल्या राष्ट्रीय पैसाफंडास मोठे अनुकूल असून त्यांची

आपल्या कृतनिश्चयास करून घेतली तर केवढी तरी मदत होईल! कांहीं काळानें या धनबिंदूचा द्रव्यसिंधु होईल आणि त्याच्या सुखावह लाटांनीं आपल्या राष्ट्रास परम दुर्लभ अशा महाभाग्योदयपर्वाचें स्नान घडेल! मग तेथें दारिद्र्य, याचना, वगैरे राहतात कशाला?

उलटपक्षीं आपण निराश झालों, पैसा पैसा करून फंड तो काय होणार व त्याचा तीस कोट लोकांस फायदा होणें शक्य होईल कसें? मुंगीनें समुद्र गिळला हें जसें होत नाहीं तद्वत् एका पैशानें हिंदुस्थाना सारख्या अफाट देशाचें दारिद्र्य जाईल असें कधींही होणार नाहीं. हा निव्वळ पोरखेळ आहे अशा नुसत्या वल्गना करीत आपण स्वस्थ बसलों तर काय होईल? आह्मी ह्मणतों अनर्थ होईल! आमच्या अंगांत कर्तबगारी नाहीं, आह्मांस धीर कसा तो मुळींच नाहीं, आह्मांस भावी पिढ्यांची पर्वा नाहीं, आह्मांस कर्तव्याची चाड नाहीं, सारांश आह्मीं खाया काळ व धरणीस भार आहों असें सिद्ध होईल. जो कर्तबगारी दाखवीत नाहीं त्याला कोणीही जवळ बोलावीत नाहीं. ज्याला धीर नाहीं त्याला आशा नाहीं, ज्याला भावी पिढ्यांची काळजी नाहीं त्याची काळजी कोणीही घेणार नाहीं आणि जो कर्तव्य बजावीत नाहीं तो कोणाच्याही आदरास पात्र होत नाहीं. अशा अजागलस्तनवत् स्थितींत राहाण्यापेक्षां मृत्यूची खांच भरलेली काय वाईट? पण छे! अशी कल्पना करणेंच मूर्ख

पणाचें काम आहे. आमचे लोक विचारी आहेत, देश कालवर्तमान जाणणारे आहेत आणि भावी पिढ्यांच्या सुखाकरितां स्वतः खस्ता खाणारे आहेत. ते आपल्या डोकीवर भावी पिढ्यांचे तळतळाट कधींही घेणार नाहींत. उलट त्यांना प्रकृत प्रयत्नासारखा—ह्मणजे पैसा फंडा सारखा—स्वल्प तरणोपाय कोणीं सांगितला तर ते अवश्य करून त्यापासून आपलें व आपल्या भावि पिढ्यांचें खात्रीनें कल्याण करून घेतील,

पैसा आहे तर सर्व आहे आणि तो नाहीं तर कांहीं नाहीं. ह्मणून मुंगीच्या पायानें आपण आपला इष्ट मार्ग धरून चालल्यास त्यांत आपल्या भावी पिढ्यांचें व एवंदर देशाचें कल्याण आहे. इंग्रजींत एक ह्मण आहे: "Help thyself and God will help thee" तूं स्वतःआपल्याला मदत कर ह्मणजे ईश्वर तुला मदत करील. या न्यायानें आपलें दारिद्र्य जेव्हां आपण घालविण्याचा खरोखर प्रयत्न करूं तव्हांच ईश्वर आपलें दारिद्र्य घालवील. आणि आपण स्वतः हें तत्व शिकून तोच कित्ता आपल्या भावी पिढ्यां-कडूनही गिरविला तरच धडगत आहे.

# शेतकी–भाग १ ला.

( लेखक, स० वा० परांजपे. )

सृष्टीचे मुख्य भाग तीन आहेत. प्राणी, वनस्पति व जड पदार्थ. मनुष्याच्या उपजीविकेचें मुख्य साधन वनस्पति असल्यामुळें त्या शास्त्राचें ज्ञान अवश्य आहे. वनस्पतिशास्त्रामध्यें सर्व तऱ्हेच्या वनस्पति येतात; परंतु शेतकी हा त्याचा एक भाग होय. मनुष्याच्या निर्वाहाला उपयोगी पडणाऱ्या वनस्पतींविषयींचें जें ज्ञान त्यास "शेतकी" असें ह्मणतात. आपल्या भरतखंडांतील शेंकडा ८० मनुष्यें शेतकीवर अवलंबून असल्यामुळें त्यांस शेतकीचें ज्ञान अवश्य पाहिजे. हें ज्ञान विशेष होण्यासाठीं त्या वनस्पति कोणकोणत्या पदार्थांच्या झाल्या आहेत, हें पाहिलें पाहिजे.

सर्व वनस्पतींत मुख्य व पुष्कळ प्रमाणांत सांपडणारा पदार्थ ह्मटला ह्मणजे पाणी हा होय. कित्येक वनस्पतींत तर शेंकडा ९२–९५ हिस्से देखील पाणी आढळतें. कांकडी, गाजर, कलिंगडें वगैरे फळांमध्यें शेंकडा ९० पासून ९५ पर्यंत पाणी असतें. ह्मणजे १०० पौंड फळें घेतल्यास त्यांत ९०–९५ पौंड पाणी असतें. यावरून त्यांत खरा, फळाचा अंश १० किंवा ५ पौंडच असतो, हें ध्यानांत येईल. बाभूळ, चिंच, आंबा वगैरे जिवंत झाडांत शेंकडा ५० ते ७० पर्यंत पाणी असतें व जाळ-

ण्यासाठीं वाळवून तयार केलेल्या लांकडामध्यें देखील शेंकडा २०–२५ पर्यंत पाणी असतें.

ह्यावरून असें सिद्ध होतें कीं, वनस्पतींत पाण्याचें प्रमाण फार आहे. ह्मणून शेतकीस पाण्याची फार अवश्यकता आहे. जमीन कितीही कसलेली असली, खतही विपूल असलें पण पाणी जर नाहीं तर धान्य वगैरे जिन्नस कधींही उत्पन्न व्हावयाचे नाहींत. पाण्याचीं मुख्य साधनें ह्मटलीं ह्मणजे पाऊस, नदी, विहिरी, ओढे व कालवे हे होत. जमिनीनजीक पाण्याचें साधन असल्यास त्यांत १२ महिने पीक होतें. पावसावरच अवलंबून असणाऱ्या जमिनीमध्यें फक्त ४–५ महिनेच पीक येतें.

नदी, ओढा, विहीर वगैरे नजीक असल्यामुळें ज्या जमिनींत बारा महिने पीक येतें, त्यास बागाईत जमीन असें ह्मणतात, व केवळ पावसाच्या पाण्यानें पिकणाऱ्या जमिनीस जिराईत जमीन असें ह्मणतात. बागाईत जमिनींत १२ महिने पीक येतें व तें चांगलें येतें, यामुळें तिला किंमत जास्त पडते, व सरकारसाराही जास्त द्यावा लागतो.

पाणी हा पदार्थ प्राण व उज्ज या दोन वायूंपासून झालेला आहे. ह्मणजे सर्व वनस्पतींत पाण्याचे रूपानें प्राण व उज्ज हीं मूलतत्वें आहेत. वनस्पतींत तिसरा मुख्य पदार्थ ह्मटला ह्मणजे कर्ब हें मूलतत्व होय. ह्याचें प्रमाण शेंकडा १ पासून २२ पर्यंत असतें.

मनुष्यें ज्याप्रमाणें श्वासोच्छ्वास करितात, त्याचप्रमाणें

वनस्पति देखील करितात. फरक इतकाच की, मनुष्यें प्राणवायु आंत घेतात, व कर्बद्वि प्राणील वायु बाहेर टाकतात, व वनस्पति कर्बद्विप्राणील वायु आंत घेतात, व प्राणवायु बाहेर टाकतात! पहा परमेश्वरानें एकमेकांनीं टाकलेल्या वस्तूंचा एकमेकांना उपयोग होण्याची कशी सोय करून ठेविली आहे! वनस्पतींतील चवथा मुख्य पदार्थ ह्मटला ह्मणजे नत्र हें तत्व होय. ह्याचें प्रमाण $\frac{1}{4}$ पासून २ पर्यंत असतें. ह्याचा पुरवठा बहुतेक खता पासून होतो.

पांचवा मुख्य पदार्थ ह्मटला ह्मणजे गंधक हा होय. ह्याचें शेंकडा प्रमाण फारच थोडें ह्मणजे $\frac{1}{120}$ पासून $\frac{1}{50}$ पर्यंत असतें.

वर सांगितलेले पांचही पदार्थ जळणारे आहेत. ह्मणजे एखादी वनस्पति जाळली असतां हे पदार्थ जळून जातात, ह्मणजे नाहींसे होतात.

ह्या वर सांगितलेल्या जळणारे पदार्थां शिवाय दुसरे पुष्कळ जड पदार्थ ( न जळणारे ) ह्मणजे धातू, वाळू वगैरे पदार्थ वनस्पतीं मध्यें आढळतात. एखादें लांकूड जाळल्यास तें सर्व नाहींसें होऊन त्याचे ऐवजीं थोडीशी राख राहते. ह्याच राखेंत जड पदार्थ असतात, व ते जळणारे नसल्यामुळें राखेच्या रूपानें मागें राहतात. ह्या जड पदार्थांचें प्रमाण शेंकडा $\frac{1}{10}$ पासून २ पर्यंत असतें. ज्या वनस्पतींत पाण्याचा अंश कमी त्यांत ह्याचें प्रमाण जास्त आढळतें. ( पुढें चालू. )

# पैसाफंड.

(श्लोक.)

अणू-रेणु एकत्र होतां अनंत ।
बने थोर विस्तीर्णसें वाळवंट ॥
अनेकां करांतील एकेक पैसा ।
करीना कसा थोर हो फंड तैसा ॥ १ ॥
जळाचे बहू बिंदु एकत्र होती ।
महासागराख्या तयांना मिळे ती ॥
बहूतां-करांतील एकेक पैसा ।
करीना कसा फंड विस्तीर्ण तैसा ॥ २ ॥
अणू आणि बिंदू किती क्षूद्र सान ।
तयांहून पैसा असे कीं महान ॥
लघुत्वास दे सागरा वाळवंटा ।
मिळे फार पैसा जमे फंड मोठा ॥ ३ ॥
जमावा कसा फंड पैसा मिळावा ।
सुटे प्रश्न त्यानेंच हा सोडवावा ॥
मला वाटतें सांगतों तें तुह्मांतें ।
तुह्मी कर्ण द्या आपुला मद्वचातें ॥ ४ ॥
अणूचें कसें जाहलें वाळवंट ।
कसा बिंदुचा अब्धि झाला अफाट ॥
बघूं या करूं सूक्ष्म याचा विचार ।
श्रमूं सर्व, सोसे न एकास भार ॥ ५ ॥

अणू बिंदु एकत्र होतात कैसे ।
नसे जीव त्या हस्त वा पाद तैसे ॥
कसे एकमेकां मधें ते मिळाले ।
कळेना मला तर्क माझा न चाले ॥ ६ ॥
" विचारी मना तूंचि शोधोनि पाहे " ।
परब्रह्म चैतन्य सर्वत्र आहे ॥
अणू बिंदुला व्यापुनी तेंच राहे ।
ह्मणूनी तयां स्नेह सामर्थ्य लाहे ॥ ७ ॥
अणूचा अणूशीं जसा स्नेह आहे ।
तसा बिंदुचा बिंदुशीं नित्य राहे ॥
कसे एकमेकांस आलिंगितात ।
सुखें श्रेष्ठता या जगीं भोगितात ॥ ८ ॥

(पु. चा.)

## स्फुट.

पैसा फंडास सर्व जातीच्या व सर्व स्थितीच्या लोकांनीं मदत करणें अवश्य आहे. हा फंड राष्ट्रीय आहे. जेणें करून त्याचा उपयोग आपल्या दरिद्री देशास होईल, अशाप्रकारें त्याचा विनियोग करावयाचा ह्मणून पैसाफंडाची चळवळ उत्पन्न करणारीं व तत्संबंधानें लोकांच्या मनांत अत्यंतावश्यकता दाखवून सहानुभूति वाढविणारीं आमच्या ' पैसाफंडा ' सारखीं मासिकें, पाक्षिकें अथवा

साप्ताहिकें प्रत्येक भाषेंतून निघणें अवश्य आहे. ठिकठिकाणीं राष्ट्रीय गंगाजळ्या स्थापन झाल्या पाहिजेत. त्यांत सर्वांनीं पैसा पैसा टाकला पाहिजे आणि त्याची व्यवस्था निरलस देशकार्यतत्पर व लोकप्रिय पुढाऱ्यांनीं आपल्या हातांत घेतली पाहिजे. पण अशा गंगाजळ्या व अशा व्यवस्था केल्याशिवाय होत नाहींत. सबब मुंबई इलाख्यांत पैसाफंड स्थापन केल्याचें यश ज्याप्रमाणें रा. काळे पटकावूं पाहतात त्याचप्रमाणें सर्व हिंदुस्थान देशांतील प्रांताप्रांतांतून कांहीं निरपेक्ष लोक निघून त्यांनीं आपापल्या प्रांतांत पैसाफंड--स्थापनेचें यश घ्यावें अशी आमची कळकळीची व मोठ्या आगत्याची सूचना आहे. बाब थोडी असून देशहित दृष्टीनें तिचा उपयोग जर व्यापक होण्याचा संभव आहे तर ही सूचना लौकरच अमलांत कां येऊं नये?

---

# वर्तमानसार.

—हिंदुस्थान सरकारचें जून अखेरपर्यंतचें एकंदर उत्पन्न गेल्यासालच्या उत्पन्नापेक्षां ७५ लक्षांनीं अधिक आहे. ही वाढ मुख्यत्वें जमीन, अफू व एक्साइज या बाबींवर झाली आहे. यावरून यंदाचें उत्पन्न बरेंच वाढेल असें दिसतें.

—मिठाचा कर कमी केल्यामुळें वरील सहा महिन्यांत त्याचें उत्पन्न गेल्यासालच्या या सहा महिन्यांपेक्षां ४३ लक्षांनीं कमी झालें.

—कारवार जिल्ह्यांत कासरगोड तालुक्यांतील कांनोगोड खेड्याचा

शेतसारा सर्वे सेटलमेंटपूर्वी ३-४ हजार होता, तो आतां १५।१६ हजार झाला आहे.

—ब्रह्मदेशांत रॉकेलच्या खाणी मोठ्या किंमतीच्या असून तिकडील तेल इकडे बरेंच येतें १९०२।३ सालीं तिकडे एकंदर ५,४८,४९,००० ग्यालन तेल निघालें. त्यांपैकीं १,७२,६९००० तेल हिंदुस्थानांत आलें.

—१९०१ सालीं कलकत्ता व कराची या बंदरांतून हांबर्ग शहरांत ३१,१२००० कातडीं व २५००० गठ्ठे गेले. व १९०२ सालीं ३०५००० कातडीं व २८ हजार गठ्ठे गेले.

—महासागरांतील एकंदर रत्नांचें गुप्त भांडार जिनोआ येथील कॅव्हेलियरपिनो नांवाच्या एका हुषार शास्त्रज्ञाचे हातीं आल्यासारखें झालें आहे. याचें वय अवघें ३० वर्षांचें आहे.

—सांगली संस्थानांतील शिरहट्टी गांवाजवळ पांच मैलांवर सोन्याच्या खाणी आहेत असें **बांबेग्याझेटियर** व **मायनिंगवर्ल्ड**च्या समजण्यांत आलें आहे. इकडे आमच्या सधन व्यापाऱ्यांनीं लक्ष द्यावें.

—सरकारी नोकरांनीं व्यापार करूं नये असा नियम आहे. परंतु दुसऱ्यास व्याजानें रकमा कर्जाऊ देणें ह्याचा ' व्यापार ' यांत समावेश होत नाहीं. असें पंजाब चीफ् कोर्टानें ठराविलें.

—करमाळें तालुक्यांतील चौघा शेतकऱ्यांनीं तीन साडेतीनशें रुपये विहिरी खोदण्याकरितां सरकारापासून तगाई घेतली होती. तो करार त्यांचेकडून पुरा झाला नाहीं तेव्हां त्यांना सदरील रकमा पंधरा दिवसांत परत करण्याच्या नोटिशा झाल्या. नोटिशीं प्रमाणें मुदतींत पैसे परत आले नाहींत ह्मणून त्यांचीं शेतें जप्त झालीं. शेतकऱ्यांनीं पुढें पैसे हजर केले तरी ते घेतले नाहींत ! पाहिजे असल्यास नवीन शर्तीप्रमाणें जमिनी घ्या असें सांगण्यांत आलें ! तीन साडेतीनशें रुपयांकरितां बिचाऱ्या शेतकऱ्यांच्या हजार दीडहजार रुपयांच्या जमिनी मात्र गेल्या !

--खोटे रुपये तयार करणारे दोन इसम यंत्र सामुग्रीसह मुंबईच्या फॉकलंद रोडवरील चाळींत पकडले गेले आहेत, त्यांपैकीं एक स्पॅनिश व दुसरा स्विस मनुष्य आहे.

—बनारसचें सेंट्रल हिंदु कॉलेज कोणत्याही युनिव्हर्सिटीच्या ताब्यांत जाऊं नये ह्मणून व्यवस्थापक मंडळी कायम फंड वाढवीत आहेत. त्यांजकडे मुंबई इलाख्यांतून २७ हजार व मद्रास इलाख्यांतून १५ हजार रुपये पोंचले आहेत.

—दक्षिण आफ्रिकेंत ठेवल्या जाणाऱ्या २५००० सैन्याचा खर्च जो हिंदुस्थानावर कायमचा पडणार होता तो आपले व्हाइसराय लॉर्ड कर्झन व कम्यांडर—इन्—चीफ् लार्ड किचनेर यांनीं हाणून पाडल्यानें सदरील संकट तूर्त तरी दूर झालें आहे.

—मि. टाटा यांनीं बंगलोरास रेशीम तयार करण्याचा मळा तयार केला असून तेथें रेशमी किडे तुती वगैरेच्या झाडांवर ठेविले आहेत. तेथील व्यवस्था मि. ओआझु नांवाच्या एका जपानी गृहस्थाकडे आहे.

—तीस वर्षांपूर्वी मद्रासेकडील मजुरांस दरमहा ६ रु. मिळत असत. आतां सुकाळाच्या दिवसांत कांहीं ठिकाणीं ५ व कांहीं ठिकाणीं तर ३ च रु. मिळतात. ब्रह्मदेशांत १५ होते ते आतां ७ मिळतात आणि मुंबईकडे ११ होते ते ६ रु. मिळतात.

**रा. रा. अं. दा. काळे, यांचीं मुंबईत बरींच व्याख्यानें झालीं. बहुतेक लोकांस कल्पना पसंत पडली. आतां ते लवकरच नाशिक मालेगांव इकडे जाणार आहेत.**

**चुकीची दुरुस्ती**—दुसऱ्या अंकांत साभार पोंच सदरा खालीं लक्ष्मण गणेश मुळे असें छापलें आहे त्या ठिकाणीं कृष्णाजी गणेश मुळे असें समजावें.

---

# पोंच, अभिप्राय वगैरे.

**साभार पोंच**—राजा भोज व यक्षसंदेश हीं पुस्तकें पोंचलीं. मि. नवरे यांजकडून मा. पु. च्या मदतीसाठीं चार आणे आले आहेत. पाठविणारांचे आह्मी आभारी आहों.

**डायमंड सोप** कंपनी कडून गुलाबी ( रोज ) साबूची पेटी आमचे कडे आली आहे. मि. परांजपे यांनीं जपानांत जाऊन मोठ्या कष्टानें हें कसब प्राप्त करून घेतलें आहे. यांस उदार आश्रय मिळाल्यास परदेशाचा साबू या देशांत येईल असें वाटत नाहीं. साबू वापरण्यालायक आहे. सबब स्वदेशभक्तांनीं यास उदार आश्रय द्यावाच अशी आमची आग्रहपूर्वक सूचना आहे. वडीची किंमत फक्त ८४ आहे.

N. B. R. आपलें पत्र बरेंच मोठें असल्यामुळें घेतां आलें नाहीं. आपल्या सूचना बहुमोल आहेत व त्या जगापुढें याव्या अशी आमची इच्छा आहे. या चिमुकल्या मासिकास तसें साधन तूर्त नाहीं, याबद्दल आह्मी फार दिलगीर आहों. आपल्या सारख्या राष्ट्रहिततत्पर लोकांचे उदात्त विचार केसरीद्वारें जगापुढें येत आहेत, हीच आपल्या लेखनपटुत्वाची साक्ष आहे, तूर्त आपण त्याच मार्गाचें अवलंबन करून आपले अमोलिक विचार समाजापुढें मांडावे अशी आमची सूचना आहे.

**स्व**देशी मेंथाल—भारतवर्षीय वस्तु विषयीं कळकळ बाळगणाऱ्या प्रत्येक देशबांधवानें हें एकदा तरी वापरून पहावें. इंग्लीश प्रमाणें गुणकारी असल्याबद्दल अनेक डाक्टर लोकांचीं सर्टिफिकिटें मिळालीं आहेत. किंमत =)१ व्यापाऱ्यांस भरपूर कमिशन. गावोगांव **एजंट** पाहिजेत.

**पत्ता**—धि आर्यन् इंडस्ट्रियल कंपनी गिरगांव, **मुंबई.**

**पा**हिजेत:—अनुभवांतीं पुष्कळ लोकांच्या पसंतीस उतरलेलें रानडे यांचें सुवासिक **कापशीचें** तेल विकणारे एजंट पाहिजेत. किंमत ४ आणे. कमिशन भरपूर.

पत्ता:—**महाजन आणि मंडळी**

सोल एजंट, गिरगांव बॅकरोड, मुंबई.

---

# कमलार्क.

टक्कल पडणें, डोकें दुखणें, अर्धशिशी, खपऱ्या, **कान फुटणें**, दाढा सुजणें, दांत हालणें, **दमा**, पोटदुखी, गरमी, लघवीचे वेळीं आग होणें, हातापायांची आग होणें, चक्कर येणें, **उन्मादवायु** ( Hysteria ) **अर्धांगवायु** व **मूळव्याध** यांवर वस्ताद आहे. सूज, ठणका व उसण ताबडतोब रहाते. १ बाटलीस १ रु.

**रा. गाडगीळ यांचा दवाखाना**, कांदेवाडी केशवजी नायकाची चाळ, श्रीमारुतीच्या देवळा जवळ, गिरगांव पोस्ट, मुंबई.

**सूचना**—औषध मागविणारांनीं या मासिक पुस्तकाचा उल्लेख करावा.

# नारायण भिकाजी आपटे
## ह्यांचें गुणकारी बालामृत.

हें औषध, लहान व मोठ्या मनुष्यास एक प्रकारचें पौष्टिक आहे. या पासून दूध व अन्न चांगलें पचतें, अशक्त मुलें सदृढ होतात, व मुलांचे हात पाय लुले असले तर व कमरेंत जोर नसून चालतां येत नसलें तर बालामृत घेतल्यानें तीं चालूं लागतात. खोकला, हाडीताप नाहींसा होऊन, रक्त व मांस ह्यांची वृद्धि होते. शौचास साफ होत नसल्यास हलकें रेचक घेऊन मागाहून या औषधाचा उपयोग करावा. हें औषध वापरण्यास निर्धास्त आहे. चांगला गुण येण्यास दोन बाटल्या घ्याव्या लागतील.

बाटलीची किंमत १२ आणे, पोष्ट खर्च ७ आणे. २ बाटल्यांस किंमत २ रुपये, रेल्वेनें मागविल्यास विशेष खर्च पडणार नाहीं. व्यापाऱ्यांस भरपूर कमिशन देऊं.

---

# तुकाराम पुंडलिक शेटये.
## यांचें पुस्तक विक्रीचें दुकान
## माधवबाग मुंबई.

आमच्या येथें मुंबई, पुणें, बडोदें वगैरे सर्व ठिकाणच्या प्रसिद्ध छापखान्यांत छापलेलीं पुस्तकें ग्रंथ, कादंबऱ्या, नाटकें, तशींच सरकारी व खाजगी शालेपयोगी पुस्तकें नकाशे, शाईच्या पुड्या डोंगरे यांचें बालामृत, सार्सापरिला वगैरे वस्तु योग्य किंमतीस विकत मिळतात. बाहेर गांवींही काळजी घेऊन माल तावडतोब पाठविला जातो. एकवेळ अनुभव घेऊन खात्री करावी. व्यापारी व मास्तर यांस भरपूर कमिशन मिळेल.

प्रती १०७० वर खपतात.

वर्षास आगाऊ वर्गणी फक्त ८ आणे. ट. ख. ३ आणे.

# "पैसा फंड"

## मासिकपुस्तक.

वर्ष १ लें. ] अकटोबर १९०३. [ अंक ४ था.

## विषयानुक्रमणिका.


| विषय. | पान. |
|---|---|
| टका | ४१ |
| स्फूट | ४६ |
| पत्रव्यवहार. | ४८ |
| वर्तमानसार | ५१ |


व्यवस्थापक,

पुरंदरे आणि कंपनी.

माधवबाग:-मुंबई.

संपादक.

एकनाथ गणेश भांडारे.

किंमत १ आणा.

'विजय' छा० माधवबाग मुंबई.

# वर्गणीदारांस सूचना.

१ आगष्टच्या अंकांत सूचना केल्या आहेत, त्या जरूर पहाव्या.

२ अद्यापि पुष्कळां कडून वर्गणी आली नाहीं. या महिन्यांत वर्गणी न आल्यास नवंबरचे अंक व्ही. पी. नें पाठविण्यांत येतील.

३ खालीं लिहिलेल्या गांवीं जे एजंट नेमले आहेत, त्यांजकडे त्या त्या गांवच्या लोकांनीं वर्गणी भरावी व ती एजंटांनीं पुरंदरे आणि कंपनी म्यानेजर "**पैसा फंड**" माधवबाग मुंबई यांजकडे पाठवावी.

**बोर्डी**—बाबूराव गोविंद परब.

**दाभोळ**—दामोदर सखारामशेट गुजर.

**दापोली**—नारायण रामचंद्र गोगटे.

**पालगड**—विष्णु कृष्ण जोशी.

| | |
|---|---|
| १ आरे.<br>२ गुहागर.<br>३ साखरी त्रिशूळ.<br>४ पेवें.<br>५ अंजनवेल.<br>६ पालशेत.<br>७ वेळंब.<br>८ धोपावें. | डॉ० नारायण गणेश शिंदे,<br>खालापाट—गुहागर. |

**अंताजी दामोदर काळे.**
मालक व मुख्य व्यवस्थापक.

पाठक यांची एक आणा किंमतीची १९०४ ची

प्रत १ ली ।·  प्रत २ री ०≡

# रोजनिशी.

प्रत ३ री ०=  प्रत ४ थी ०-

दर वर्षाप्रमाणें १९०४ ची रोजनिशी आक्टोबरमध्यें तयार होईल सर्व प्रकारच्या लोकांस ह्या रोजनिशीचा लाभ घेता यावा म्हणून या रोजनिशीचे वर लिहिल्याप्रमाणें चार वर्ग केले आहेत कोणत्याही दराची रोजनिशी घेतल्यास रेलवे संबंधी साधारण सर्व माहिती, आगबोट तारायंत्र, पोस्ट आफीस, वगैरे उपयुक्त माहिती सारखी राहील. जाहिरातीच्या फायद्याकडे लक्ष देऊन गिऱ्हाईकांची गैरसोय होऊ नये म्हणून ह्या रोजनिशींत जाहिराती भरलेल्या नाहींत. कोणतीही रोजनिशी घेण्यापूर्वी ही पाहावी. व्यापारी लोकांस भरपूर कमिशन मिळेल.

## दिपवाळी करितां मुद्दाम !

# निम्मे किमतीस.

खालील पुस्तकांपैकीं १ रुपयाचीं घेणारास निम्मे किमतीस मिळतील.

| | रु. | आ. |
|---|---|---|
| ज्ञान सिंधु............ | १ | ८ |
| झांशीची राणी......... | | १२ |
| विश्वगुणादर्श कथासार... | | ६ |
| सुरसपंचकडी ......... | | ३ |
| श्रीमध्वाचार्य यांचें चरित्र | | १ |
| आगबोटींतील व रेलवेंतील करमणूक ....... .. | | ३ |
| अंत:करण तरंगावली ... | | ८ |
| याचेंच नांव खरें प्रेम ... | | ३ |
| प्रेमाचा पस्तावा ... ... | | ३ |
| गुणवंतराव............ | | ३ |
| मुंबईचा दंगा ......... | | ४ |

| | आ. |
|---|---|
| केसरी पत्रावरील खटला सन १८९७ चा ... | ४ |
| वसंतविलास ... ... ... | ६ |
| वामन दाजी ओक यांचें चरित्र.............. | ४ |
| किमया ......... | १ |
| अनाथ अबला ......... | ३ |
| त्रिकूट रहस्य ......... | ३ |
| आपासाहेब पेशवे यांचें चरित्र ........... | ४ |
| निवडक अभंगांची गाथा | १२ |
| फुलांचा गजरा......... | ६ |

वरील पुस्तकें व रोजनिशी खालील पत्त्यावर विकत मिळतील.

**बाळकृष्ण लक्ष्मण पाठक,**
मोतीबाजार पारशी गल्ली, मुंबई.

# वर्गणीची पोंच.

आर्य महादेव भिवा पवार. ८
,, पुरु० विठ्ठ० कराडकर. ८
मोहन भवानी शंकर पाध्ये. ८
,, मणिशंकर दया, पाध्ये. ८
,, गोपाळ केशव कराडकर. ८
,, नारायण कृष्ण देवधर. ८
आर्य रामचंद्र कृष्ण काळे ८
,, अनं०भाऊ० खटावकर ८
,, कृष्णा. श्री. भाटलेकर ८
बाई हरकी देवजी भगवान ८
आर्य वासुदेव शिवराम आरेकर (नारगोळ) ८
,, गोविंद रामचंद्र आरेकर (नारगोळ) ८

## आगाशी- एजंट आर्य पेंडसे यांचे मार्फत

आर्य विश्वनाथ वामन केतकर ८
,, सखाराम गोपाळ गद्रे ८
,, नारायण गंगाधर आपटे ८
,, गणेश नारायण गोखले ८
,, गणेश नारायण वर्तक ८
,, शंकर प्रभाकर रानडे ८
,, दामो० श्याम० तिरवडेकर (आर्नाळा) ८

## चिपळूण-एजंट रा. रा. दातार यांचे मार्फत

आर्य गोपाळ बाळाजी चितळे ८
,, गजानन मोरेश्वर दातार ८
,, विष्णु चिंतामण मालशे ८
,, दिन०महा० करमरकर ८
,, सखा० केशव पाटणकर ८
सेख हुसेन सेख अल्लीमुका ८
,, नाना तामजी देसाई ८
शेट प्रेमजी विरजी ८
,, गणशेट म्हादशेट खातु ८
,, दशरथ काशीनाथ शेट ८
आर्य गणेश विनायक जोग ८
,, बाळाजी गोविंद जोशी ८
,, नारा०विष्णु भाबरेकर ८
,, सिता०जनार्दन मेहेंदळे ८
,, ह० गोविं०साडविलकर ८
,, सखा०श्रीधर चितळे ८
,, वामन बळवंत काशीकर ८
,, दत्तात्रय गणेश जुवेकर ८
,, बाळकृष्ण चिं. भागवत ८
,, कृ. बल्लाळ आगाशे ८
,, भास्कर वा. ताह्मनकर ८
,, पर. रघु. पाटणकर ८
,, गंगाधर मो. सोमण ८

,, पुरु. हरी केतकर (भिले) ८
,, हरी प. केतकर (बिवली) ८
,, गणेश अ. थत्ते (बिवली) ८
,, राम. गणे. थत्ते (बिवली) ८

**डहाणू एजंट मार्फत.**

,, गोवर्धन लालजी ८
,, शंकर भास्कर जोशी ८
,, विना. सिता. पाटणकर ८
,, ज. धों. करंदीकर ८
,, पर. वामन फाटक ८
,, छोटालाल नरोत्तम ८
मि. हुसेन आखुबजी ८
आर्य दाजी कीडू कुंभार ८
,, लल्लु नरोत्तम पटेल ८
,, देशहितेच्छु ८

**आगाशी.**

**आर्य महा० चिंतामण पेंडसें यांचे विद्यमानें.**

आर्य गणपतराव मराठे ८
,, दत्तोपंत देवभक्त ८
,, पर्शराम बजाबा गवळी ८
,, वासुदेव नारायण खांडेकर ८

**वसई.**

**एजंट-गणपतराव मराठे यांचे मार्फत.**

आर्य सेवळ लल्लुभाई वाणी ८
,, त्रिंबक काशिनाथ वर्तक ८
,, विष्णु मोरेश्वर मराठे ८
,, अगन्ना अनापा तेलंग ८

,, रामशास्त्री मोघे ८
,, मुकुंद जनार्दन आचार्य ८
,, भिकाजी बापूजी कोठवळे ८
,, सिताराम हरी भागवत ८
,, महादेव दिनकर चित्रे ८
शेट त्रिकमदास मुळजी ८
,, सदाशिव कृष्ण फडके ८
,, नरसिंह महादेव वाघ ८
,, केशव बाबा. दाभोळकर ८
,, पुरुषो. पांडुरंग सोनार ८
,, त्रिंबक आत्माराम वकील ८
,, पांडुरंग सदाशिव सामंत ८
,, गणेश नारायण ठोंसर ८
,, हरिश्चंद्र जगन्नाथ लोहार ८
,, कृष्णाजी नारायण वझे ८
,, जगजीवनदास प्राणजीव. ८
,, लक्ष्मीदास दामोदरदास ८

**मुंबई.**

,, श्रीधर रामचंद्र बापट ८
,, प्रभाकर दि. गाडगीळ ८
,, नारायण गणेश मुळे ८
,, व्ही. बी. महाडेश्वर ८
,, परशराम बी. ताम्हाने ८
,, जगन्नाथ जी. कीर्तिकर ८
,, आत्माराम हरीबा ८
,, पुरुषोत्तम आर. अवसरे ८
,, दिनानाथ रणछोड ८
,, रामचंद्र अनंत ८
,, शंकर सिलोजी थोरत ८

,, सिताराम वि. मुळे ८
,, शंकर पंढरीनाथ आणेकर ८
,, गणपत आत्माराम ८
,, गणेश वासुदेव परांजपे ८
,, शांताराम ल. नाडकर्णी ८
,, भास्कर भिवाजी ८
,, जी. एम्. पटवर्धन ८
,, आर. ए. सुळे ८
,, पुरुषोत्तमपंत सामंत ८
,, सुंदरराव गोविन्दराव ८
,, गंगाराम नारायण ८
,, वामन त्र्यंबक खारकर ८
,, विश्वनाथ बी. थोपेश्वरकर ८
,, रघुनाथ पुरुषोत्तम साठे ८
,, महाजन आणि मंडळी ८
,, बाबू नारायण मयेकर ८
,, अनंत गो. परांजपे मुधोळ ११
,, सेक्रे० बालसभा मुधोळ ११
,, राम. नारा. लिमये (पाडलें) ११
,, आर. एच्. देवधर (लाहोर) ११
,, श्रीधर लक्ष्मण परांजपे (सेरवली) ११
,, कृ. भास्कर रानडे (पर्वे) ११
,, राम० नारा० साळगांवकर (सावंतवाडी) ११
,, गो ना. जुवेकर (चिरनेर) ११
,, अनंदराव रा. कवडे (अहमदाबाद) ११
,, ना. बा. ह्मसकर (पुणें) ११
,, ग. ना. तेरे आणि मंडळी (उंबरगांव) ८
,, गं. वा. शृंगारपुरे (वेर्डी) ११
,, ज. ना. तेरे. (खंडाळें) ११
,, यमुबाई यादव गद्रे (उमेळा) ८
,, बा. स. खानोलकर (आर्नाळा) ११

# "पैसा फंड"

मासिक पुस्तक.

वर्ष १ लें.] अकटोबर, सन १९०३. [अंक ४ था.

## टका!

टका कर्ता, टका हर्ता; टका मोक्षप्रदायकः ।
टका सर्वत्र पूज्यंते; बिनटका टकमकायते ॥

टका ह्मणजे पैसा. त्याची लीला वरील सुभाषितांत एका विनोदी कवीनें यथार्थ वर्णन केली आहे. तो ह्मणतो जगांत कर्ता पैसा, हर्ता पैसा, पूजनीय पैसा, आणि तो नसला ह्मणजे टकमका पहात लावणारा पैसाच! व्यवहारांत सुद्धां अगदीं असेंच आहे. ज्याचे जवळ पैसा असतो अथवा त्याला जो कमावीत असतो त्याला संसारांत कर्ता ह्मणतात. तो ज्याचे पाशीं नसतो अथवा जवळ असून त्याचा भलत्याच कामीं दुरुपयोग करितो त्याला हर्ता ह्मणजे उधळ्या वगैरे वाटेल तीं निंदाव्यंजक विशेषणें देतात. ज्याचे जवळ तो मुबलक असतो ह्मणजे जो श्रीमंत असतो त्याची त्याच्या श्रीमंतीमुळें चोहोंकडे मानमान्यता असते व त्याला वाटेल त्या बहुमानसूचक नांवानें संबोधिण्यांत येतें. असे हे लक्ष्मीपुत्र अक्षरशून्य असले, दुर्गुणी असले, किंबहुना घरबुडवेही असले तरी त्यांच्या बहुमानसूचक 'साहेब' इत्यादि पदव्या कोठेंही जात नाहींत!

मात्र त्यांचे जवळ पैसा थोडासा तरी शिल्लक पाहिजे. आणि तो जोंपर्यंत थोड्या फार अंशानें जवळ असतो तोंपर्यंत 'टका सर्वत्र पूज्यंते' या लोकमान्य श्रुतीस हरताळ लागत नाहीं! परंतु तोंच पैसा जवळचा नाहींसा झाला, किंवा संपला, अथवा जन्मापासून जवळच मुळीं नसला ह्मणजे त्या बिचाऱ्यास जगांत सर्वकाळ चालूं असणाऱ्या 'जीवनसंग्रामा' पुढें हात टेंकावे लागतात! तो शहाणा असला तरी त्याला मूर्खांचे टक्केटोणपे खाण्याचा प्रसंग येतो. आणि मूर्ख असला ह्मणजे मग तर बोलावयालाच नको. सारांश टका ह्मणजे पैसा जवळ असणें ह्मणजेच या जगांत कांहीं सुख व मान आहे. नाहींतर कांहीं नाहीं.

आपला हिंदुस्थान देश पूर्वी केवळ कांचनमय होता, असें ह्मटलें तरी चालेल. कारण त्यांतून खरोखरच सोन्याचा धूर निघत असे. तें त्याचें वैभव व अपार संपत्ती पाहून परकीयांच्या तोंडास पाणी सुटलें आणि त्यांनीं साम, दाम, दंड, व भेद यांचा हजारों वर्षे सारखा उपयोग करून त्या बिचाऱ्याला प्रस्तूतची ही हीन दशा आणली! त्यामुळें या भूमातेस रक्ताचे अभिषेक झाले, धर्माची पायमल्ली झाली, स्वातंत्र्याचा नायनाट झाला, वैभवाच्या पताका जमीनदोस्त झाल्या, आणि दारिद्र्यानें मात्र आमचा देश जो पादाक्रान्त केला तो कायमचा केला. आमच्या आजच्या हीन स्थितीचें कारण कदाचित् आमचे आह्मी असूं, परंतु परकीयांनीं आमच्या देशांत पाय ठेवण्याचे पूर्वीचा आमचा

इतिहास पाहतां आमच्या ऱ्हासाचें आद्य कारण आमचे आम्ही खास नाहीं असें दिसून येईल. गोल्डस्मिथच्या Good Natured Man (सुशील गृहस्था) चा अति चांगुलपणा शेवटीं त्याच्याच विपन्नावस्थेस जसा कारण झाला त्याचप्रमाणें आमच्या देशाची विपुल संपत्तीच आमच्या प्रस्तूतच्या शोचनीय स्थितीस कारण झाली आहे असें आढळून येईल. ती आपल्या देशांत जेव्हां मुबलक होती तेव्हां 'टका सर्वत्र पूज्यंते' या वचनानुसार आमच्या देशाची बडेजाव होती. ती इतकी कीं, एखादा मोठा अधिकारी भेटला अथवा चटक चांदणी सारख्या एखाद्या मेमसाहेब आडव्या आल्या ह्मणजेच ज्यांना डोक्यावरची टोपी काढण्याच्या रूपानें त्यांचा बहुमान करण्यांत भूषण वाटतें, तेच लोक पूर्वीं आमच्या राजापुढें भर दरबारांत टोपी व बूट काढून गुडघे तर टेंकीतच; पण वेळेनुसार खंडणी देतांना आपले हातही रुमालबद्ध करून त्यांना मान देत! तेव्हां हा केवळ टक्याचा प्रभाव आहे. त्याचे प्रभावांत 'अस्मानी' च्या ऐवजीं सपशेल 'सुलतानी' होत होत तीच टोपी आणि तेच बूट आतां कधीं कधीं आमच्या शिरकमलावर विराजमान होण्यास कोठें कोठें आरंभ झाला आहे! कारण आमच्या जवळचा टका ह्मणजे पैसा गेला. आणि त्या पैशाबरोबर आमचें सर्वस्वच गेलें. ह्मणून आह्मांला दारिद्र्यानें पूर्ण घेरलें आणि एका परमेश्वरा वांचून आमची खरी काळजी करणारा कोणीही राहिला नाहीं; अशी आमची खातरी

झाली. तेव्हां त्या परमेश्वराला आपली करुणा कशानें येईल?

कोणी ह्मणतील त्याची भक्ति करा, करुणा भाका व टाळ कुटा ह्मणजे तो प्रसन्न होईल. कोणी ह्मणतील गृह पुत्र आणि कलत्र यांचा त्याग करून अरण्यांत जाऊन आत्मज्ञानाचा शोध करा ह्मणजे तो कृपा करील व कोणी ह्मणतील साधुसंतादि महाजन ज्या मार्गानें गेले तो मार्ग आपण धरला ह्मणजे आपल्या इष्ट कामना पूर्ण होतील. हे तिन्ही मार्ग कुचकामाचे आहेत असें ह्मणण्याची आमची इच्छा नाहीं. परंतु प्रस्तुतकालीं ज्या मार्गानें आपण गेलों ह्मणजे आपली पूर्वस्थिति प्राप्त होईल असें आपणास वाटतें तो मार्ग या तिन्ही मार्गापेक्षां फार भिन्न आहे. आणि आमच्या मतें रामनामाचा जप, आत्मज्ञानाचा शोध, व पंढरीची वारी, या योगानें तो करुणाघन जितका प्रसन्न होण्याचा संभव आहे त्यापेक्षां त्या भिन्न मार्गानें गेल्यास तोच करुणाघन आपणावर अधिक मेहेरबान होण्याचा संभव आहे. तो भिन्न मार्ग ह्मटला ह्मणजे स्वावलंबन, सदाचरण व भूतदया होय. आणि या त्रिगुणात्मक मूर्तीचें पूर्ण ऐक्य 'सत्य' यांत आहे. यापैकीं पहिली पायरी स्वावलंबनाची आहे. स्वावलंबन ह्मणजे स्वतःवर अवलंबून राहणें. ज्या राष्ट्रांत अशा व्यक्तींची संख्या अधिक असेल तें राष्ट्र धन्य आहे. आमच्यांत स्वावलंबनी व्यक्ति फार थोड्या ह्मणून दुसऱ्याच्या मदतीची अपेक्षा करणारांचाच वर्ग आमच्यांत अधिक आहे हें उघड आहे. ह्या परावलंबनी स्थितीनें आ-

ह्मांला रसातळाला पोंचविलें. त्यामुळें आह्मी अधिकाधिक खालावत जाऊन जेव्हां उपाशीं मरूं लागलों तेव्हां कोठें आ-ह्मांला आतां स्वावलंबनाची पुसट पुसट कल्पना होऊं लागली! आणि ती अशा वेळीं होऊं लागली कीं, ज्यावेळीं आह्मांला स्वावलंबनी होण्याचें एकही सुलभ साधन उरूं नये! तथापि मुळींच स्वावलंबनी नसण्यापेक्षां उशीरां कां होईना पण स्वावलंबनाची आतांशी कोठें आह्मांला पुसट पुसट आठवण होऊं लागली आहे ही फार चांगली गोष्ट आहे. अशा वेळीं आमचें आद्य कर्तव्य, एकमेकांनीं एकमेकांला मदत करणें व राष्ट्रीय कल्याणासाठीं सर्वांनीं एक होणें हें, होय. आपली शोचनीय स्थिति आपल्यास कळून चुकली आहे. तेव्हां आपल्याप्रमाणें आपल्या मुलांनीं तरी आजन्म दास्यांत लोळूं नये अशी तजवीज आपण आतां-पांसून केली पाहिजे. ह्मणून 'सर्वारंभास्तंडुला: प्रस्थ-मूला:' ही ह्मण लक्षांत ठेवून उद्दिष्ट राष्ट्रीय कार्यासाठीं जर दुसरें चांगलें कृत्य आपल्या हातून कांहींच होत नसेल तर निदान एक एक पैसा तरी मागें टाकण्यास सर्वांनीं आधीं शिकलें पाहिजे. आणि त्यानंतर त्याचा सद्व्यय करण्यास शिकणें ही दुसरी गोष्ट. पहिलीपेक्षां दुसरीची महती विशेष आहे. पण जेथें पहिलीचाच ठिकाण नाहीं, तेथें दुसरीचा काय उपयोग? "अर्थशास्त्रा" वरील 'ग्रंथमाला' नुसती गळ्यांत का बांधावयाची आहे?

वस्तुत: एका पैशाची किंमत कांहींच नाहीं. पण तीस-

कोट पैशांची किंमत ४६,२५०००रुपये आहे! व 'जलबिन्दु निपातेन क्रमशः पूर्यते घटः' या न्यायानें कांहीं वर्षांनीं या ४६,२५००० चे कोट्यावधी रुपये होतील. देशहित-दृष्टीनें त्यांचा सञ्चय केला, दारिद्र्यहनन या सर्वसंमत व सर्व व्यापक तत्वावर रोंख ठेवून भिन्न धर्मांच्या व भिन्न ज्ञातींच्या सर्व लोकांचें ऐक्य झालें आणि स्वावलंबन, सदाचरण व भूतदयाविशिष्ट विभूति पुढें आल्या तर 'टका सर्वत्र पूज्यंते' या वाक्याची यथार्थता तेंव्हांच कळून येईल. निदान आपल्या हिंदुस्थानाजवळचा तरी 'टका' नाहींसा झाला असल्यामुळें त्याला अशा कामीं संघशक्तीची फारच अवश्यकता आहे आणि तिचा या 'पैसाफंडा'च्या कामांत उद्दिष्ट हेत्वनुरूप व्हावा तसा उपयोग होण्यास कांहीं हरकत नाहीं, मुळींच अशक्य नाहीं, व त्याला वेळही फारसा लागणार नाहीं अशी आमची कल्पना आहे. आणि देशाच्या संघशक्तीवर, हिमतीवर, व कृतींवर त्याचें भावी वैभव जितकें अवलंबून असतें तितकें दुसऱ्या कशावरही नसतें.

---

## स्फूट.

'पैसा फंडा' ची कल्पना निघून व तिची यथार्थ अवश्यकता लोकांस भासूं लागल्यापासून तत्संबंधानें आपल्य महाराष्ट्रांतील व गुजराथेंतील प्रमुख वर्तमानपत्रांत बरेच अनुकूल लेख येऊं लागले आहेत ही मोठी उमेद आण-

णारी गोष्ट आहे. या पैकीं पर्यायानें ज्यांनीं पैसाफंडा संबंधानें आपली पूर्ण अनुमति दिली आहे असे दोन लेख विशेष वाचनीय आहेत. पहिला ता० १३ मिनहूच्या मराठ्यांत R, V. T. ह्यांचा Bread! Dear Bread! हा व दुसरा ता० १२ मिनहूच्या श्रीसयाजीविजयांत आलेला 'संपत्तीचा सद्व्यय' हा दांडगा लेख. हे दोन्ही लेख मोठे चांगले आहेत. व दोघांचीही इच्छा या 'पैसा फंडास' व्यापक स्वरूप येऊन गोरगरीबांस उद्योगधंदे मिळावे अशीच आहे. या दोन्ही लेखांचा आपल्या मनांशीं शांतपणानें विचार करून तदनुरूप आपण वागूं लागलों तर किती चांगली गोष्ट आहे? निदान आमच्या वाचकांनीं तरी ते लेख शक्य असल्यास अवश्य वाचावे अशी आमची शिफारस आहे.

---

आसामचे माजी चिफ् कमीशन सर हेन्री कॉटन यांनीं मि० मलबारीच्या ' ईस्ट एण्ड वेस्ट ' मासिक पुस्तकांच्या गेल्या अंकांत ' हिंदुस्थानच्या दारिद्र्या ' वर एक लेख लिहिला आहे. त्या लेखांत नवीन असें कांहीं नाहीं. तथापि जें त्यांनीं लिहिलें आहे तें मोठ्या कळकळीनें आणि सप्रमाण असेंच लिहिलें आहे. त्या लिहिण्याचा एकंदर रोख असा आहे कीं हिंदुस्थानदेश अत्यंत दरिद्री झाला आहे. व दिवसानुदिवस तो अधिक दरिद्री होत आहे. वर्तमानपत्रें, राष्ट्रीयसभा व प्रांतिकसभा ही गोष्ट पुनःपुन्हां

राज्यकर्त्यांचे कानीं कपाळीं ओरडून सांगत असतांही ही गोष्ट त्यांचे डोक्यांत शिरत नाहीं हें चांगलें नाही वगैरे. परंतु सर हेन्री कॉटन हे या देशांतील सरकारी अधिकाऱ्यांपैकीं एक प्रमुख, जुने व अनुभवीक अधिकारी असून त्यांना स्वराज्याचा अत्यंत अभिमान असणें साहजीक असतांही त्या अनुभवांत त्यांना आमची स्थिति जशी दिसून आली तशीच त्यांनीं आपल्या लेखणींतून कागदावर उठविली हें विशेष आहे. विशेषतः त्यांच्या दर्जाचा मनुष्य जेव्हां आमच्या अभागी देशाचें शोचनीय दारिद्य प्रांजलपणें कबूल करितो तेव्हां आमची स्थिति किती अनुकंपनीय असली पाहिजे हें येथें सांगितलें पाहिजे असें नाहीं. खोऱ्यानें पेन्शनें ओढून त्यांवर विलायतेंत चैन मारणारे हिंदुस्थानसरकारचे माजी अधिकारी थोडे नाहींत. परंतु सर हेन्री कॉटनसारखे वस्तुस्थिति उघड करून दाखवून आमच्यासारख्या परदुःखानें दुःखित होणारे मात्र विरळ. आणि ह्मणूनच त्यांच्या लेखाचा येथें आभारपूर्वक उल्लेख करण्यांत येत आहे.

# पत्रव्यवहार.

## माझा प्रवास.

रा. रा. पैसाफंड मासिक पुस्तककर्ते यांस,

वि. वि. ता. ९ सपटंबर सन १९०३ पासून मुंबई येथें पैसाफंडावर व्याख्यानें द्यावीं अशीं पुष्कळांनीं इच्छा प्रद-

शिंत केल्यावरून मी कांहीं दिवस मुंबईत राहिलों. नंतर ता. ९ सपटंबर रोजीं राई भायंदर येथें आलों. आर्य मोरोपंत मराठे यांनीं या वर्षाची पैसाफंडाची वार्षिक रकम ५ रुपये थोड्याच दिवसांत ‘ केसरी ’ कर्त्यांकडे पाठविण्याचें कबूल केलें. नंतर भायंदर येथें येऊन आर्य लक्ष्मणराव मराठे यांची भेट घेतली. यांनीं या वर्षाची वार्षिक वर्गणी १५ रुपये पाठविण्याचें कबूल केलें, इतकेंच नव्हे तर लगेच हुंडी लिहून दिली ! नंतर मी वसई येथें येऊन आर्य विष्णुपंत मराठे, गोविंदराव शेंडे वगैरे मंडळीच्या भेटी घेतल्या. रविवारीं सभा भरविण्याचें ठरलें. एक दिवस अवकाश होता ह्मणून उमेळा येथें गेलों. आर्य गोपाळराव मराठे यांनीं आपल्या घरीं चार मंडळीं जमविली. फंडाला काय मदत मिळेल हें मागाहून कळणार आहे. मासिक पुस्तकाला ४ वर्गणीदार झाले. नंतर वसईस थिएटर मध्यें सभा भरविली. व्याख्यान झालें. कल्पना पसंत पडली. कांहीं आंकडे पडले. परंतु गांवांतील ठळक मंडळी आली नव्हती, यामुळें कमेटी झाली नाहीं. तरी पण आर्य गणपतराव मराठे यांस तूर्त खजिनदार ठराविले आहेत. येथें मा.पु.ला ५० वर्गणीदार झाले ! मला ठिकठिकाणीं नेहमीं जो अनुभव येतो, तो येथेंही आला. तो हा कीं, तरुण मंडळीमध्यें स्वदेशहिताची कळकळ विशेष दिसली. पैसाफंडांतून एक पै न घेतां मरेपर्यंत दुसरें काम करणें नाहीं, असा निश्चय ऐकून मला मदत देण्याची पुष्कळांस इच्छा झाली. उमेळा

येथील आर्य गोपाळराव मराठे यांनीं मोठ्या आनंदानें स्वयंसेवकांचें काम पत्करलें आहे. असो. वसईचें काम आटपून मी पापडी येथें आलों. सायंकाळीं श्री शंकराचे देवळांत सभा भरविली. आर्य विनायकराव बर्वे, वासुदेव भाऊ नातू, शेट काशीदास वगैरे ठळक मंडळी बरीच होती. व्याख्यान होऊन कल्पना पसंत पडल्यावर कमेटी नेमण्यांत आली. विनायकराव बर्वे यांस खजीनदार नेमण्यांत आलें. आर्य परांजपे यांनीं स्वयंसेवकाचें काम पतकरलें. वर्गणी जमेल ती गांवांत ठेवावी किंवा 'केसरी' कर्त्यांकडे पाठवावी, याबद्दल थोडा वादविवाद झाल्यावर 'केसरी'-कर्त्यांकडे पाठवावी असें सर्वानुमतें ठरलें. विजया दशमीच्या आंत प्रत्येकानें आपली वर्गणी द्यावी असें ठरलें. येथें ३ वर्गणीदार झाले. नंतर मी आगाशी येथें आलों. श्री. बापूसाहेब गद्रे, स्वदेशभक्त माधवराव पेंडसे यांच्या विद्यमानें सायंकाळीं श्रीभवानीशंकराच्या देवळांत सभा भरविली. ६ महिन्यां मागें येथें माझें व्याख्यान झालें होतें. परंतु कमेटी झाली नव्हती, ह्मणून मी येथें पुनः आलों होतों. सर्व मंडळींनीं कृपा करून माझ्या ह्मणण्यास मान देऊन कमेटी स्थापन केली. श्री. बापूसाहेब गद्रे यांस खजीनदार ठरविलें. एक महिन्यांत वर्गणी वसूल न झाल्यास माधवराव पेंडसे यांनीं वसूल करून ती खजीनदारामार्फत केसरीकडे पाठविण्याचें कबूल केलें आहे. येथील न्हावी, पुजारी, गवळी व टांगेवाले अशा धंदेवाल्या लोकांतही पैसाफंडाला हातभार

लावण्याची इच्छा दिसली, याचें श्रेय बऱ्याच अंशीं आर्य महादेव चिंतामण पेंडसे यांसच आहे, यांत तिळमात्र शंका नाहीं. येथें मा. पुस्तकाला २ नवीन वर्गणीदार झाले. आर्य परशरामभाऊ गवळी हे वाचनाचे भोक्ते दिसले. यांनीं मा० पुस्तकाची वर्गणी व ( राष्ट्रीय ) पैसा फंडाची वर्गणी देऊन शिवाय मला प्रवास खर्चासाठीं चार आणे दिले! एका तांगे वाल्यानें मला विरार स्टेशनपर्यंत फुकट पोंचविलें. नंतर मी पालघर येथें आलों..आर्य जनूभाऊ दांडेकर भाऊसाहेब दांडेकर वगैरे कांहीं गृहस्थांच्या भेटी घेऊन रविवारीं सभा भरविण्याचें ठरविलें. आज ता. १९ रोजीं शनिवार आहे, सबब येथून जवळच शिरगांव आहे, तेथें जाण्याचा बेत केला आहे. पुढील हकीगत पुढील अंकीं येईल. कळावें.

केळवें माहीम } आपला
१९।९।०३ } अं. श. काळे.

---

# वर्तमानसार.

—ओसक येथिल प्रदर्शनामधील जवाहीरखान्यांत कांहीं धाडशी लोकांनीं फारच मोठी चोरी केली. २५००० येनचा माल चोरांनीं लांबविला. त्यांतच २५०० येन किमतीचें एक मोतीही चोरीस गेलें.

—१९०१ मध्यें जुलै अखेर हिंदुस्थानसरकारच्या खजिन्यांत १७,०१,८७,००० रु. शिल्लक होते; १९०२ मध्यें १८,०९,३८,००० रु. होते व १९०३ मध्यें १८, ६६,२२,००० होते.

—काश्मीरांत जो नुकताच जलप्रलय झाला त्यामुळें लाखों कुटुंबें निराश्रित पडलीं आहेत. त्यांच्या मदती साठीं जो फंड गोळा होत आहे त्यास काश्मीरच्या महाराजांनीं एक लक्ष रुपये व श्री० सयाजीराव महाराज गायकवाड यांनीं २००० रुपये दिले. शिवाय श्रीनगर येथील राजवाडाही निराश्रितांस आश्रय देण्याकरितां खुला करून देण्यांत आला आहे.

—ता. २९ आगष्ट पासून ता. ३१ मिनहूपर्यंत पुणें येथें तीन दिवस सारखी महंमदीय प्रांतिक शिक्षणपरिषद् भरली होती. प्रेक्षकसमुदाय दोन हजारपर्यंत होता. अजमीर, जंजिरा, पोरबंदर, राजकोट, सातारा, बेळगांव, सोलापूर, विजापूर, खंबायत, भडोच, केरवाडा वगैरे ठिकाणचे महंमदीय प्रतिनिधी आले होते. अध्यक्ष स्थानीं नबाब मोसेन उल्मुख, अलीगड हे होते. या परिषदेंत एकंदर दहा ठराव पास झाले. पैकीं **सहावा ठराव रुपया फंडाबद्दल होता.** व त्या ठरावान्वयें **रुपया फंडाकरितां प्रत्येकानें स्वशक्त्यनुसार झटावें.** असें प्रतिपादन करण्यांत आलें.

—सदरील परिषदेच्या गुदस्तांच्या बैठकींत वरील प्रमाणेंच प्रत्येक मुसलमान गृहस्थानें आयुष्यांत एकदां तरी **निदान एक रुपया तरी सभेच्या फंडास द्यावा** असा ठराव पास झाला होता आणि त्याप्रमाणें वरील बैठकीच्या दिवसापर्यंत १०,३६३ रुपये जमा झाले. याबद्दल आह्मी आपल्या मुसलमान बंधूंचे अभिनंदन करितों.

—त्याचप्रमाणें या महंमदीय प्रांतिक शिक्षणपरिषदेची पहिली बैठक झाल्या नंतर मि. महंमद युसफ सुलेमान व मि. महंमदइब्राहिम सुलेमान यांनीं प्रत्येकीं २५००० रुपये या सभेस विद्याप्रसाराचे कामीं देणग्या दिल्या आहेत. आणि ह्या ह्मणजे तिसऱ्या बैठकीच्या वेळींही जुनागडच्या नबाबांनी २००० रु., त्यांचे वजीरसाहेबांनीं १००० रुपये व सुरतेंतील बोहऱ्यांचे मुल्लासाहेबांनीं ५०० रु. दिले. स्तुत्य.

## वर्तमानसार.

—नामदार लॉर्ड नार्थकोट आपल्या इलाख्याचे गव्हरनर, हे आपल्या पत्नीसहवर्तमान गेल्या महिन्याचे ५ वे तारखेस परत गेले. हे स्वभावानें मोठे शांत व मनमिळाऊ होते. तसेच ते उदारही होते. स्वदेशीं जातांना त्यांनीं डे. ए. सोसायटीला मदत ह्मणून एक हजार रुपये दिले.

—मद्रासेंतील येलोर तालुक्यांत ताम्मिलेरु नदीस भयंकर पूर येऊन ५००० एकरांतील पीक बुडून दीड लक्ष रुपयांचें नुकसान झालें !

—लॉर्ड ल्यामिंगटन हे मुंबईचे नवे गव्हरनर होऊन येणार आहेत.

—येत्या राष्ट्रीयसभेचे अध्यक्षस्थानीं कलकत्त्याचे सुप्रसिद्ध बाबू लाल मोहन घोस यांची निवड होणार आहे. योग्य.

—केसरीकर्ते रा. बाळगंगाधर टिळक, यांस ताईमहाराजांचे खटल्यांत अठरा महिन्यांची सक्त मजुरीची शिक्षा व १००० रु. दंड सर्वश्रुत झालाच आहे. असें ह्मणतात कीं प्रजेपासून वसूल करून घेतलेल्या करापैकीं या खटल्यांत सरकारचे ४०००० रुपये खर्च झाले. सदरील खटल्यावर से. जज्ज मि. ल्यूकस यांच्याकडे अपील झालें असून त्यांनीं रा. टिळक यांस तूर्त जामिनावर सोडलें आहे. चालू महिन्यांत अपिलाची बहुधा सुनावणी होईल असें वाटतें.

—स्मारकवाल्यांची खाशी सोय—संगमरवरी आणि दगडी पुतळे व मूर्ति करतांना हातानें करावें लागणारें टाकीचें, रंध्याचें व इतर काम या पुढें सहज व थोड्या खर्चांत करणारें यंत्र एकानें शोधून काढलें आहे!

—सरकारी गुप्तवातम्यासंबंधानें एक 'मुस्कुटदाबी' कायदा पास होण्याचें घाटत आहे ! जें जें होईल तें तें थोडेंच आहे !

## पोंच व अभिप्राय वगैरे.

**ऐतिहासिक पुरुषांचे उत्सव कां करावे?**—लेखक रा. विनायक दामोदर सांवरकर व प्रकाशक रा. गणेश नारायण जोशी. फडणीसपुस्तकमालेंतलें हें पहिलें पुष्प आहे. तें मोठें-सुंदर आहे. सर्वांच्या संग्रहास पात्र आहे. किंमत अवघी ०१.

**राजा भोज व यक्ष संदेश**—हीं पुस्तकें आमचेकडे अभिप्राया करितां आलीं आहेत. त्यांची पोंच मागील अंकीं दिलीच आहे. पुस्तकांची भाषा ठीक आहे. लेखक रा. देवस्थळी यांची कवित्वशक्ती बरी आहे. त्यांनीं एखादें स्वतंत्र काव्य तयार केल्यास त्यांच्या कवित्वाची चांगली परिक्षा करितां येईल. पुस्तकाची किं. अनुक्रमें ५ व ३ आणे आहे. छपाई निर्णयसागरची आहे. एकंदरींत पुस्तकें संग्रहास पात्र आहेत; तरी वाचनेच्छूंनीं आश्रय द्यावा अशी आमची शिफारस आहे. हीं पुस्तकें पाठविणारांचे फार उपकार आहेत.

**सूचना**—"पैसाफंड" मासिक पुस्तक आम्ही आपल्या व्यवसाय बंधूंकडे पाठवीत असतों. तथापि आमचे बरेच मित्र आह्मांस उलट भेट देत नाहींत. यापुढें तरी आमच्या बंधूंचें इकडे लक्ष जाऊन ते नियमानें भेट देत जातील अशी आशा आहे. **लोकमित्र, दीनमित्र, उद्यमोत्कर्ष** आणि **लोकसेवा, भूत, समर्थ** व **नगरसमाचार** यानीं भेट देण्यास सुरवात केली आहे व त्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोंत.

## गुण न आल्यास पैसे परत.

# किंमत ] बालामृत. [१२आणे.

हें मुलांच्या शरीर प्रकृतीची उत्तम सुधारणा करणारें असून, हाता पायांच्या काड्या, पोटांतले विकार, अग्निमांद्य जुनाट खोकला, आंगांतील कडकी वगैरेवर केवळ अमृततुल्य गुणदायी आहे. मुलें सशक्त, निरोगी तेजस्वी बनतात, दूध व अन्न चांगलें पचूं लागतें. हें मधुर असल्यामुळें मुलें मोठ्या हौसेनें पितात. यापासून जंत होण्याची धास्ती नाहीं. उत्तम गुणास तीन बाटल्या लागतात. तीन बाटल्या एकदम मागविणारास २ रुपये. शिवाय जर्मन सिल्वरचा चमचा फुकट १ बाटलीस ट. ख. ६ आणे. ३ बा. ट. ख. १० आणे.

पैसा मिळवा व पैसा वांचवा.

# उपयुक्त कलाकलाप.

## भाग १ ला व भाग २ रा.

प्रत्येक भागाची किंमत ५ आणे ट. ह. अर्धा आणा व्ही. पी.नें एक भागास ७ आणे. दोन भागांस १२ आणे प्रत्येक भागांत व्यवहारांत नेहमीं उपयोगी पडणाऱ्या अशा शंभर शंभर जिनसा तयार करण्याची खरी व अनुभविक माहिती दिली आहे.

औषधें व पुस्तकें मिळण्याचा पत्ता.

## वि. के. लोंढे, पोष्ट—गिरगांव मुंबई.

# केशव भिकाजी ढवळे यांचें
# पुस्तक विक्रीचें दुकान.

आमच्या येथें सर्व ठिकाणच्या प्रसिद्ध छापखान्यांत छापलेलीं पुस्तकें. ग्रंथ, कादंबऱ्या, नाटकें, सरकारी व खासगी शालोपयोगी पुस्तकें स्वस्त भावानें विकत मिळतात. बाहेरगावीं विशेष काळजी घेऊन माल पाठवूं. व्यापारी व शाळामास्तर यांस भरपूर कमिशन देऊं. शिवाय नफ्याचा $\frac{1}{10}$ सार्वजनिक पैसाफंडाला देत जाऊं. तरी सर्वांनीं **स्वार्थ** व **परमार्थ** साधण्याची संधी घालवूं नये. आह्मीं रुपयास अर्धा आणा कमिशन घेऊन पाहिजे तो माल पाठवित असतों. एकवेळ अनुभव घेण्याची विनंति. मागणी करतेवेळीं ' पैसा फंड ' मासिक पुस्तकाचा उल्लेख करावा.

पत्ता—माधवबाग मुंबई.

---

## सोपें औषध । परी गुणवंत ॥ दासबोध ॥

स्वदेशाभिमान मिश्रण ( चूर्ण ५$\frac{1}{4}$ तोळे ) स्वाभिमान पाक ( २१ तोळे ) या दोन्हीं औषधांची किंमत फक्त सव्वारुपया. हीं औषधें पौष्टिक वीर्यवर्धक–स्वप्नावस्था प्रतिबंधक–मूळव्याध शामक–रक्त शोधक–मेंदूला पुष्टिकर, अशीं आहेत. स्वदेशभक्तांनीं संशय न धरितां हींच औषधें घ्यावीं; कारण यांच्या नफ्यानें मूळ किमतीला धार्मिक ज्ञानाचे व स्वदेशहित साधक ज्ञानाचे ग्रंथ देणारी ' ज्ञानदान ग्रंथमाला ' सुरू होणार, कळावें.

महादेव चिंतामण पेंडसे.

आगाशी. ता. वसई.

**स्व**देशी मेंथाल—भारतवर्षीय वस्तु विषयीं कळकळ बाळगणाऱ्या प्रत्येक देशबांधवानें हें एकदा तरी वापरून पहावें. इंग्लीश प्रमाणें गुणकारी असल्याबद्दल अनेक डाक्टर लोकांचीं सर्टिफिकिटें मिळालीं आहेत. किंमत ८४ व्यापाऱ्यांस भरपूर कमिशन. गांवोगांव एजंट पाहिजेत.

**पत्ता**—धि आर्यन् इंडस्ट्रियल कंपनी, गिरगांव, **मुंबई.**

---

**पा**हिजेत:—अनुभवांतीं पुष्कळ लोकांच्या पसंतीस उतरलेलें रानडे यांचें सुवासिक कापशीचें तेल विकणारे एजंट पाहिजेत. किंमत ४ आणे. कमिशन भरपूर.

पत्ता—**महाजन आणि मंडळी.**
सोल एजंट गिरगांव बॅकरोड, मुंबई.

---

**नारायण भिकाजी आपटे ह्यांचें गुणकारी**

# बालामृत.

हें औषध लहान व मोठ्या मनुष्यास एक प्रकारचें पौष्टिक आहे. यापासून दुध व अन्न चांगलें पचतें, अशक्त मुलें सदृढ होतात. खोकला हाडी ताप नाहींसा होऊन, रक्त व मांस यांची वृद्धि होते. चांगला गुण येण्यास तीन बाटल्या द्याव्या लागतात. किंमत १ बाटलीची १२ आणे पोष्ट खर्च ७ आणे. ३ बाटल्यांस रु. २. यांशिवाय खालील औषधें आमचे कडे मिळतील.

**गजकर्णारि**—किंमत ३ आणे. **मलनाशक गोळ्या.** ६ गो. बा. किंमत २ आणे. **शृंगार विलासिनी हेअर ऑईल** किंमत ६ आणे. रेलवेनें मागविल्यास विशेष खर्च पडणार नाहीं. व्यापाऱ्यांस कमिशन भरपूर.

पत्ता—**वैद्याची वाडी ठाकुरद्वार मुंबई.**

# विक्रीस तयार.

| | आ. |
|---|---|
| सार्थ भ० गीता | १० |
| ,, रामगीता | २ |
| ,, तत्वबोध | २ |
| ,, आत्मबोध | २ |
| ,, महिम्न | २ |
| ,, पवन विजय | ६ |
| ,, अवधूत गीता | ८ |
| ,, शिवस्वरोदय | ८ |
| ,, वृद्धचाणाख्य | ४ |
| ,, शृंगारशतक | ४ |
| ,, वैराग्यशतक | ४ |
| ,, नीतिशतक | ४ |
| ,, रामरक्षा | १ |
| प्राकृत शिवगीता | ६ |
| प्राकृत व सं० कोश | रु. ३ |
| गीतार्थ बोधिनी | रु. २ |
| वैद्यक संग्रह | रु. ३ |
| ज्योतिषसार | १२ |
| संसारचोपडी | १२ |
| रामविजयसार | ८ |
| हरिविजयसार | ८ |
| पांडवप्रतापसार | ८ |
| संतलीलामृतसार | ६ |
| पांडवचाळिशी | ८ |
| जहांदार नूरमहिताब | १२ |
| ललित संग्रह | ८ |
| भाडळी ज्योतीष | ६ |
| रुक्मीणी स्वयंवर | ६ |
| दत्तचरित्र | १२ |
| गीत पंचदशी (गर्देकृत) | ८ |
| गीतामृत शतपदी ,, | ८ |
| देवमामलेदार चरित्र | रु. १ |
| पांडव प्र. ग्रंथ बुक | १०४ |
| पुराणांतील नकला | ४ |
| ,, ,, भाग २ रा | ४ |
| तु० भाषेतील गोष्टी | १२ |
| मूर्खशिरोमणी | ४ |
| द्रौपदीचरित्र | ६ |

वरील पुस्तकें विकत घेणारांस नवंबर अखेर पर्यंत एक रुपयास चार आणे कामिशन मिळेल.

**पुरंदरे आणि कंपनी, मु० मुंबई.**

प्रती १००० वर खपतात.

वर्षास आगाऊ वर्गणी फक्त ८ आणे. ट. ख. ३ आणे.

# "पैसा फंड"

## मासिकपुस्तक.

वर्ष १ लें. ] नवंबर १९०३. [ अंक ५ वा.

### विषयानुक्रमणिका.


| विषय. | पान. |
|---|---|
| आमचें रोजचें उत्पन्न .................... | ५३ |
| स्फूट .............................. | ५९ |
| वर्तमानसार .......................... | ६५ |
| पत्रव्यवहार ( प्रवास ).................. | |


व्यवस्थापक,

**पुरंदरे आणि कंपनी.**

माधवबाग:—मुंबई.

संपादक,

**एकनाथ गणेश भांडारे.**

किंमत १ आणा.

'विजय' छा० माधवबाग मुंबई.

# पत्रव्यवहार.

—*—

## माझा प्रवास.

ता० १९ शनिवार रोजीं शिरगांव येथें गेलों. आर्य मोरेश्वर मुकुंद पाटील मोगरे यांनीं शेट दामोदरदास भुकणदास यांच्या घरीं सभा भरविली. सभेला फार थोडी मंडळी होती. परंतु जी होती ती ठळक मंडळी होती. व्याख्यान होऊन कल्पना पसंत पडल्यावर वार्षिक वर्गणी चे आंकडे पडले. आर्य पेठे व गाडगीळ यांनीं प्रत्येकीं दर साल तीन रुपये देण्याचें कबूल केलें. इतरांनींही यथा शक्त्या आंकडे घातले. आर्य मोरेश्वर पाटील मोगरे यांनीं स्वयंसेवकाचें काम मोठ्या आनंदानें पतकरलें. विजया-दशमीच्या सुमुहूर्तानें एकंदर जमेल ती रकम ''केसरी'' कर्ते यांजकडे पाठविण्याचें ठरलें. येथें मा० पुस्तकास ६ वर्गणीदार झाले.

ता० २० रविवार रोजीं माहीम येथें आलों. आर्य जनूभाऊ दांडेकर यांनीं येथील श्री व्यंकटेशाचे देवळांत सभा भरविली. सभेला बरीच मंडळी आली होती. आर्य तात्यासाहेब दांडेकर, आर्य भाऊसाहेब दांडेकर वगैरे बडी-बडी मंडळी सभेला आली होती, त्यामुळें सभेला एक प्रकारची शोभा आली होती. व्याख्यान होऊन कल्पना पसंत झाल्यावर सर्वांनीं यथाशक्त्या आंकडे घातले. श्री. तात्या-साहेब दांडेकर यांस खजीनदार नेमिलें. जागच्या जागीं २०

रुपयांचे आंकडे पडले. अद्यापि बरेच आंकडे पडणार आहेत. श्री. तात्यासाहेब यांनीं दरसाल ९ व श्री. भाऊसाहेब यांनीं २ रु. वर्गणी देण्याचें कबूल केलें आहे. दरसाल १ रु. देणारे गृहस्थ बरेच आहेत! आर्य जनूभाऊ व बळवंतराव श्रृंगारपुरे यांनीं स्वयंसेवकाचें काम आनंदानें पत्करलें आहे. येथें मा. पुस्तकाला १२ वर्गणीदार झाले. अद्यापि कांहीं होतील असें वाटतें. सेंट्रल कमेटी होईपर्यंत ही रकम येथेंच जमा होत जाईल, असें या सभेंत ठरलें. धोंडोपंत दांडेकर यांनीं १ रुपया व जनूभाऊ दांडेकर यांनीं ‌॥ मला प्रवास खर्चासाठीं दिले. व काशीनाथ पंत बुलाख यांनीं कुटुंबाच्या मदतीसाठीं ८ आणे दिले!

ता. २१ रोजीं बोयसर मार्गें चिंचणी येथें आलों, व दुसरे दिवशीं शेट नरसीलाल हरीलाल यांच्या वाडींत सभा भरविली. हा गांव गुजराथी वाणी लोकांचा असल्यामुळें व त्या लोकांत पैसाफंडाची चळवळ मुळींच नसल्यामुळें सभेला फारच थोडी मंडळी आली होती. येथील गुजराथी लोकांस मराठी चांगलें समजतें, यामुळें व्याख्यानाचा परिणाम थोडाबहुत झाला. शेट नरसीलाल यांस खजीनदार नेमलें. जागच्या जागीं कांहीं आंकडे मात्र पडले. अद्यापि बरीच वर्गणी जमा होईल असें वाटतें. येथें मा० पु० ला सात वर्गणीदार झाले. या गांवीं स्वयंसेवक मिळाला नाहीं, हें पाहून वाईट वाटतें.

ता. २३ रोजीं तारापूर येथें रा. रा.शामराव सखाराम बर्वे यांच्या घरीं सभा भरली, व तेथें व्याख्यान होऊन कल्पना पसंत पडल्यावर कांहीं आंकडे पडले. रा. शामरावपंत बर्वे व डा० भागवत यांनी दर साल प्रत्येकीं दोन रुपये देण्याचें कबूल केलें, व इतरांनीं-ही आपापल्या शक्तीप्रमाणें आंकडे घातले. शामरावपंत बर्वे यांस खजीनदार नेमलें. व यांनींच स्वयंसेवकाचें काम कबूल केलें आहे. असे थोर लोक स्वदेशहितासाठीं श्रम सोसण्यास तयार होतील, तोच सुदिन! येथें मा. पु. ला ६ वर्गणी-दार झाले.

ता. २५ रोजीं डहाणू येथें आलों. डहाणू येथील ही माझी सहावी खेप होय! येथें पैसा फंडाची कल्पना पसंत पडली ह्मणजे तालुका कमेटी स्थापन होऊन तिच्या द्वारें सर्व तालुक्याचा फंड सुरळीत रीतीनें वसूल होण्यास त्रास पडणार नाहीं, ह्मणून मी आपल्याकडून हरप्रयत्न केला होता, परंतु कांहीं विघ्नसंतोषी लोकांनीं माझा हिरमोड व्हावा, ह्मणूनच कीं काय, हरप्रयत्नानें सभा ह्मणून होऊं दिली नाहीं! परंतु "सत्य संकल्पाचा दाता भगवान्, सर्व करी पूर्ण मनोरथ" अथवा "निश्चयाचें बळ, तुका ह्मणे तेंचि फळ" या श्रीतुकाराम महारा-जांच्या अभंगाचा भंग होऊं नये, ह्मणूनच कीं काय, दयाघन परमेश्वरानें माझा हा फार दिवसांचा हेतु पार पाडला! ता. २६ रोजीं येथील लायब्ररींत आर्य परशराम

पंत फाटक यांचे अध्यक्षते खालीं सभा भरून कल्पना पसंत पडली. सभेस आलेल्या आर्य जनूभाऊ करंदीकर, शेट गोवर्धन लालजी, शेट नानूभाई आढिया वगैरे थोर मंडळींनीं आपापल्या इच्छे प्रमाणें वार्षिक आंकडे घातले. मुख्य कमेटी होईपर्यंत जमतील ते पैसे शेट गोवर्धन लालजी यांजकडे ठेवावे, असें ठरलें. शेट नानूभाई यांनीं स्वयंसेवकाचें काम पत्करलें आहे. सभेला वकील मंडळी पैकीं कोणीं आलें नव्हतें! मुनसफ होऊं पाहणाऱ्या वकील मंडळीच्या सहवासाचा हा परिणाम कीं काय, नकळे! असो, येथें एक विलक्षण प्रकार घडला तो नमूद केल्याखेरीज मला राहवत नाहीं. येथील कित्येक मंडळी चहाची बडी भोक्ती दिसल्यामुळें मी आपल्या व्याख्यानांत या व्यसनापायीं आह्मीं स्वत: भिकारी होऊन देशाचें वाटोळें कसें करणार, हें थोडक्यांत दर्शविलें होते. त्यावरून कित्येक मंडळींनीं कांहीं मुदतीपर्यंत चहा न पिण्याचा निश्चय केला. या मुदतींत शरीरास अपाय न झाल्यास ते चहास कायमचा रामराम करणार आहेत! येथें मा. पु. ला पूर्वीं २६ वर्गणीदार मिळालेच होते' या खेपेस ४ अधिक मिळाले. दुसरे दिवशीं येथील तरुण मुलास उपदेशपर दोन शब्द सांगून मी घोलवड येथें आलों. येथें सभा होण्याचा रंग दिसेना, ह्मणून मी ता. २८ रोजीं बोर्डी येथें जाऊन शेट करसनदास वल्लभदास यांच्या घरीं सभा भरविली; भडोच येथील व्यापारी शेट नारणदास

भिकाभाई हे अध्यक्ष होते. सभेला पुष्कळ मंडळी आली होती, त्यांत कित्येक पारशी मंडळीही होती. बहुतेक मंडळी गुजराथी भाषाभिज्ञ दिसल्यामुळें मला गुजराथी भाषेमध्यें बोलण्याचा प्रसंग आला! सभेमध्यें गुजराथी भाषण करण्याचा हा माझा पहिलाच प्रसंग! यामुळें माझी त्रेधा उडाली. शेंवटीं मी मराठींत बोलण्याची परवानगी घेऊन आपलें भाषण आटपलें! बहुभाषाभिज्ञ असल्यामुळें काय फायदा होतो, हें यावेळीं मला चांगलें कळून आलें. कल्पना पसंत पडल्यावर जागच्याजागीं वार्षिक ७ रुपयांचे आंकडे पडले शेट बनेचंद धीराजी मारवाडी यांस खजीनदार नेमलें. आर्य परब यांनीं स्वयंसेवकाचें काम पतकरलें आहे. येथें मा. पु. ला एकंदर १९ वर्गणीदार झाले. दुसरे दिवशीं घोलवड येथील मंडळीनीं खटपट करून सभा भरविली. कल्पना पसंत पडल्यावर कमेटी वगैरे स्थापन करण्याच्या भानगडींत न पडतां वार्षिक ९ रुपयांची यादी केली व सन १९०३ ची रकम केसरीकर्ते यांजकडे लगेच पाठवून दिली. येथील लोकांची कर्तव्यदक्षता वर्णनीय नाहीं असें कोण ह्मणेल? येथें मा० पु० ला एकंदर २३ वर्गणीदार झाले. येथील आर्य गुंडोपंत माळकर यांनीं मला कुटुंबास मदत ८ आणे व प्रवासखर्च २ आणे मिळून १० आणे दिले. येथून दसऱ्या करितां घरीं गेलों.

खतलवाडा २१-९-०३ अं. दा. काळे.

# पैसाफंड

## मासिक पुस्तक.

वर्ष १ लें.] नवंबर, सन १९०३. [अंक ५ वा.

# आमचें रोजचें उत्पन्न तीन पैसे तरी आहे काय?

ता० ११ सप्टेंबर १९०३ रोजीं सर रॉबर्ट गिफिन यांनीं 'ब्रिटिश असोसिएशन'च्या 'इकॉनॉमिक सायन्स ॲण्ड स्टॅटिस्टिक्स' नामक शाखेपुढें "साम्राज्याची संपत्ति आणि तिचा विनियोग "या विषयावर एक सर्वोत्कृष्ट निबंध वाचला. त्यांत त्यांनीं हिंदुस्थानच्या दारिद्र्याचा बराच विचार केला असून एके ठिकाणीं तर असे हृदय-द्रावक उद्गार काढले आहेत कीं 'हिंदुस्थानची ती को-ट्यावधी प्रजा आह्मांला अर्धपोटी ठेवतां येत नाहीं. कारण आपण ती तशी ठेविली तर त्याची सर्व जबाब-दारी आपल्यावर आहे.' पुढें सदरील देश अधिकाधिक दरिद्री होत चालला आहे हें सिद्ध करण्याकरितां आपल्या निबंधांत त्यांनीं बरेच आंकडे दिले आहेत. आणि शेवटीं

असें दाखविलें आहे कीं, ब्रिटिश इंडिया आणि त्यांतील त्यांचे अमलाखालीं असणाऱ्या संस्थानांतील तीस कोटी लोकांचें वार्षिक उत्पन्न ४६ कोटी ८० लक्ष पौंड आहे. येवढें उत्पन्न संयुक्तराज्यें आणि वसाहती यांतील ४२ कोटी लोकांच्या नुसत्या खाण्यापिण्यासही पुरत नाहीं! आणि त्याच उत्पन्नांत जेव्हां हिंदुस्थानच्या सर्व लोकांना सर्व गरजा भागवाव्या लागतात तेव्हां ते दिवसेंदिवस दरिद्री होत चालल्यास आश्चर्य नाहीं. ह्याशिवाय या निबंधांत लष्करीखर्चांत सढळ हात व शिक्षणाचे कामांत आमचे राज्यकर्त्यांचा नेहमीं आंखुडता हात कसा असतो याचेंही बरेंच विवेचन केलें आहे; पण त्याच्याशीं आपल्याला येथें विशेष कर्तव्य नाहीं. मुख्य मुद्दा जो हिंदुस्थानचें दारिद्र्य त्याकडे आपल्यास पाहणें आहे. असो. या निबंधवाचनाचे दुसरे दिवशींच आपल्या हतभागी देशाचे प्रसिद्ध कैवारी मि० विल्यम डिग्बी यांनीं एक लेख लिहिला. त्यांत त्यांनीं असें ह्मटलें आहे कीं, सर गिफिन साहेबांच्या आंकड्यांत थोडी चूक आहे, इतकेंच नव्हे तर तींत थोडीशी अतिशयोक्तिही आहे. परंतु या अतिशयोक्तीनें आपलें बरेंच काम केलें आहे. कारण सन १८८१–८२ सालीं जी कोमर–बार्बर इन्क्वायरी झाली होती तिच्या आधारानें सर गिफिन साहेबांनीं हे आंकडे दिले आहेत. पण कालमापनाच्या दृष्टीनें ते चुकीचे आहेत. त्या इन्क्वायरीच्या वेळीं हिंदुस्थानची लोकसंख्या २५ कोटी

३७ लक्ष ३३ हजार ५१४ होती. आणि आतां ( ह्मणजे ता० १ एप्रील १९०१ रोजीं ) ती २९ कोटी, ४३ लक्ष, ६० हजार, ३५६ ह्मणजे जवळ जवळ ३० कोटी आहे. यावरून आजची लोकसंख्या १८८१-८२ सालापेक्षां जवळ जवळ ५ कोटींनीं अधिक वाढली, हें सिद्ध होतें. पण त्या मानानें हिंदुस्थानचें उत्पन्न मात्र वाढलें नाहीं. शक्य तितक्या सूक्ष्म दृष्टीनें अवलोकन करून त्याचें वार्षिक उत्पन्न १९०० साल पर्यंत २८ कोटी ९९ लक्ष ५९ हजार ९१९ पौंड होतें असें दिसून आलें, आणि तें बरोबर आहे, अशी माझी खात्री आहे. तेव्हां संयुक्तराज्यांतील व वसाहतींतील त्या ४२ कोटी लोकांचा नुसता खाण्यापिण्याचा ४६ कोटी ८० लक्ष पौंड खर्च कोणीकडे? आणि बिचाऱ्या हिंदुस्थानांतील या ३० कोटी लोकांचा ज्यांत, सर्वच प्रकारच्या गरजा भागवावयाच्या, तो २८ कोटी ९९ लक्ष, ५९ हजार ९१९ पौंड आदा कोणीकडे? पुढें मि० डिग्बी ह्मणतात, हिंदुस्थानचें जें हें मीं वार्षिक उत्पन्न काढलें तें बरोबर आहे असें ह्मणण्यास एक सबळ पुरावा आहे. तो पुरावा ह्मटला ह्मणजे १९०२ सालीं हिंदुस्थानच्या जमीनमहसुली संबंधानें प्रसिद्ध झालेलें ब्ल्यू बुक होय. त्यांत दक्षिणकानडा व मलबार आणि कांहीं जमीनदारी मैदानें खेरीज करून सरसकट मद्रास इलाख्यांतील शेतकीचें वार्षिक उत्पन्न दिलें आहे. त्याचा ढोकळ दृष्टीनें विचार करतां असें दिसून येतें कीं, प्रत्येक

शेतकऱ्याचें वार्षिक उत्पन्न अवघें १८ शिलिंग ह्मणजे १३॥ रुपये आहे. ह्मणजे रोजचें उत्पन्न सरासरीं २॥ पैसेच पडतें. खुद्द मद्रास इलाख्यांतील शहरा पुरता विचार केला तर शेतकी शिवाय इतर व्यवसायांपासून लोकांना काय मिळतें याची ही कल्पना होईल. गेल्या खानेसुमारींत मद्रास इलाख्यांतील ३ कोटी ४० लक्ष, लोकसंख्येमागें ४२ लक्ष ७५ हजार धंदेवाले शहरांतून राहणारे दिसले. त्यावरून माझें असें अनुमान आहे कीं, शेतकरी आणि धंदेवाले या दोन्ही वर्गांतील लोकांचें वार्षिक उत्पन्न जवळ जवळ सारखेंच आहे. इतकें ह्मणून पुढें मि० डिग्बी साहेबांनीं असें आपलें मत दिलें आहे कीं शेतकरी आणि इतर धंदेवाले यांचें उत्पन्न दर रोज दर माणशीं दोन पैशापेक्षां कांहीं अधिक पण २॥ पैशापेक्षां कमी (Five eighths of one penny per head per day) आहे! ह्याहीपेक्षां डोक्यांत अधिक तेल घालून त्या दुर्दैवी हिंदुस्थानच्या प्रत्येक रहिवाशाचें रोजचें सर्वसाधारण उत्पन्न कोणी काढू पाहिल्यास डिग्बी साहेबांनीं काढलेलाच आंकडा खरा आहे असें त्याच्या अनुभवास येईल. १८८१–८२ सालाच्या मानानें जरी सर रॉबर्ट गिफिन यांनीं काढलेला आमच्या रोजच्या उत्पन्नाचा सढळ आंकडा घेतला तरी तो चार पैशापेक्षां किंचित् कमीच पण अधिक होत नाहीं! परंतु ही गोष्ट वीस वर्षांपूर्वीची आहे. त्या वेळीं या देशाच्या वार्षिक

उत्पन्नाचा सरकारी अंदाज ४६ कोटी ८० लक्ष पौंड होता. आणि आतांचा ह्मणजे १९०० सालचा मि० डिग्बींचा अंदाज २८ कोटी, ९९ लक्ष, ५९ हजार ९१९ पौंड आहे. ह्मणजे उण्यापुऱ्या पावणे दोन तपांतच आमच्या रसातळास चाललेल्या हिंदुस्थानचें उत्पन्न १७ कोटी, ८० लक्ष, ४० हजार ८१ पौंड कमी होऊं लागलें! आमच्या दारिद्र्या विषयीं विचार करतांना वीस वर्षांपूर्वीचे ढोबळ आंकडे घेऊन जेव्हां सर रॉबर्ट गिफिन साहबांनीं वरच्या सारखे उद्गार काढले तेव्हां त्यांना मि. डिग्बी साहबांचे हे आंकडे पाहून काय वाटलें असेल? डिग्बीसाहेबांचें तर असें ह्मणणें आहे कीं, हिंदुस्थानच्या दारिद्र्याची पूर्ण चौकशी व्हावी.

पण ती करतो कोण? या दारिद्र्यांतूनच शक्य तेवढा पैसा मिळवून सातासमुद्रांपलीकडे नेऊन सांठविण्यांत ज्यांचें लक्ष लागलें आहे त्यांची दृष्टी केवळ स्वार्थपरायण झाल्यास आश्चर्य नाहीं. आणि आज जी आमच्या देशाची शोचनीय स्थिति झाली आहे तिच्यांतून आह्मांला कोणी वर काढून आमचा भाग्योदय करील अशी कल्पना सुद्धां मनांत आणणें वेडेपणाचें होईल. उलट सोन्याचीं अंडीं घालणाऱ्या हंसी प्रमाणें एखादे दिवशीं आमची स्थिति झाल्यास नवल नाहीं. ज्या देशाचें रोजचें माणशीं उत्पन्न दोन व तीन पैशांचे दरम्यान येऊन बसलें आहे त्यांच्या दारिद्र्याचा आतां आणखीं कसा कळस

व्हावा हें आह्मांस कळत नाहीं. आळशांतल्या आळशा प्रमाणें आमचें रोजचें उत्पन्न शून्य होईपर्यंतच जर वाट पाहावयाची असेल तर मात्र अशी वाट पाहणाऱ्या मानवी प्राण्यांस उत्पन्न करण्यांत ब्रह्मदेवानें आपली करामत निःसंशय सोळा आणे खर्च केली असें ह्मटलें पाहिजे! बाप हो! असली भलतीच मार्गप्रतीक्षा करण्याच्या भरीं पडूं नका! तुमच्या रोजच्या दोन अडीच पैशांच्या उत्पन्नांतून वर्षाचे कांठीं केवळ एक पैसा मागें टाका. आणि आपल्या मित्रांस, आप्तांस, आणि हितचिंतकांस तसें करण्याविषयीं आग्रहपुरस्सर भाग पाडा. ह्या तुमच्या एका पैशानें पुढें फार मोठें राष्ट्रीय कार्य साधून तुह्मांला सुखाचे व आनंदाचे दिवस येण्याचा बळकट संभव आहे. गंगानदी हिमालयांतून निघाली तेव्हां ती सामान्य नद्यांप्रमाणें कृश व दुर्बळ होती. पण पुढें जसजशा तिला इतर नद्या मिळूं लागल्या, तसतशी ती अंगानें भरून इतकी पराक्रमी झाली कीं खारट पाण्याच्या समुद्राला सुद्धां तिनें कित्येक मैल गोड करून सोडलें! तुमच्या एका पैशाचीही तशीच गोष्ट आहे. आज तीस कोटी व्यक्तींनीं तीस कोटी पैसे वर्षाचे कांठीं मागें टाकण्याचा शपथपूर्वक दृढनिश्चय केला तर हां हां ह्मणतां आपल्या दारिद्र्यरूपी शत्रूचा आपणच पराभव करूं. इतरांच्या मदतीची आ१ण मग वाट पाहणार नाहीं. सारांश आपलें कल्याण आपल्यासच करून घेतलें पाहिजे.

# स्फुट.

आपल्या हिंदुस्थान देशास ज्यानें आकंठ गिळंकृत केलें आहे त्या घोरतर दारिद्र्यरूपी कर्कोटकापासून त्याची अल्प काळांत सुटका करण्याकरितां " पैसाफंडा " सारख्या महामंत्रास्त्राचा प्रयोग बरा आहे अशी बहुतेकांची आतां समजूत झाली आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. परंतु कित्येक समंजस, पोक्त, दूरदर्शी व देशाभिमानी लोकांना सुद्धां या ' पैसाफंडाच्या ' शक्यतेची जबर शंका आहे.

त्यांचें असें ह्मणणें आहे कीं, रा. काळे या एकट्याच गृहस्थांनीं आपल्या कुटुंबाची सुद्धां परवा न करितां 'पैसा-फंडा ' सारख्या अत्युपयुक्त होऊं पाहणाऱ्या राष्ट्रीय चळवळीस वाहून घेतलें, येवढ्या पुरतीच फार झालें तर त्यांची तारीफ करतां येईल. परंतु हिंदुस्थानासारखा अफाट देश आणि रा. काळे ही व्यक्ति या गोष्टी मनांत आणल्या ह्मणजे मुंगीनें समुद्र गिळण्याप्रमाणेंच ही ' पैसा-फंडा ' ची शक्यता अशक्य दिसते. ठोकळ मानानें पाहतां सध्यां मनुष्याचें आयुर्मान पन्नाशीवर येऊन बसलें आहे. तेव्हां व्यक्तिमात्राकडून सर्व आयुष्यांत या राष्ट्रीय फंडाला सालिना पाव आण्याप्रमाणें साडे बारा आणे मिळणार आणि असें असून ते वसूल करण्याकरितां अथवा ते आपोआप वसूल होण्यासारखें लोकमत जागृत करण्याक-

रितां रा. काळे अर्धें आयुष्य संपल्यानंतर बाहेर पडले आहेत! घटकाभर असें जरी गृहीत धरून चाललें कीं, प्रत्येक व्यक्तीनें आपली ही साडे बारा आणे राष्ट्रीय वर्गणी एकदम देण्याचें मनांत आणिलें तरी सुद्धां ती वसूल करणें दाहा काळ्यांच्यानें होणार नाहीं! दुसरी गोष्ट अशी आहे कीं, अशा चळवळी यापूर्वी अनेकांनीं केल्या, परंतु त्या तेव्हांच नामशेष झाल्या. त्यांवरून प्रस्तुत चळवळीवर सर्व लोकांचा सारखा भरंवसा एकदम बसेल हें संभवत नाहीं. आणि संभवत असलें तरी आपल्या 'आरंभशूर' लोकांत कोणतीही संस्था चिरस्थायी झालेली ऐकण्यांत व पाहण्यांत नाहीं. फार काय? पण सर्व हिंदुस्थानच्या भावी उत्कर्षाचा मूळ पाया जी राष्ट्रीयसभा तीसुद्धां आजमितीला डबघाईला आलेली आहे. असें जरी असलें तथापि आपल्या हयातीपर्यंत रा. काळे "या 'पैसाफंडा' च्या रूपानें कांहीं हजार रुपये वर्गणी वसूल करतील व तोंपर्यंत त्यांच्या कुटुंबाला मदत करणारे मदतही करतील हें शक्य आहे. परंतु रा. काळे यांचे पश्चात् त्यांचें हें असिधाराव्रत कोण चालविणार आहे? ते चालविणारे पैदा होईपर्यंत प्रस्तुतची "पैसाफंडा" ची चळवळ कितीही लोकोपयुक्त दिसली व तीपासूनच आपल्या देशाचें कितीही दारिद्र्य नाहींसें होण्यासारखें असलें तरी तिच्या वाढीचा पुढें संभव नसल्यामुळें ज्यांच्या एक एक पैशानें रा. काळे यांनीं हजारों रुपये जमविल्यासारखें होईल, ते, सद्धेतुपूर्वक दिलेल्या आपल्या राष्ट्रीय वर्गणीचा सदुपयोग न झाल्याबद्दल बिचारे काळे यांस कदाचित् शाप मात्र देतील!

वरीलप्रमाणें पुष्कळांच्या मनांत शंका येऊं लागल्या आहेत व आरंभीं ह्मटल्याप्रमाणें कित्येक ‘ समंजस, पोक्त, दूरदर्शी, व देशाभिमानी ’ गृहस्थांनीं तर तसे उद्गार सुद्धां काढले आहेत. तेव्हां त्याबद्दल दोन शब्द लिहिणें अवश्य आहे. कोणतेंही राष्ट्रीयकार्य ‘ पी हळकुंड आणि हो गोरी ’ या ह्मणीप्रमाणें तावडतोब होत नसतें. ज्या संसारांत मूठभर माणसें असतात त्यांत सुद्धां कोणतीही उद्दिष्ट गोष्ट एकदम अमलांत येतेच असें नाहीं. मग ज्या देशांत आज कोट्यावधी संसार आहेत त्या आपल्या भारतवर्षांत पैसाफंडाला कोठें सुरवात होते न होते तोंच वरच्यासारखे उद्गार इतक्यांतच निघणें हें आश्चर्य आहे ! महासागराच्या आदिअंताचा प्रत्यक्ष अनुभव नसतांही कोलंबसानें ज्याप्रमाणें आपलें गलबत त्यांत घातलें, त्याचप्रमाणें आपल्या देशाची विस्तीर्णता, तींतील विविध ज्ञाती, पंथ व समजुती, आणि ‘ न जाणे न नेणे ’ असे ‘ पामर ’ यांचा रतिभर सुद्धां अनुभव रा. काळे यांस नसतां त्यांनीं पैसाफंडाच्या चळवळीस हात घातला ती त्यांनीं चूक केली असें आह्मीं ह्मणणार नाहीं. कारण कोलंबसामागून हजारों, लाखों, किंबहुना कोट्यावधी पाश्चात्यांनीं महासागरांत उड्या घातल्या आहेत व घालीत आहेत, आणि त्यांच्या साहसाचीं व कृतनिश्चयाचीं गोड फळें आज पृथ्वीच्या सर्व पाठीवर जशीं पसरलीं आहेत तद्वत् आमच्यांतील होतकरू व देशाभिमानी तरुण पिढीस करण्याला कांहीं

हरकत नाहीं. तरी त्यांनीं व आमच्या अधीर लोकांनीं ही गोष्ट लक्ष्यांत ठेविली पाहिजे कीं, पाश्चात्यांचें साहस, त्यांचा निश्चय, त्यांचा बाणा, व त्यांची एकी प्रसिद्ध असतांही आजची ही त्यांची श्रीमंती व आपणास दिसणारें हें त्यांचें वैभव प्राप्त करून घेण्यास त्यांना तीनचार शतकें लागलीं! कोलंबस कांहीं चिरायु नव्हता किंवा त्याचे अनुयायी व्यक्ति या नात्यानें चिरंजीव नव्हते. परंतु समुद्राच्या पलिकडे जमीन आहे आणि साधल्यास तीवर आपल्या अजरामर होऊं पाहणाऱ्या भावी राष्ट्राला हात-पाय पसरण्यास हरकत नाहीं ही जी त्याची यथार्थ समजूत, त्या समजुतीवरच इतरांनीं त्याचा खडतर मार्ग स्वीकारला. "पैसाफंडा"ची गोष्ट तशीच आहे. तो जमून तद्द्वारां आपल्या राष्ट्राचें शोचनीय दारिद्र्य दूर होणें अशक्य नाहीं ही रा. काळे यांची दृढ व यथार्थ समजूत आहे आणि ह्मणून त्यांनीं या गोष्टीचा उपक्रम केला आहे. ते स्वतः शतायु किंवा चिरंजीव नाहींत हें त्यांनाही समजतें. परंतु कोलंबसामागून इतरांनीं आपलीं जहाजें जशीं त्या अफाट समुद्रांत ढकललीं आणि त्यांना कांहीं सोन्याचे तुकडे ( अमेरिका वगैरे ) सांपडले तद्वत् काळ्यांचे अनुयायीही हिंदुस्थानांतील प्रत्येक कोनाकोपऱ्यां-तून उत्पन्न होऊन पैसा फंड व त्याचें स्वरूप व्यापक करून सोडतील अशी त्यांची व आमची खातरी आहे. तथापि तसें होण्यास या पैसाफंडासंबंधानें चळवळ करणारीं

हिंदुस्थानांतील प्रत्येक भाषेंत मासिकें, पाक्षिकें, साप्ताहिकें किंबहुना प्रात्याहिकेंसुद्धां सुरू झाल्यास तीं आह्मांस पाहिजे आहेत असें आह्मीं या पूर्वीच म्हणून ठेविलें आहे. आणि अशी एकदां चळवळ सुरू झाली ह्मणजे या आर्य. मातेचे पोटीं या राष्ट्रीय पैसाफंडाचे पोषक, सहाय्यक, व संवर्धक उत्पन्न होणार नाहींत असें नाहीं. ते वाटेल त्या धर्मांत, वाटेल त्या ज्ञातींत व वाटेल त्या प्रांतांत उत्पन्न झाले अथवा आतांच कोणाला तशी प्रेरणा होऊन ते निरपेक्ष बुद्धीनें पुढें आले तर त्यांचें सुस्वागत करण्यास आह्मीं एका पायावर तयार आहों! पण तसा योग आज आला नाहीं तरी वर ह्मटल्या प्रमाणें या पैसाफंडाचे पोषक, सहाय्यक व संवर्धक उत्पन्न होईपर्यंत आमच्या लोकांनीं धीर धरून नेटानें प्रयत्न चालू ठेविला पाहिजे. या फंडाचें महत्व सुशिक्षित वर्गास चांगलें कळतें असें आह्मी समजतों. तेव्हां त्यांचेपासून व्यक्तिनिहाय साडेबारा आणे एकदम मिळणें फारसें अशक्य नाहीं. काळजी काय ती अशिक्षित वर्गाची आहे. कारण आपल्या देशांत त्यांचाच भरणा फार मोठा आहे. आणि विशेषेंकरून त्यांच्याचमध्यें एतत्संबंधानें अधिक नेटाची सारखी चळवळ चालू ठेवणें इष्ट आहे. तथापि अशिक्षितांचा वर्ग मोठा भाविक असतो ही त्यांत एक लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे. त्यामुळें अशाच वर्गाचे हातून देशोन्नतीचें काम जेवढें होतें तेवढें त्यांचेवर वर्चस्व मिळवू

पाहणाऱ्या सुशिक्षित वर्गाच्यानें कधीं कधीं होत नाहीं. अमुक गोष्टीचा असा परिणाम चांगला असून तो मोठा पुण्यप्रद, कीर्तिप्रद; व हितप्रद आहे अशी एकदां या भाविक वर्गाची खात्री झाली कीं ती कायमची समजावी. आणि येवढ्याच हेतूनें वर्षाचे कांठीं त्यांचे पासून "पैसाफंडा" ची ही पाव आणा राष्ट्रीय वर्गणी घेण्यांत जो दूरदर्शी-पणा व धोरण आहे, तें एकदम साडेबारा आणे घेण्यांत नाहीं. आणि त्यांत यशही यावयाचें नाहीं. पाश्चात्या-सारख्या अभिमानी, निरलस, उद्योगी, साहसप्रिय व दृढनिश्चयी लोकांनाही आपले हेतु तडीस न्यावयाला जर कांहीं शतकें लागतात तर हिंदुस्थानासारख्या अफाट-दारिद्र्यानें गांजलेल्या अफाट—देशाला आपलें डोकें या उपायानें किंचित वर करण्याला निदान पाव सहस्त्रक लागल्यास नवल नाहीं. मात्र आमच्या लोकांनीं तेवढा धीर, उत्साह, नेट, निश्चय व विश्वास कायम ठेविला पाहिजे.

---

शेवटीं राहतां पैकीं पैसाफंडाच्या वसूलीचा व चिरस्था-यित्वाचा प्रश्न राहिला. पण त्यासंबंधानें आजच अधिक लिहिण्याची गरज नाहीं. फंडाच्या वसूली व चिरस्थाइ-त्वापेक्षां त्याच्या चळवळीला व्यापकत्व आलें ह्मणजे सगळ्या गोष्टींचा उलगडा आपोआप होतो. असो, एवढ्यानें आमच्या पृच्छकांचे अंशतः तरी समाधान होईल अशी आशा आहे.

---

# वर्तमानसार.

—एल्. एम्. एन्ड एस्. शिवाय एम्. बी., बी. एस्. ची एक नवीन पदवी मुंबई युनिव्हर्सिटीनें काढण्याचें ठरविलें आहे. परीक्षेची फी ४० रुपये आहे. या पदवीचा अर्थ, बॅचलर ऑफ मेडिसिन अॅन्ड सर्जरी.

—हिंदुस्थानांतले हिंदुस्थानांत तारा पाठविल्या असतां हल्लीं जे पैसे पडतात, ते येत्या जानेवारीपासून निमे कमी पडूं लागतील.

—दिवसांतून ११ तासांचे वर व आठवड्यांतून सहा दिवसांचे वर मजुरांकडून काम घेऊं नये अशी दुरुस्ती फॅक्टरी आक्टांत हिंदुस्थान-सरकार करणार, ही बातमी अगदीं निराधार आहे ह्मणून सरकारानें जाहीर केलें आहे.

—दुष्काळामध्यें जेव्हां गुरांस चारा मिळेनासा होईल तेव्हां रान-खात्यानें आपल्या चराऊ रानाचे फीचें उत्पन्नाकडे लक्ष न देतां गुरें वांचविण्याचा प्रयत्न करणें अधिक जरूर आहे; व अशा वेळीं फी घेत-लीच तर ती उत्पन्नासाठीं न घेतां खात्याचे व्यवस्थेच्या सोयीसाठीं घ्यावी व फॉरेस्टांतील चराऊ रान गुरांसाठीं मोकळें सोडावें, अशा अर्थाचा सरकारी ठराव नुकतांच प्रसिद्ध झाला आहे. चराऊं रानांत घेण्याच्या गुरांची निवड होऊं नये, स्थानिक सोय लावून मग बाहेर गवत पाठवावें.

—हिंदुस्थानांतून व सिलोनांतून रशियामध्यें जाणाऱ्या चहावरील २१॥ रुबलची जकात रशियानें २॥ रुबलनें वाढविली, हें कृत्य व्यापारी तहांतील अटींचे विरुद्ध झालें असून त्याचा विचार करण्यासाठीं इंग्लंडचे फॉरिन ऑफिसांत एक कॉन्फरन्स भरणार आहे.

—इंग्रजी साम्राज्याचें वार्षिक उत्पन्न तीन अब्ज वीस कोटी पौंड असून, त्यांतील सर्व संपत्ती दोन खर्व, दोन अब्ज, २५ कोटी पौंड आहे! एकंदर ग्रंथकर्त्यांचें वार्षिक उत्पन्न ५० लक्ष पौंड आहे! असें सर रॉबर्ट गिफिन या अंकशास्त्रज्ञानें प्रसिद्ध केलें आहे.

—मुंबई येथें ता. २६ रोजीं क्षत्रिय नीतिसमाजातर्फे परळ येथें प्रसिद्ध ह. भ. प. रिसवडकर बुवा यांचें ४॥ तास सुश्राव्य कीर्तन झालें. श्रोतृसमाज फार मोठा होता. कीर्तनाचे शेवटीं डायमण्ड सोप कंपनीचे म्यानेजर रा. रा. परांजपे यांनीं **पैसाफंडा**ची कल्पना सांगितल्यानंतर तबक फिरविलें तों फंडास २८१२८६ ची रक्कम जमली. इतरत्रही त्याचें अनुकरण व्हावें.

—कोईमतुरच्या कलेक्टरानें प्लेगचे नियम फार कडक केले असल्यामुळें कन्नूर शहराची फार दुर्दशा उडाली आहे. तांदूळ व इतर धान्य येईनासें झाल्यामुळें त्या शहरांत दुष्काळी महागाई होऊन गरीबलोक उपाशीं मरत आहेत!

—बेळगांव येथील युरोपियन रहिवाशांचे कपडे धोबी लोक आपल्या प्लेगदूषित घरांत नेऊन ठेवितील व त्यामुळें युरोपियन लोकांत रोग फैलावेल, अशी भीति वाटल्यावरून त्यांचे साठीं १९००० रुपये खर्चून तेथें युरोपियन पद्धतीचा धोबीखाना बांधण्याचा विचार चालला आहे.

—जी० आय. पी. रेलवेच्या वाडी ते रायचूर स्टेशनवर व इतर ठिकाणीं आणि हैदराबाद संस्थानांत बहुतेक ठिकाणीं अतिवृष्टीनें गेल्या महिन्याचे आरंभीं भयंकर महापूर आले! कित्येक स्टेशनें बुडालीं. कित्येक नद्यांत पाणी मावेनासें होऊन तें पुलांवरून गेलेल्या तारांपर्यंत भिडलें! खुद्द हैद्राबादेस २१३ हजार घरें पडलीं. अनेक तलाव फुटले. कृष्णानदीसही मच्छलीपट्टण व बेझवाड्याजवळ न भूतो न भविष्यति असा अपरंपार महापूर आला. त्यामुळें तिचा कालवा व रेलवेचा पूल पडला मनुष्यहानी बरीच झाली. त्यांचीं वाहून आलेलीं व जात असलेलीं अनेक प्रेतें दिसलीं. उत्तर हिंदुस्थानांतही बरीच अतिवृष्टी होऊन जगप्रसिद्ध ताजमहालावरही या सृष्टिकोपाचा परिणाम झाला. त्यांतील शहाजहान व मुलतान या थडग्यांचे वरचे बाजूसच मुख्य घुमटावर मोठी भेग पडून पावसाचें पाणी आंत गळूं लागलें. हा

हस्त नक्षत्राचा प्रभाव ता. ४ ते १० आक्टोंबर पर्यंत कमी अधिक प्रमाणानें चहूंकडे सारखा दिसत होता.

—शिक्षणाप्रीत्यर्थ लोकलबोर्डें १५,३३,०२८ रु. व म्युनिसी-पालिट्या ६,६१,०९८ रु. खर्च करीत असत; या पैकीं सरकार आज-पर्यंत अनुक्रमें ४,९१,१३३, व १,९६,००० रु. आपल्या तिजोरींतून देत असे. परंतु यापुढें मुंबई सरकार अनुक्रमें ८,००,३३७ रु. व ३,४३,४६० रु. ग्रांट देणार आहे.

—कलकत्याच्या महाराणी साहेबाचे राष्ट्रीय स्मारकासाठीं आणखी १॥ लक्ष रुपयांची देणगी देण्यास म्हैसूरच्या पुढील बजेटांत मंजुरी दिली आहे.

—बनारस सेंट्रल हिंदु कालेजाचा कायमफंड ४ लक्ष, २५ हजार रुपयांवर गेला आहे. कौंडशेक नांवाच्या युरोपियन उमरावाच्या बहि-णीनें मरतांना आपल्या इस्टेटीपैकीं ३० रुपये या कॉलेजास दिले आहेत. शिवाय मुंबईहून परवां आणखीं ४६,००० वर वर्गणी त्याच संस्थेकडे रवाना झाल्याचें कळतें!

—अमेरिकेंत युनायटेड स्टेट्स मध्यें मि० पुलिटझर हे एक वर्तमानपत्रकर्त्यांची शाळा काढणार आहेत. ३० वर्षांपूर्वीं हे फार गरीब होते. पण हल्लीं ते आपल्या या संस्थेस १० लक्ष डॉलर्स देखार देणार आहेत त्यांस त्यांची सध्यांची स्थिति येण्यास त्यांचे 'न्यूयार्क वर्ल्ड' पत्र कारण झालें व त्यावरच त्यांनां लाखों डॉलर्स मिळाले.

—मद्रासमरकार लौकरच मद्रास येथें एक व्हेटरनरी इन्स्टिट्युशन ( गुरांचें वैद्यकखातें ) काढणार आहे. तेथें शिक्षण फुकट देण्यांत येणार असून १०।१० रु. च्या १० स्कॉलरशिपाही ठेवणार आहे.

पैसा फंडाची रकम ता. ३१ आगष्ट अखेर जमा २१७ रुपये होती. ती ३० सपटंबर अखेर २५७ रुपये झाली. सबंद महिन्यांत चाळीस रुपये वसूल झाला ! ' इश्वरेच्छा ! '

# पत्रांचा सारांश पोंच वगैरे.

केसरी, जगद्धितेच्छु, मराठादीनबंधु महाराष्ट्रकवी ही आमचेकडे नवीन भेट देऊं लागलीं आहेत. चालकांचे आह्मी आभारी आहों. आमचे दुसरे व्यवसायबंधुही भेट देतील अशी आशा आहे.

मराठी ग्रंथसंग्रहालय ठाणें, मराठीग्रंथसंग्रहालय मुंबई व विविध नाट्य विषय संग्रह नासिक या संस्थांकडून वार्षिक रिपोर्ट अभिप्राया करितां आले आहेत त्यांचा आह्मी आभारपूर्वक स्वीकार करितों. अभिप्राय सवडी प्रमाणें अवश्य देऊं.

या शिवाय रानडे यांचें कापशीचें तेल, लोंढे यांचा कर्पूरार्क ग्रेटमर्कंटाइल कंपनीचा औषधांचा क्याटलाग पोंचला. पाठविणारांचे उपकार आहेत.

गुंडो गोविंद माळकर—घोलवड हे लिहितात—
"पैसाफंड मा. पु. चे वर्गणींतून खर्चवेंच वजा जाऊन रा. काळे यांचे कुटुंबास मदत मिळेल असें वाटत नाहीं सबब वर्गणीबरोबर रा. काळे यांचे कुटुंबास मदत ह्मणून शक्त्यनुसार रकम पाठवावी अशी या मासिकांचे वर्गणीदारांस माझी विनंति आहे."

वरील सूचना आह्मास पसंत आहे मा. पु. चे नफ्यांतून आर्य काळे यांचे कुटुंबास मदत तूर्त मिळणें अशक्य आहे. आर्य काळे यांचे कुटुंबास मदत कोणी पाठविल्यास ती आह्मी त्यांकडे पाठवून मदत करणारांचें नांव या मासिकांतून प्रसिद्ध करूं.

संपादक.

# वर्गणीची पोंच.

## केळवा माहीम.

आर्य काशीनाथ बाबाजी-
बुलाख ८
,, गंगाधर मोरेश्वर दांडेकर ८
,, वामन गणेश दांडेकर ८
,, रावजी गोपाळ दांडेकर ८
,, धोंडो हरी फडके ८
,, कृष्णाजी काशिनाथ पेठे ८
,, [illegible] मित्र ८
,, दुसरा एक मित्र ८

## शिरगांव माहीम.

## एजंट आर्य मोगरे यांचें विद्यमानें.

आर्य श्री. मो. मोगरे ८
,, वामन जीवण वर्तक ८
,, महादेव विनायक पेठे ८
,, गोपाळ गंगाधर गाडगीळ ८

## तारापूर.

आर्य शामराव स. बर्वे ८
,, नारायण वि. भागवत ८
,, गणेश दिनकर गद्रे ८
आर्य माधवराव गोखले
पुजारी ( आगाशी ) ८
,, वा. रा. मंडलीक
( मुरुड ) ११
,, लल्लुभाई दामोदर ( चिं-
चणी ) ८
" शंकरराव नरसिंगराव
( गुलबुर्गा ) ८
" विष्णु वि. रानडे
( मासूं ) ११
,, मो. ना, निंबकर
( मासूं ) ११
,, वा. बा. जोशी
( अर्नाळा ) ८
,, ना. घ. सचनीस
( डहाणू ) ८
,, दामोदर वि. दांते
( खेड-पुणे ) ११
,, जमशेटजी रस्तमजी
पाटील ( अकोला ) ११
आर्य व्यवस्थापक विद्याविलास
वाचन मंदीर ( मावळुंगे ) ११
,, बा. वा. जोशी
( धामणसे ) ११
,, रावजी भास्कर काळे
( चव्ये ) ११
,, भगवान दास भाईदास
( गुचंद्र ) ११

## घोलवड

आर्य कृ. मो. मुसळे ८
,, वामन दामोदर शेवडे ८
,, सिताराम दिनकर
परांजपे ८

,, पांडुरंग वासुदेव जुवेकर ८
,, शिवराम रामचंद्र जोशी ८
,, दत्तात्रय नारायण पाठक ८
,, महादेव रामचंद्र काळे ८
,, गणेश विठ्ठल जोशी ८
,, कृष्णाजी विनायक
कानडे ८
,, गुंडो गोविंद माळकर ८
,, नारायण हरी क्षीर
सागर ८
,, सदाशिव विठ्ठल भागवत ८
,, रामचंद्र वामन अमृते ८
,, गणेश बापूजी भागवत ८
,, राजाराम लक्ष्मण भागवत ८
शेट गंभीरमल गणेशजी ८
,, पुनमचंद उदेरामजी ८

## मुंबई.

आर्य विठ्ठल मो. नावर ८
,, हरी गोविंद वाघ ८
,, चुनीलाल मगनलाल ८
,, त्र्यंबक खंडेराव ८
,, लक्ष्मण गोविंद अभ्यंकर ८
,, नारायण बापूजी पंडित ८
,, सदाशिव वामन ८
,, नारायण रा. मुसळे ८
,, केशव मो. जुवेकर ८
,, विष्णु नागेश चौघुले ८
,, अनंत गणेश गोखले ८
,, दादा केळकर — ८

,, विष्णु विठोबा मोटे ८
,, जानुजी बापूजी ८
,, भा. र. आचार्य ८
,, ना. श्री. कालगावकर ८
,, हरी कृष्ण कोगजे ८
,, शंकर प्रभाकर जोश ८
,, जी. व्ही. गोगटे ८
श्री. भि. बोरवणकर ८
,, निलकंठ ना. शिंपी ८
,, बापुजी त्रि. जावळे ८

## मालगुंड

आर्य गणेश दाजी लिमये ,१
,, विष्णु गोपाळ भिडे ११
,, गोविंद विनायक
केळकर ११

## बोर्डी

,, भोगीलाल वल्लभदास ८
,, गोपाळ नाना पाटील ८
,, शंभुलाल गोपाळ वाणी ८
शेट बनेचंद धीरजी ८
,, फुलचंद पनजी ८
,, फुलचंद कस्तुरचंद ८
,, विश्राम नारायण
भंडारी. ८

## उंबरगांव एजंट मार्फत.

आर्य गजा. नारा. पिंपुटकर ८
,, बाळकृष्ण चिंतामण बेंद्रे ८
,, मोरेश्वर गोपाळ मराठे ८
,, दि. प. ८

वर्षाची वर्गणी ८ आणे. ट. ख. ३ आणे.

एका नांवावर ६ प्रती गेल्यास ट० खर्च माफ. फुट० अं० १ आणा.

# "पैसा फंड"

## मासिकपुस्तक.

वर्ष १ लें. ] दिसेंबर १९०३. [ अंक ६ वा.

## विषयानुक्रमणिका.


| विषय. | पान. |
|---|---|
| आमच्या पुढाऱ्यांत कोणती उणीव आहे? ... | ६१ |
| शेतकी ... | ७६ |
| कविता ... | ८० |
| वर्तमानसार ... | ८१ |


मुख्य एजंट-पुरंदरे आणि कंपनी-माधवबाग मुंबई.

हें पुस्तक अंताजी दामोदर काळे यांनीं मुंबईंत विजय छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

# वर्गणीदारांस सूचना.

१ या मासिक पुस्तकाचे ५ अंक निघाले, तरी अद्यापि पुष्कळां· कडून वर्गणी आली नाहीं, हें पाहून वाईट वाटतें

२ हें मा० पु० काढण्याचा हेतू सर्वांस माहीत झालाच आहे. हल्लीं काम फार वाढलें आहे, यामुळें खर्चही फार वाढला आहे. माझी स्थिति तर जगजाहीर आहे. या सर्व गोष्टी ध्यानांत आणून [illegible] यदाल्यांनीं वर्गणी तावडतोब पाठवावी. न पाठविल्यास पुढील अंक व्ही. पी. नें पाठविणें भाग पडेल. तरी तो कोणी परत करूं नये, अशी विनंति आहे.

३ पैसा फंडाचे किंवा पैसा फंड मा. पुस्तकाचे पैसे वर्तमान पत्रें वगैरे पाठविणें तीं पुरंदरे आणि कंपनी माधवबाग मुंबई [illegible] पाठवावीं. पैसा फंडाचे पैसे केसरीकडे पाठविण्यांत येतील.

४ हें मा. पु. घेण्यांत स्वार्थ व परमार्थ आहे. अल्प खर्चीत ज्ञान-प्राप्ति होऊन स्वदेशहित केल्याचें श्रेय मिळतें.

५ पोष्टाकडून अद्यापि परवानगी मिळाली नाहीं. यामुळें जोड अंक पाठविणें भाग पडत आहे.

खालीं लिहिलेले गांवीं एजंट नेमले आहेत. त्याजकडे त्या गांवच्या लोकांनीं वर्गणी भरावी व ती त्यांनीं मुख्य एजंटाकडे पाठवावीं.

**शिरगांव माहिम**--मोरेश्वर मुकुंद पाटील, मोगरे.

**तारापूर**--शामराव सखाराम बर्वे.

**चिंचणी**--शेट नरसीलाल हरीलाल वाणी.

**सुरत**--गोपाळ त्र्यंबक दांडेकर, दुकानदार भागातलाव.

**अलिबाग**--डोंगरे आणि मंडळी, दुकानदार.

**आक्षी** }
**नागांव** } कृष्णाजी गणेश ढापरे.

**महाड**--वामन पांडुरंग चांद.

**सांवतवाडी**--रामचंद्र नारायण साळगांवकर.

**अंताजी दामोदर काळे.**

# सिंहावलोकन.

—*—

हिंदुस्थान सरकारची साम्राज्यतृष्णेची संक्रांत ईशान्य भूमिनी होऊन बिचाऱ्या तिबेटावर तिची लवकरच धाड येणार असून अलंध्य विंध्याद्रीला जसें अगस्ति मुनीनीं लंध्य करून दक्षिणेंत आपल्या मठाची स्थापना केली, तसें आमचें सरकार सीमाभूत हिमनगास ओलांडून तिबेटांत स्वराज्यस्थापना करण्याच्या विचारांत असून कीं काय नकळे, जारीनें तयारी चालवित आहे. पाश्चात्य लढाईचें मुख्य अंग जें तारायंत्र तें खंबाजंग पर्यंत गेलें असल्याचें समजतें. याक जातीचे ९०० नेपाळी प्राणी इंग्लिशांची अन्नसामुग्री सिकीमला पोंचविण्याकरितां पाठविले होते; परंतु तिबेटी लोकांनीं त्यांस अडथळा केला. ह्या व अशा अनेक कारणांवरून तिबेटी लोक सावध आहेत असा अदमास आहे. इंग्लिशांची सिकिमची पलटण अन्नसामुग्री व गरम कपडे ह्यांसह लवकरच पुढें चालून जाईल असा संभव आहे. मात्र विलायत सरकारची मंजुरी मिळण्याचा अवकाश आहे.

---

लार्ड कर्झन साहेब हिंदुस्थानचे ‘मायबाप’ सरकार इराणच्या आखातांत राजकीय दौऱ्यावर गेले आहेत. इराणच्या शहावर रशियाचें जें वजन अलीकडे बरेंच

वाढलें आहे असें ह्मणतात, त्याच्या योगानें हिंदुस्थानच्या व इंग्लंडच्या व्यापारास आणि राज्यधोरणास कांहीं धक्का पोचूं नये अशा प्रकारें हिंदुस्थानसरकारचें ह्मणजे अर्थात् ब्रिटिश सरकारचें आणि इराणच्या शहाचें निकट नातें राजकीय करारमदारांनीं पूर्ववत् कायम करण्या करितां ही गव्हर्नरजनरल साहेबांची सफर आहे असें दिसतें. एकंदरींत हिंदुस्थानच्या उत्कर्षाची आमच्या सरकारची काळजी वर्णनीय खरी !

---

मद्रासच्या लोकांनीं यंदा तेथें भरणाऱ्या 'राष्ट्रीय सभेची' कडेकोट तयारी केली आहे. राष्ट्रीयसभेबरोबर राष्ट्रीय उद्योगाचें प्रदर्शन जें अलीकडे भरूं लागलें आहे त्याचीही व्यवस्था जारीनें झाली असून मद्रास इलाख्यांतील सरकारी अधिकारीही प्रदर्शनास मदत करीत आहेत ही मोठीच आनंदाची गोष्ट होय. राष्ट्रीय सामाजिक परिषदेचीही यथाकाल आणि यथाशक्ति उठवणी करण्यास आमचे सुधारक वीर आळसाशीं भांडून मधून मधून खटपट करीत असल्याचा चांगलाच प्रत्यय येत आहे. नामदार गोखले यांस त्यांनीं अध्यक्ष होण्याबद्दल विनंति केली होती. परंतु नामदार साहेबांनीं मोठेपणानें आभारपूर्वक त्या विनंतीस पाठ दिली. नामदारांचा विनय वाखाणण्यासारखा कोण न गणील? उघडच आहे, 'विद्या विनयेन शोभते,

**दोन शोचनीय मृत्यु**—गेल्या महिन्यांत खानदेशांतील एक चांगले पुढारी बाबासाहेब गरूड हे परलोकवासी झाले. ह्यांचें घराणें आज तीनचार पिढ्या चांगलें, नांवालौकिकांचें आहे. बाबासाहेब हे मुंबईस सालीसिटरचें काम करीत असत. ते १८७०सालीं इंदूर संस्थानांत चीफजस्टिस झाले. श्री. कै० तुकोजीराव होळकर ह्यांचा बाबासाहेबांवर चांगलाच विश्वास होता. पुढें कै० गोविंदराव, बाबासाहेबाचे चुलते, वारल्यावर हे धुळयासच वकीली करीत असत. ह्यांनीं आपल्या कुलाचा लौकिक यथाकाल चांगला राखिला होता. हे एकदा मध्यप्रांतातर्फे कायदे कौन्सिलचे सभासदही निवडून आले होते. त्यांनीं त्या प्रसंगीं पोलीस बिलाच्या कामीं आपला निस्पृहपणा लोकांच्या व सरकारच्या प्रत्ययास चांगलाच आणून दिला. खानदेशांतील एक चांगला पुढारी नाहींसा झाला ही मोठी दुःखाची गोष्ट होय. मरण समयीं यांचें वय ५८ वर्षांचें होतें. ह्यांच्या मागें गरूड घराण्यांत ह्यांच्या सारखा पुरुष उरला नाहीं. परंतु ह्यांचे चिरंजीव आपल्या वडिलाप्रमाणेंच लोकांचा पुढाकार घेऊन आपला परंपरागत लौकिक जिवंत ठेवतील अशी आह्मांला फार फार आशा आहे.

---

दुसरा अत्यंत शोकजनक मृत्यु ह्मणजे रा. रा. शंकर मोरो रानडे बी. ए. यांचा होय. हे वांई येथील राहाणारे. यांचें घराणें मूळचें शास्त्रीय विद्येचें. हे लहानपणापासूनच बुद्धिमतेबद्दल गाजलेले असत, यांचें गृह-

शिक्षण मुख्यतः ह्यांच्या विदुषी आजीच्या सहवासांत झालें. १८७२ त पदवी घेऊन ह्यांनीं सरकारी नौकरी धरली. मुंबई येथें हे 'नेटिव ओपिनियन' पत्राचे दुय्यम लेखक असत. पुढें. कांहीं कारणानें ह्यांना सरकारी नोकरी सोडून बडोद्यास संस्थानी नोकरी पतकरावी लागली. ह्यांनीं नाट्यकथार्णव या नांवाचें एक मासिक पुस्तक बरींच वर्षें चालविलें होतें. त्यांतून त्यांचीं बरींच नाटकें आणि कादंबऱ्या प्रसिद्ध झाल्या असून त्या बहुतेक लोकादरास पात्र आहेत. हे गद्या प्रमाणेंच कविताही करीत; आणि ह्यांचे मित्र ह्यांना 'शिघ्रकवी' ह्मणत ते सार्थ करून दाखवीत. हे सुरेख कीर्तनही करीत असत. ह्यांचा वडील मुलगा हाता तोंडास येऊन गेल्यानें ह्यांच्या मनाला जो धक्का बसला तो पूर्णपणें कधीं निघालाच नाहीं. मरण समयीं ह्यांचें वय अवघें ५२।५३ वर्षांचें असावें! अशा अकाल मृत्यूनें असल्या चांगल्या मराठी लेखकांस गांठावें हें खरोखर महाराष्ट्राचें दुर्दैवच होय. 'वृत्तकुतूहल' नांवाचा एक कल्पकतेचा उज्वल मासलाच असा ग्रंथ ह्यांजपाशीं बहुतेक तयार असल्याचें आह्मी ऐकिलें आहे. परंतु निर्घृण काळापुढें सर्वच खुंटतें! तथापि त्यांचे स्नेही कांहीं निवडक लेखांसह हें 'वृत्तकुतूहल' छापून काढितील अशी आह्मांस आशा आहे.

# पैसा फंड

मासिक पुस्तक.

वर्ष १ लें.] दिसेंबर, सन १९०३. [अंक ६ वा.

## आमच्या पुढाऱ्यांत कोणती उणीव आहे?

" आमच्यांत प्रमुख ह्मणविणाऱ्या लोकांस स्वतःची योग्यता, ज्ञान व कर्तृत्व, हीं जरी केवळ अकटोविकट वाटतात, व जगांत आजपर्यंत महान् महान् पुरुषांनीं जीं कृत्यें केलीं, तीं करण्याचा पत्करही जरी ते खुशाल घेतात, तरी वस्तुतः पाहिलें तर वरील तिन्ही गुणांत त्यांचा कमीपणा पुष्कळच आहे असें सर्व यथार्थ पहाणारांस वाटेल."—
निबंधमाला.

सदरहु उताऱ्यांत केलेल्या विधानास आज सुमारें ३० वर्षें लोटलीं. ह्या अवधींत शतविध फेरफार झाले. त्या वेळीं कित्येकांचीं कांहीं विषयांसंबंधानें जीं मतें होतीं, त्याच त्यांच्या मतांत आज वैचित्र्य दिसून येतें. कित्येकांनीं आपल्या देशाच्या वास्तविक स्थितीचें चित्र लोकांस काढून दाखवून पूर्वींच्या व हल्लींच्या चित्रांत किती तफावत आहे, हें सर्वांच्या निदर्शनास आणून दिलें; व

आपणांला पूर्वीची स्थिति प्राप्त करून घेण्यास कोणकोणते उपाय योजिले पाहिजेत त्यांचें दिग्दर्शन केलें व अशा रीतीनें आपणा स्वतांस नांवारूपास आणिलें. हेच आमचे पुढारी होत. ह्यांच्यामध्यें ३० वर्षांपूर्वी जी उणीव भासत होती,-जी वरील उताऱ्यांत निर्दिष्ट केली आहे-ती मात्र अजून दूर झाली नाहीं, हें मोठें आश्चर्य होय. इतरांची सुधारणा करूं जाणाऱ्यानें आपली स्वतःची सुधारणा करूं नये, हें किती हास्यास्पद आहे बरें ?

सांप्रत आपल्या देशांत पुढाऱ्यांची तर मुळींच उणीव नाहीं. महान् महान् पदवीधर पंडितांपासून तों 'यस्', 'नो' करणाऱ्या लहान पोरांपर्यंत पाहिजे त्यानें देश सुधारणेच्या गप्पा झोंकाव्या! अशा रीतीनें सर्वच पुढारी होऊं पाहतात! आपलें बळाबळ न जाणतां, पाहिजे त्या कामांत खुशाल हात घालावयाचा प्रकार अलिकडे आमच्यांत दिसूं लागला आहे, त्यामुळें देशाचें किती तरी नुकसान होत आहे. ज्या कामाचा पुढाकार घ्यावयाचा, त्याच्या संबंधाचा मुळींच विचार न करितां, एकदम त्यास हात घालावयाचा व 'नव्याचे नऊ दिवस' ह्या म्हणीप्रमाणें जोंपर्यंत तें काम करण्याची आंगांत हुरूप आहे, तों पर्यंत तें करावयाचें. मग बसले स्वस्थ! यांत त्यांच्या आरंभशूरपणाचें, कमकुवतपणाचें, अदूरदर्शीपणाचें, व कोत्या बुद्धीचें प्रदर्शन होत नाहीं काय? यामुळें त्यांचें स्वतःचेंच धैर्य खचून जातें; आणि एकदां अशा प्रकारचो जबर

ठोकर बसली ह्मणजे नवीन काम करण्याचा उत्साह त्यांच्यांत राहत नाहीं. तर अविचारामुळें मोठमोठीं दुर्घट कामें करण्याचा आव घालून सर्व फसल्यामुळें तीं धडपणें होत नाहींत् व दुसरीं होण्यासारखीं जीं कामें आहेत, तीं झालेल्या उत्साहभंगामुळें होत नाहींत! मिळून दोहोंकडे नकारच! ह्यास्तव कोणत्याही कामांत कोणास धुरीणत्व पत्करावयाचें झाल्यास, तें काम करण्याची आपली योग्यता आहे किंवा नाहीं, तें काम आपल्या हातून नीट तडीस जाईल किंवा नाहीं याचा नीट विचार करून मग तें पत्करावें.

ज्ञाना विषयीं ह्मणावें तर तें पुढाऱ्यांच्या अंगीं पुष्कळ असतें. परंतु कित्येक वेळां तें दुसऱ्यापासून घेतलेलें असतें ह्मणजे ते आपल्या ज्ञानाची पायरी नीटपणें न ओळखून केवळ अनुकरण इच्छेनें किंवा प्रतिष्ठेच्या आशेनेंच कोणतेंही काम आपण होऊन शिरावर घेतात. अशानें कितीवेळ तग निघणार ? ज्यांना खरी कळकळ नाहीं, परंतु केवळ लब्ध-प्रतिष्ठ व्हावें अशाच इच्छेनें जें काम करितात त्यांच्या हातून तें काम कधींही चांगल्या रीतीनें पार पडत नाहीं. अनुकरणाचें अस्तित्व बहुधा क्षणभंगुर असतें. एखाद्याच्या अंगीं सदनुकरण करण्याचा गुण असून त्याला ज्ञानाचें जर पाठबळ असेल तर तें अनुकरण मात्र चिरकालिक होईल खरें. परंतु औपचारिक अनुकरणानें कोणत्याही प्रकारचा फायदा होणार नाहीं. तसेंच, आपलें नांव चार

चौघांत निघावें, आपलें नांव वर्तमानपत्रांतुन झळकावें, आपली देशाच्या पुढाऱ्यांमध्यें गणना व्हावी; आपल्याला सर्वांनीं मान द्यावा व अशा रीतीनें आपली प्रतिष्ठा वाढावी ह्मणूनही कित्येक लोक धुरीणत्वाचें काम आपण होऊन अंगावर घेतात. परंतु पुढचा पोंच नसल्यामुळें ते आपल्या कृतसंकल्पाला लवकरच आंचवतात. यासाठीं आपलें ज्ञान-भांडार किती मोठें आहे व आपल्या उद्योगाचा परिणाम काय होईल, यांकडे प्रत्येक पुढारी होऊं पाहणारानें विशेष लक्ष्य पुरविलें पाहिजे.

मनुष्याचा स्वभावतःच धर्म असा असतो कीं, एकादी गोष्ट जरी आपणा स्वतःस अवगत असली, तरी ती दुसऱ्याच्या तोंडून ऐकिली ह्मणजे तीस महत्व द्यावयाचें. आणि ह्या गोष्टीचा उपदेशक जर आपल्या वचनाप्रमाणें वर्तन ठेवित असेल, तर त्याच्याविषयीं आपल्या मनांत जो विश्वास व जी प्रेमबुद्धि उत्पन्न होते ती तर अवर्णनीयच ! परंतु सर्वांचें घोडें अडतें तें येथेंच. त्यांच्या वचनाचा व वर्तनाचा संयोग घडून येण्यास कपिलाषष्ठीच्याहीवरचा योग यावा लागतो ! मोठमोठ्या सभांतून त्यांनीं खुशाल लांबलचक व्याख्यानें द्यावींत व घरीं त्यांचें वर्तन पाहिलें तर अगदीं विरुद्ध ! सभेमध्यें इतक्या मोठ्या जनसमूहापुढें, 'आपल्याला असें केलें पाहिजे, आपल्याला तसें केलें पाहिजे' अशी बडबड करण्यांत व 'आमचे पूर्वज येथेंच चुकले, त्यांस अक्कलच नव्हती' असे व्यर्थ दोषारोप करण्यांत त्यांचें काय जातें ?

तात्पुरती कां होईना, श्रोतृसमाजावर त्यांची थोडीशी छाप बसते ना? वाः! तें काय विचारावें! श्रोतृसमाज लगेच ह्मणूं लागतो, 'अमक्या अमक्याचें व्याख्यान ना, फार सुरेख झालें, तो सर्वथैव वंद्य होय, अशींच माणसें आज आमच्या देशांत पाहिजे आहेत.' पण बिचाऱ्या वक्त्याची मागील स्थिति पाहिली तर फारच भयंकर! ही त्याच्या ठिकाणीं असणारी उणीव केव्हां ना केव्हां तरी बाहेर येतेच येते! आणि असें झालें, ह्मणजे मग काय राहिलें? सर्व भ्रमाचा भोंपळा फुटला!! जे एका वेळीं देशाचे पुढारी ह्मणून गणले जात असत, त्यांची ही दशा! तर पुढाऱ्यांनीं आपणांवर लोकांचा विश्वास बसेल, अशा तऱ्हेचें वर्तन ठेविलें पाहिजे.

आमच्या देशाचे पुढारी ह्मणून ज्या लोकांची गणना होत असेल, त्या सर्वांमध्यें एकी असणें अत्यंत आवश्यक आहे. नाहीं तर पुढाऱ्यांचा हेतु काय तर एकी करण्याचा ह्मणजे सर्वांची एक जूट करून, त्या सर्वांस आपली खरी स्थिति समजावून देऊन, त्या सर्वांस सुधारणा करण्याच्या कामांत मदतीस घ्यावयाचें, परंतु खुद्द पुढाऱ्यांतच एकी नाहीं, अशी स्थिति व्हावयाची. असें मात्र असतां कामा नये. आपापसांत एकी असल्यानें एकमेकांस धीर असतो. प्रत्येकास असें वाटत असतें कीं, आपण ज्या एका विशिष्ट कामास प्रवृत्त झालों आहों, त्याच कामीं मदत करणारा दुसरा कोणीतरी आहे. त्यामुळें

मानसिक महत्वाकांक्षा दुणावते व ती लवकरच फलद्रूप होते! नाहींतर एकाद्यानें एकाद्या कामाचा पुढाकार घ्यावा, व त्यास कोणींही मदत करूं नये, उलट त्याचा उपहास मात्र करावा, जेणेंकरून त्याची छळणूक होईल, जेणेंकरून त्याला हातीं घेतलेल्या कामाचा पश्चात्ताप होईल असें केलें तर काय बरें परिणाम होईल? ह्मणून देशकल्याणासाठीं ज्यांनीं ज्यांनीं पुढारीपणा घेतला असेल व देशकल्याणासाठीं जे खऱ्या कळकळीनें झटत असतील, त्यांच्यामध्यें ऐक्य असावें व पुढारी होऊं पहात आहेत, त्यांना धीर देऊन मदत करावी.

देशांतील लोकांचा पुढारीपणा घ्यावयाचा ह्मणजे कांहीं सोपें काम नाहीं. देशाची पूर्वापार स्थिति कशी होती, हल्लीं कशी आहे, आजपर्यंत त्याच्या सुधारणेसाठीं किती प्रयत्न झाले, ते कोणीं केले, ते त्यांचे प्रयत्न कितपत सफळ झाले, आतां आपणाला कोणत्या बाजूंनीं सुधारणा केल्या पाहिजेत, यांविषयीं त्यांनीं फारच विचार केला पाहिजे. नंतर पुढारीपणा पत्करण्यांत कांहीं हरकत नाहीं. ह्या सर्व गोष्टी मनांत बिंबल्या नसल्या, तर 'डोळयांत केर व कानांत फुंकर' या ह्मणी प्रमाणें त्यांचे प्रयत्न प्रत्येक बाबतींत फुकट जातील. तसेंच आपली स्वतःची योग्यता किती आहे, आपण किती ज्ञानसंपन्न आहों आपल्याला हें काम झेंपेल कीं नाहीं, वगैरे अनेक गोष्टींचा मनाशीं पुरा विचार करून मग धुरीणत्वाचें जूं आपल्या खांद्यावर घ्यावें. एरवीं अविचारानें घेऊं नये. अशा बाबतींत अविचार केला असतां पुढें काय होईल, त्याचें उत्तर नुसत्या कल्पनेनें सुद्धां कळण्यासारखें आहे.

आमच्यापैकीं कित्येक पुढारी सरकारी अधिकाऱ्यांची हांजी हांजी करून आपल्यावर मर्जी संपादन करून घेतात. ह्यांत त्यांस काय वाटत असेल तें वाटो! देशाचा पुढारी-पणा कशासाठीं घ्यावयाचा, तर देशाचें कल्याण करण्या-साठीं. पण वरील प्रकार त्याच्या अगदींच उलट! इकडे लांगूलचालनाचा प्रकार व इकडे देशाचे पुढारी ह्मणून पुढें पुढें मिरवून आपणांला लब्धप्रतिष्ठ करण्याचा प्रकार! हे दोन्ही प्रकार त्यांस साधल्यासारखे वाटतात. परंतु त्यांनीं आपल्या पहिल्या प्रकारास पुरा फांटा दिला पाहिजे. कारण एखादे वेळीं असा प्रसंग येतो कीं, देशासाठीं भांडतांना सरकारी अधिकाऱ्यांच्या विरुद्ध जावें लागतें; परंतु ह्या पुढारीमजकुरांचा पहिला प्रकार जर त्यांच्याशीं अबाधित चालू असला तर मग कसें होणार? मग काय व्हावयाचें? ते देशकल्याणाच्या कामास झुगारून देण्यास यत्किंचितूही मागेंपुढें पहाणार नाहींत! असें न करावें तर स्वार्थ साधत नाहीं. तेव्हां येथें दुसराही एक मुद्दा असा सांपडतो कीं, देशकल्याणाचें खरें खुरें व अंतःकर-णापासून काम करावयाचें असेल, तर स्वार्थ आदिकरून पिशाचांस हांकलून देऊन लोककल्याणेच्छादेवीला आ-पल्या हृदयमंदिरांत बसविलें पाहिजे. त्या देवीची प्राणप्र-तिष्ठा केल्यानंतर तिची मनोभावानें सतत आराधना केली पाहिजे, ह्मणजे ती तात्काळ सुप्रसन्न होऊन अपेक्षित वर देईल व त्याप्रमाणें आपली कार्यसिद्धि होईल. ह्यापरती दुसरी इच्छा ती कशाची करावयाची?

# शेतकी--भाग १, ला.

( २ ऱ्या अंकावरून पुढें चालू. )

राखेमध्यें क्षारज ( Potassium ), मग्न ( Magnesium ), मुक्त ( Calcium ), लोह, स्फुर ( Phosphorus ) हीं मूलतत्वें आढळतात. त्यांपैकीं लोखंड हें फारच थोड्या प्रमाणांत असतें. हीं सर्व तत्वें जरी फारच थोड्या प्रमाणानें वनस्पतींमध्यें सांपडतात, तरी ह्यांवर सर्व वनस्पतींचें जीवन अवलंबून आहे. मनुष्याच्या शरीरामध्यें हीं तत्वें असतात. त्यांवांचून मनुष्याचें शरीर बळकट रहावयाचें नाहीं. त्याचप्रमाणें वनस्पतींनांही त्या तत्वांची फार अवश्यकता आहे. ह्या तत्वांचा पुरवठा जमिनींतून होतो. हीं तत्वें निरनिराळ्या क्षारांचे रूपानें वनस्पतींमध्यें आढळतात.

ज्वल पदार्थास "चेतन" पदार्थ ( Organic ) व अज्वल पदार्थास "अचेतन" पदार्थ ( Inorganic ) ह्मणण्याचा प्रघात आहे. परंतु वास्तविक पाहिलें असतां चेतन पदार्थ जसे वनस्पतींचे पोषणास अवश्यक आहेत, त्याचप्रमाणें जड पदार्थ ( Incumbustible ) अवश्यक आहेत. ह्मणजे झाडांना ह्या दोन्ही तऱ्हेच्या पदार्थांपासून चेतना येते. ह्यामुळें असा भेद करितां येत नाहीं.

वनस्पतींना त्यांच्या पोषणाचे पदार्थ जमिनीपासून व हवेपासून मिळतात. वनस्पतींचीं मुळें आपल्या

उपजीविकेचे पदार्थ ? जमिनीपासून शोषण कारितात. व वनस्पतींचीं पानें हवेंतून उपजीविकेचे पदार्थ शोषून घेतात. जमिनीपासून नत्र ( Nitrogen ), जडपदार्थ व पाणी मिळतें; व हवेपासून कर्ब ( Carbon ) व फारच थोड्या प्रमाणानें नत्र व पाणी मिळतें.

वनस्पतींतील घटकावयवांचें साधारण स्वरूप लक्षांत यावें ह्मणून वाळलेल्या गवताच्या घटकावयवांचें प्रमाण खालीं दिलें आहे.

जनावराच्या खाण्याच्या वाळलेल्या गवताचे घटकावयव.

( गवत, ६६५८ ).

| घटक | प्रमाण | एकूण |
|---|---|---|
| प्राण ( Oxygen ) | ४५९० | ज्वल पदार्थ ६४६७ |
| उज्ज ( hydrogen ) | ५१० | |
| कर्ब | १३१५ | |
| नत्र | ५० | |
| गंधक | २ | |
| क्षारज | ५८ | अज्वल ( जड ) पदार्थ. १९१ |
| सिंधुज ( Sodium ) | १५ | |
| चुना ( Calciumoxide ) | २८ | |
| मग्न | १२ | |
| लोह | $\frac{1}{2}$ | |
| स्फुर | $1\frac{1}{2}$ | |
| हर ( Chlorine ) | १६ | |
| सिक ( Silica ) | ६० | |
| | एकूण | ६६५८ |

हेंच गवत ओलें असल्यास त्याचें वजन ११००० होईल. कारण त्यांत पाण्याचा अंश फार असतो. बाकीच्या पदार्थांचें प्रमाण सारखेंच.

## मुळ्यांचें शोषणः—

झाडांना असणाऱ्या मुळया, जमिनीपासून पाणी व दुसरे पोषक पदार्थ झाडांस पोंचवितात. मुळ्या ह्मणजे झाडांचा प्राण होय.

झाडाच्या मुळ्या दुखावल्यावर अगर त्यांस कीड वगैरे लागल्यास झाड मरण्याच्या पंथास लागतें.

जड पदार्थांचे क्षार हे पाण्यांत विरघळणारे (Soluble) असतात. हे क्षार झाडांमध्यें पाण्याबरोबर जातात. कारण ते पाण्यांत विरघळलेले असतात. हे जड पदार्थांचे क्षार झाडांचे पोषणास अवश्य असतात.

झाडांच्या मुळ्यांस त्वचा असते या त्वचेस बारिक बारिक क्षतें असतात. त्याच क्षतांमधून जमिनींतील पाणी क्षार वगैरे पदार्थ झाडांचे पोषणासाठीं मिळतात. त्यांजबरोबर पोषणास निरुपयोगी असे पदार्थ सुद्धां झाडांमध्यें जातात.

झाडांचे मुळ्यांमध्यें एक तऱ्हेचें रासायनिक तेजाब (Acid) असतें. ह्या तेजाबाचे अंगीं एक विलक्षण गुण आहे. मुळ्यांवर बारिक दोरे (Loot—hairs) अगर केंस असतात. त्या केंसावर व मुळ्यांवर जमिनींतील माती बसते. त्या मातीशीं तेजाबाचा त्या दोऱ्याचे सहाय्यानें

संयोग होऊन त्या मातींतील कांहीं द्रव्यांचा क्षार बनतो. तो क्षार पाण्यांत विरघळून पाण्यावाटे झाडांत जातो. ह्या तेजाबाचे योगानें मुख्यतः क्षारज व स्फुर ह्या पदार्थांचे क्षार झाडांस मिळतात. हे क्षार झाडांचें उपजीविकेस फारच अवश्य आहेत. मुळ्यांतील तेजाबाचे प्रमाण झाडांची जात व आकार या मानानें कमी अगर जास्त असतें. सर्व झाडांमध्यें क्षारज धातू जास्त प्रमाणांत सांपडते. क्षारज धातूचे क्षार बहुतेक लांकडाचे राखेपासून करितात.

समुद्रीवरील झाडांमध्यें सिंधुज धातु जास्त सांपडते. व जमिनीवरील झाडांमध्यें क्षारज धातू जास्त सांपडते; समुद्रावरील झाडांमध्यें नील ( Iodine ) हें मूल तत्व सांपडते. नीलाची उत्पत्ति समुद्रावरील झाडाचे राखे-पासूनच होते.

ह्या वायूचा ( नत्र ) पुरवठा जमीन व त्यांत घातलेल्या खतांपासून होतो. बहुतेक द्विदल धान्यें—डाळी होणारीं धान्यें—(Leguminous Plants) अगर कडदणें (Idem.) ह्यांमध्यें नत्रवायूचें प्रमाण जास्त असतें. ह्या झाडांच्या-मुळ्यांवर लहान लहान गोळ्या (Tubercles ) असतात. व ह्यांच्या द्वारें मुळ्या नत्र वायू शोषून घेतात. ज्या जमिनीमध्यें नत्रवायू नसतो व ज्यांत खतही नसतें, अशा जमिनींत हीं धान्यें चांगलीं पिकत नाहींत. नत्रवायूचा पुरवठा थोड्या प्रमाणानें हवेपासून होतो. ( अपूर्ण. )

# पैसा फंड.

३ ऱ्या अंकावरून पुढें चालू

श्लोक.

पैसा पैशा भेटण्या जाय मोदें
पैशा-माजी स्नेह अत्यंत नांदें
पैशाचा हा धर्म लोकांस ठावा
पैसा-फंडा कां न पैसा मिळावा? ९
पैसा जाई फार पैक्यांत खेळा
भारी बाळां संगती हौस बाळा
पैसा फंडीं नांदतो अल्प पैसा
तेथें जाया तोष त्या होय कैसा १०
एकेक थेंब जरि संतत शीघ्र जाई
संपूर्णता तरि तलाव सवेग घेई
फंडांत जाइल तयापरि शीघ्र पैसा
आकंठ फंड तरि तो न भरेल कैसा? ११
जारे पैशा शीघ्र फंडांत जारे
चित्तीं शंका धारिसि कासयारे
जाणें तूतें केसरीकार--हस्तीं
सोडीं सारी मानसांतील धास्ती १२
बोलायाला तोंड तूझें न हाले
ज्याच्या हातीं राहसी तोच बोले
फंडीं जाया तूं न बाहीर येशी
दारू, वेश्या, नाटका धांव घेशी १३
फंडीं जाया स्नेह संपूर्ण आटे
वाटे पायां लागती काय कांटे
पैसा-फंडीं कां न जातोस पैशा
खोट्या बाबी सांगसी नित्य कैशा? १४

# वर्तमानसार.

—सोन्याची कांब पातळ व लांब होण्यासाठीं सोनार लोक ती आपल्या हातोड्यानें ठोकितात, तेव्हां तींतून सोन्याचे कांहीं बारीक कण निघतात व ते आपल्या लक्ष्यांत न आल्या कारणानें फुकट जातात. ते जाऊं नयेत ह्मणून अमेरिकन लोकांनीं एक यंत्र तयार केलें आहे. तें जवळ ठेविलें कीं कांबीपासून निघणारे कण इतर कोणत्याहि ठिकाणीं न पडतां अचूक त्या यंत्रांत जाऊन पडतात!

—खोटीं नाणीं तयार करणारी एक मंडळी नुकतीच पुणें येथें पकडली आहे. या मंडळीस सरकारच्या फोटोझिंको ऑफिसमधील एका इसमाचें अंग आहे असें ह्मणतात. ही मंडळी आपला व्यवहार एका मोकळ्या घरांत करीत असे.

—पत्याळा संस्थानच्या हद्दींत सिमला नजीक कोळशाची एक खाण सांपडली आहे. या खाणींतील कोळशाचे थर सहज रीतीनें खणतां येण्यासारखे आहेत. व तो कोळसा उत्तम जातीचा असून घरकामाकडे त्याचा फारच चांगला उपयोग करितां येईल असें समजलें आहे. ही कोळशाची खाण सिमल्यापासून १७ मैलावर असणाऱ्या एका खिंडींत आहे.

—प्रो० छत्रे यांची 'न्यू इंडियन सर्कस' सध्यां चीनमध्यें आहे. तिकडे त्यांचा फारच गौरव होत आहे. खुद्द महाराणीनें तर त्यांस २० हजार रुपये व सहा पदकें देणगी ह्मणून दिलीं आहेत. पूर्वेकडील भागांत आणखीं एक वर्षभर फिरून नंतर ते इकडे येणार अशी बातमी आहे.

—थोड्या दिवसांपूर्वीं मद्रास इलाख्यांत फार पाऊस पडला. त्याच्या योगानें बग्गा नदीला महापूर येऊन, कडाप्पा शहरांतील गरीब लोकांचीं एकंदर कच्चीं १५०० घरें पडलीं!

—बंगलोर येथेंही कांहीं दिवसांपूर्वीं अतोनात पाऊस पडला. त्यामुळें रेल्वेचा रस्ता मैल मैल पाण्यांत बुडाला आहे.

--तसेंच म्हैसूरांतलि कोलार प्रांतांतही अतिवृष्टि झाली. तेथील पालर नदीला महापूर आला. व कित्येक तलाव फुटून दोन गांव वाहून गेले.

-- इराणच्या आखातांतील सफर झाल्यानंतर कलकत्यास परत जातांना लेडी कर्झन ग्वालेर येथें तेथिल महाराणीचा पाहुणचार घेण्यास जाणार आहेत. लार्ड कर्झन साहेबही रामगड जंगलांत व भरतपूर संस्थानांत शिकार करण्याकरितां जाणार आहेत.

ता. १३ नवंबर रोजीं स्वदेशहितचिंतक नाटक मंडळीचा शारदा खेळ ज्या मक्तेदारांनीं घेतला होता, त्यांनीं उत्पन्नाचा एक अष्टमांश पैसा फंडास देण्याचें कबूल केलें होतें, त्याप्रमाणें त्यांजकडून ५० रुपये आले ते पोंचले. त्याचप्रमाणें त्या दिवशीं रा. पागे यांनीं जोरदार भाषण करून श्रोत्यांचीं मनें गार करून टाकल्यावर तेथें तबक फिरविण्यांत आले, तों त्यांत ८ रुपये १ आणा ७ पै जमल्या. हे पैसे व स्वदेशहितचिंतक नाटक मंडळीनें वार्षिक वर्गणीचे दिलेले ५ रुपये आह्मांस पोंचले. हे व दुसरे किरकोळ मिळून ७१ रुपये २ आणे १० पै आम्हीं ता. १६ रोजीं केसरी ऑफिसांत भरले.

---

उंबरगांव—येथें वैद्य वासुदेव बाजी जोशी यांनीं कुमारी आंसवाचा कारखाना काढला आहे. या गांवीं कुमारीचें बन असल्यामुळें व हे वैद्य बडोदें येथें शिकून तयार झालेले असल्यामुळें कारखान्याची भरभराट होणें साहाजिक आहे. आर्यौषधींचा अभिमान बाळगणारांनीं इकडे जरूर लक्ष द्यावें.

## पत्राचा सारांश पोंच वगैरे.

**साभार पोंच**— रा. रा. विष्णु हरी बर्वे यांनीं कुटुंबाचे मदतीसाठीं ३ रुपये पाठविले ते पोंचले. पाठविणारांचे फार फार उपकार मानतों.

रा. पागे यांनीं केलेलें दंतमंजन डबी १ किंमत ४ आणे पोंचली. तसेंच रा. जोगळेकर यांनीं तयार केलेलें मराठी एक्सरसाइज बुक किं. १ आणा पोंचलें. पाठविणारांचे आभारी आहों.

---

**रा. शेरोपंत मराठे राई**—राई भायंदर मिळून या वर्षी पैसा फंडासाठीं ३० रुपये जमले, ते येथील खजीनदार प्राणजीवन पुरुषोत्तम यांजकडे ठेवले आहेत, असें कळवितात. ही रक्कम केसरीकडे गेल्यास फंडांत भर पडेल असें आह्मांस वाटतें.

**रा. महादेव दत्तात्रय भागवत मुं.** मित्र मंडळींत जमलेली पैसा फंडाची रकम १५॥=॥। बॉंबे ब्यॉंकींग कंपनीमध्यें ठेविली आहे, असें कळवितात. ज्याला वाटेल त्यानें वाटेल तेथें रक्कम ठेवावी हें बरें नाहीं, असें आमच्या अल्प मतीला वाटतें.

---

पैसा फंडाची शिल्लक सप्टेंबर अखेर २५७ रु. होती. गेल्या दोन महिन्यांत १०० रुपयांची भर पडली असावी, असें वाटतें.

# वर्गणीची पोंच.

**उंबरगांव एजंट मार्फत.**

आर्य पुरुषोत्तम केशव तेरे ८
,, नारायण विठ्ठल करंदीकर ८
,, गोविंद नारायण वेदक ८
,, नारा. पांडुरंग इंदुलकर ८
,, गोविंद रामचंद्र कासार ८
,, भिकाजी मोरे. मांदुसकर ८
,, कृष्णराम शंकर पंड्या ८
,, त्रिंबक वासुदेव काळे ८
,, कृष्णा त्र्यंबक मेस्त्री ८
शेट त्रिभुवन गांडाभाई ठक्कर ८
,, मनजी लालाजी मारवाडी ८
,, नाथाभाई वनमाळी ठक्कर ८
,, भिका जीवण गोली ८
,, वासुदेव वाजी जोशी ८

**खत्तलवाडा एजंट मार्फत.**

आर्य हरी विष्णु पुराणिक ८
,, मगन मुरार सुतार ८
,, चिंतामण काशिनाथ सोनार ८
,, नारण लाला कामळी ८
,, केशव गणेश मेहेंदळे ८
,, विठ्ठल भटजी भोळे ८
,, मोरेश्वर लक्ष्मण ढापरे ८
,, विष्णु श्रीधर ढापरे ८

**शिरगांव भिलाड एजंट मार्फत.**

आर्य मोरो श्रीधर आरेकर ८
,, दत्तात्रय श्रीधर रिसबुड ८
,, निछाभाई मकनजी ८
,, नानाभाई रामशंकर ८
,, देवजी रामा आगरी ८
,, जामाजी उमाजी (कलगांव) ८
शेट नवरोजी दादाभाई फटाक्या (नारगोळ) ८

**नागांव एजंट मार्फत.**

आर्य बाळाजी रघुनाथ जोशी ८
,, कृष्णाजी गणेश ढापरे ८
,, सिताराम निळकंठ सुद्रिक ८
,, जनार्दन बाळाजी बर्वे ८
,, गंगाधर जनार्दन पाटील से० लायब्ररी आक्षी ११
आर्य नारायण कृष्ण घैसास (अलिबाग) ८
,, भिकाजी महादेव रानडे ८
,, वामन बाळकृष्ण पटवर्धन (चिंचेली) ११
आर्य सेक्रेटरी लायब्ररी त्रिंटें ११
,, परशराम त्रिंबक दांडेकर आणि ब्रदर्स सुरत ११

**पालगड एजंट मार्फत.**

आर्य विष्णु कृष्ण जोशी ८
,, वासुदेव गणेश गोंधळेकर ८
,, दत्तात्रय बल्लाळ परचुरे ८

**पंढरपूर एजंट मार्फत.**

,, दत्तो बळवंत गांडाळे ८
,, वासुदेव रामचंद्र हरिदास ८

**स्वदेशी मेंथाल—भारतवर्षीय वस्तू विषयीं कळकळ**

बाळगणाऱ्या प्रत्येक देशबांधवानें हें एकदा तरी वापरून पहावें. इंग्लीश प्रमाणें गुणकारी असल्याबद्दल अनेक डाक्टर लोकांचीं सर्टिफिकिटें मिळालीं आहेत. किंमत ०।४ व्यापाऱ्यांस भरपूर कमिशन गांवोगांव एजंट पाहिजेत

पत्ता—धि आर्यन् इंडस्ट्रियल कंपनी—गिरगांव, मुंबई.

पाहिजेत:—अनुभवांतीं पुष्कळ लोकांच्या पसंतीस उतरलेलें रानडे यांचें सुवासिक कापशीचें तेल विकणारे एजंट पाहिजेत. किंमत ४ आणे. कमिशन भरपूर. पत्ता:—महाजन आणि मंडळी सोल एजंट, गिरगांव मुंबई.

---

**नारायण भिकाजी आपटे ह्यांचें गुणकारी बालामृत.**

हें औषध, लहान व मोठ्या मनुष्यास एक प्रकारचें पौष्टिक आहे. या पासून दूध व अन्न चांगलें पचतें, अशक्त मुलें सदृढ होतात, व मुलांचे हात पाय लुले असले व कमरेंत जोर नसून चालतां येत नसलें तर बालामृत घेतल्यानें तीं चालूं लागतात. खोकला, हाडीताप नाहींसा होऊन, रक्त व मांस ह्यांची वृद्धि होते, शौचास साफ होत नसल्यास हलकें रेचक घेऊन मागाहून या औषधाचा उपयोग करावा. हें औषध वापरण्यास निर्धास्त आहे. चांगला गुण येण्यास दोन बाटल्या घ्याव्या लागतील.

बाटलीची किंमत १२ आणे, पोष्ट खर्च ७ आणे. ३ बाटल्यास किंमत २ रुपये, रेल्वेनें मागविल्यास विशेष खर्च पडणार नाहीं. व्यापाऱ्यांस भरपूर कमिशन देऊं.

ना. भि. आपटे ठाकुरद्वार, वैद्याचीवाडी मुंबई.

**तक्रारः**—डोंगरे यांचीं औषधें ज्यांस पाहिजे असतील त्यांनीं तीं खालील पत्त्यावर मागवावीं. आमचीं औषधें दुसऱ्या कोणाकडून मागविणें झाल्यास "**डोंगरे यांचीं औषधें पाठवावीं**" असें स्पष्ट लिहावें. असें न लिहिल्यास जास्त कमिशनच्या आशेनें कित्येक लोक आमच्याबद्दल दुसऱ्यांचीं औषधें पाठवितात आणि त्यांचा गुण न आल्यास गिऱ्हाइकें आमच्याकडे तक्रार करतात, ह्मणून ही सूचना मुद्दाम करावी लागत आहे.

**लहान** मुलांस डोंगरे यांचें बालामृत फार गुणकारी आहे. यानें जीर्णज्वर, जुनाट खोकला, संग्रहणी, पोट मोठें असणें, हातपाय बारीक असणें, वगैरे विकार नाहींसे होऊन रक्त व मांस यांची वृद्धि होते, हाडांस बळकटी येते व मुलांचें वजन वाढून तीं चांगलीं बळकट व सतेज होतात. शिवाय हें मधुर असल्यामुळें मुलें हौसेनें घेतात. किंमत १ बाटलीस १२ आणे पोष्ट खर्च ६ आणे. एकदम ३ बाटल्यास पोष्ट खर्चासुद्धां २॥१२.

**डोंगरे यांचें दंतमंजनः**—यानें दांत स्वच्छ व बळकट होतात. एका डबीची किं. ४ आणे. पो. ख. तीन डब्यांपर्यंत ३ आणे, एक डझन डब्यांची किं. २ रु. पो. ख. ८ आ. तीन डब्याही डझनाच्या भावानें देऊं.

औषधें मागविणारांनीं आपलें नांव, गांव व पोष्ट हीं स्पष्ट लिहावीं.

पत्ता—**कें. टी. डोंगरे गिरगांव-मुंबई.**

वर्षाची वर्गणी ८ आणे. ट. ख. ३ आणे.
एका नांवावर ६ प्रती गेल्यास ट० खर्च माफ. फुट० अं० १ आणा.

# "पैसा फंड"

## मासिकपुस्तक.

वर्ष १ लें. ] जानेवारी १९०४. [ अंक ७ वा.

### विषयानुक्रमणिका.


| विषय. | पान. |
|---|---|
| आमचे देशबंधु आणि त्यांचीं आधुनिक राजमान्य व्यसनें ........................ | ८३ |
| शेतकी ........................................ | ८९ |
| स्फुटविषय ........................... | ९३ |
| वर्तमानसार ........................... | ९६ |


मुख्य एजंट-पुरंदरे आणि कंपनी-माधवबाग मुंबई.

हें पुस्तक अंताजी दामोदर काळे यांनीं मुंबईत विजय छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

# माझा प्रवास.

ता. १ आक्टोबर रोजीं घरीं गेलों, तों दिपवाळी पर्यंत घरीं राहिलों. घरांतील नकारघंटा कानाशीं एक सारखी ठणठण करीत होती, यामुळें विश्रांति कोठून मिळणार? बसल्या बसल्या आजूबाजूच्या गांवांत चळवळ केली, परंतु मुंबई अगर पुणें येथें वजनदार लोकांची कमेटी स्थापन झाली नाहीं, यामुळें माझे श्रम व्यर्थ गेले! फक्त कळगांव येथील सन १९०२ बद्दलची वार्षिक वर्गणी दोन रुपये मजपाशीं आली. नंतर मी मुंबईस जाऊन नाटक कंपनीचा एखादा खेळ मिळवावा या उद्देशानें मुंबईस १५ दिवस खटपट केली, तेव्हां सर्व खेळ मिळाला नाहीं, तरी पण $\frac{1}{2}$ उत्पन्न मिळालें. मुख्य कमेटी स्थापन झाल्यावर स्वदेशहितचिंतक मंडळी एक खेळ देण्यास तयार आहे. कमेटी होईपर्यंत तिनें दरसाल ५ रुपये देण्याचें कबूल केलें आहे. ता. १७ नवंबर रोजीं शेट होरमसजी आरदेसर डुबाश यांच्या बरोबर मी पडावांतून अलिबाग येथें गेलों. येथील सभा रविवारीं ठरवून मी आक्षी नागांव येथें गेलों. लोक उद्योगांत मग्न असल्यामुळें सभा भरली नाहीं. मा. पुस्तकास मात्र ८ वर्गणीदार मिळाले. आक्षी येथील दोघातिघांनीं कबूल केल्याप्रमाणें तावडतोब पैसे दिले, त्यांची पोंच केसरींतून येईलच. रा. रा. पाटील मास्तर यांनीं मला ४ आणे दिले. रविवारीं ठरल्या प्रमाणें अलि-

बाग येथें वाड्यांत सभा भरली. रा. कुंटे, रानडे, गोखले, ओक वगैरे बरीच मंडळी आली होती. मणेरीकर, वैद्य वगैरे वकील आले असते, तर दुधांत साखर पडली असती. येथें कल्पना पसंत पडून जागच्याजागीं कांहीं रकम जमली. व मा. पुस्तकाला ६ वर्गणीदार मिळाले. मी अनवाणीं फिरत असलेला पाहून एका गरीब मनुष्यास माझी दया आली ह्मणून त्यानें वर्गणी करून मला १ रुपया दिला. नंतर मी थळ येथें गेलों. येथेंही सभा होण्याचें चिन्ह दिसेना, ह्मणून मी परत मुंबईस आलों. मासिक पुस्तकांत माझ्या संबंधानें एक अक्षर सुद्धां येऊं नये अशी माझी इच्छा असतां दरएक अंकांत कांहींतरी उल्लेख येतच होता, यामुळें रा. भांडारे यांजकडून लेखकाचें काम काढून घेणें भाग पडलें. मा. पुस्तकाची एकंदर व्यवस्था लावून मी ता. ९ दिसेंबर रोजीं सुरत येथें जाण्यासाठीं निघालों. प्रथम राई येथें उतरून केसरीकडे २५ रुपये पाठविले. मोरोपंत मराठे यांनीं मला प्रवासखर्चासाठीं १ रुपया दिला. येथून मी डहाणू येथें आलों. येथील पैसे केसरीकडे जातील कीं नाहीं, या बद्दल शंका आहे. येथून मी सुरत येथें गेलों. दांडेकर ब्रदर्स यांनीं माझी चांगली व्यवस्था ठेवेली. दुसरे दिवशीं दाक्षिणी सभेच्या दिवाणखान्यांत माझें भाषण झाल्यावर कांहीं आंकडे पडले. १ जानेवारी नंतर जमतील ते पैसे केसरीकडे पाठविण्याचें ठरलें आहे. मा. पुस्तकाला १२ वर्गणीदार झाले. येथील दाक्षिणी संस्था विद्वानांचा

परामर्ष घेते, त्याप्रमाणें तिनें जाण्यायेण्याचा खर्च ५ रुपये देऊन माझाही परामर्ष घेतला. येथून मी बडोदें येथें गेलों. रा. अनंतराव शेखदार यांनीं माझी चांगली व्यवस्था ठेविली. येथील सहविचारिणी सभेचे सेक्रेटरी रा. हरीभाऊ तळवलकर हे हजर नव्हते, तरी पण रावसाहेब गोविंद सखाराम सरदेसाई बी. ए. यांनीं हस्तपत्रिका प्रसिद्ध करवून स्टेट लायब्ररीच्या दिवाणखान्यांत या सभेमार्फत रावबहादूर र. म. केळकर, पेनशनर सुभे, यांच्या अध्यक्षतेखालीं माझें व्याख्यान करविलें. माझें भाषण झाल्यावर डा. चिपळोणकर यांनीं, थोडेसे आक्षेप घेऊन भाषण केलें. वजनदार लोकांची कमेटी स्थापून मग पैसा फंड गोळा करणें बरें, हें त्यांचें ह्मणणें पुष्कळांस पटलें; शिवाय अध्यक्षांनीं कल्पना चांगली असून ती अमलांत येणें फार जरूरीचें आहे, असें प्रतिपादन केलें. तेव्हां कमेटी स्थापण्यासाठीं दुसरे दिवशीं पुनः हस्तपत्रिका प्रसिद्ध होऊन सभा भरविण्यांत आली. व्याख्यान झाल्यावर रावबहादूर केळकर, रावसाहेब राजे, रावसाहेब सर देसाई, लेफ्टनंट श्रीपादराव जगदाळे व गोपिनाथ जनार्दन आठल्ये (सेक्रेटरी) येणें प्रमाणें कमेटी स्थापण्यांत आली. यांस दुसरे लोक घेण्याचा अधिकार देण्यांत आला आहे. मा. पुस्तकास ११ वर्गणीदार झाले. रा. पटवर्धन, केसरीचे एजंट यांनीं पैसाफंड मासिक पुस्तकाची एजन्सी फुकट पत्करण्याचें जाहीर रीतीनें कबूल केलें. वजनदार लोकांनीं मनावर घेतल्यावर काय होणार

नाहीं ? रा. सुमंत, मोघे, मोकादम व मराठे, हे सर्व तरूण होतकरू देशभक्त स्वयंसेवकांचें काम करण्यास तयार झाले हा वरील कमेटीचाच प्रताप, असें निदान मला तरी वाटतें. या स्वयंसेवकांपाशीं कमेटी सहीशिक्यानिशीं छापील चोपड्या देणार आहे; त्या चोपडीवर वर्गणी देणारानें स्वदस्तुरची सही व आंकडा घालावा, स्वयंसेवकांनीं रोजचा वसूल झाला असेल तो सेक्रेटरीपाशीं द्यावा व त्यानें शिल्लक घेतल्याबद्दल त्याच चोपडीवर सही करून द्यावी. सेक्रेटरीनें आपल्यापाशीं नेहमीं १ रुपयापेक्षां जास्त रक्कम कधीं शिल्लक ठेवूं नये. एकंदर रक्कम सेव्हिंग्ज ब्यांकेंत ठेवावी, असें कमेटीनें ठरविलें आहे, हें पाहून संतोष वाटतो. वर्गणीची नांवनिशीवार पोंच महिना अखेर सेक्रेटरीच्या सहीनें सयाजी विजय सारख्या पत्रांत येण्याची तजवीज होईल, तर मला वाटतें लोकांचा विश्वास बसून काम फार चांगलें होईल, याकडे कमेटी लक्ष्य देईल अशी आशा आहे. येथील सहविचारिणी सभेनें मला दोन रुपये व रावब० केळकर यांनीं ८ आणे प्रवास खर्चासाठीं दिले. अमदाबाद येथें मला त्रास पडूं नये, ह्मणून रावबहादूर केळकर यांनीं तेथील वजनदार वकील रा. गोविंदराव पाटील यांस पत्र दिलें होतें. रा. पाटील हे तेथें नव्हते तरी पण रा. आनंदराव कवडे फोटोग्राफर यांनीं मला सर्वतोपरी साह्य केलें. उद्देश ऐकून घेतल्यावर व्याख्यान करवावें असें ठरलें. मंडळींनीं हस्तपत्रिका प्रसिद्ध केल्या. ता० १९

दिसेंबर रोजीं मद्रेंत श्रीकृष्ण मंदिरांत दक्षिणी मंडळी-साठींच रा. आनंदराव कवडे यांच्या अध्यक्षतेखालीं सभा भरून माझें व्याख्यान झालें. येथें दक्षिणी मंडळी अगदीं थोडी आहे, त्या मानानें मंडळी जमली होती. व्याख्यान झाल्यावर एक दोघांचीं भाषणें झालीं. नंतर वार्षिक वर्गणीचे आंकडे पडले. रा. आनंदराव कवडे यांस खजीनदार नेमण्यांत आलें. दोन इसम स्वयंसेवक झाले आहेत. एकंदर वर्गणी जमली ह्मणजे केसरीकडे पाठविण्याचें ठरलें आहे. येथें मा. पुस्तकास ६ वर्गणीदार झाले, व आणखी कांहीं होतील असें वाटतें. पुढें मराठी भाषाभिज्ञ मंडळी अगदींच कमी, ह्मणून मी अमदाबादेहून परत बडोदें येथें आलों. रा. महेश्वरपंत गोऱ्हे यांनीं मला बडोदें पर्यंतचें टिकीट काढून दिलें. उद्यां मी येथून सुरत येथें जाईन, नंतर तेथून टाप्टी रेल्वेनें धुळ्यास जाण्याचा विचार आहे.

बडोदें ता० }
२१।१२।३ }                                   अं० दा० काळे.

---


## विक्रीस तयार.

पैसा फंडाची कल्पना हें लहानसें पुस्तक छापून तयार आहे. यांत पैसा फंडाविषयीं सर्व माहिती दिली आहे. किंमत एक पैसा आहे. जास्त घेणारास योग्य कमिशन.

परचुरे, लेले आणि कंपनी, कमिशन एजन्ट्स.

चंद्रबाग, माधवबागेनजीक-मुंबई.

# पैसा फंड

मासिक पुस्तक.

वर्ष १ लें.] जानेवारी, सन १९०४. [अंक ७ वा.


# आमचे देशबंधू आणि त्यांचीं आधुनिक राजमान्य व्यसनें.

## १.

## धूमपान.

"तमाखुपत्रं राजेंद्र भज माऽज्ञानदायकम्" ॥

सुभाषितम्.

इंग्रजी राज्य झाल्यापासून ह्या आर्यावर्तांत ज्या सुधारणा झाल्या, त्यांचें बरेंच श्रेय आमच्या सांप्रतच्या राज्यकर्त्यांसच दिलें पाहिजे. इंग्रजी विद्येच्या प्रसाराबरोबर अर्वाचीन भौतिक शास्त्रांच्या ज्ञानाचा या देशांत प्रसार झाला व बरेच शतकें अज्ञानावस्थेंत घोरत पडलेल्या या देशाला, आपल्याला राष्ट्रांच्या जीवनकलहामध्यें कायकाय केलें पाहिजे, याविषयीं जागृति आली; व ही जागृति

झाल्यामुळें आमचे लोक इंग्रजांचे कृतज्ञतापूर्वक आभार मानूं लागले! ज्ञानामृताच्या सेवनाच्या आनंदांत इंग्रज येथें कशाकरितां आले, त्यांनीं ह्या देशाच्या स्वातंत्र्यवैभवाचा अपहार कसा केला व संपत्तीचें एकसारखें शोषण कसें चालविलें आहे, याचाहि आमच्या लोकांस विसर पडला. इतकेंच नव्हे, तर कलीचा संचार झाल्याबरोबर कैकयीची जशी वृत्ति पालटली, त्याचप्रमाणें हें श्वेतद्वीपींचें ज्ञानामृत आमच्या देशबंधूच्या अंगांत भिनल्याबरोबर त्यांस पौरस्त्य गोष्टींचा तिटकारा येऊं लागला व पाश्चात्य गोष्टींविषयीं फाजील अभिमान वाटूं लागला. ह्याच ज्ञानामृताचें प्राशन केल्याबरोबर आमच्या देशबंधूंची ग्राहकशक्ति झपाट्यानें वृद्धिंगत होत गेली, व वाढतां वाढतां ती इतकी वाढली कीं, अखेरीस त्यांनीं आमच्या राज्यकर्त्यांच्या सुधारलेल्या अनेक चालीरीतींचा व सुधारलेल्या बहुतेक व्यसनांचा साभार स्वीकार केला! त्यापैकीं त्यांच्या चालीरीतींसंबंधानें आज येथें बिलकुल उहापोह करावयाचा नाहीं. फक्त त्या चालीरीतींबरोबर इकडे जीं व्यसनें विशेष प्रचारांत आलीं, त्यांपैकीं एकाचा—धूमपानाचा—आज येथें विचार करावयाचा आहे.

मनुष्यानें ज्या आपल्या बुद्धिबलाच्या योगानें भूगर्भाचें संशोधन केलें; गगन चुंबित महानगांसही लंघ्य करून सोडिलें; क्षणभर दृग्गोचर होऊन नाहींशा होणाऱ्या विद्युल्लतेसही आपल्या अंकित केलें; व प्रखर अग्नीसही लहानशा

खोलींत कोंडून टाकिलें, त्याच बुद्धीला त्यानें आपण होऊन व्यसनाधीन करून सोडावी व अशा रीतीनें तीस अबला करून टाकावी, या त्याच्या दुष्ट स्वभावास काय ह्मणावें ? बुद्धीस एकदां व्यसनाधीन केल्यानंतर त्या त्या व्यसनास जरूर तो पदार्थ जर वेळच्यावेळेस मिळाला नाहीं, तर त्याची जी त्रेधा उडते, ती त्याची त्यासच माहित! अशा प्रसंगीं तो कोणत्याहि कामधंद्यास नालायक होतो. कांहीं वेळानें जर त्यास तो पदार्थ मिळाला तरच स्वारी ताळ्यावर यावयाची!° नाहींतर सर्वच फजीति! अशा रीतीनें त्याची ज्ञानशक्ति क्रमशः खुंटत जाते. दैववशात् असा मनुष्य जर का श्रीमंत असला तर त्याच्या संपत्तीची वाताहातच होते. कारण 'आधीं जाते बुद्धि व मागाहून जातें भांडवल' अशी त्याची स्थिति होते! अशी स्थिति प्राप्त झाली तरी सुद्धां त्याचे डोळे क्वचितच उघडतात ! सुभाषितांत सुद्धां असेंच ह्मटलें आहे कीं, "दारिद्र्यशीलोऽपि नरःतमाखुं नैव मुञ्चति।" पुढें तो हळू हळू कर्जबाजारी होतो व त्याच्या पतीचा विक्रय झाल्यावर तर, आप्तजन इष्टमित्र कोणीही त्याच्या वाऱ्यास सुद्धां उभे रहात नाहींत! अशा रीतीनें व्यसनी मनुष्य आपलें सर्वस्व घालवून आपल्या पोटाला कोणी कांहीं घालील काय ? अशी मार्गप्रतिक्षा करीत बसतो! शिव शिव! असा मनुष्य धन असतांहि निर्धन व बल असतांहि निर्बल होतो!! हा परिणाम कशाचा ? एका व्यसनाचाच नव्हे काय ?

मनुष्याचा व्यसनाधीन होण्याचा साधारण काल म्हटला म्हणजे १८ वर्षांच्या पुढील होय. ह्या वयांत पुष्कळ मंडळी धूमपानाचें व्यसन निव्वळ गमतीखातर म्हणून आपल्या अंगीं जडवून घेतात! आणि त्याचा परिणाम त्यांच्या आकुंचित दृष्टिपथांत न आल्यामुळें ते आपला नित्यक्रम लपवून छपवून कां होईना पण अव्याहत चालू ठेवितात. अशा वेळीं मुलांच्या आईबापांनीं त्यांच्या वर्तनक्रमावर सूक्ष्म परंतु करडी नजर ठेविली पाहिजे; व ह्या व्यसनापासून अनेक हानिकारक परिणाम कसकसे होतात, हें प्रत्यक्ष उदाहरणांनीं दाखवून देऊन त्यांचें मन क्षणिक व भासमय सुख देणाऱ्या ह्या व्यसनापासून परावृत्त करित असलें पाहिजे. अशा प्रसंगीं त्यांचें नियमन करणारा योग्य शास्ता त्यांना जर न मिळाला, तर ते जन्माचेच व्यसनी बनून जाणार! ही झाली २५ वर्षांच्या वयाच्या आंतील तरुण मुलांची स्थिति! ह्या वयाच्या पुढील मंडळीस 'आपण आतां मोठें झालों,' असें वाटून हा प्रकार राजरोस करण्यास त्यांना मुळींच भय वाटत नाहीं. त्यांनीं ह्या व्यसनांत आतां जवळ जवळ एक तप घालविलें असल्यामुळें त्याशीं त्यांचा वियोग होणें बहुतेककरून दुरापास्त असतें. हल्लीं हल्लीं धूमपानाचें व्यसन लावून घेणें, हें एक मोठें भूषणच समजलें जातें; व भर रस्त्यावरून, किंबहुना मोठमोठ्या सभांतूनही हा निंद्य प्रकार केला जातो.

तमाखु हा पदार्थ विषांशयुक्त असल्यानें तो प्राण हार-

कच होय. तमाखु ओढणाऱ्याचे ओंठ काळे पडून त्याच्या तोंडास दुर्गंधि येते. तिच्या धुरानें फुप्फुसास इजा होऊन श्वासोच्छासास तीं लवकरच निरुपयोगी होतात. तमाखु ओढणारास बहुधा दम्याचा रोग जडतो व त्याचा घसा नेहमीं कफानें भरून आलेला असतो. आणि वारंवार खोकला येऊन कफाचे बटकेच्या बटके पडतात. ह्या व्यसनापासून घडणारा मुख्य अपाय ह्मटला ह्मणजे काळिज करपणें हा होय. यामुळें मनुष्य सदाचा रोगी बनून अल्पकाळांतच कमकुवत असा होतो.

सांप्रतच्या विद्वानांस हरएक गोष्टींत पाश्चात्यांचें अनुकरण करण्याची लालसा उत्पन्न झाल्यामुळें व हल्लींचा काळ सुधारणेचा असल्यामुळें पुष्कळांस देशी तमाखु ओढणें लाजिरवाणें वाटूं लागलें आहे. तेंच अमेरिकन तंबाखूचे बनविलेले सिगार्स व सिगारेटस् चारचौघांत प्रतिष्ठेनें ओढण्यास त्यांस काडीचीही लज्जा वाटत नाहीं. अगोदर तमाखु ओढणें हें वाईट आणि विदेशी तंबाखु ओढणें तर अत्यंत वाईट. बाकी, हल्लींचा काळच असा आहे. 'यथा राजा तथा प्रजा' हा न्याय–निदान वाईट गोष्टींत तरी–सर्वांच्या पुढें आहे. सुशिक्षित लोक अमेरिकन तंबाखु ओढतात, आपण ओढावा; मग त्यांत कितीका पैसा जाईना! त्याची येथें कोणाला दिक्कत आहे? मग तो पैसा देशांत राहो अगर परदेशांत जावो, कांहीं का होईना! हा सुशिक्षित मंडळीचा प्रकार पाहून आंग्लविद्येनें थोडीशी विभूषित झा·

लेली साधारण मंडळीही, हें व्यसन आपल्या अंगीं जडवून घेतात! हे विचार मनांत आल्याबरोबर आह्मांस खालील सुभाषिताची आठवण होते:—

"एकस्य कर्म संवीक्ष्य करोत्यन्योऽपि गर्हितम् ।
गतानुगतिको लोको न लोकः पारमार्थिकः ॥"

अशा रीतीनें ही दोन्ही प्रकारची मंडळी आपला स्वतःचा नाश करून घेतात तो घेतातच व आपल्या बरोबर आपल्या देशासही बुडवितात! दोघांत फरक इतकाच कीं, एकास समजतें पण उमजत नाहीं, व दुसऱ्यास तर मुळीं कळतच नाहीं!!

आजपर्यंत ह्या हिंदुस्थानांतील अमोघ पैसा अनेक कारणांनीं परदेशीं गेला, ही गोष्ट पुष्कळांनीं अनेक वेळां आमच्या देशबंधूंच्या नजरेस आणून दिली असतां तिकडे ते अजूनहि दुर्लक्ष्य करित आहेत—त्यास कांहीं आळा घालावयाचें सोडून देऊन उलट त्यांत भरच पाडीत आहेत—ही सखेदाश्चर्याची गोष्ट आहे! आमचे सुशिक्षित देशबंधू सुधारलेल्या तऱ्हेचें धूमपान करितात, परंतु त्याच्या योगानें आपण आपला देश कसा निर्धन करित आहों, इकडे त्यांचें मुळींच लक्ष्य जात नाहींसें दिसतें! फक्त एवढ्याच गोष्टींत त्यांचें अशिक्षितांसारखें वर्तन कसें होतें कोण जाणे! अशिक्षित लोकांना आपण कोण, आपला देश काय, आपली स्थिति हल्लीं कशी झाली आहे, आपला देश कोणत्या दशेला आला आहे, त्याचीं कारणें

काय, ती स्थिति कोणत्या उपायांनीं सुधारितां येईल, इत्यादि गोष्टींचें यत्किंचितही ज्ञान नसतें, ह्मणून त्यांच्या हातून तशा प्रकारचे प्रमाद घडतात; आणि स्वतःस पदवीधर ह्मणवून घेणाऱ्या, स्वतांस सुशिक्षित ह्मणवून घेणाऱ्या, तसेंच स्वतःस सुधारक (मूळअर्थी) ह्मणवून घेणाऱ्या मंडळीच्या हातूनही तसेच प्रमाद घडतात, हें अत्यंत गर्हणीय होय, फार तर काय, हें त्यांस अत्यंत लांछनास्पद होय. अशा रीतीनें सुशिक्षित लोक ह्या व्यसनाच्या योगानें आपल्या स्वतःच्या, आपल्या अनुयायांच्या, आपल्या देशबांधवांच्या, व उघड उघड आपल्या देशाच्या नाशास कसे कारणीभूत होत आहेत, त्याचें दिग्दर्शन वर केलें आहे, तर हा लेख वाचून तरी ह्या दुष्ट, निंद्य, लांछनास्पद परंतु हल्लीं संभावित होऊं पाहणाऱ्या ह्या धूम्रपानाच्या व्यसनास सर्व लोक, एकदम जरी नाहीं, तरी हळु हळु पूर्ण फांटा देतील, अशी दृढ आशा आहे.

---

# शेतकी--भाग १ ला.

( मागील अंकावरून पुढें चालू. )

मागें सांगितलेंच आहे कीं, मुळ्यांतून पाणी व त्या बरोबर द्रवणाऱ्या जड पदार्थांचे क्षार झाडांमध्यें जातात. ह्या झाडांचा सर्व भाग जमिनीवर आला असल्यामुळें त्यांस सूर्याचा प्रकाश लागतो, व त्याच्या उष्णतेनें झाडांतील

पाण्याची वाफ होऊन ती बाहेर हवेंत मिसळते. समुद्राचें पाणी अगर मीठ घुतलेलें पाणी उष्णतेनें आटविलें असतां खालीं मिठाचा सांका असतो, त्याप्रमाणें झाडांतील पाण्याची वाफ झाल्यामुळें आंतील क्षारांचा सांका तयार होतो. हा सांका पुन्हां येणाऱ्या पाण्यामध्यें विरघळून त्याचा एक पाकासारखा पदार्थ होतो. ह्या पदार्थाचा उपयोग झाड वाढविण्याचे कामीं ह्मणजे लांकूड, ढाप्या, पानें वगैरे पदार्थ बनण्याचे कामीं होतो. ही क्रिया सारखी चाललेली असते. झाडांच्या अवयवास ( TISSUE ) निरुपयोगी असे जड पदार्थांचे क्षार झाडांच्या सालींत, पानांत व पाचोळ्यांत जातात. ह्यामुळेंच साली, पानें, पाचोळा वगैरे जळाल्यास त्यांच्या राखेचें प्रमाण निवळ लांकडापेक्षां जास्त असतें. वाळू हा पदार्थ झाडांच्या पोषणास उपयोगी पडत नाहीं, ह्मणून तो साली व पाचोळा ह्यांत जास्त सांपडतो. मोठमोठ्या झाडांच्या वरच्या बाजूस जी बरीच जाड साल सांपडते, त्यांत वाळूचें प्रमाण जास्त सांपडतें. तरी झाडांच्या उपजीविकेस वाळूची अवश्यकता आहे, असें मुळींच नाहीं. जोंधळा, मका, बाजरी, गहूं वगैरे तृणधान्यांच्या ( Graminaceous ) झाडांवरील पाचोळ्यांतही, थोडें वाळूचें प्रमाण सांपडतें. तरी कित्येक पाचोळ्यांत वाळूचें प्रमाण अगदीं थोडें सांपडतें. यावरून ह्यांच्या पोषणास वाळू अवश्य नाहीं. कित्येकांची अशी कल्पना आहे कीं, पाचोळा व साल ह्यांस जो चिवटपणा असतो. त्याचें कारण

त्यामध्यें वाळू असलेली वाळू होय. पण ज्या अर्थी कित्येक साली व पाचोळे ह्यामध्यें वाळूचें प्रमाण अगदीं थोडें असून, ते वाळूचें ज्यास्त प्रमाण असलेल्या साली व पाचोळ्या इतकेंच चिवट असतात, त्या अर्थी वाळू ही चिवटपणा आणते, हें ह्मणणें योग्य नाहीं.

## ३ पानांचें शोषण:—

हवेमध्यें कर्बाम्लिप्राणील् ( Carbonic Acid Gas) हा वायु असतो. पानें हा वायु हवेंमधून शोषून घेतात, हा वायु पाण्यामध्यें फार लवकर वितळतो. व ह्याचें वितळण्याचें प्रमाणही फार आहे. हा वायु पानें शोषून घेतात. व तो पानांतील पाण्यामध्यें वितळून मागाहून झाडांत सर्वत्र पसरतो. मग आंत त्यांचें रासायनिक वर्गीकरण (Decomposition) होऊन, त्या वायूचीं दोन तत्वें ह्मणजे प्राण व कर्ब हीं निरनिराळीं होतात. कर्ब हें झाडांचें मुख्य अन्न होय. झाडें तें आंत घेतात, व प्राणवायु बाहेर टाकितात. मनुष्यें ज्या प्रमाणें श्वासोच्छ्वास करितात, त्याच प्रमाणें झाडेंही करितात. फरक इतकाच कीं, झाडांना कर्ब तत्वाची अवश्यकता असते. व मनुष्यांना प्राणतत्वाची अवश्यकता असते. मनुष्यें हवेंतून जो प्राणवायु आंत घेतात, त्या प्राणवायूचा संयोग मनुष्यांनीं खाल्लेल्या अन्नाशीं होऊन, अन्नांतून जास्त प्रमाणांत आलेल्या कर्ब तत्वाच्या संयोगानें "कर्बाम्लिप्राणील" हा वायु बनतो.

ह्या वायु मनुष्यें बाहेर टाकितात, व पुन्हां प्राणवायु आंत घेतात. मनुष्यप्राण्यांप्रमाणें इतर प्राणीही श्वासोच्छ्वास करितात. प्राण्यांनीं बाहेर टाकिलेला कर्बद्विप्राणील झाडांचे उपयोगी पडतो. मग झाडें कर्ब आंत घेऊन शुद्ध प्राणवायु बाहेर टाकितात. व तो प्राण्यांच्या उपयोगी पडतो. कर्बद्विप्राणील हा वायु फार विषारी आहे. ह्यांत प्राणी जिवंत राहूं शकत नाहीं. तेव्हां प्राण्यांनीं टाकिलेलें विष हें वनस्पतींचें अन्न होय, व वनस्पतींनीं टाकिलेला प्राणवायु हें मनुष्याचें अन्न होय. मनुष्याच्या पोषणासाठीं जसें अन्न लागतें, तसें वनस्पतींच्या पोषणासाठीं जमीन व खत हीं लागतात. नत्र वायु हा हवेमध्यें पुष्कळ असतो, पण तो पाण्यांत फार थोडा वितळतो. ह्मणून पानांच्या शोषणानें वनस्पतींस पुरेसा वायूचा पुरवठा होत नाहीं. तरी नत्र वायूचा पुरवठा जमिनींतून होतो. मनुष्याच्या पोषणास कर्बतत्व अवश्य लागतें. पण हवेंतून मिळणें शक्य नसल्यामुळें अन्न खावें लागतें. ह्या अन्नांत कर्बतत्व असतें. ह्यावरून आपल्या लक्ष्यांत येईल कीं, मनुष्यें ज्याप्रमाणें श्वासोच्छ्वास करितात, व त्यांना अन्नाची गरज असते, त्याचप्रमाणें झाडेंही श्वासोच्छ्वास करितात, व त्यांचे पोषणास अवश्यक जे पदार्थ ते त्यांस जमिनींतून मिळतात. प्राणी ज्याप्रमाणें श्वासोच्छ्वास करितात, त्या प्रमाणें झाडेंहीं पानांच्या द्वारें श्वासोच्छ्वास करितात.

# स्फुट विषय.

आजकाल व्यापार ह्मणजे कोणत्याही राष्ट्राचें बलाबल जोखण्याचा कांटाच मानिला आहे. पूर्वी राष्ट्राची शक्ति जशी त्यांतील लोकांच्या मर्दुमकीवर बहुतेकांशीं अवलंबून असे, तशी ती आतां राष्ट्राच्या व्यापारावर अवलंबून आहे, असें ह्मटल्यास चालेल. ज्या राष्ट्रानें आपल्या व्यापार बलानें दुसऱ्या राष्ट्रांवर पगडा बसविला, त्यानें त्यांस तें स्वतंत्र असतांही जिंकलें असें होतें; त्याचा दरारा इतर राष्ट्रांवर बसतो; व तें लौकरच नांवालौकिकास येतें. सांप्रत पृथ्वीवर जीं जीं राष्ट्रें पुढें आलेलीं आपण पाहतों, तीं सर्व व्यापार बलानें इतरांपेक्षां जास्त बलवान् आहेत, असें आपणांस आढळून येईल. ह्मणून आजकाल कोणत्याही राष्ट्रास पुढें यावयास "व्यापार" हाच एक उत्तम, सुलभ व हितावह मार्ग आहे.

* * *

हल्लीं आपल्या देशास जी दुर्धरावस्था प्राप्त झाली आहे, ती तरी एका व्यापाराच्या अभावामुळेंच झाली आहे. जें आर्यावर्त पूर्वी कुबेरनगरी ह्मणून नांवाजलेलें, जें आपल्या अतुल संपत्तीनें, नैसर्गिक सृष्टिसौंदर्यानें व इतर गोष्टींनें सर्व जगाच्या कौतुकास पात्र झालें व ज्याच्या जिवावर आज नांवाजलेलीं राष्ट्रें पुढें आलीं त्या आपल्या देशाची स्थिति काय आहे, इकडे आमच्यांतील सुशिक्षित

लोकांचें लक्ष कितपत गेलें आहे, हें त्यांच्या वर्तनावरून पाहिलें असतां छाती फाटूनच जाते.

*  *  *

हिंदुस्थानचा व्यापार आजकाल किती खालावत चालला आहे, हें हल्लीं कोणत्याहि मनुष्यास सांगण्याची अवश्यकता नाहीं. मूळारंभीं हिंदुस्थानांतून कोणत्या तऱ्हेचा माल परदेशीं जातो व कोणत्या तऱ्हेचा परदेशांतून इकडे येतो हें जो सूक्ष्म रीतीनें पाहील, त्यास असें दिसून येईल कीं, इकडील सर्व माल मातीच्या मोलानें आम्ही परदेशीं पाठवितों व त्याचाच बनलेला भपकेदार पण निरुपयोगी, दिखाऊ परंतु बिनटिकाऊ असा माल वाटेल त्या किमतीस घेतों व अशा रीतीनें प्रत्येक वर्षी, प्रत्येक दिवशीं किंबहुना प्रत्येक पळास आपलें, आपल्या देशाचें व आपल्या भावी पिढीचें नुकसान करीत असतों.

*  *  *

ह्मणून हा अनर्थ टाळण्याकरितां प्रत्येक मनुष्यानें क्षणोक्षणीं स्वदेश व त्याचें कल्याण हीं डोळयापुढें वागविलीं पाहिजेत. विलायती वस्तु घेतांना, वापरतांना व ती फेंकून देतांना क्षणोक्षणीं तिच्यामुळें आपलें कोणतें नुकसान झालें, आपल्या देशाच्या व आपल्या भावी पिढीच्या लोकांच्या अन्नांत आपण कशी माती कालवित आहों, हें सर्व नीट लक्ष्यांत ठेविलें पाहिजे ह्मणजे कोणत्याहि मनुष्यास आप-

त्या जन्मभूमीबद्दल योग्य अभिमान उत्पन्न होऊन तो खरा "देशभक्त" होईल. ह्या गोष्टीकडे हल्लीं आमच्यांतील सुशिक्षित, तरुण व होतकरू मंडळींचें थोडथोडें लक्ष्य जात आहे, ही एक आनंदाची गोष्ट आहे.

* * *

तरी सुद्धां वरील गोष्टीकडे जावें तितकें लक्ष्य न गेल्यामुळें अजूनहि देशाचें किती नुकसान होत आहे हें सूज्ञ मनुष्यास सांगण्यास नलगे. आमच्या देशांतील व्यापारी मंडळाकडे नजर फेंकली तर सर्वच निराशा होते. त्यांचा सर्व व्यापार परदेशी लोकांचाच आहे असें ह्मटल्यास चालेल. ह्मणजे इकडील लोकांचीं दुकानें जणूं काय इंग्लंड, जर्मनी, अमेरिका वगैरे देशांतील लोकांचींच आहेत. ते पाठवितील तो माल ह्यांनीं विकावा व आपल्या अज्ञानामुळें आपल्या देशाचें व भावी पिढ्यांचें नुकसान करण्याचें श्रेय घ्यावें.

* * *

ह्मणून आमच्या व्यापारी मंडळीस आह्मी नम्रपणें अशी सूचना करितों कीं, त्यांनीं केवळ परदेशी लोकांचीं "भारवाहक तट्टें" न होतां इकडेहि तसेच कारखाने काढल्यास सहज होण्यासारखें असून त्यांत त्यांचा फायदा आहे. तसेंच शेवटीं आमच्या वाचकांस व देशबंधूंस देशी माल वापरण्याची सूचना करून त्यांची तूर्त रजा घेतों.

* * *

# वर्तमानसार.

—आपण कांद्याच्या ज्या पांकळ्या निरुपयोगी ह्मणून उकिरड्यावर टाकून देतों, त्याच पांकळ्या येथून इंग्लंड व अमेरिका येथें पाठवून त्यांचा विलायती तंबाकु बनविण्याकडे उपयोग करितात, असें नुकतेंच समजलें आहे ! सिगार्स व सिगारेट्स् ओढणाऱ्यांनीं आपण काय ओढतों आहों, इकडे विशेष लक्ष्य पुरवावें.

—रा. रा. कृष्णराव फाटक वकील यांनीं नागपूर येथें चाकू कातऱ्यांचा देशी कारखाना काढला आहे; त्यांतील चाकू व कातऱ्या चांगल्या प्रतीच्या असून किंमतीही बेताच्याच आहेत, असें समजतें. देशी माल वापरणारांना हें सोइस्कर आहे.

—तारीख १६ रोजीं कानपूर येथील एंजिन्सामिल्स कंपनीच्या इमारतीस आग लागून बरेंच नुकसान झालें. ही इमारत गिरणींतील मजुरांसाठीं बांधिली होती. आगीच्या वेळेस वारा फार सुटलेला असल्यामुळे आसपासच्या १०० झोंपड्यांसही आग लागली. दुःखांत सुख येवढेंच कीं, या भयंकर आगींत प्राणहानी मुळींच झाली नाहीं.

—पुण्यांतील कित्येक दाणेवाल्यांनीं प्रत्येक पल्ल्यामागें एक एक पैसा जास्त घेऊन त्यापासून उत्पन्न होणारी रकम प्लेग व इतर अपघातानें निराश्रित झालेल्या लोकांस साह्य करण्याकडे देण्याचें योजिलें आहे. अशा रीतीनें साल अखेर १२००० रुपये जमतील, असा अंदाज आहे. इतर व्यापाऱ्यांनींही त्याचें अनुकरण केल्यास चांगलें.

—सुरत येथें ता. १९ रोजीं मध्यरात्रीनंतर त्रिभुवन गोवनराम याच्या दुकानांत आग लागली व तिच्या योगानें सुमारें ८० दुकानांची राखरांगोळी झाली. एकंदर पाऊण लाखाचें नुकसान झालें.

—हिंदुस्थान आणि सिलोन यांच्यामध्यें लवकरच आगगाडी सुरू होणार असून रामेश्वर येथें आगगाडीचा मोठा कारखाना निघणार आहे.

—अमेरिकेंतील ओटावा युनिव्हर्सिटीस आग लागून तिच्या सर्व इमारती खाक झाल्या त्यांत बऱ्याच विद्यार्थ्यांची प्राणाहुति झाली असें ह्मणतात.

—हल्लीं व्हेसुविअस नामक ज्वालामुखी पर्वत फारच प्रदीप्त झाला आहे. त्याचा स्फोट एकसारखा चालू असून त्यांतून तापलेले पदार्थ बाहेर येत आहेत !

—दिल्लीदरबारचा इतिहास छापून तयार होत आहे. त्याचीं प्रुफें लॉर्ड कर्झन साहेब स्वतः तपासीत आहेत ! त्यांतील मजकुर कमजास्त होत असल्यामुळें पुस्तक बाहेर पडण्यास कांहीं विलंब लागला आहे, असें समजतें.

---

**साभार पोंच.**—रावसाहेब गोपाळ अनंत भट यांजकडून कुटुंबास मदत ह्मणून दोन रुपये आले, ते पोंचले. पाठविणाराचे आभारी आहों.

---

**स्वदेशी** मेंथाल—भारतवर्षीय वस्तू विषयीं कळकळ बाळगणाऱ्या प्रत्येक देशबांधवानें हें एकदा तरी वापरून पहावें. इंग्लीश प्रमाणें गुणकारी असल्याबद्दल अनेक डाक्टर लोकांचीं सर्टिफिकिटें मिळालीं आहेत. किंमत ०४ व्यापाऱ्यांस भरपूर कमिशन गांवोगांव एजंट पाहिजेत.

पत्ता—धि आर्यन् इंडस्ट्रियल कंपनी—गिरगांव, मुंबई.

**पाहिजेत**:—अनुभवांतीं पुष्कळ लोकांच्या पसंतीस उतरलेलें **रानडे** यांचें सुवासिक **कापशीचें** तेल विकणारे एजंट पाहिजेत. किंमत ४ आणे. कमिशन भरपूर.

पत्ता:—**महाजन आणि मंडळी** सोल एजंट, गिरगांव मुंबई.

रजिस्टर नंबर बी० ४५१

# ॥ सोपें औषध परी गुणवंत ॥

दासबोध.

**व्याधिहरण**—या औषधाप्रमाणें क्षयरोग व बाळंतरोग यांवर दुसरा रामबाण उपायच नाहीं. यानें बिघडलेलें रक्त शुद्ध होऊन, ताजें रक्त त्वरित उत्पन्न होतें. फार जुना जीर्णज्वर हें औषध फक्त ३ वेळ घेतल्यानें साफ बरा होतो.

व्यापारी व विद्यार्थी यांस मानसिक श्रम फार होतात, त्यांना यापासून फार मोठा फायदा आहे. किं. १ बा. १॥ रुपया. ३ बाटल्यांस ४ रुपये. टपाल व्ही. पी. खर्च निराळा.

**आरोग्यामृत**—ह्यानें गोंवर, कांजिण्या, देवी व तीप यांपासून अंगीं राहिलेली कडकी नाहींशी होऊन शरीर सदृढ व बळकट होतें. पिण्यास हें अतिशय गोड असल्यामुळें लहान मुलें तें फार आवडीनें पितात. किं. १ बा. १ रुपया. ३ बाटल्यांची २॥ रुपये. व्यापारी लोकांस भरपूर कमिशन मिळेल.

**उपदंशारि**—गर्मी, परमा, बद, ठणका, इत्यादी उपदंशासंबंधी विकारावर अत्युत्तम उपाय. परमा कितीही वर्षांचा जुना असला तरी हें औषध २ दिवस घेतल्यानें साफ बरा होतो. किं. १ बा २ रुपये. ३ बाटल्यांस ५ रुपये. याशिवाय खालील औषधें आमचेकडे मिळतील.

प्रवाळभस्म ( चंद्रपुटी ) १ तोळा १ रुपया,

सुवर्णमाक्षिक भस्म. १ तो. १रु.

लाहेभस्म १ तो. १ रुपया.

खोकल्यावर गोळ्या ( १२ गो. ड. ) ८८.

सर्दीवर गोळया. (१२ गो. ड.) ८८.

प्रदररिपु. १ तो. १ रुपया.

शूलदावानल ५ तो. १ रुपया.

गुळवेलसत्व (खात्रीचें)१ तो.८४

कचोरा सत्व १ तो. ८२.

**पत्ता**—धी ग्रेट मर्कंटाइल कंपनी. गुहागर, जि. रत्नागिरी.

**सूचना**—अर्धा आण्याचें तिकिट पाठवून कॅटलाग मागवा.

# वर्गणीची पोंच.

| मुंबई. | आणे. |
|---|---|
| डॉ. जी. बी. प्रभाकर | ८ |
| प्रो. एन्. बी. रानडे | ८ |
| आर्य गजानन भास्कर वैद्य | ८ |
| ,, विष्णु नारायण ग.बोले | ८ |
| आर्य गदाधर लक्ष्मण मुळे परळ | ११ |
| ,, कल्याणदास धरमदास | ८ |
| ,, अनंत विनायक गुर्जर | ८ |
| ,, विठ्ठल माणिक ठाकूर | ८ |
| ,, गंगाधर गोविंद पोतदार | ८ |
| ,, कृष्णाजी दामोदर मळेकर | ८ |
| ,, महादेव बाळकृष्ण तांबट | ८ |
| बाळाजी काशिनाथ करमरकर | ८ |
| ,, बाळकृष्ण गोपाळ मांजरेकर | ८ |
| ,, गणेश लक्ष्मण पागे | ८ |
| ,, गोविंद जनार्दन मराठे | ८ |
| ,, अनंत रामचंद्र रेंगे | ८ |
| ,, चिंतामण सदाशिव सोमण | ८ |
| माधवराव नारायण पाटणकर | ११ |
| ,, केशव बाळकृष्ण जोशी | ८ |
| ,, सिताराम धाकोजी राणे | ८ |
| ,, भिकाजी बल्लाळ मुकादम | ८ |
| ,, गंगाधर काशिनाथ लोंढे | ८ |
| ,, महादेव हरी आठवले | ८ |
| ,, जीवन त्र्यंबक चिटणीस | ८ |
| ,, शंकर हरी शेजवलकर | ८ |
| ,, महादेव दत्तात्रय भागवत | ८ |
| ,, भालचंद्र कृष्ण जभेकर | ८ |
| ,, नारायण वामन पुराणिक | ८ |
| ,, रामराव बाळकृष्ण नवलकर | ८ |
| ,, बाळकृष्ण लक्ष्मण ढापरे | ८ |
| डॉ. मोरेश्वर गोपाळ देशमुख | ८ |

# वर्गणीदारांस सूचना.

बडोदें—आर्य गजानन विनायक पटवर्धन.

अहमदाबाद— ,, आनंदराव कंवडे फोटोग्राफर.

यांस एजंट नेमिलें आहे. तेथील वर्गणीदारांनीं त्यांजकडे वर्गणी भरावी. व त्यांनीं ती मुख्य एजंटांकडे पाठवावी.

अंताजी दामोदर काळे.

# संगमनेरकर दामले वैद्य

## यांचीं केवळ वनस्पतीचीं रामबाण औषधें.

पानथरी (प्लीहा) वर—हिंवतापानें होणारे पोटांतील डावे आंगचे गांठीवर हें औषध सुरू होतांच भूक लागून शक्ती येते व पानथरी ७ दिवसांत जाते. रोग जुना व मोठा असेल तर २।३ डबे लागतात. डबीची किंमत १२ आणे.

शूळ दावानल—अर्थात पोटशूळ—भोजनानंतर दुखणारे परिणाम—शूळावर, व ओटी माकडहाडाचे ठिकाणचेही शूळ १४ दिवसांत बरे होतात. किंमत १ रुपया.

हिंव ताप—एक दिवसाआड, रोजचा व चातुर्थिक हिंवताप ह्या औषधानें ३ वेळांतच बंद होतात. किंमत ८ आणे.

मुळव्याध—रक्ती व मोडाची हटकून २१ दिवसांत दूर होते, ठणका राहून शौचास साफ होते. रक्त तिसरे दिवशीं बंद. किंमत १ रुपया.

शरीरमित्र—सर्व प्रकारचे धातूविकार, स्वप्नावस्था, ह्यांजवर केवळ वनस्पतीचें शास्त्रोक्त औषध मित्राप्रमाणें साह्य करितें. शौचास साफ करून धातु घट्ट होते. व सर्व व्यापार पूर्वीप्रमाणें सुरळीत चालतात. २१ दिवसांचे औषधाची किंमत १ रुपया.

स्त्रियांचे सर्व प्रकारचे विकार—(धुपणी) तांबडीं, पांढरीं ह्यांजवर झाडपाल्याचें औषध अति उत्तम व अनुभवशीर आहे. १४ दिवसांत गुण. किंमत १ रुपया.

परम्यावर—मूत्रेंद्रियांतील आग पहिले दिवशीं बंद. ७ दिवसांत पू बंद होऊन उत्तम गुण कायमचा येतो. १॥ रु.

पत्ता—ठिह. त्री. दामले, संगमनेरकर वैद्य;
बुधवार पेठ किब्यांचा वाडा, पुणें.

वर्षाची वर्गणी ८ आणे. ट. ख. ३ आणे.
एका नांवावर ६ प्रती गेल्यास ट० खर्च माफ. फुट० अं० १ आणा.

# "पैसा फंड"

## मासिकपुस्तक.

वर्ष १ लें. ] फेब्रुवारी १९०४. [ अंक ८ वा.

### विषयानुक्रमणिका.


| विषय. | पान. |
| --- | --- |
| आमचे देशबंधु आणि त्यांचीं आधुनिक राजमान्य व्यसनें ............... | ९७ |
| शेतकी.................................................. | १०२ |
| स्फुट विषय ........................................ | १०६ |


मुख्य एजंट–पुरंदरे आणि कंपनी–माधवबाग मुंबई.

हें पुस्तक अंताजी दामोदर काळे यांनीं मुंबई १
विजय छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

१

# माझा प्रवास.

ता. २१ दिसेंबर रोजीं रा. रा. गोन्हे यांच्या बरोबर मी बडोदें येथील 'पदार्थ संग्रहालय' पहाण्यास गेलों होतों. तेथील अनेक प्रेक्षणीय वस्तू पाहून समाधान झालें. चोहों-बाजूंनीं दीन झालेल्या या देशांत अद्यापिही कसब असलेलें पाहून कोणा देशभक्ताचें अंतःकरण प्रफुल्लित होणार नाहीं? शक्य असेल त्यानें हें एकदां तरी जरूर पहावें अशी मी शिफारस करितों. श्री. सयाजीराव महाराजांच्या अलोट बुद्धिसामर्थ्याचें हें एक प्रदर्शनच आहे, असें ह्मटल्यास चा-लेल. असो, दुसरे दिवशीं मी भडोच येथें गेलों. शहरांत प्लेग होता, यामुळें वेजलपूर नामक दूरच्या भागांत वस्तीस राहिलों. रात्रीं गप्पा मारण्याच्या हेतूनें आजूबाजूच्या मंडळीस बोलावून त्यांस थोडक्यांत उद्देश समजावून दिला, तों लगेच वार्षिक ५॥ रुपये जमले. दोन इसम स्वयंसेवक मिळाले. तेथील एका वजनदार गृहस्थास खजीनदार नेमण्यांत आलें. मी १ पैही न घेतां हें काम करीत असलेलें पाहून त्यांस फार आनंद झाला. मंडळीनीं मला सुरत येथें पोंचविलें. येथून ११ मैलांवर डुमस ह्मणून हवा खाण्याचें प्रसिद्ध ठि-काण आहे. तेथें मोठमोठे लोक आले आहेत असें ऐकलें ह्मणून रा. दाते, सुरत येथील माजी म्यु० ओव्हरसीयर बदरकर यांच्या घरीं दुपारीं भोजन केलें! त्यांचा श्रीमंती थाट व योग्य आदरसत्कार पाहून मी तर चकित झालों.

भोजनोत्तर त्यांनीं स्वत: बगीच्यांतील सर्व झाडांची माहिती दिली. येथें कडूलिंबासारखेंच एक गोड लिंबाचें झाड दृष्टीस पडलें! यांनीं पैसा फंडाचा उद्देश ऐकून घेतल्यावर सांगितलें कीं, "महाराष्ट्रांत वजनदार लोकांची कमेटि स्थापून बराच फंड जमला ह्मणजे गुजराथेंत या. मी स्वत: मदत करीन व दुसऱ्या जवळून करवीन. हिंदु एज्यू० फंडास मी १ हजार रुपये दिले आहेत. गुजराथ प्रांत चांगल्या कामीं मदत करण्यास कधीं माघार घेणार नाहीं. काळजी काय ती महाराष्ट्राची आहे!" या शब्दांत पुष्कळ अर्थ आहे. असें मला वाटतें. येथून मी सोनगड येथें गेलों. रावब. केळकर यांनीं एका गृहस्थावर पत्र दिलें होतें, यामुळें उतरण्याची पंचाईत पडली नाहीं. दुसरे दिवशीं सभा भरून कल्पना पसंत पडल्यावर वार्षिक ८ रुपये जमले. मा० पुस्तकास ७ वर्गणीदार झाले. येथील हवा पूर्वीं फार वाईट होती; अलीकडे रेल्वे झाल्यापासून बरीच सुधारली आहे. येथील जमीन सुपीक व वस्ती पातळ असल्यामुळें शिकलेल्या लोकांनीं नवीन पद्धतीनें शेती करण्यासाठीं इकडे वसाहत केल्यास त्यांचा व पर्यायानें देशाचा पुष्कळ फायदा होईल. देशांतील पड जमिनी परकी लोकांच्या ताब्यांत जाण्यापूर्वी डोळे उघडले तर उदात्त हेतूनें स्थापन झालेल्या कंपनीस श्री० सयाजीराव महाराजांकडून विशेष सवलती मिळण्यास अडचण पडेल असें वाटत नाहीं. येथें हलक्या जातींच्या मुलांसाठीं एक

१०० मुलांची शाळा आहे. येथें कपडे व जेवण फुकट मिळतें. सुतार काम शिकविण्याचीही सोय केली आहे. लहान मुलांनीं केलेल्या पेट्या, खुर्च्या पाहून आनंद झाला. अशा संस्था अनेक निघाल्यास अज्ञान-तिमिर नाहींसें होण्यास उशीर काय? येथून जवळच व्यारा येथें रा. गोखले यांचा आगपेट्यांचा कारखाना आहे, तो पहाण्यास जाणार होतों, परंतु तेथें उंदीर मरूं लागल्यामुळें योग आला नाहीं. ह्मणून मी नवापूर येथें गेलों. खानदेशांतील हें पेट्याचें ठिकाण आहे. सोनगडच्या लोकांनीं एखाद्यावर पत्र दिलें असतें तर बरें झालें असतें. पत्र नसल्यामुळें आगांतुकी करणें भाग पडलें! बऱ्याच दिवसांनीं मला हा प्रसंग आला, तरी पण पोष्टमास्तरच्या सुस्वभावामुळें मला विशेष त्रास झाला नाहीं. रा. केशवराव पाठक यांच्या घरीं सभा भरून व्याख्यान झालें. अशिक्षित व दैववादी मंडळी पुष्कळ, यामुळें कमेटी स्थापन झाली नाहीं. येथील मंडळीस वाचनाची गोडी नाहीं, यामुळें मा. पुस्तकास १ ही वर्गणीदार मिळाला नाहीं! लायब्ररी स्थापन करण्याची खटपट करणारावर अर्ज झाले, हें ऐकून तर फारच आश्चर्य वाटलें! सोनगड प्रमाणें येथेंही रेलवे खर्च मिळाला नाहीं, यामुळें पदरमोड करून नंदुरबार येथें गेलों. हा तालुक्याचा गांव असून येथील लोक सुखी आहेत. सुरतच्या दांडेकरांनीं पत्र दिलें होतें यामुळें उतरण्याची काळजी पडली नाहीं. रा. विष्णुपंत दांडेकर यांनीं उत्तम व्यवस्था ठेविली, रा. केतकर वकील यांच्या अध्य-

क्षतेखालीं ता. १ रोजीं सभा भरून माझें व्याख्यान झालें. मंडळी थोडी होती तरी पण वजनदार लोक आले होते, यामुळें काम बरें झालें. रा. मराठे दुकानदार यांनीं "पैसा फंडाची कल्पना" या पुस्तकाच्या २०० प्रती वाटण्याचें कबूल केलें. ५ इसमांनीं स्वयंसेवक होऊन समाजांत ही कल्पना पसरविण्याचें काम पत्करलें. सभेंत मा. पुस्तकास १० वर्गणीदार झाले. रा. मराठे यांनीं मासिक पुस्तकें घरोघर पोंचविण्याची जबाबदारी आपल्या अंगावर घेतली ! असे स्वदेशभक्त पुष्कळ उत्पन्न झाल्यावर उन्नति लांब आहे काय ? असो. येथून मी तळोदें गांव आटपून परत नंदुरबार येथें आगगाडींत बसण्याचा बेत केला. रा. दांडेकर यांनीं प्रवास खर्चासाठीं मला ३ रुपये दिले. १ रुपया भाडें देऊन मी तळोदें येथें गेलों. ता. ३ रोजीं एका देवळांत सभा भरून माझें व्याख्यान झालें. कल्पना पसंत पडली, परंतु उशीर झाल्यामुळें कमेटी झाली नाहीं. हा तालुक्याचा गांव आहे, तरी पण येथील सर्व मंडळी अधिकाऱ्यांच्या तंत्रानें वागणारी असल्यामुळें पुढें तरी कमेटी स्थापन होईल कीं नाहीं, याचा संशयच आहे. गांवांत धनाढ्य मंडळी बरीच असून मा. पुस्तकास १ ही वर्ग० मिळाला नाहीं ! येथून प्रकाशें ५ कोश आहे. येथें जाण्याची इच्छा होती. परंतु गाडीची तजवीज न झाल्यामुळें परत नंदुरबार येथें आलों. शंकर कलाल यांस भाडें देत असतां त्यानें एक दिडकी

सुद्धां घेतली नाहीं ! दुसरे दिवशीं रा. केतकर वकील यांजकडे सभा भरविल्याबद्दल दाखला मागण्यास गेलों असतां त्यांनीं प्रवास खर्च सिंदखेड्यापर्यंत देण्याची इच्छा दाखविली, परंतु रा. दांडेकर यांनीं ३ रुपये दिले आहेत, यामुळें जरूर नाहीं, असा मी जबाब दिला ! नंतर मी सिंदखेडा येथें आलों. हा तालुक्याचा गांव आहे. येथें आजच प्लेग शुरू झाला होता, यामुळें व्याख्यान कसें होईल, याची काळजी पडली. एक दोघांच्या खटपटीनें रात्रीं ९ वाजतां श्री दत्त मंदिरांत सभा भरून व्याख्यान झालें. कल्पना पसंत पडली. मासिक पुस्तकाला ७ सात वर्गणीदार झाले. फंड थोडा बहुत तरी जमेल अशी खातरी वाटते. एका गृहस्थानें छोट्या पुस्तकाच्या १० प्रती वाटण्याचें कबूल केलें. मंडळीनीं प्रवास खर्च १ रुपाया दिला. दुसऱ्या एकानें आग्रहपूर्वक ८२ दिले! येथून मी धुळ्यास जाण्याचा बेत केला होता, परंतु शिरपुर हा तालुक्याचा मोठा गांव बाजूस आहे, तो घेऊन मग धुळ्यास जा, असें सिंदखेड्याच्या लोकांनीं सांगितलें होतें, यामुळें शिरपूर येथें गेलों. एकाच्या घरीं उतरलों. त्यांनीं उद्देश ऐकून घेऊन शक्य तितकी खटपट करून पहा, असें सांगितलें. ता. ७ रोजीं संध्याकाळीं रा. अण्णासाहेब करंदीकर वकील यांच्या अध्यक्षतेखालीं जाहीरसभा भरून माझें भाषण झालें. कल्पना पसंत पडली. कमेटी

( पुढें चालू. )

# पैसा फंड

मासिक पुस्तक.

वर्ष १ लें ] फेब्रुवारी १९०४. [ अंक ८ वा.

## आमचे देशबंधू आणि त्यांचीं आधुनिक राजमान्य व्यसनें.

२.

### सुरापान.

" न करील कां पित्याची दुर्गतिची माउली सुरा माती।"

मोरोपंत.

मनुष्यानें आपल्या बुद्धीस व्यसनांच्या ताब्यांत दिलें असतां, काय काय अनिष्ट व अपायकारक परिणाम होतात, ह्याचा विचार स्थूलदृष्टीनें आह्मी मागील अंकीं केलाच आहे. प्रस्तुत अंकांत सुरापानानें कोणकोणते अनर्थ होतात, यांविषयीं विचार करावयाचा आहे.

कोणत्याहि देशाचें सार्वभौमत्व हस्तगत केल्यानंतर त्या राष्ट्रांतील प्रजेशीं अगदीं बंधुत्वानें वर्तन दाखवावयाचें, असा आमच्या इंग्रज बहादरांचा संकल्पच असल्यामुळें तो मनांत वागवून त्यांनीं आपलें शुभ्र पाऊल ह्या देशांत टाकिलें.

देवदानवांना समुद्रमंथनसमयीं सांपडलेल्या चौदा रत्नांत ज्याप्रमाणें हालाहल, शंख वगैरे सारखींही कांहीं अद्वितीय रत्नें होतीं, त्याप्रमाणें ह्या बहाद्दरांनीं समुद्रलंघनसमयीं आपणांबरोबर आणिलेल्या चित्ताकर्षक व चित्तपरिभ्रामक अशा ज्या कित्येक चिजा आह्मांस प्राप्त झाल्या, त्यांतही तमाखु, सुरा वगैरे सारख्यांचा अंतर्भाव होता.

आंग्लविद्या, कला, यंत्रें, शोध यांचा ह्या प्रदेशांत क्रमाक्रमानें फैलाव होत आहे तोंच कित्येक वाईट गोष्टींचाही इकडे प्रसार होत चालला. आंग्लविद्येनें पूर्ण मंडित झालेल्या लोकांचें लक्ष्य, आपल्या जीवरक्षणाचा मार्ग शोधतां शोधतां, कित्येक वाईट गोष्टींकडे स्वभावतःच गेलें! व इंग्रजी सुरापान हा एक देह रक्षणाचा उपाय आहे, असें त्यांस वाटूं लागलें. व तो राजाश्रितही असल्याकारणानें त्याचा स्वीकार करण्यास त्यांस मुळींच शंका वाटली नाहीं.

सुरापानाचें व्यसन आमच्या देशांत अगदींच नवीन आहे असें जरी नाहीं, तरी त्याची हल्लीं दिसत असलेली वाढ होण्यास हें राज्य कारणीभूत झालें नाहीं असें कोण ह्मणेल? कै. न्या. रानडे ह्यांनीं एके ठिकाणीं असें स्पष्ट ह्मटलें आहे:—" पेशवाईमध्यें दारूचे पिठे काढण्याची लोकांस सक्त मनाई होती; त्यामुळें तिची विक्री उघडरीतीनें कोठेंच होत नव्हती. " हिंदु लोकांच्या धर्मशास्त्रांत सुरापान हें पंचमहापातकांपैकीं एक गणिलें आहे; स्वराज्यामध्यें स्वधर्माच्या कल्पनांचा विशेष जोर असणें स्वाभाविक आहे.

अर्थातच पूर्वीच्या काळीं सुरापान हें अतिनिंद्य कर्म मानलें जाणें व हल्लींच्या काळांत त्याची विशेष चहा होणें साहजिकच आहे. अशा रीतीनें ह्या सुरेनें मध्यंतरीं कांहीं दिवसांची 'सिक् लीव्ह' घेतली होती, परंतु तिला श्वेतद्वीपीचे धन्वंतरी लवकरच भेटल्यामुळें तिची प्रकृति पूर्ववत् ताळ्यावर येऊन ती पूर्वीपेक्षां दुप्पट जोरानें काम करूं लागली. व मंडळीस स्ववश करून घेऊं लागली !

सुशिक्षित लोकांनींहीं सुरेस आपला उदार आश्रय दिल्यापासून तिनें आपल्या धन्वंतरींचा फायदा करून देण्याचा क्रम आरंभिला. ह्या मंडळीस युरोपखंडांतील ग्रेटब्रिटन, फ्रान्स, जर्मनी वगैरे देशांतून पवित्र होऊन आलेल्या मदिरेच्या सेवनाशिवाय काळ लोटेनासा झाला! व अशा रीतीनें ह्या नवीन तऱ्हेच्या सुरापानाच्या पायीं आमच्या देशांतील सुमारें ५४ लक्ष रुपये प्रतिवर्षी परदेशांत जाऊं लागले ! यांचा ओघ सुशिक्षित मंडळीवांचून कोण थांबविणार?

मदिरा हा पदार्थ बहुधा प्रत्येक वनस्पतीच्या बियांपासून व फुलांपासून होतो. हा त्यांचा काढिलेला अर्क होय. औषधी कामाकडे कांहीं बाबतींत हिचा उपयोग होतो, हें खरें आहे; परंतु तसा उपयोग बचनागासारख्या विषाचाही होतो, ह्मणून तें कोणी खाण्याजेवण्यांत आणील काय? त्याज्य वस्तूंचे औषधी गुण ग्रहण करणें हा आपद्धर्म होय. सर्वसामान्य नियम नव्हे. ह्या पदार्थाचें सेवन केल्यास हा आपला अंमल त्या मनुष्यावर लवकरच चालवूं लागतो. व

हळुहळु त्यास कशाचीही शुद्धि रहात नाहींशी होते. युरोपांत हवा अतिशय थंड असल्यामुळें तेथील लोकांस मदिरेसारख्या उष्ण पदार्थाचें सेवन करावें लागतें. ह्या प्रदेशांत तें हितकर होईलच असें नाहीं. वैद्यशास्त्रवेत्ते ह्मणतात कीं, थंड हवेपेक्षां ऊष्ण हवेंतील लोकांवर मदिरेचा परिणाम विशेष होतो. असो. या पदार्थाची निशा चढल्यावर मनुष्य हवेंतसें बडबडूं लागतो. त्याच्या तोंडास विलक्षण प्रकारची घाण येते. हा पदार्थही तमाखुप्रमाणेंच जर वेळेवर न मिळाला, तर व्यसनी मनुष्याची अगदीं त्रेधा उडून जाते.

हल्लीं सर्व लोक धर्म + + होत चालल्यामुळें कोणीही शास्त्रोक्त चालीरीतींचा मान ठेविनातसे झाले आहेत. कित्येक जातिभेदाचें ' खूळ ' मोडूं पहात आहेत, कित्येक भक्ष्याभक्ष्यनिषेध करूं पहात आहेत, कित्येक वर्णपद्धतीला झुगारून देऊं पहात आहेत, प्रत्येकजण आपापल्या परी शक्य तेवढी सुधारणा करीत आहे! अशी घडामोड चालत आहे, इतक्यांत कित्येक वर्णश्रेष्ठ असे लोक सुरास्वारस्य चाखून पहाण्याचें धाडस करित आहेत, ही मोठ्या दुःखाची गोष्ट होय. ही गोष्ट त्यांस कोणत्याहि प्रकारें भूषणावह नसून उलट दूषणावहच आहे.

वास्तविक इतकी सुधारणा करणाऱ्या लोकांना हिची योग्यता जास्त चांगल्या रीतीनें कळावयास पाहिजे होती; परंतु वस्तुस्थिति पाहिली तर अगदींच उलट. बरोबरच

आहे! एवढी सुधारणा करावयाची कशासाठीं? सुरापाननिषेधासाठीं कीं काय? छीः उलट सुरापान उत्तेजनासाठीं! सतत ८।१० वर्षेपर्यंत ५०।७५ इंग्रजी बुकें कोळून प्यालेले असे लोक ह्या व्यसनाच्या नादीं लागलेले असतात! हे आपल्या व्यसनाच्या योगानें आपल्या देशाचें तसेंच आपणास्वतःचें असें दुहेरी नुकसान करितात. वेळेनुसार जवळ पैसा नसला तरी तलफ आली ह्मणजे ती पुरी करण्यासाठीं त्यांस जे त्रासदायक उपाय योजावे लागतात, ते त्यांचे त्यांसच माहित! इतका त्रास सोसून काय मिळवावयाचें, तर भ्रामक व अंतीं दुःखप्रद अशा महासुखांत आपणांस पाडून घेऊन आपली कृतकृत्यता मानून घ्यावयाची! वाः! जणुं काय जगांत कृतकृत्यता मानून घेण्यासारखें कृत्य करण्यास या वांचून दुसरें नाहींच!!

ह्या मादक पदार्थांच्या सेवनापासून काय काय अनर्थ होतात, ते कोणाला माहित नसतात असें नाहीं. ते ते पूर्णपणें जाणत असतांही तलफ आली ह्मणजे स्वतः होऊन त्याच्या आधीन होतात. ह्याच्या योगानें पुष्कळ लोक आपल्या जातकुळीस बट्टा लावून धुळीस मिळालेले आहेत. श्रेष्ठ दर्जाच्या मंडळीनीं ह्या दुष्ट पदार्थाची संगत धरून आपल्या योग्यतेस, ऐश्वर्यास व विद्वत्तेस कलंक लावून घेतलेला आहे; व 'खलाच्या संगानें सुगुण तरि तो लोपत असे' ह्या वचनाची यथार्थता दिसून आलेली आहे. ह्याच व्यसनाच्या योगानें व्यसनी मंडळींचा व त्यांच्या आईबापांचा व

इष्टमित्रांचा अखंड वियोगही झालेला आहे. आणि कित्येक आपल्या सर्वस्वास मुकून स्वतः च्या प्राणांसही आंचवलेले आहेत. एकूण, कोणीही मनुष्य, जो एकदां सुराभक्त बनला, तो समूळ नाशावांचून सुटला नाहीं. ह्या एका मदिरेच्याच योगानें हिंदुस्थानांतील मोठमोठ्या मुसलमानी व हिंदु राष्ट्रांची नासाडी झाली! असे मोठमोठे पुरावे जवळ असतांना सुद्धां ह्या मदिरेचे भजक तिच्या भजनीं जास्त जास्तच लागत आहेत, असें पिशाच्चरूपी कोणतें द्रव्य तिच्या ठायीं आहे, कोण जाणे!

शेवटीं सुशिक्षितांस व अशिक्षितांस एवढेंच सांगणें आहे कीं, त्यांनीं कोणत्याही प्रकारें परदेशी मदिरा विकत घेऊन स्वदेशाचें नुकसान करूं नये, एवढेंच नव्हे, तर सुरापानास अजीच फांटा देऊन चौऱ्यांशी लक्ष योनि फिरून मिळविलेल्या या दुर्लभ नरदेहाला आपल्या फाजील अक्कलहुशारीनें काळमुखीं न पाडूं देण्याची खबरदारी घ्यावी.

---

# शेतकी--भाग १ ला.

( मागील अंकावरून पुढें चालू. )

**४. रुजणें:—** [ GERMINATION. ]

झाडांची उत्पत्ति बियांपासून होते. सृष्टिकर्त्यानें बीं हें त्याच कामाकरितां योजिलेलें असतें. बियांमध्यें त्या त्या झाडांचे गुणधर्म असतात. ह्मणून ज्या तऱ्हेचें झाड पाहिजे,

त्या तऱ्हेचें बीं पेरावें लागतें. एकच तऱ्हेचें खत असलेल्या एका जमिनींत जर निरनिराळ्या तऱ्हेचीं बियें पेरलीं तर त्या त्या बियांचीं झाडें उगवतील. जमीन, हवा व खत हे पदार्थ जरी एक असले तरी त्या त्या बियांस अवश्य लागणारे तेवढे पदार्थ तीं बियें, रुजल्यानंतर शोषून घेतात, व त्यांची वाढ होते. प्रत्येक झाडाचे गुणधर्म अगदीं निरनिराळे असतात. त्यांची आकृति निराळी, पानें निराळीं, पानांचा आकार व रंग निराळा, फुलें निराळीं, त्यांचा वास निराळा, फळें लहान मोठीं, गोड, आंबट, तुरट; एकंदरींत त्यांमध्यें अगदीं जमीन अस्मानाचा फरक असतो व हे सर्व गुणधर्म एवढ्याशा लहान बियांमध्यें सृष्टिकर्त्यानें ठेविले आहेत.

बीं हें रुजण्यासाठीं जमिनींत घालावें लागतें. बीं रुजण्यास चांगली जमीन, पाणी, हवा, व ऊष्णता लागते. बीं रुजल्याचें पहिलें चिन्ह मोड ( Embryo ) येणें हें होय. ह्या मोडामध्यें झाडांचा सर्व जीव असतो. हे मोड खुडून टाकल्यास बीं रुजणार नाहीं. ह्या मोडांत झाडांच्या पोषणास लागणारें अन्न असतें. बीं रुजून त्याला मुळें व पानें फुटेपर्यंत त्या झाडांचें पोषण ह्या मोडांतील रसानें होतें. बीं जमिनींत पेरल्याबरोबर तें जमिनींतील पाण्यानें भिजून मोठें होतें, ह्मणजे तें पाण्यानें फुगतें. नंतर हवा व ऊष्णता लागून त्यास मोड येतो. ह्या मोडांतील रसानें त्यांच्या पोषणास प्रारंभ होऊन त्यांस मुळ्या व पानें

फुटल्यानंतर-झाडांची वाढ झपाट्यानें होऊं लागते. बीं जमिनींत फारच खोल खणून पुरल्यास त्यास हवेचा प्रतिबंध होतो, त्यामुळें त्यास श्वासोच्छ्वास करितां येत नाहीं, व ह्मणून तें मरतें. बीं पेरण्यापूर्वीं जमीन नांगरून भुसभुशीत करावी लागते. असें केल्यानें हवा आंत जाते व बीं रुजण्यास हरकत होत नाहीं. बीं जसें लहान मोठें असेल, त्या मानानें तें कमीजास्त खोलीमध्यें पुरलें पाहिजे. बीं उगवून जमिनीवर येईपर्यंत त्याचें पोषण त्यामधील सत्वानें थोड्याप्रमाणानें जमिनींतील पाण्यावर होतें. बीं उगवून जमिनीवर आल्यावर त्याचें पोषण हवा व जमीन ह्यांवर होतें; ह्मणून जमिनीवर आलेलें झाड मरण्याची भीति नसते. जमिनींतील पेरलेल्या बियांचा कोंब ( Plumule ) वर आल्यास त्यास झाड उगवलें असें ह्मणतात.

४. वाढः—[ Development ]

जमिनीवर कोंब येतांच झाडाची वाढ झपाट्यानें सुरू होते. प्रथम खालीं मुळ्या फुटतात व वर पानें येऊं लागतात. मुळ्या व पानें ह्यांच्या द्वारें झाडांच्या वाढीस अथवा पोषणास लागणारे पदार्थ मिळतात, व झाड जोरावतें. झाडाचें खोड ( Stem ) तयार होतें व त्यास फांद्या ( Twigs ) फुटतात; व शेवटीं त्यास फुलें व फळें येतात. मुळ्यांच्या योगानें झाडांस जड पदार्थ, पाणी व नत्रवायू हे पदार्थ मिळतात; व पानांच्या द्वारें कर्ब तत्वाचा व थोडा बहुत नत्र तत्वाचा पुरवठा होतो, हें मागें सांगितलें आहे.

झाडांस फळें येऊं लागलीं ह्मणजे मुळ्या, खोड, पानें ह्या सर्वांतून पीट, ( Starch ) स्फुर, क्षारज वगैरे त्यांस लागणारे पदार्थ मिळतात ह्मणजे मुळ्या, पानें, खोड वगैरे-तून अत्यंत महत्त्वाचे पोषक पदार्थ हे सर्व फळें उत्पन्न होण्याकडे जातात, ह्मणून झाडांस फळें वगैरे आल्या-वर त्यांत सत्व रहात नाहीं. कित्येक ह्मणजे धान्याचीं झाडें ( Cereal ) हीं वर्षभरच टिकतात. ह्यांस एकदां पीक ( Crop ) आलें ह्मणजे हीं झाडें मरूं लागतात, ह्मणून ह्यांस एक वर्षाचीं ( Annual ) झाडें असें ह्मणतात. फळ-झाडां (Fruit tree ) पैकीं केळ हें झाड एक वर्षाचें होय. बाकीचीं झाडें एक वर्षाहून जास्त ह्मणजे २ वर्षांपासून १००।१५० वर्षांपर्यंतही टिकतात. ह्यांस सततचीं ( Perenial ) झाडें ह्मणतात. फळांस उपयोगीं पडणारें मुख्य पोषक द्रव्य झाडांच्या गाभ्या ( Pith ) मध्यें असतें. ताड, माड, सुपारी वगैरे ज्या झाडांस फांद्या नसतात, त्यांचा गाभा कापून काढल्यास त्यांची वाढ खुंटते व तीं मरून जातात. फांद्या असणाऱ्या झाडांचा गाभा तोडल्यास त्यास पुन्हां पालवी फुटते, परंतु त्या झाडांत मूळचा जोर रहात नाहीं. ज्या झाडांस फांद्या असतात, तीं झाडें बहुधा सततचीं असतात. व ज्यांस फांद्या नसून जीं गवतासारखीं असतात, तीं एक वर्षभर जगणारीं असतात. झाडांची वाढ खत, हवा व पाणी ह्यांवर पुष्कळ अवलंबून असते.

# स्फुट विषय.

हिंदुस्थानांतील व्यापार परदेशी लोकांच्या हातांत गेल्यामुळें आमचें पदोपदीं किती नुकसान होत आहे हें सुशिक्षित वर्गाशिवाय फारच थोड्यांस समजत असेल. देशांत शेंकडा ८० ऐंशी लोक जर केवळ शेतकरी आहेत, ( व शेतकरी लोक किती सुशिक्षित असतात हें पाहिलें, ) तर त्यांतील लोकांस आपल्या व्यापाराचें वास्तविक ज्ञान किती असणार बरें ? त्यांनीं प्रतिदिवशीं सकाळपासून संध्याकाळपर्यंत शेतांत खपून "मेघराजानें जर कृपा केली तर प्रथमत: सरकारची पोतडी भरावी, राहिल्यासाहिल्यांत सावकारास फूल नाहीं फुलाची पाकळी वाहावी," व आपण खुशाल "हरी हरी" ह्मणत बसावें; त्यांस जर पोटभर अन्न मिळत नाहीं तर मग आपल्या कुदळ खोऱ्याचें लोखंड किंवा लंगोटीचें कापड हीं देशांत होतात कीं परदेशांत होतात, ह्याची त्यांस कितपत खातरजमा असणार बरें ? अथवा ज्यांस स्वदेश व परदेश अज्ञानभ्रमानें सारखाच होऊन राहिला, त्यांच्या हातून असें प्रमाद होणें साहजिकच आहे.

* * * *

परंतु राष्ट्रास आधारभूत व जनसमूहास नायक होणाऱ्या सुशिक्षितांकडे पाहिलें तर कांहींच समाधान होत नाहीं. उलटपक्षीं अशिक्षितांच्या हातून न होणारे प्रमाद

ह्यांच्या हातून प्रत्यहीं होत असतात. त्यांस लागणारे कोट, पाटलूण, धोत्रें वगैरेंचें कापड परदेशी! सिगार, सिगारेट्स पेटविण्यास लागणाऱ्या आगपेट्या परदेशी! छऱ्या परदेशी! बूट, स्टॉकिन्स परदेशी! तमाखु वगैरे हौशीचे पदार्थ परदेशी! सर्वच परदेशी! ह्या सर्व सुशिक्षितांस आपला देश कोणता, हें समजतें; त्याची सांप्रत कशी स्थिती आहे, हें समजतें व ती सुधारण्यास कोणते मार्ग आहेत, हेंही समजतें; परंतु त्यांचें वर्तन पाहिल्यास मात्र अगदींच उलट. ही मोठी लांछनाची गोष्ट आहे.

* * * *

ही स्थिती घालविण्यास देशांतील शेतकी व व्यापार हीं सुधारलीं पाहिजेत. जर देशांत शेंकडा ८० लोक शेतकीवर उदरनिर्वाह करितात, (वास्तविक पाहिलें तर तीवर बाकीच्या विसांचें पोट भरून आपण त्यांच्या तोंडाकडे पाहातात, ) तर देशांतील शेतकी वाईट असें कोण ह्मणेल बरें? परंतु हा केवळ भ्रम आहे. खानदेश, वऱ्हाड, नागपूर अथवा धारवाड, बेळगांव इकडे जे कोणी वैशाख अगर जेष्ठ महिन्यांत हिंडून येतील, त्यांस हा सर्व भ्रमाचा भोंपळा आहे हें कळेल. ह्या महिन्यांत जेव्हां सूर्याचें प्रखर तेज अंगास झोंबूं लागतें, डोळ्यांस लावण्यास जलबिंदूही मिळत नाहींसा होतो व त्यांतच जठराग्नि तप्त होऊन पोटांत जेव्हां कावळे कोकलूं लागतात त्या वेळीं त्या बिचाऱ्यांनीं ह्या विसांच्या तोंडाकडे पाहूं नये काय? व अशा

वेळीं त्यांच्या गरजा भागविणें हें ह्या विसांचें—अर्थातच त्यांच्या जिवावर चैन मारणारांचें—आदिकर्तव्य नाहीं काय? पण सर्वच अनर्थ! त्या विसांचें लक्ष्य भलतीकडेच असतें. मग नाइलाज होऊन ते बिचारे राली ब्रदर्स सारख्यांच्या पायां पडतात व ते देतील तो पैसा बयाण्यादाखल घेऊन त्यांस पुढील उत्पन्नाचें करारपत्र लिहून देतात. त्यांत त्यांच्याकडे काय दोष बरें? अशा गोष्टींकडे आह्मी लक्ष्य देण्यास नको काय?

* * * *

परंतु अशावेळीं हे वीस काय करित असतात बरें? कोणी उन्हाळा होतो ह्मणून कोल्ड्रिंक्स् घेतात; कोणी माथेरान महाबळेश्वरीं जातात; तशीही सवड नसल्यास कोणी सांजसकाळ हवा खाण्यास जातात; ( हवा खाऊन राहण्याचीही पाळी कदाचित् हिंदुस्थानास येईल; ) कोणी म्यांचेस्टरी मलमल वापरतात; कोणी गारेचे चष्मे लावतात; आणि अशा रीतीनें आपल्या देशास नागवितात. बहुतेकांस आपलें ह्मणजे अर्थातच आपल्या देशाचें हित कशांत आहे हें समजत नाहीं असें नाहीं. परंतु स्वदेशी वस्तु असली ह्मणजे ती वाईट असणारच अशा भ्रामक कल्पनेनें ते देशी वस्तूंकडे मुळीं पाहातच नाहींत. अशा लोकांपेक्षां खरोखर अशिक्षित लोकच चांगले. कारण, त्यांस समजावून सांगितल्यास ते सहसा देशाचें नुकसान होईल असें कृत्य करणार नाहींत; परंतु " अगाध जल संचारी नो गर्वं याति रोहितः।

अंगुष्ठोदक मात्रेण शफरी फर्फरायते ॥ " ह्या प्रमाणें त्यांचें अर्धवट शहाणपण त्यांचें त्यांस व त्यांच्या देशास घातुक होतें.

* * * * *

वरच्या सारख्या घोरतर प्रसंगीं भुकेनें व्याकूळ होऊन पटापट प्राण सोडणाऱ्या बिचाऱ्या गरीब लोकांस जर आह्मी ( सर्व हिंदुस्थानवासीयांनीं ) फंड गोळा करून कांहीं मदत केली, तर जें धान्य आज दिसण्यास मात्र मुबलक आहे तें परदेशीं न जातां देशांतच राहून त्याचा येथें योग्य उपयोग करितां येणार नाहीं काय ? अशा गोष्टींचीं जबाबदारी देशांतील पुढारी लोकांवर येत नाहीं काय ? तसेंच देशांत सुरू असणाऱ्या कारखान्यांस उत्तेजन देऊन गोरगरीबांची भाकरी अखंड चालविणें हें प्रत्येकाचें काम नाहीं काय ? व येवढ्याकरितां देशीच माल, मग तो बरा असो वा वाईट असो, वापरावयाचा असा बाणा बाळगणारे नरवीर आज आमच्यांत निघतील काय ? व अशा रीतीनें " कृतांत-कटकामल-ध्वज-जरा दिसों लागली " असतां " मी माझ्या देशाची थोडी बहुत तरी सेवा केली आहे " ( I have done something for my country ) असें समाधानसुख अनुभविणारे लोक आह्मांत आज किती असतील बरें ? हे प्रश्न आह्मी आमच्या सुज्ञ वाचकांस घालून तूर्त लेखणीस विश्रांति देतों.

* * * * *

( पहिल्या ५ व्या पानावरून पुढें चालू )

झाली नाहीं, तरी पण लवकर होईल अशी आशा आहे. येथें मासिक पुस्तकास २ वर्गणीदार मिळाले. रा. शंकर प्रभाकर जोशी हे एक उत्कट देशभक्त दिसले. यांनीं छोट्या पुस्तकाच्या ५० प्रती वाटण्याचें कबूल केलें. येथील एका गृहस्थांनीं मला धुळ्यापर्यंतचा खर्च दिला. एकाला हा दंड काय ह्मणून ? ता. ९ रोजीं मी धुळें येथें आलों. शिरपूरच्या एका गृहस्थानीं मला एक पत्र दिलें होतें, यामुळें उतरण्याची पंचाईत पडली नाहीं. रा. देव वकील यांनीं माझी चांगली व्यवस्था ठेविली. येथील प्रमुख लोकांच्या संमतीनें दुसरे दिवशीं व्याख्यान ठरलें. सर्व लोकांस जाहीर होण्यासाठीं मी हस्तपत्रिका प्रसिद्ध केल्या. त्याचा खर्च येथील सत्कार्योत्तेजक सभेनें दिला. ५ वाजतां सभा ठरली असतां ६ वाजेपर्यंत अध्यक्ष न आल्यामुळें पुष्कळ लोकांस विनाकारण खोळंबून राहावें लागलें. शेवटीं अध्यक्ष आले नाहींतच ! मंडळी मात्र पुष्कळ जमली होती. विद्वान् व थोर गृहस्थ पुष्कळ होते. यामुळें सभेस विशेष शोभा आली होती. एक तास भाषण झाल्यावर रावब० आपटे ए० इंजीनियर यांनीं स्पष्ट सांगितलें कीं, आह्मी एल्. सी. इ. होऊन इंजीनियर झालों, परंतु आमच्या मुलांस असि० इंजि०च्या जागा मिळतील कीं नाहींत याचा संशय आहे. दिवसेंदिवस नौकऱ्या दुर्मिळ होत चालल्या आहेत; यासाठीं रा. काळे यांनीं सुचविलेल्या मार्गानें जाणें हेंच योग्य आहे. पैसा ही किती हल-

की वस्तू आहे. परंतु एकत्र केल्यावर त्यांत किती प्रचंड शक्ति येते बरें? पैसा फंडाची कल्पना सर्वमान्य झाली, तरी त्यापासून रा. काळे यांस काय लाभ आहे? ते निरिच्छ बुद्धीनें ही खटपट करीत आहेत. त्यांस मी २।३ वर्षे ओळखतों. ते बोलल्या प्रमाणें वागणारे आहेत. या प्रमाणें रावब०चें भाषण झाल्यावर अध्यक्ष साहेबांनीं पुष्टि दिली. तेव्हां सर्वांस कल्पना पसंत पडली. नंतर कमेटी स्थापण्याच्या उद्देशानें दुसरे दिवशीं रावसाहेब माधवराव नारायण गद्रे माजी सरकारी वकील, यांच्या अध्यक्षतेखालीं सभा भरून कमेटी नेमण्यांत आली. जागच्या जागीं १५ रुपये वार्षिक वर्गणीचे जमले. मा० पु० ला १६ वर्गणीदार मिळाले. सेंट्रल कमेटी होईपर्यंत पैसे येथेंच ठेवण्याचें ठरलें. वजनदार लोकांनीं स्वयंसेवक होण्याचें ठरविल्यामुळें येथें बडोद्या प्रमाणें या फंडाला बरेंच रूप येईल असें दिसतें. बहुतेकांनीं वार्षिक १ रुपया व शिवाय मा०पु० घेण्याचें कबूल केलें आहे. "सेक्रेटरी पैसा फंड कमेटी" यांनीं मा० पु० चे एजंट होण्याचें कबूल केलें आहे. येथील सत्कार्योत्तेजक सभेनें मा० पु० घेऊन २ रुपये पैसा फंडास देण्याचें ठरविलें आहे शिवाय "जपानची मर्दुमकी" हें १२ आण्यांचें पुस्तक या मा. पु. च्या वर्गणीदारांस ८ आ० व यापैकीं २ आणे पैसाफंडास देण्याचें कबूल केलें आहे! येथील एका गृहस्थानीं प्र. खर्चासाठीं ५ रुपये दिले. दुसऱ्या एकानें मला नागपुरी रुइफुली कांठी उपरणें दिलें। थोड-

क्यांत सांगावयाचें ह्मणजे सर्वांच्या अंतःकरणांत दयाघन परमेश्वरानें मजविषयीं प्रेम उत्पन्न केलें. परमेश्वरी लीला विचित्र आहे हेंच खरें ! येथील चाकू कातऱ्यांचा कारखाना पहावयास गेलों होतों. याचे मालक रा. मनोहर हे स्वतः इंजीनियर असून श्रीमंत आहेत. यांच्या कारखान्यांत एका इंजीनवर कापूस दाबणें, गहूं दळणें, व चाकू करणें अशीं तीन कामें चालतात. यांनीं देशहिताकडे नजर देऊन चाकूची किंमत बरीच कमी केली, तरी चालण्यासारखें आहे. परंतु त्यांच्यामध्यें उत्कट देशाभिमान नसल्यास त्यांनीं तरी काय करावें ? येथील कमेटीनें छोट्या पुस्तकाच्या २०० प्रती वाटण्याचें ठरविलें आहे. येथील सत्कार्योत्तेजक सभेच्या चिटणिसांनीं मुद्दाम स्टेशनवर पोचविण्यास येऊन जळगांवचें टिकीट काढून दिलें. या प्रेमाला काय ह्मणावें ? ता. १२ रोजीं रात्रीं ९ वाजतां जळगांव येथें पोंचलों. दुसरे दिवशीं कोर्टांत जाऊन वकील लोकांची भेट घेऊन हस्तपत्रकें छापण्याची व्यवस्था करविली. ता. १४ रोजीं लायब्ररीमध्यें डॉ. रेघे एल. एम्. एस. असि. सर्जन यांच्या अध्यक्षतेखालीं सभा भरून व्याख्यान झालें. कल्पना पसंत पडली. सेंट्रल कमेटी होईपर्यंत जमतील ते पैसे गावांतच आबासाहेब ह्माळस वकील यांच्या येथें ठेवण्याचें ठरलें. जागच्याजागीं १५ रुपये जमले. मा. पु. ला १० वर्गणीदार मिळाले. येथील मंडळींनीं छोट्या पुस्तकाच्या २०० प्रती विकत घेण्याचें ठरविलें आहे. रा. रा. आबा

साहेब व रा. रामभाऊ चौघुले वकील यांनीं सभा भरविण्याचें कामीं फार तसदी घेतली. येथून मी भुसावळ येथें जाण्याचा बेत केला. रा. रा. रामचंद्र विनायक चौघुले वकील यांनीं मलकापूरचें तिकीट काढून दिलें. एका व्यक्तीवर हा भार कां पडावा हें मला कळत नाहीं. ता. १५ रोजीं मलकापूर येथें येऊन दादासाहेब पिंपळीकर वकील यांच्या घरीं उतरलों. जळगांवचे फडके वकील यांनीं पत्र दिलें होतें, यामुळें त्रास पडला नाहीं. सकाळीं प्रमुख लोकांच्या भेटी घेतल्या. दुसरे दिवशीं सभा भरविण्याचें ठरलें. रविवार ता. १७ रोजीं थिएटरमध्यें रा. जोगदंड बी. ए. यांच्या अध्यक्षतेखालीं सभा भरून माझें भाषण झालें. नंतर कांहीं गृहस्थांनीं भाषण केलें. ५०० रुपयांस १२० रुपये कमी आहेत, ते मिळाले ह्मणजे वजनदार लोकांची कमेटी स्थापन होणार आहे. हे माझे शब्द ऐकून येथील मंडळीनीं तावडतोब १५० रुपये देण्याचें कबूल केलें. हें काम अर्धवट राहिलें होतें, तें पुरें करण्यासाठीं दुसरे दिवशीं सभा भरविण्यांत आली. रा. दामोदरपंत रानडे वकील हे अध्यक्ष होते. आज रोजीं पुष्कळ मंडळी होती. व्याख्यान झाल्यावर रा. रा. विष्णुसा बाळकृष्णसा सावजी यांनीं स्वतः १५० रुपये देण्याचें कबूल केलें. हें ऐकून सर्व थिएटर टाळ्यांनीं दणाणून गेलें. नंतर वार्षिक फंड व कायम फंडाचे आंकडे घेण्यांत आले. पुष्कळांनीं यथाशक्त्या आंकडे घातले. कित्येकांनीं तेथच्या तेथें रोख देऊन टाकले. मा० पु० ला १५ वर्गणीदार झाले. अद्यापि बरेच

होणार आहेत. रा. रा. दादासाहेब पिंपळीकर वकील यांनीं यवतमाळपर्यंतच्या खर्चासाठीं ४ रुपये दिले. रा. रा. दामोदरपंत अत्रे यांनीं उपरण्यांची जोडी दिली. आज रोजीं मी यवतमाळ येथें जात आहें.

मलकापूर, वऱ्हाड. १९।१।०४. अं० दा० काळे.

---

पोस्ट खात्यानें शेवटीं सहा महिन्यांनीं आमचें मासिक पुस्तक रजिस्टर केलें. याबद्दल वर्गणीदारांचे तर्फे आह्मी पोस्ट खात्याचे आभार मानितों.

**साभार पोंच**:—मलकापूर येथील मंडळी, ५॥ रु; रा. रा. वि. चौघुले जळगांव, २॥ रु; व रा. वि. प. भागवत, धुळें, १ रु. असे ९ रु. कुटुंबाचे मदतीकरितां आले ते पोंचले. त्यांचे अत्यंत आभारी आहों.

---

## मुंबईच्या वर्गणीदारांस सूचना.

येथें प्लेग थोडथोडा वाढूं लागला आहे. तरी वर्गणीदारांनीं आपले पत्ते बदलल्यास ते आह्मांस बिनचूक कळवावे.

**सूचना**—वर्गणींची पोंच पुढील खेपेस येईल.

---

**स्व**देशी मेथाल—भारतवर्षीय वस्तू विषयीं कळकळ बाळगणाऱ्या प्रत्येक देशबांधवानें हें एकदां तरी वापरून पहावें. किंमत ०४ व्यापाऱ्यांस भरपूर कमिशन. गांवोगांव एजंट पाहिनेत.

पत्ता—धि आर्यन् इंडस्ट्रियल कंपनी—गिरगांव, मुंबई.

**पा**हिजेत:—अनुभवांतीं पुष्कळ लोकांच्या पसंतीस उतरलेलें **रानडे** यांचें सुवासिक **कापशीचें** तेल विकणारे एजंट पाहिजेत. किंमत ४ आणे. कमिशन भरपूर.

पत्ता:—**महाजन आणि मंडळी** सोलएजंट, गिरगांव मुंबई.

वर्षाची वर्गणी ८ आणे. ट. ख. ३ आणे.
एका नांवावर ६ प्रती गेल्यास ट० खर्च माफ. फुट० अं० १ आणा.

# "पैसा फंड"

## मासिकपुस्तक.

वर्ष १ लें. ] मार्च १९०४. [ अंक ९ वा.

### विषयानुक्रमणिका.

विषय. पान.

आमचे देशबंधु आणि त्यांचीं आधुनिक राजमान्य व्यसनें ............... १०७

शेतकी................................११४

स्फुट विषय .............................. ११६

मुख्य एजंट-पुरंदरे आणि कंपनी-माधवबाग मुंबई.

हें पुस्तक अंताजी दामोदर काळे यांनीं मुंबईंत विजय छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

केतकी पंचांग-किं. १ आणा मुंबईंत विजय छापखान्यांत मिळेल.

# माझा प्रवास.

ता. १७ व १८ रोजीं मलकापूर येथें जीं व्याख्यानें झालीं, त्यांचा तेथील लोकांवर बराच परिणाम झाला, असें ह्मणण्यास हरकत नाहीं. कित्येकांनीं १५ रुपये दरमहा पगारी मनुष्य नेमण्याची उत्सुकता दाखविली. राजापूरकर सं. कंपनीचे मालक मि. राणे यांनीं खामगांव येथें पैसा फंडास एक खेळ देण्याचें कबूल केलें. दादासाहेब पिंपळी-कर यांचे कृपेनें यवतमाळ दृष्टीस पडलें! यांच्या कृपेनें ह्मणण्याचें कारण असें कीं, हा गांव रेलवेपासून फार लांब आहे. नांदूरा, खामगांव, आकोला वगैरे गांव फिरत फिरत आलों असतों, तर उन्हाळ्याच्या भीतीनें व खर्चाच्या त्रासानें या खेपेस तरी खात्रीनें दृष्टीस पडला नसता. असो; मलकापूर येथील गुड्स क्लार्कनें ( नांव विसरलों! ) वर्धा, नागपूर इकडे जरूर जा, अशी शिफारस केली, व नको ह्मणत असतां प्रवास खर्चासाठीं १ रु. खिशांत घातला! धामणगांव स्टेशन पासून यवतमाळ २९ मैल लांब आहे. माणशीं १॥ रुपया गाडीभाडें पडतें. मि. राड्रिक यांनीं मजपासून १ रुपया घेतला परधर्मीयांस सुद्धां माझी दया आली!! येथील रा. रा. रामचंद्र रघुनाथ बापट वकील, यांची माझी कोंकणांतील ओळख होतीच यामुळें उतर-ण्याची अडचण पडली नाहीं. गुदस्त सालीं त्यांच्या गांवीं भरलेल्या सभेचे हे अध्यक्ष होते, यामुळें माझे सर्व विचार

त्यांस कळले होते. त्यावेळीं त्यांनीं मला प्रवास खर्चासाठीं २ रुपये दिले होते. पुढें कांहीं दिवसांनीं त्यांनीं रा. मोरोपंत मराठे राहाणार राई जि० ठाणें यांच्या पत्रावरून ताब- डतोब माझ्या घरीं परभारें १० रुपये पाठविले होते! आज जिकडे तिकडे पैशाशिवायच्या गप्पा मारणारे पुष्कळ आहेत. पेटीला किल्ली लावण्याची वेळ आली ह्मणजे तीन कोस मागें! अशा स्थितींत अनोळखी म- नुष्याच्या शिफारशीवरून उदार मनानें मदत करणारे विरळा! असो, ता० २४ रोजीं हरासास आलेल्या लो- कांसाठीं रा. रा. भाऊसाहेब मुंडले वकील बी. ए. एल एल. बी. यांच्या अध्यक्षतेखालीं माझें पहिलें व्याख्यान झालें. यवतमाळ येथील लोकांसाठीं निराळें व्याख्यान ठरलें. कारण, स्वदेशासंबंधीं विचार अहोरात्र ज्यांचे डो- ळ्यांसमोर आहेत, ते प्रो. द्रवीड एम. ए. हे मुंबईस गेले होते. त्यांच्या येण्यावर सभा राहिली. ता. ३० रोजीं त्यांच्या अध्यक्षतेखालीं माझें दुसरें व्याख्यान झालें. अध्यक्ष साहेब पूर्वी महाराष्ट्र कालेजांत प्रोफेसर होते व हल्लीं रा. रा. बाबूसाहेब द्रवीड यांच्या गिरणींत म्यानेजर आहेत. बाबुसाहेब हे प्रोफे० साहेबांचे श्वशूर असून विल- क्षण डोक्याचे गृहस्थ आहेत. त्यांनीं ५।६ वर्षांत कार- खांना इतका वाढविला कीं, पूर्वीची स्थिति पाहणारे हल्लीं तोंडांत बोटें घालीत आहेत! त्यांनीं हिंदु एज्यू० फंडास १० हजार रुपयांची देणगी दिली! स्वकष्टार्जित द्र-

त्याचा अशा रीतीनें सद्व्यय करणारा हरीचा लाल ब्राह्मण मंडळींत तरी विरळा, यांत शंका नाहीं. या विलक्षण औदार्या बद्दल मी बाबूसाहेबांचें अभिनंदन करतों, व दयाघन परमेश्वराची करुणा भाकतों कीं, असल्या नररत्नास उदंड आयुष्य दे व त्यांच्या मुलांबाळांस सुखी ठेव.

ता. ३० शनिवारीं ६ वाजतां माझें भाषण सुरू झालें. मंडळी पुष्कळ व विद्वान् होती, यामुळें मी मोठ्या उमेदीनें दोन तास बोललों. माझ्या मागून एक दोघांनीं भाषण केलें. शेवटीं अध्यक्षांनीं आपल्या रसाळ वाणीनें चटकदार भाषण करून श्रोत्यांच्या अंतःकरणास पान्हा आणिला! इतकें होतें तों वेळ बराच झाला. नाटकाची वेळ झाली. कित्येक तर हें नाटकच चाललें आहे, असें समजून आंत आले व निराश होऊन बाहेर गेले! कमेटी स्थापण्याच्या व आंकडे घेण्याच्या उद्देशानें दुसरे दिवशीं ४ वाजतां पुनः सभा भरली. वजनदार लोकांची जिल्हा कमेटी स्थापन झाली. जागच्या जागीं वार्षिक ७० रुपयांचे आंकडे पडले. कायम फंडाचे आंकडे असते, तर पुष्कळ फंड जमला असता! मा. पुस्तकाला ६० वर्गणीदार एक घटकेंत मिळाले! मागाहून १५ मिळाले. ४० जणांनीं आपली वर्गणी सुद्धां दिली! रा. भाऊसाहेब बापट व भाऊसाहेब मुंडले प्रभृति सुशिक्षित मंडळींनीं देशकार्य समजून वार्षिक ५।१० असे आंकडे घातले, तर त्या

बद्दल मला आश्चर्य वाटत नाहीं. परंतु शेट हरदेव सुकदेव मारवाडी व शेट सौभागलाल माणेकचंद यांनीं प्रत्येकीं वार्षिक १० व ५ रुपये देण्याचें ठरविलें, हें पाहून अति आनंद होतो. मारवाडी कवडीचुंबक, धनलोभी, अशी बहुतेकांची समजूत असते. पण या शेटजीनीं त्यास हरताळ लाविला! आपल्या जातभाईस योग्य वळण घालून दिल्याबद्दल मी अंतःकरणपूर्वक शेटजींचे आभार मानतों. परमेश्वर करो व असे पुष्कळ शेट मारवाडी लोकांत निघोत! .

येथील लहान थोरांच्या मनावर झालेला परिणाम पाहून स्व० हि० चिंतक नाटक मंडळीनें बुधवारच्या खेळाचें ½ उत्पन्न पैसा फंडास देण्याचें जाहीर केलें! सोमवारच्या **हरि किशोर** पत्रांत व्याख्यानाचें सार प्रसिद्ध झाल्यावर लहान मोठ्यांच्या तोंडीं पैसा फंड बसला! बापूसाहेब द्रवीड, भाऊसाहेब बापट, शेट हरदेव सुकदेव प्रभृति मंडळीच्या खटपटीनें व स्वदेशभक्त स्वयंसेवकांच्या श्रमानें पुष्कळ मंडळी नाटकास आली. यामुळें पैसा फंडास १५० रुपये मिळाले. अर्धे नाटक झाल्यावर गांवकऱ्यांचे व कंपनीचे आभार मानण्याचे हेतूनें मी चार शब्द बोललों. 'हा खेळ कंपनीनें दिला, यामुळें अनायासें पैसा फंडास बरीच मदत झाली याबद्दल मी कंपनीचे उपकार मानतों. हल्लीं तसेंच हा खेळ येथें तीनदां झाला असून ब्राम्हणांच्या विषयास सहन करूनही आपण येथें आलां, यावरून

पैसा फंडा विषयींची उत्कट इच्छा स्पष्ट दिसून आली. याबद्दल पैसा फंडाचा पुरस्कर्ता या नात्यानें मी तुह्मा गांवकऱ्यांचे आभार मानतों, व जातां जातां अशी सूचना करतों कीं, येथें जी कंपनी येईल तिच्याशीं पैसा फंडाला मदत केल्याखेरीज आह्मी तुह्मांस मदत करीत नाहीं असा एकमतानें ठराव केला तर तुह्मांस दरवर्षास २।३ शें रुपये सहज मिळतील. त्यांतून एखादा चांगला उपदेशक ठेविल्यास १२ महिने चळवळ चालून पैसा फंडाची चळवळ किती तरी जोरानें पसरेल, व याचें श्रेय तुह्मांस येईल.' ही सूचना पुष्कळांस मानवली असें दिसलें. यवतमाळ येथील कमेटी दरमहा १५ रुपये पगार देऊन मनुष्य ठेवण्यास तयार आहे! स्वदेश हि. चिं. मंडळी १५।२० रुपये पगार देऊन एक मनुष्य नेमण्यास तयार आहे. असें चांगल्या आधारावरून मला माहीत आहे. आतां माणसांचीच कमतरता आहे! भोजन भाऊंची समृद्धि आहे!! असो, येथील काम आटपून मी दारव्हा येथें गेलों. रा. गोंधळेकर प्रभृति मंडळीच्या खटपटीनें लायब्ररींत सभा भरून व्याख्यान झालें. आयत्यावेळीं व अवेळीं (सकाळीं) सभा भरविली, यामुळें ह्मणण्यासारखें काम झालें नाहीं, परंतु तेथील स्वदेशभक्तांच्या खटपटीनें बीं रुजेल यांत शंका नाहीं. संध्याकाळीं मंडळीनें मुद्दाम ठेवून घेऊन मला पान-सुपारी केली! मला हा प्रकार पाहून फार आश्चर्य वाटलें! बापट वगैरेंस अशा पानसुपाऱ्या होऊं लागल्या, तर त्यांची कार्य समज

(पुढें चालू.)

# पैसा फंड

## मासिक पुस्तक.

वर्ष १ लें.] मार्च, सन १९०४. [अंक ९ वा.

# आमचे देशबंधू आणि त्यांचीं आधुनिक राजमान्य व्यसनें.

## ३. चहापान.

सांप्रतच्या काळीं जीवन संरक्षणाचा एक मार्ग होऊं पाहणाऱ्या चहापानाचा प्रकृत अंकांत विचार करावयाचा आहे. लहानांपासून थोरांपर्यंत, 'गरिबांपासून श्रीमंतां-पर्यंत व अगदीं कनिष्ठ वर्णापासून तों अतिश्रेष्ठ वर्णापर्यंत बहुतेक सर्व लोक चहाचे भोक्ते असतांना व अशा री-तीनें हा 'महाजनो येन गतः स पन्थः' असतांना आह्मी त्यास व्यसनांच्या मालिकेंत कसा गुंफिला, ह्याबद्दल आमचे कित्येक वाचक आश्चर्य करतील. परंतु पूर्ण वि-चाराअंतीं 'चहापान हें आपणांस जडलेलें एक व्यसनच आहे' असें त्यांस कबूल करावें लागेल. हें व्यसन हल्लीं फार बोकाळलें आहे, यासाठीं ह्या खेपेस ह्या विषयास हातीं धरिलें आहे.

**चीन** देश हें चहाचें आदिस्थान होय. तेथून याचें प्रयाण इंग्लंडांत व इतर ठिकाणीं झालें. आणि तेथून त्याची प्रसिद्धि इंग्लिश कृपाछत्राखालीं खालीं असलेल्या प्रत्येक देशांत व पर्यायानें इतर सर्वत्र झाली. पूर्वी खुद्द इंग्लंडांतच चहापानाविषयींची माहिती जी उकळलेलें पाणी टाकून शिल्लक राहिलेला पाला खाण्याइतकी होती, ती आतां जाऊन सर्व ठिकाणच्या आबालवृद्धांस त्याची खरीखुरी माहिती झालेली आहे; व कित्येकांस तर त्याची इतकी चटक लागून राहिली आहे कीं, दिवसांतून जास्त नाहीं तरी ३।४ वेळ चहापान केल्याशिवाय दिवस सुना जात नाहींसा झाला आहे! ह्याशिवाय ह्या प्रमाणाच्या दुप्पट तिप्पट मजला मारणारांचा वर्ग तो निराळाच ! ! **चीन** देश आमच्या इतका सन्निध असतां त्याचा संपर्क चहाच्या बाबतींत आह्मांस मुळींसुद्धां न लागतां तो एकदम परक्या खंडांतील लोकांस लागला व तेथून त्याचें परावर्तन होऊन त्याचें प्रतिबिंब ५००० मैलांवरून थेट हिंदुस्थानावर अचुक पडलें, हें अतर्क्य गौडबंगाल आहे, ह्यांत संशय नाहीं.

'बापसे बेटा सवाई' या न्यायाप्रमाणें हल्लीं **चिनामध्यें** चहाची लागवड होत नसेल इतकी लागवड इंग्रजी राज्यांत होत आहे व इंग्लंडांत चहा पिणाऱ्यांची वाढ होत नसेल इतकी वाढ ह्या हिंदुस्थानांत होत असलेली दिसत आहे! जी मंडळी प्रात:कालचे सर्व विधी छपरावर ठेवून आंथरुणांतून

उठली नाहीं तोंच डोळे चोळीत चोळीत प्रतिदिनीं वाण्याच्या दुकानीं जाऊन 'अर्धीचा चहा, दुगाणीची साखर' या द्वादशाक्षरी मंत्राचा जप करूं लागते, त्या मंडळीचें प्रमाण इतर कोणत्याहि देशांतील मंडळीपेक्षां जास्त कां असूं नये? हा प्रकार कनिष्ठ जातींतील लोकांचा झाला. मध्यम जातीचे लोक इतका द्राविडी प्राणायाम न करितां तडक एखाद्या 'हिंदु उपाहार गृह,' 'हिंदु विश्रांति गृह,' 'हिंदु क्षुधा शान्ति गृह,' 'आर्य विश्रामालय' ह्या सारख्या किंवा यांचाच पाठभेद असणाऱ्या दुसऱ्या आलयांत जाऊन 'एक 'कप' चहा' ह्या षडाक्षरी सूत्राचा उच्चार करितात. हा प्रकार मुंबईसारख्या मोठमोठ्या शहरांतून नजरेस पडतो. ह्यांच्याहिपेक्षां श्रेष्ठ दर्जाची मंडळी घरीं बसूनच 'चहा झाला का ?' ह्या पंचाक्षरी मंत्राचीं एकसारखीं आवर्तनें करीत असतात, तेव्हां कोठें अल्पदुग्धमिश्रित चहाचें पाणी पुढें येतें! इतके भोक्ते ज्या देशांत आहेत, तो देश खरोखरच.......... !

शिवाय ह्या चहापानामुळेंच आमचा धार्मिक बाबतींत बराच तोटा झालेला दिसत आहे. चहापानाचें बंड प्रत्येक जातींत असल्याकारणानें व त्यास फारसा खर्चही लागत नसल्याकारणानें कोणत्याही जातीच्या मनुष्यास दुसऱ्या जातींतील मनुष्यास मेजवान्या ( पार्ट्या ) देतां येतात. त्यांत मुख्यत्वेंकरून चहाचाच बडिवार असतो. आणि ह्यावरून त्यांस 'टी पार्ट्या' असें विशिष्ट इंग्रजी नामा-

भिधान प्राप्त झालें आहे. हा प्रकार बहुधा सर्वत्र दृष्टीस पडतो. मुंबईसारख्या शहरांतून इराण्याच्या 'हाटेलां'त जाऊन त्यांच्या हातचाही चहा पिण्यास हल्लीं कोणास दिक्कत वाटेनाशी झाली आहे! चांगले चांगले विद्वान् व साक्षर लोकही ह्याच पंथाचे अनुयायी झालेले आहेत. त्याचप्रमाणें उच्च वर्णांतील लोकांनींही धरबंध ठेविलेला दिसत नाहीं! खरोखरच ही दुःस्थिति होय!! राष्ट्रोन्नतीच्या मुळाशीं धर्मोन्नति आहे, हें मुख्य तत्व कोणींही विसरतां कामा नये. तरी राष्ट्राच्या उन्नतीसाठीं धडपड करणाऱ्या अर्धवट लोकांनीं वरील तत्व आपल्या मनांत पक्कें ठसवून घेऊन नंतर त्यांनीं वरील स्तुत्य कामास हात घालावा.

असो. शरीर पोषणाच्या बाजूनें पाहिलें तरी चहापानाच्या योगेंकरून कोणास पुष्टि आलेली आहे, कोणी सशक्त झाला आहे किंवा कोणास आरोग्य प्राप्त झालें आहे, असें कोणीं पाहिलेंही नाहीं, किंवा कोणीं ऐकिलेंही नाहीं! उलट चहापानातिशयानें कांहीं लोक जन्माचे तद्व्यसनी, कोणी अशक्त, फार तर काय कोणी उदररोगी, कोणी मूत्ररोगी व कित्येक निपुत्रिकही बनलेले आहेत!! चहाचें अतिसेवन कोणत्याही तऱ्हेनें फायदेशीर नसून उलट हानिकारकच आहे, हें वरील चहाभोक्तेमंडळापैकीं कोणीही कबूल करील. परंतु समोर चहा दिसला किंवा इतर व्यसनांप्रमाणें चहाची तलफ आली ह्मणजे 'कोणाला धीर

निघणार ? मग पुराणांतलीं वांगीं पुराणांत ! तरी ह्या त्यांच्या हातून समजून उमजून (!) होत असलेल्या गोष्टीकडे त्यांनीं जास्त लक्ष्य पुरवून तीस आळा घातला पाहिजे. हल्लीं आमची मंडळी जितका चहा पिते, तितकेंच पूर्वींच्या काळचे लोक सत्वगुणविशिष्ट दूध पीत असल्याकारणानें त्या वेळच्या मनुष्यांच्या अंगांत एक प्रकारचा जोम, हिंमत, ताकद व मर्दानीपणा असे ! परंतु तो काळ आतां अगदीं गेला ! आमची मंडळी टिकाऊपणाकडे न पाहतां दिखाऊपणीकडे पहात आहे, त्यास दुसऱ्यांचा काय इलाज ? त्यांचे डोळे आपोआप उघडतील तो सुदिन !

आजपर्यंत आमच्या सुखासाठीं इंग्रजांनीं ह्या देशांत ज्या अनेक सुधारणा केल्या, त्या दोघांच्याही फायद्यासाठीं केलेल्या आहेत. फरक इतकाच कीं, आमचा फायदा फक्त वरवर दिसणारा असून त्यांचा फायदा अगदीं खराखरा आहे. त्यांनीं जरी व्यसनें ह्या प्रदेशांत आणून सोडिलीं, तरी त्यांची उत्पत्ति इंग्लंडची, त्यामुळें होणारें उत्पन्नहि इंग्लंडचें आणि त्या व्यसनांस लागणाऱ्या उपकरणादि वस्तूही विलायतीच ! ह्या चहाचा इकडे फैलाव झाल्याबरोबर कप, बशा, तीं ठेवावयास लागणारीं पत्र्याचीं ताटें, व फक्त चहाच्याच उपयोगी, अशीं दुसरीं कित्येक भांडीं, यांचीही इकडे जरूरी लागावयास लागली. कारण चहा हें पेय जर विलायती, तर तें ठेवावयास भांडींही विलायती नकोत काय ? असा विचार करूनच

कीं काय नकळे, त्यांनीं तीं प्रचारांत आणिलीं आहेत! चहासारखें पेय तांब्याच्या किंवा पितळेच्या भांड्यांत घालून दिलें तर तें देणारास 'थँक्स' च्या ऐवजीं 'फूल' ही पदवी नाहीं का मिळणार? तेव्हां चहा पिणाराकडे कपबशांचे जोड निदान २।३ तरी असावयाचेच; तसेंच विलायती चहा जर करावयाचा तर तो मातीच्या ओबड-धोबड दिसणाऱ्या चुलीवर तरी कां? तो बनविण्यास विलायती बिनधुराची, बिनत्रासाची 'प्रायमस्' चूल नको काय? बरें, ती विलायती पडली, तेव्हां तीस लागणारीं राकेल तेल व स्पिरिट हीं द्रव्येंही विलायती कां असूं नयेत? तेव्हां ही आणखी पुढील पायरी!

आमची मंडळी आह्मांस असेंही विचारावयास चुक-णार नाहीं कीं, 'तुह्मी विलायती चहा वापरतां' असा आह्मांवर जो वृथा आरोप ठेवितां तो कां? चहा सिलोनमध्यें व हिंदुस्थानांत निलगिरी, ह्मैसूर इत्यादि ठिकाणीं होतो. परंतु आह्मीही त्यांस असें विचारितों कीं, हो, चहा आपल्या—नव्हे ह्या—हिंदुस्थान देशांत होतो खरा, परंतु त्याची लागवड कोण करितात? अर्थात् तो जेथें उत्पन्न होतो, ते मळे कोणाच्या ताब्यांत आहेत? त्यांचें स्वामित्व कोणाकडे आहे? तें जर गोऱ्या लोकां-कडे आहे व तें तसेंच आणखी वाढत जावें असा जोंपर्यंत ते प्रयत्न करित आहेत व त्या त्यांच्या प्रयत्नांस यश मिळत आहे, व अशा रीतीनें चहाच्या पायीं पैसा

जोंपर्यंत परदेशीं जात आहे, तोंपर्यंत चहाच्या नादीं लागणें—मग तो आंग्लभूमींतील असो वा आर्यभूमींतील असो—अप्रशस्त आहे. शिवाय दुसऱ्या मुख्य मुद्याविषयीं आह्मी वर लिहिलेंच आहे, कीं तो शरीर प्रकृतीस अपायकारक आहे. तेव्हां कोणत्याही बाजूनें पाहिलें तरी चहा पिणें हें बरोबर नाहीं असें दिसून येईल.

कॉफी चहासारखी बाधक जरी नसली, तरी चहास लागू असणाऱ्या इतर कारणांवरून हानिकारकच होय. तेव्हां तिचेंही सेवन करूं नये हें उत्तम !

असो. आमच्या देशबंधूंस जीं राजमान्य व्यसनें जडलीं आहेत, त्यांचा यथाक्रम विचार आह्मीं केलेलाच आहे. तरी तदनुसार ते आपलें वर्तन सुधारतील, अशी पूर्ण उमेद बाळगून आम्ही हा विषय संपवितों.



# शेतकी--भाग १ ला.

( मागील अंकावरून पुढें चालू )

## ६ हवा व पाऊस.

हवा हवा ही दोन वायूंपासून झालेली असते, ह्मणजे ती दोन वायूंचें मिश्रण होय. शुद्ध हवेंत दोन वायू—प्राण व नत्र—असतात. त्यांचें शेंकडा प्रमाण ह्मटलें ह्मणजे नत्र—वायू ७९ माग व प्राण—वायू २१ भाग असें असतें परंतु शुद्ध हवा क्वचितच आढळते. हवेंत दुसरे सांपडणारे अशुद्ध पदार्थ ह्मटले ह्मणजे कर्बद्विप्राणील वायू व नेत्रोज्य वायू हे होत. ह्याखेरीज क्वचित् क्षार (SALT) व आम्ल ( ACID ) हे पदार्थ सांपडतात. झाडांना कर्ब तत्वाचा पुरवठा हवेंतील वायूंपासून होतो. नत्र वायू फारच थोड्या प्रमाणानें हवेपासून झाडांस मिळतो. ह्या विषयीं विस्तारानें "पानांचें शोषण" ह्यांत लिहिलें आहे. उष्ण कटिबंधापेक्षां समशीतोष्ण कटिबंधांत झाडांचें पीक चांगलें होतें तरी कांहीं वनस्पतीचें पीक उष्ण कटिबंधांत चांगलें होतें. उदाहरणार्थः—नारळ, ताड, रबर, सागवान इ०; समशीतोष्ण कटिबंधांत बहुतेक सर्व प्रकारचीं झाडें होतात. शीत कटिबंधांत उगवणारीं झाडें ह्मटलीं ह्मणजे देवदार, पाईन द्राक्षें, नारिंगें इ० होत.

साधारणपणें ह्या तिन्ही कटिबंधांतील उष्णतेचें प्रमाण खालीं लिहिल्या प्रमाणें आहेः—

उष्णं कटिबंघ........................९०°—१२५° F
समशीतोष्ण कटिबंध ...............६०°—१००° F
शीत कटिबंध.........................१०°—८०° F

उत्तर ध्रुवाजवळळील देश हे शीत कटिबंधांत येतात, भूमध्य रेषेजवळील उष्ण कटिबंधांत येतात; व उत्तर ध्रुव व भूमध्य रेषा ह्या मधील देश हे समशीतोष्ण कटिबंधांत येतात.

जमिनीजवळ जिवंत पाणी नसल्यास त्या जमिनीस पावसाची फार जरूरी लागते. अशा जमीनीस जिराईत असें ह्मणतात. अशा जमीनींत एकच पीक होतें. आपल्या-कडे हिंवाळा, उन्हाळा व पावसाळा असे वर्षाचे तीन भाग मानले जातात व पावसाळा बहुतेक समशीतोष्ण कटिबंधांत असल्यामुळें त्यांत पीक फार चांगलें येतें; व बहुतेक सर्व प्रकारचीं धान्यें, फळें, झाडें व वनस्पती हीं होतात. परंतु ह्या सर्व उत्पन्नाची भिस्त पावसाळ्यावर असते. आपल्याकडील सर्व शेतकऱ्यांचें ह्मणजे अर्थात आपलें सर्वांचें जविन ह्मटलें ह्मणजे केवळ पाऊस होय; पावसाची टंचाई असली ह्मणजे दुष्काळ येणार असें समजावें.

पाऊस

# स्फुट विषय.

कोणत्याही देशांतील सांपत्तिक स्थिति सुधारण्यास शेतकी व व्यापार हीं दोन मुख्य साधनें होत; ह्यांच्या संबंधानें जो कोणी विचार करील त्यास असें कळून येईल कीं, आमच्या देशांत—कीं ज्यास प्रत्येक बाबतींत संपत्तीच्या अभावीं परकीयांच्या तोंडाकडे पहावें लागत आहे. त्यांत—पूर्वोक्त साधनांचा योग्य उपयोग करण्यांत येत नाहीं; व ह्मणूनच त्याला सांप्रत पदोपदीं नडणारी जी दुर्धरावस्था ती प्राप्त झाली आहे. खरोखर पाहिलें तर आमच्या देशांतील जमीन बरीच सुपीक आहे, बहुतेक ठिकाणीं पाण्याची विपुलता आहे व (अलिकडील ५।६ वर्षे सोडलीं तर) मेघराजही वेळोवेळीं योग्य ती मदत देत असतात, सारांश शेतकी चांगली चालण्यास जीं मुख्य साधनें तीं तर आह्मांपाशीं बहुतेक आहेत.

* * * * *

व्यापारासंबंधीं जरी विचार केला, तरी तिकडूनही आह्मांस विषाद वाटण्यास नको. आज "ज्यांनीं सारें भूमंडळ आपल्या वाणिज्यानें ग्रासून टाकलें आहे, व ज्यांच्या देशांत हजारों टोलेजंग कारखाने" असून तद्वारा जीं आआपल्या देशांत पैशाचा पाऊस पाडीत आहेत अशीं अमेरिका, इंग्लंड वगैरे राष्ट्रें नांवारूपास येण्यापूर्वींसुद्धां

आमच्या देशांतील व्यापार, आमच्या देशांतील शेतकी व आमच्या देशांतील कलाकौशल्य हीं सर्व लोकांस चकित करून सोडीत असत व ह्मणूनच गुळाच्याभोंवतीं जसा मुं-ग्यांचा समुदाय, मधाच्या भोंवतीं जसा मधमाशांचा जमाव अथवा दात्याच्या भोंवतीं जसा याचक-वृंद जमतो त्या प्रमाणेंच आमच्या देशांत निरनिराळे लोक केवळ संपत्तीच्या लोभानें आले व अद्याप येतच आहेत ! मग अशा देशांत व्यापार किती नामी चालेल बरें ? त्यांतूनच आमचें प्रस्तुत सरकार तर केवळ व्यापारी बाण्याचें असल्यामुळें त्यांनीं व्यापाराचीं अनेक साधनें उत्पन्न करून ठेविलीं आहेत.

* * * * *

मग इतक्या सोई असून शेवटीं आमच्या हातांत केवळ शंखच यावा ही केवढी आश्चर्याची गोष्ट बरें ? जर आ-मच्या देशांत शेतकी व व्यापार हीं नीट चालण्यासारखीं आहेत तर तीं उर्जितावस्थेस येऊन देशोन्नति कां बरें होत नाहीं ? तर त्यास उत्तर हेंच कीं, ती शेतकी आज ज्यांच्या हातांत आहे व ज्यांच्या विशाल श्रमानें आमच्या देशाची सांपत्तिक स्थिति सुधारावी अशी आमची इच्छा आहे त्यांस त्यांची लंगोटीही धड नेसतां येत नाहीं व आपाप-ल्या गांवांव्यतिरिक्त भूगोल ज्ञानही त्यांस नाहीं, मग त्यांस स्वदेशाविषयीं अभिमान वाटून खरी कळकळ त्यांच्यांत कशी बरें उद्भवणार ? ह्मणून आमच्यांतील तरुण विद्वान् लोक शेतकीचें अवलंबन करून अशिक्षि-

तांस हातांशीं धरतील तर मात्र शेतकी लवकरच सुधारेल व त्यामुळें देशाचें बरेंच कल्याण होईल.

* * * * *

परंतु आमच्या देशांतील विद्वानांकडे पहावें तर सर्वच अंधार! प्रथमतः त्यांचा शेतकी हा विषयच नावडता! त्यांनून जर कदाचित् कोणी शोकी असलाच तर कोठपर्यंत तर त्या विषयावर गोडगोड व्याख्यानेंच द्यावयाचीं आहेत, किंवा लांबलांब निबंधच लिहावयाचे आहेत तो पर्यंत! एकदां जर कां दौतलेखणी सुटून नांगर हातीं आला व "इरीरी" पर्यंत मजल आली (इतकी मजल येणें कठीणच) कीं बहादरांस लाज वाटावयास लागलीच! खरेंच, जे वीर शेंकडों इंग्रजी, संस्कृत व मराठी अशा पुस्तकांशीं झुंजले त्यांनीं काय कानावर लेखणी ठेवून गुलामगिरीचें जड जूं मानेवर वागविण्याचें सोडून हातांत नांगर घ्यावा, खांद्यावर आसूड टाकावा व डोक्यावर खताची टोपली घ्यावी? व अशा रीतीनें जगांत हांसें करून घ्यावें? मुळींच नाहीं. उपाशी मरण्याची वेळ आली तरी चालेल, परंतु स्वतंत्र धंदे काढण्यास आमचा जन्मच नाहीं अशी समजुत उराशीं घट्ट बाळगणारांनीं ती प्रथम सोडली पाहिजे.

* * * * *

ह्मणून आमच्या तरुण, विद्वान्, सुशिक्षित व "देशोन्नतीच्या धुराकर्माचा अंगिकार" करणारांनीं प्रथम शेतकीस हातीं धरिलें पाहिजे व अशिक्षितांच्या मदतीनें तीस सुधा·

रिलें पाहिजे ह्मणजे ती अनेक मार्गानें फलद्रूप होईल. असें करण्यास अनेक सोई आहेत. आमच्या देशांत पुष्कळ जमिनी ओसाड पडत चालल्या आहेत व असंख्य गरीब लोक मोल मजुरीकारितां तोंडें वेंगाडित आहेत; तरी अशा जमिनी पुष्कळ लोकांनीं एकत्र मिळून मक्त्यानें घेऊन, त्यांत नवीन निघालेलीं चमत्कारिक व गेरमाहित खतें घालून त्यांवर जर त्यांनीं योग्य मेहेनत घेतली व आस्थेनें त्यांची मशागत केली तर देशाचें बरेंच कल्याण होईल, गोरगरिबांचीं पोटें भरतील व आमच्या पोटाच्या मागें लागलेल्या सुशिक्षितांचें दैन्य फिटून त्यांस स्वतंत्रतेचें सुख अनुभविण्यास मिळेल व देशाचें कल्याण केल्याचें श्रेय त्यांकडें येईल, इकडे त्यांनीं लक्ष्य द्यावें.

---

स्वदेशी मेंथाल—भारतवर्षीय वस्तू विषयीं कळकळ बाळगणाऱ्या प्रत्येक देशबांधवानें हें एकदां तरी वापरून पहावें. किंमत ०४ व्यापाऱ्यांस भरपूर कमिशन. गांवोगांव एजंट पाहिनेत.

पत्ता—धि आर्यन् इंडस्ट्रियल कंपनी—गिरगांव, मुंबई.

पाहिजेत:—अनुभवांतीं पुष्कळ लोकांच्या पसंतीस उतरलेलें रानडे यांचें सुवासिक कापशीचें तेल विकणारे एजंट पाहिजेत. किंमत ४ आणे. कमिशन भरपूर.

पत्ता:—महाजन आणि मंडळी सोलएजंट, गिरगांव मुंबई.

### चिंद्रवळें.

रा. रा. मो. वि. निंबकर ११
,, मो. म. निमकर ११
,, गो. अं. निंबकर ११

### वसई.

,, श्री. वा. दांते ८
,, गो. बा. जोशी ८
शेट. हरगोवन वनमाळी ८
रा. रा. मो. दि. जोशी ८
,, दु. अं. कुवल ८
लिंगमाबाई हेड्मिस्ट्रेस. ८
रा. रा. सु. भा. जोशी. ८

### वडोर्दें.

रा. सा. रा. आ. राजे. ८
,, गो. ज. आठले. ८
,, श्रीपदराव जगदाळें. ८

### डहाणू.

रा. रा. मो. ना. खरे. ८
,, गो. शां. चौबळ. ८
,, आ. कृ. गोखले. ८
,, ल. जी. ठक्कर. ८
राणा मा. न. मालत्री. ८
शेट ना. जे. ठक्कर ८

### कुडली.

रा. रा. रा. वा. निमकर. ११

### शिरगांव.

रा. ब. ग. कृ. आपटे, ११

### आयनी.

रा. रा. गो. ना. कान्हरे. ११

### कान्हे.

,, भा. रा. जठार. ११

### लवेल.

सेक्रेटरी श्रीसिद्धीविनायक लां. ११

### कुटरे.

रा. रा. गो. वि. कोगजें. ११

### शहापूर.

,, आण्णासा. लिमये. ११

### पेण.

,, वा. सि. पराडकर. ११

### वेळंब.

,, त्र्यं. गो. ओक. ११

### सोनगड.

,, शि. कृ. चंद्रामे. ८
शेट. घे. के. मुजुमदार. ८
,, चुनि. जिवनदास. ८
डॉ. ग भा. जोशी. ८
रा. रा. वि. ब. गोगटे. ८

### सोनगड.

शेठ. विठ्ठल भाई अ. भाई. ८
रा. रा. भि. पंत विवलकर. ८

### मलकापूर.

,, ना. गो. भावे. ८
,, वा. गो. पिंपळीकर. ८
,, ना. गोविंद सा. ८
,, तात्या. सिताराम. सा. ८
,, दा. बा. पिंपळीकर. ८

### शिरपूर.

,, स. वा. जोशी. ११
सेक्रेटरी. नेटिव्ह लायब्ररी. ११

## परचूरी.

रा. रा. वि. स. पेठे. ११

## मुंबईंतील वर्गणी.

रा. रा. मो. ना. लेले. ८
,, बा. वि. बेंडे. ८
,, शा. आर. मानकर. ८
,, गो. रा. मणेरिकर. ८
डॉ. के. ए. गोखले. ८
रा. रा. गो. सि. धोपेश्वरकर ८
रा. रा. भो. बा. रिसबुड. ८
,, ग. ल. गड्बोले. ८
,, अ. ग. साठे. ८
,, अ. ह. खेर. ८
,, दा. रा. बापट, ८
,, ना. गो. गोडबोले. ८
,, ह. रा. पाठक. ८
,, त्रि गो. काणे. ८
,, सो. ग. शेलार. ८
,, र. कल्याण शास्त्री. ८
,, वि. अ. काणे. ८
,, अ. नि पिटकर. ८
रा. सा. ह. सि. दिक्षीत ८
रा. रा. ल. शि. काळे. ८

## यवतमाळ.

रा. रा रामचंद्र रघुनाथ बापट ८
,, बळी. रा. साष्टीकर. ८
सेक्रेटरी ज्युबिली लायब्ररी ८
रा. रा. रा. के. गडबोले. ८
शेट हरदेव सुखदेव. ८
रा. रा. कृ. ग. बंदे. ८
,, शा. प्र. देशपांडे. ८
,, कृ. भि. देसाई. ८

रा. रा. ह. गं. फाटक. ८
,, पां. अं. देशपांडे. ८
,, श्री. गं. देशपांडे. ८
,, दा. रा. हळबे. ८
,, चिं. वा. केळकर. ८
,, ल. चिं. बापट. ८
,, ग. मो. गोरे. ८
,, द. कृ. काणे. ८
,, जि. भी. पतकी. ८
,, पां. दा. थत्ते. ८
,, ना. ग. देशपांडे. ८
,, य. श्री. प्रतापे. ८
,, श्रीनिवास उमाकांत. ८
,, पां. ग. जोगळेकर. ८
,, मु. वि. झाडगांवकर. ८
,, रामकुवर रामनारायण. ८
,, शं. वा. सुकळीकर. ८
,, बा. मा. सराफ. ८
,, वा. गो. जोशी. ८
,, आस्कर आणि कंपनी. ८
,, अ. ग. भागवत. ८
,, द. गं. जोगळेकर. ८
,, चो. गं. मुदलीयार. ८
,, ना. ए देशपांडे. ८
बी. जी. कल्याणराम आयर. ८
रा. रा. दे. एम्. पाटील. ८
,, प. ना. पाटील. ८
डॉ. एन्. जी. सरदेसाई. ८
रा. रा. के. वि धाटंजीकर. ८
,, वि. ना. डांग. ८
,, ग. ह. पाटील. ८
,, गो. का. ओक. ८

( पिंवळ्या ५ व्या पानावरून पुढें चालू. )

किंमत कमी होईल, असें वाटून थोडें वाईट वाटलें. येथून मी डिग्रस येथें गेलों. रस्ता फार वाईट, गाडी अगदीं लहान! त्यांत ३ मनुष्यें होतीं या मुळें फार त्रास झाला. डॉ. परांजपे यांच्या खटपटीनें सभा भरली. मंडळी पुष्कळ होती त्यांत कित्येक मुसलमान व्यापारी होते. कल्पना पसंत पडल्यावर आंकडे पडले. नंतर स्थानिक कमेटी स्थापण्यांत आली. डॉ. परांजपे हे एक खरे उत्कृष्ट देशभक्त दिसले. यांनीं मला पुष्कळ बोधामृत पाजिलें. जातांना यांनीं मला धाबळी, लोटा वगैरे प्रवासास जरूर लागणाऱ्या जिनसांची मदत केली! यांनीं मला दारव्हा येथें पोंचविलें. तेथून मी परत यवतमाळ येथें आलों. थत्ते मास्तर यांनीं मला प्रवास खर्चासाठीं ८ आणे दिले. हरी किशोर कर्ते यांनीं पैसा फंडावर मोठ्या कळकळीनें एक मुख्य लेख लिहून लोकांस विनंति केली होती. कोरडी विनंति वाटेल ह्मणून दर वर्गणीदारामागें अर्धा आणा देण्याचें उघडपणें आश्वासन दिलें होतें. नंतर धामणगांव येथें आलों. रा. भाऊसाहेब बापट यांनीं प्रवास खर्चास २ रुपये व कुटुंबाच्या मदती साठीं ५ रुपये दिले. शिवाय आंगांतील सदरा, आंगरखा वगैरे कपडे दिले! ईश्वराला करुणा आली ह्मणजे माणसाला दया येते, यांत संशय नाहीं. धामणगांवीं आज सभा भरली होती. कल्पना पसंत पडली. आंकडे घेण्यासाठीं दुसरे दिवशीं सभा होऊन वार्षिक वर्गणीचे १५ रुपये जाहले. नागपूर वर्धा इकडे प्लेग असल्यामुळें मीं उद्यां उमरावतीस जाण्याचा बेत केला आहे.

धामणगांव—वऱ्हाड. ता० १८।२।०४ अं० दा० काळे.

# संगमनेरकर दामले वैद्य

## यांचीं केवळ वनस्पतीचीं रामबाण औषधें.

पानथरी (प्लीहा) वर–हिंवतापानें होणारे पोटांतील डावे आंगचे गांठीवर हें औषध सुरू होतांच.भूक लागून शक्ति येते व पानथरी ७ दिवसांत जाते. रोग जुना व मोठा असेल तर २।३ डबे लागतात. डबी किं. १२ आ.

शूल दावानल–अर्थात पोटशूळ–भोजनानंतर दुख-णारे परिणाम शूळावर, व ओटी माकडहाडाचे ठिकाण-चेही शूळ १४ दिवसांत बरे होतात. किंमत १ रुपया.

हिंवताप–एक दिवसाआड, रोजचा व चातुर्थिक हिंव ताप ह्या औषधानें ३ वेळांतच बंद होतात. किं. ८ आ.

मूळव्याध–रक्ती व मोडाची हटकून २१ दिवसांत दूर होते, ठणका राहून शौचास साफ होतें. रक्त तिसरे दिवशीं बंद. किमत १ रुपाया.

शरीरमित्र–सर्व प्रकारचे धातुविकार, स्वप्नावस्था, ह्यांनवर केवळ वनस्पतीचें शास्त्रोक्त औषध मित्राप्रमाणें साह्य करितें. शौचास साफ करून धातु घट्ट होते. व सर्व व्यापार पूर्वीप्रमाणें सुरळित चालतात. २१ दिव-सांचे औषधाची किंमत १ रुपया.

स्त्रियांचे सर्व प्रकारचे विकार–(धुपणी) तांबडी, पांढरी ह्यांजवर झाडपाल्याचें औषध अति उत्तम व अनु-भवशीर आहे. १४ दिवसांत गुण. किंमत १ रुपाया.

परम्यावर–मूत्रेंद्रियांतील आग पहिले दिवशीं बंद. ७ दिवसांत पू बंद होऊन उत्तम गुण कायमचा येतो. १॥रु.

पत्ता–वि. बी. दामले, संगमनेरकर वैद्य;
बुधवार पेठ किब्यांचा वाडा, पुणें.

रजिस्टर नंबर बी० ४५१

# ॥ सोपें औषध परी गुणवंत ॥

दासबोध.

**व्याधिहरण**—या औषधाप्रमाणें क्षयरोग व बाळंतरोग यांवर दुसरा रामबाण उपायच नाहीं. यानें बिघडलेलें रक्त शुद्ध होऊन, ताजें रक्त त्वरित उत्पन्न होतें. फार जुना जीर्णज्वर हें औषध फक्त ३ वेळ घेतल्यानें साफ बरा होतो.

व्यापारी व विद्यार्थी यांस मानसिक श्रम फार होतात, त्यांनां यापासून फार मोठा फायदा आहे. किं. १ बा. रुपया. ३ बाटल्यांस ४ रुपये. टपाल व्ही. पी. खर्च निराळा.

**आरोग्यामृत**—ह्यानें गोंवर, कांजिण्या, देवी व ताप यांपासून अंगीं राहिलेली कडकी नाहींशी होऊन शरीर सदृढ व बळकट होतें. पिण्यास हें अतिशय गोड असल्यामुळें लहान मुलें तें फार आवडीनें पितात. किं. १ बा. १ रुपया. ३ बाटल्यांची २॥ रुपये. व्यापारी लोकांस भरपूर कमिशन मिळेल.

**उपदंशारि**—गर्मी, परमा, बद, टणका, इत्यादि उपदंशा संबंधीं विकारावर अत्युत्तम उपाय. परमा कितीहि वर्षांचा जुना असला तरी हें औषध २ दिवस घेतल्यानें साफ बरा होतो. किं. १ बा. २ रुपये ३ बाटल्यांस ५ रुपये. शिवाय खालील औषधें आमचे कडेस मिळतील.

प्रवाळभस्म ( चंद्रपुटी ) १ तोळा.१ रुपया.

सुवर्णमाक्षिक भस्म, १ तो. १ रु.

लोहभस्म १ तो. १ रुपया.

खोकल्यावर गोळ्या ( १२ गो. ड. ) ०८.

सर्दीवर गोळ्या. ( १२ गो. ड. ) ०८.

प्रदररिपु. १ तो. १ रुपाया.

शूलदावानल ५ तो. १ रुपया.

गुळवेलसत्व ( खात्रीचें)१तो.०४

कचोरा सत्व १ तो. ०२.

**पत्ता**—धी ग्रेट मर्कंटाईल कंपनी. गुहागर, जि. रत्नागिरी.

**सूचना**—अर्धा आण्याचें टिकिट पाठवून क्याटलाग मागवा.

वर्षाची वर्गणी ८ आणे. ट. ख..३ आणे.
एका नांवावर ६ प्रती गेल्यास ट० खर्च माफ. फुट० अं० १ आणा.

# "पैसा फंड"

## मासिकपुस्तक.

वर्ष १ लें. ] एप्रिल १९०४. [ अंक १० वा.

## विषयानुक्रमणिका.

| विषय. | पान. |
| --- | --- |
| आमची अर्वाचीन दैन्यावस्था | ११९ |
| शेतकी | १२५ |
| पत्रव्यवहार | १२७ |
| नवीं पुस्तकें | १३० |

मुख्य एजंट–पुरंदरे आणि कंपनी–माधवबाग मुंबई.

हें पुस्तक अंताजी दामोदर काळे यांनीं मुंबईंत विजय छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

केतकी पंचांग–किं. १ आणा मुंबईंत विजय छापखान्यांत मिळेल.

# माझा प्रवास.

ता० १९ फेब्रु० रोजीं धामणगांव येथें पैसा फंडाचे वार्षिक आंकडे पडले, याचें खरें श्रेय रा. वामनराव बर्वे व राली ब्रदर्सचे एजंट रा. नारायणराव यांस आहे. देश दारिद्री होत असून लाखो लोकांस अर्ध पोटीं राहावें लागतें, हें माझें ह्मणणें सभेस आलेल्या मारवाडी शेट लोकांस खोटें वाटलें! मग आंकडे कसे पडणार? ही स्थिति लक्ष्यांत आणून वरील दोघा गृहस्थांनीं खटपट केली, ह्मणूनच माझे श्रम फुकट गेले नाहींत. पैसा फंड जसा सार्वजनिक आहे, तसें "पैसा फंड" मा० पुस्तकही सार्वजनिक आहे. असें असतां त्याला १ ही वर्गणीदार मिळाला नाहीं! येथून मी उमरावती येथें गेलों. रेल्वे भाडें रा. बर्वे यांनीं दिलें. श्री० दादासाहेब खापर्डे यांचे घरीं उतरलों. यांचें घर ह्मणजे एक राजवाडाच आहे. यांस वऱ्हाडांतील टिळक समजतात. यांचा शांत स्वभाव पाहून मला फार आनंद वाटला. रात्रीं त्यांनीं पैसा फंडाचा सर्व इतिहास ऐकून घेतला, व शक्य तितकी मदत करण्याचें कबूल केलें. दुसरे दिवशीं खाजगी हायस्कुलांतील कांहीं मंडळी भेटली. यांनीं सभा भरविण्याच्या कामीं विशेष उत्सुकता दाखविली. या मंडळीसह मी रविवारीं रावब० मुधोळकर व रा. जोशी यांच्या भेटीस गेलों. रावब० हे दुःखी होते, तरी पण त्यांनीं सर्व हकीगत

ऐकून घेतली, व सभा भरल्यास मी जरूर येईन असें सांगितलें. नंतर रा. जोशी यांस भेटलों. यवतमाळ येथील रा. भाऊसाहेब मुंडले वकील यांनीं त्यांस परभारें पत्र पाठवून व्याख्यान जरूर करवा, अशी शिफारस केली होती. यामुळें त्यांचीही संमति मिळाली मग काय विचारावें? याच स्वदेशभक्त मंडळींनें रा. खापर्डे, मुधोळकर, जोशी यांच्या सह्यानिशीं लगेच हस्तपत्रकें छापून प्रसिद्ध केलीं. मग सभेला पुष्कळ मंडळी आली यांत नवल कसलें? ता० २२ फेब्रु० सोमवारीं गणेश थिएटरमध्यें खापर्डे, जोशी, मुधोळकर वगैरे थोर मंडळी व्याख्यानास आल्यामुळें सभेला विलक्षण शोभा आली होती. मोठ मोठी मंडळी सभेला आली ह्मणजे शोभाही हात जोडून उभीच असते! आज रोजीं श्री माणिक प्रभु मंडळीचा खेळ असल्यामुळें व्याख्यान ६ वाजतां सुरूं झालें असतें ह्मणजे बरें झालें असतें! परंतु दुर्दैवानें मंडळी लवकर न आल्यामुळें ७ वाजतां भाषण सुरूं होऊन व्यानेजरांच्या आग्रहामुळें ८ वाजतांच बंद करणें भाग पडलें! आणखी अर्धा तास मिळाला असता, तरी काम सुरेख झालें असतें. पण तसा योग न आल्यामुळें मला राहिलेलें व्याख्यान ता. २६ रोजीं पुरें करावें लागलें. कल्पना पसंत पडली. उमरावतीपुरती कमेटी स्थापावयाची असती, तर कमेटी होऊन फंडाचे आंकडेही पडले असते. परंतु तसें न करतां सगळ्या वऱ्हाडाची एक मुख्य कमेटी तुह्मी स्था-

पन करा, अशी मीं सभेला विनंति केली होती. या मुळें त्या दिवशीं कांहीं एक काम झालें नाहीं. अर्थात १ पैचा देखील आंकडा पडला नाहीं. यावरून माझी विनंती मंडळीस अमान्य झाली असें मात्र कोणी समजूं नये. मोठ्या लोकांच्या डोक्यांत ती विनंति घोळत होती ! तसें नसतें तर ता. २ मार्च रोजीं "प्रोव्हिजनल सेंट्रल कमेटी "स्थापन झाली नसती. या कमेटी मध्यें उमरावतीचे बहुतेक प्रमुख गृहस्थ आहेत. श्री. खापर्डे अध्यक्ष, रा. जोशी वकील खजीनदार व रा. ब्रह्मे वकील सेक्रेटरी आहेत. रावब. मुधोळकर यांनीं एक 'स्कीम' तयार केली आहे तिचा या कमेटी कडून स्वीकार होईल अशी आशा आहे. ही कमेटी, आपण केलेले नियम व मुधोळकरांची 'स्कीम' छापून वऱ्हाडांतील मुख्य मुख्य प्रमुख लोकांकडे पाठविणार आहे. सर्वांची पसंती मिळाली, ह्मणजे मुख्य सेंट्रल कमेटी स्थापन होईल ! येथपर्यंत झालेल्या कामाकडे लक्ष्य दिल्यास उमरावती करांनीं योग्य मार्गानें तारूं हांकलें आहे, असें ह्मटल्या खेरीज राहवत नाहीं. तेथील स्थानिक पत्रें या विषयाची उचल करतील तर दुधांत साखर पडेल. अमरावतीकर नाटक मंडळीचे म्यानेजर रा. बेडेकर यांनीं उदार बुद्धीनें एका खेळाचा $\frac{1}{4}$ पैसा फंडास व $\frac{1}{4}$ जपानी फंडास देण्याचें कबूल केले होतें. परंतु जाग्रणाच्या त्रासा मुळें नाटकाला फारच थोडी मंडळी आली सबब त्या दिवशीं खेळ झालाच नाहीं ! अर्थात उत्पन्न कोठून मिळ-

णार ? असें असतां एकानें उत्पन्न मिळालें असें केसरींत उघडपणें जाहीर केलें आहे ! जपानी फंडा बद्दल मी आपल्या भाषणांत प्रथम उल्लेख केला होता, त्याचा मुलांच्या मनावर परिणाम चांगला झाला असें त्यांनीं जम-विलेल्या फंडाकडे लक्ष्य दिल्यास, ह्मणणें भाग आहे. पैसा फंडालाही त्यांनीं यथाशक्ति मदत केली, ती के-सरी मार्फत कळेलच. येथें मा. पुस्तकासंबंधानें कोणी प्रयत्न केला नाहीं, तरी पण १६ वर्गणीदार मिळाले प्रयत्न झाला असता तर १०० पेक्षां जास्त सहज मिळाले असते. येथील कमेटीनें मुंबईच्या पैसाफंडोत्तेजक मंडळीनें प्रसिद्ध केलेल्या छोट्या पुस्तकाच्या ५०० प्रती विकत घेउन त्या वांटण्याचें ठरविलें आहे, हें पाहून संतोष झाला. ता. ३ रोजीं मूर्तिजापूर येथें जाण्याचा बेत केला. लोकमान्य टिळक, पैसा फंडाचे खजीनदार, यांच्या सुटकेची वर्दी २ वाजतां मला कळली, तेव्हां मला किती आनंद झाला, हें मी शब्दांनीं व्यक्त करण्यास असमर्थ आहें. असो येथील कांहीं मुलें मला मुद्दाम स्टेशनावर पोंचविण्यासाठीं आलीं होतीं ! पदरच्या पैशानें टिकीट काढलें! मी मूर्ति-जापूर येथें ७ वाजतां पोचलों. कोठें उतरावें हा विचार पडला. श्री माणिक प्रभु मंडळीमध्यें जावें असा बेत केला. मालकांनीं चांगली व्यवस्था ठेविली; सकाळीं उठल्यावर राली ब्रद० चे एजंट रा. गोविंदराव अप्पाजी यांची भेट घेऊन त्यांस सर्व हकीगत सांगितली. तेव्हां त्यानीं प्रथम

सामान सुमान आपल्याघरीं आणविलें, व नंतर चौघांची ओळख करून दिली. रात्रीं नाटक झालें. बाजारचा दिवस असल्यामुळें पुष्कळ मंडळी नाटकास आली होती. तेथें म्यानेजरांच्या परवानगीनें १० मिनिटें भाषण करून आपला उद्देश सर्वांस कळविला. दुसरे दिवशीं महादेवाच्या देवळांत सभा भरली. कल्पना पसंत पडल्यावर स्टेशनच्या लोकांसाठीं (इकडे मोठमोठे लोक रहातात) दुसरें व्याख्यान करावें असें ठरलें. रविवार असल्यामुळें पुष्कळ मंडळी आली होती. रात्र फार झाल्यामुळें कमेटी झाली नाहीं. परंतु मा. पु. ला ४९ वर्गणीदार मिळाले ! रा. गोविंदराव व त्यांचे कारकून रा. केशवराव यांनीं मेहनत केली नसती तर इतके वर्गणीदार मिळते कीं नाहींत याची शंकाच होती. येथून मी अकोलें येथें गेलों. रा. गोविंदराव यांनीं प्र. खर्चा साठीं १ रुपया दिला. रा. मोडक मास्तर यांनीं उमरावतीस डा. कोल्हटकर यांची ओळख करून दिली होती, यामुळें उतरण्याची पंचाइत पडली नाहीं. डाक्तर साहेब घरीं नव्हते. सकाळीं रा. मोडक यांनीं रा. चिपळूणकर वकील यांची ओळख करून दिली. हे गृहस्थ लायब्ररीचे सेक्रेटरी आहेत. यांनीं उद्देश ऐकून हस्तपत्रकें काढण्याचें कबूल केलें. आकोलें गांवीं प्लेग झाल्यामुळें वस्ती बाहेर बरीच आहे. राव ब. दत्तोपंत भागवत वकील व राव सा. महाजनी एम. ए. यांची भेट घेऊन त्यांस सभेस येण्या विषयीं आमंत्रण दिलें. ता. ९

(पुढें चालू).

# पैसा फंड

मासिक पुस्तक.

वर्ष १ लें. ]     एप्रील, सन १९०४.     [ अंक १० वा.

## आमची अर्वाचीन दैन्यावस्था.

"मातृभिश्चिन्त्यमानानां, ते हि नो दिवसा गताः"

आमच्या देशास उत्तरोत्तर वाईट स्थिति येत चालली आहे ही गोष्ट निर्विवादच होय. तरी ती घालविण्यास मुख्य उपाय ह्मटला ह्मणजे प्रत्येक मनुष्यास स्वदेशाविषयीं खरीखरी माहिती करून देणें हा होय. ही माहिती अशी कीं, आपला देश कोणता, त्याची गेल्या शतकापर्यंत काय स्थिति होती, गेल्या शतकांत काय झाली व हल्लीं काय आहे. ही स्थिति एकदां कोणत्याही मनुष्यास समजली व एकंदर लोकांच्या मनांत स्वदेशासंबंधीं असणारी हयगय त्यांस कळली ह्मणजे तो मनुष्य–यत्किंचित् बाबतींत सुद्धां–देशाचें नुकसान करण्यास तयार होणार नाहीं. ह्मणून आमच्या ह्या हतभाग्य देशासंबंधीं चार शब्द लिहिण्याचा आजचा विचार आहे.

आमचा देश आर्यावर्त अगर हिंदुस्थान होय. उत्तरेस काश्मीरपासून तों दक्षिणेस थेट कन्याकुमारीपर्यंत

ह्याची लांबी सुमारें १९०० मैल आहे व रुंदी पूर्वेस असामपासून तों पश्चिमेस कराचीपर्यंत जवळजवळ तितकीच आहे हें भूगोलज्ञांस सांगणें नलगे. ह्या अफाट देशांत अर्थातच शेंकडों जाती, हजारो भाषा अनेक पंथ व अगणित रीतिरिवाज होते व आहेत; असें असूनही गेल्या शतकापर्यंत आह्मी राजकीय बाबतींतच नव्हे तर औद्योगिक बाबतींत सुद्धां बरेच नांवाजलेले होतों. अठराव्या शतकांत राजकीय दृष्टीनें ह्या देशांत अनेक उलाढाली होऊन आह्मी धार्मिक व राजकीय बाबतींत येथें असणाऱ्या सर्व राष्ट्रांवर आपला झेंडा रोंविला, फार दिवसांपासून ग्लानि आलेल्या हिंदुधर्मास व हिंदुराष्ट्रास टवटवी आणून देऊन त्यास वैभवशिखरावर बसविलें व अनेक कला उदयास आणिल्या. परंतु मनुष्य काय किंवा राष्ट्र काय कितीही जोरावर असलें तरी त्यास केव्हांना केव्हां तरी खालीं येण्याची वेळ येतेच ह्या इतिहासांतील सर्व प्रसिद्ध नियमाप्रमाणें तो सर्व मनू बदलून जाऊन जे आह्मी वैभव शिखरावर चढून इतर सर्व राष्ट्रांकडे मोठ्या कौतुकानें पहात होतों त्याच आह्मांस अस्ते अस्ते खालीं येण्याची वेळ आली व त्या प्रमाणें आह्मी खालीं येतही आहोंत इतकेंच नाहीं तर उत्तरोत्तर रसातळाच्या कोणत्या पायरीवर आह्मी जाणार ह्याचा कांहींच अंत लागत नाहीं.

पेशवाई बुडाल्यावर इकडे जेव्हां इंग्रजी छत्र सुरू झालें तेव्हां सर्व लोक त्यांच्या परम निर्मल अशा वर्तनास भुलून

गेले व हेंच राज्य चिरकाळ असेल तर बरें होईल अशा त्यांच्या कल्पना झाल्या. त्यावेळीं आमच्या सरकारचें वर्तनही फार निराळ्या तऱ्हेचें असे. न्यायदेवता तर त्या वेळीं मूर्तिमंतच अवतरली होती. हायकोर्टांत त्या वेळीं जज्जसाहेबांच्या मदतीस शास्त्री ठेविलेले असत. नेटिवां विषयीं आदरभाव* ह्याला तर सीमाच नव्हती. परंतु हें सर्व जाऊन आतां अगदींच उलट झालें आहे! आतां साहेबच स्वतः खासे शास्त्री बनून मनुस्मृति पाहूं लागले आहेत, मग त्यास शास्त्रीबोवांची काय जरूर बरें? जे एल्फिस्टन साहेब बाहेर एक यःकश्चित महार भेटावयास आला होता ह्मणून त्यास टोपी काढून सामोरे आले त्यांचेच नातू-पणतू पहा बरें! त्यांची भेट घेण्यास आमच्या राजेरजवा-ड्यांस मोठ्या मिनतवारीनें वागावें लागतें. अशीच स्थिति प्रत्येक बाबतींत दृष्टीस पडते. सारांश प्रभातकालीं अनेक भुवनांस आधारभूत होऊन सर्व लोकांस आल्हाद देणाऱ्या व लाल किरणांनीं युक्त अशा सूर्यास पाहून आजचा दिवस मोठ्या आनंदांत जाईल असे विचार जों मनांत यावे तोंच एका एकीं मोठ मोठे काळेढग यावे, विद्युल्लता बाईनें कडकड चमचम करून कोणाचें घर तर कोणाचें दार मोडून टाकून ज्याच्या त्याच्या तोंडावरील टवटवी नाहींशी

* गुदस्तसालीं कै० प्रो० जिनसिवाले ह्यांनीं येथें दिलेल्या व्या-ख्यानांत एल्फिंस्टन साहेब व एक महार ह्यांचें मोठें चटकदार वर्णन केलें होतें तें आमच्या मुंबईच्या वाचकांस स्मरत असेलच.

करावी व ज्या ठिकाणीं मोठ्या हौशीनें व आनंदानें जाण्याचा संकल्प करावा तेथेंच जाण्यास आह्मांस भीति व उदासीनता वाटावी ह्या प्रमाणें.इंग्रजी राज्या पासून हिंदु-स्थानावर निरनिराळे परिणाम झाले आहेत. जें इंग्रजीराज्य आह्मांस फार सुखकर होईल अशा नुस्त्या समजुतीनें पेश-वाई बुडाल्याची विशेष दिक्कत वाटली नाहीं तेंच इंग्रजी राज्य आतां "पुढचा मागच्यास चांगलें ह्मणावितो "ह्या प्रमाणें विशेष त्रासदायक वाटत आहे. उघडच आहे; इंग्रज सरकार जें इकडे आलें तें आमच्या फायद्या साठीं मुळींच नसून आपली तुंबडी भरून घेण्यासाठीं हीं गोष्ट आतां सिद्धांताप्रमाणें मानली जात आहे. मग त्यांनीं आपलें पोट सोडून आमच्याकडे काय ह्मणून पहावें बरें ? आपा-पल्या पोळीवर तूप ओढणें हा प्रत्येक मनुष्याचाच धर्म होय त्या बद्दल एकट्या इंग्रज सरकारसच दोषदेतां येणार नाहीं. यावरून हें उघडच आहे कीं, आह्मांस इंग्रज सरकारा-पासून इतर गोष्टी प्रमाणें औद्योगिक बाबतींत सुद्धां कोण-त्याही तऱ्हेनें मदत मिळणें शक्य नाहीं मग आह्मी स्वत: आपल्या पायावर उभें राहिल्याशिवाय आज आह्मांस दुसरा मार्गच नाहीं. अशी आमची आजची स्थिति आहे.

वरील स्थितीच्या प्रतिकारार्थ आह्मी काय काय केलें पाहिजे त्याचा विचार आतां करूं देशस्थिति चांगली असणें ह्मणजे देशांत उद्योग धंदा करणाऱ्या प्रत्येक मनुष्याच्या निर्वाहास पंचाईत न पडणें. अशी स्थिति आमच्या देशांत

आढळेल काय ? पोटाला नाहीं, धंदा नीट चालत नाहीं, परदेशी मालापुढें टिकाव धरवत नाहीं, ह्या कारणांमुळें आमच्यांतील किती कला आजपर्यंत नाहींशा झाल्या बरें ? परदेशी लोक येथें येऊन थोडेच कारखाने बंद करीत आहेत ?. तुमच्यांपेक्षां सुबक सुबक माल तयार करवून तुमचा व्यापार ठार बुडविणें हें तर त्यांचें कर्तव्यच होय! परंतु त्यांच्या व्यापारास उत्तेजन न देतां आपल्या देशाकडे पाहून परदेशीय वस्तु तुच्छ मानणें हें तुमचें कर्तव्य नाहीं काय ? तें तुह्मी कोणत्या तऱ्हेनें बजावीत आहां ह्याचा कांहीं विचार करा. आर्यभूमीच्या पोटीं येऊन तीस भारभूत होण्यापेक्षां जन्मास न येणेंच बरें नव्हे काय ? सारांश परदेशी लोकांनीं आह्मांस बुडविलें ही जी आमच्या देशबंधूंचीं गाऱ्हाणीं तीं आह्मांस तर केवळ हास्यास्पद वाटतात. इंग्लिश फ्रेंच अमेरिकन वगैरे लोकांस परदेशीय लोक नव्हते काय ? मग त्यांस कसें बरें त्यांनीं बुडविलें नाहीं ? ईस्ट इंडिया कंपनी प्रथम जेव्हां इंग्लंडशीं व्यापार करूं लागली तेव्हां हिंदुस्थानांतील व्यापारास फार विलक्षण तेज आलें होतें व आज जशी आमची स्थिति आहे तशीच कांहींशी इंग्लिश लोकांचीं झाली होती. हिंदुस्थानांतील माल मग तो चांगला असावयाचाच ह्या मुळें हिंदुस्थानच्या मालाचा खप बराच होऊन इंग्लंड मधून द्रव्याचा ओघ इकडे येऊं लागला, परंतु ही गोष्ट तिकडील मुत्सद्द्यांच्या लवकर लक्ष्यांत येऊन त्यांनीं तिच्या प्रतिका-

रार्थ अनेक उपायही योजले व अशा रीतीनें परदेशीं जाणारा द्रव्यौघ बंद केला. तर हीच गोष्ट इकडे शक्य नाहीं काय? प्रत्येकानें परदेशी माल वापरावयाचा नाहीं असा निश्चय केल्यास चालणार नाहीं काय? परंतु ही गोष्ट फारच थोड्यांच्या लक्ष्यांत आलेली आहे. तरी प्रत्येकानें वरील निश्चय करून देशांत निरनिराळे कारखानें काढण्याच्या तजवीजीस लागावें. ह्मणजे देशाचें दारिद्य नाहींसे होऊन पुष्कळ लोकांस अन्न मिळेल, परदेशी लोकांनीं दिलेला सुळसुळाट कमी होईल व आमच्या आर्यभूमीचें पूर्वीं प्रमाणें कला कौशल्यांत तरी नांव निघेल. तरी आतां विषय आटोपण्या पूर्वीं परदेशी लोकांचे व्यापाराचे कावे व आमच्या लोकांचें त्याविषयींचें अज्ञान ह्या संबंधीं नुकतीच एक गोष्ट ऐकण्यांत आली आहे ती वाचकांस सांगून त्यांची रजा घेतों.

ह्या वर्षीं कापूस कमी पिकल्यामुळें व अमेरिकेंत कांहीं जळाल्यामुळें चोहोंकडे कापडाची महर्गता होणार असा अंदाज होतांक्षणींच अमेरिकेंतील लोकांनीं एक कायदा करून अमेरिकेंतील सर्व कापूस एका विविक्षित ठिकाणीं आणण्याची तजवीज ठेवली. पुढें तेथें येणारा सर्व कापूस परदेशीं बिलकुल न पाठवितां आपल्याच देशांतील गिरणी वाल्यांस ज्यास्त सवलतीनें देण्याची त्यांनीं व्यवस्था केली व अशा रीतीनें आपला व्यापार अव्याहत चालवून कापड मात्र महाग केलें व परदेशी व्यापारास मोठा धोका बसविला.

असो; तर ह्या सर्व गोष्टीवरून आह्मी आज असें शिकणें आहे कीं, आमचा देश केवळ व्यापाराच्या अभावीं दारिद्र्यांत बुडतो आहे. व तो तरण्यास व्यापारहाच एक उत्तम उपाय होय. तरी आमच्या लोकांनीं इकडे लक्ष्य द्यावें.

# शेतकी--भाग १ ला.

( मागील अंकावरून पुढें चालू )

### ७ जमीन ( Soil. )

सपाटी वरील जमिनींत बहुतेक ८ इंचांपासून २।४ फूट पर्यंत माती असते, व तिच्याखालीं मुरम, रेती, खडक वगैरे असतात. अशा तऱ्हेच्या जमिनींत बहुतेक सर्व प्रकारचें पीक होतें. अशा जमिनींत माती पुष्कळ असल्या मुळें त्यांत पावसाचें पाणी बरेंच खोल मुरतें. ह्यामुळें तींत पावसाचा ओलावा चांगला असतो.

डोंगरावरील जमिनींत बहुतेक ४ इंचांपासून १ फूट पर्यंत माती असते, ह्यामुळें तींत पाणी ज्यास्त मुरत नाहीं. आणि ह्मणून ओलावा कमी असतो. अशा जमिनीस डोंगराळ जमीन असें ह्मणतात.

ह्या जमिनींत ओलावा कमी लागणारीं ह्मणजे वऱ्या, राळे नाचण्या ह्यांसारखीं रुक्ष धान्यें होतात. ह्या जमिनींत उंची किंमतीचे पदार्थ पिकत नाहींत. ह्यामुळें त्यांची किंमत कमी असून शेत साराही थोडा असतो.

जमिनी ह्या खडक, रेती व इतर नष्ट झालेल्या पदार्थांवर पाणी, हवा, ऊष्णता वगैरेंचा परिणाम होऊन झालेल्या आहेत. जमिनीचे गुणधर्म ती ज्या खडकापासून झालेली असेल, खडकाच्या जातीवर अवलंबून आहे. जमीन जसजशी जुनी होत जाते, तसतसें त्या मधील मातीचें प्रमाण वाढत जातें. जमिनीचे विचे विशेष गुणधर्म खतावर अवलंबून असतात जमिनींतील मुख्य पदार्थ ह्मटले ह्मणजे माती, वाळू, खडू व कूज ( Humus ) हे होत ह्या पदार्थांमध्यें कोणकोणत्या तत्वांचा विशेष सामावेश होतो, तें पाहूं या.

माती मध्यें मुख्य तत्वें ह्मटलीं ह्मणजे अंभ, सिक, प्राण उज्ज हीं होत ह्यांशिवाय त्यांत क्षारज तत्वही बऱ्याच प्रमाणांत सांपडतें. शुद्ध मातींत फक्त जड पदार्थ असतात, व अशुद्ध मातींत प्राणी, वनस्पती वगैरे पदार्थांची जड माती वगैरे पदार्थ सांपडतात.

वाळू हा पदार्थ सिक तत्वाचा प्राणवायूशीं संयोग होऊन बनतो. ह्याचे दोन प्रकार असतात. एक पूड व दुसरा स्फाटिक. [ Crystal ] पुडीस वाळू ह्मणतात व स्फटिकास गारगोटी, खडे वगैरे ह्मणतात. वाळूचा अशुद्ध स्फटिक ( ह्यांत वाळूच्या तत्वांव्यतिरिक्त इतर पदार्थ असतात ) ह्मणून एक भाग आहे. त्यास अभ्रक असें ह्मणतात. वनस्पतीस वाळू व गारगोटी ह्यांपेक्षां अभ्रकाचा फार उपयोग होतो. कारण अभ्रकामध्यें इतर तत्वें असल्यामुळें त्यावर पाणी, हवा, प्रकाश वगैरे पदार्थांचें परिणाम होऊन त्याचें वर्गीकारण होतें.

# पत्रव्यवहार.

आर्य संपादक "पैसा फंड" मासिक पुस्तक यांस.
सा. नं. वि. वि.

खालील पत्र हें मासिक पुस्तकाच्या वर्गणीदारांस व इतर हितचिंतकांस, "पैसा फंड" पुस्तकांच्या द्वारें आर्य काळे यांच्या कुटुंबास मदत किती होते, हें कळावें एवढ्याच करितां आहे.

"पैसा फंड" मासिक पुस्तकाच्या दुसऱ्या अंकांत माझ्या पत्राचा सारांश घेतला आहे. त्यांत एक हजार वर्गणीदार झाले, ह्मणजे आर्य काळे यांच्या कुटुंबास अंशतः मदत होईल असें लिहिलें आहे. संपूर्णत्वें करून मदत होणार नाहीं, असा माझ्या पत्राचा उद्देश होताच. आतां वर्गणीदार एक हजार झाले आहेत, तेव्हां आर्य काळे यांच्या कुटुंबास काळजी राहिली नाहीं, असा पुष्कळांचा समज झाला आहे, व कांहींनीं असें ह्मणूनही दाखविलें आहे. पण आंतील स्थिति काय आहे, याजबद्दल कोणीं तपासच केला नाहीं असें वाटतें. ज्या पेक्षां माझ्या पत्रांतील सारांशावर अशा प्रकारच्या शंका निघाल्या आहेत, त्या पेक्षां मासिक पुस्तकाचा ठोकळ हिशेबच पुढें देतों. ह्मणजे कोणाची गैर समजूत झाली असेल तर ती दूर होईल; व आर्य काळे यांच्या कुटुंबास त्यांतून कितीशी मदत होते हें कळेल.

या मासिक पुस्तकाच्या १२५० प्रती छापिल्या जातात. वर्गणीदार सुमारें ११०० असून वसूल ५०९ प्रतींचा २५४॥ रुपये आलेला आहे.

## दरमहा खर्चाचा तपशील.

| | |
|---|---|
| २५॥ | छापणावळ. |
| ५ | लेखकांस मोबदला. |
| ३ | जागेचें भाडें ( ऑफिसाचें ). |
| २ | वांटणावळ ( मुंबईंतील ). |
| ३ | डांक खर्च, मासिकाचा. |
| १॥ | पत्रव्यवहार इतर प्रकारचा. |
| ४० | |

या प्रमाणें दरमहा खर्च आहे सालाचा ४८० रुपये खर्च असून, आजपर्यंत सुमारें २५० रुपये उत्पन्न झाले आहेत. सर्व वर्गणी आगाऊ वसूल होती, तर आर्य काळे यांच्या कुटुंबास २० वीस रुपये राहिले असते. पण वर्गणी निम्मे सुद्धां वसूल झाली नाहीं. व राहिलेल्या वर्गणीपैकीं कांहीं वर्गणीदार बुडवितील व कांहीं मागाहून देतील, अशी येणारी खूट मनांत आणिली, तर हें मासिक पुस्तक बंद करावें लागेल, किंवा कर्ज काढून पुढील आशेवर बसावें लागेल, या वांचून अन्य मार्ग दिसत नाहीं.

ज्यानें आपलें तनु—मन देशकार्याकडे लावण्याचा निश्चय

केला, त्याच्या संबंधानें इतकी अनास्था असावी, हें दुर्भाग्यच होय. व अशी स्थिति राहील तर मासिक पुस्तक बंद केल्यावांचून दुसरा श्रेयस्कर मार्ग नाहीं. आर्य काळे, यांच्या कुटुंबास कांहीं लोक मदत करीत आले आहेत, व पुढेंही कांहीं दिवस करितील. हें खरें; पण मासिक पुस्तक काढण्याच्या हेतूं पैकीं 'आर्य काळे यांच्या कुटुंबास मदत व्हावी,' हा हेतू निष्फळ होईल. व पुस्तक बंद झाल्यानें संस्थेची सर्व प्रकारची चळवळ समजण्यास मार्ग राहणार नाहीं.

हल्लीं आर्य काळे जागोजाग पैसा फंडासाठीं फिरत आहेत. व जेथें जातील तेथें त्यांस वर्गणीदार मिळत आहेत हें खरें. पण सर्व वर्गणी वसूल होईलच असा भरंवसा कोठें आहे? ह्मणून जेवढे आगाऊ वर्गणीदार असतील, तेवढेच कायम वर्गणीदार धरून चाललें पाहिजे.

जोंपर्यंत पैसा फंडाची संस्था आहे, तोंपर्यंत त्या संस्थेचें मासिक पुस्तक तरी असावें, हें कोणी नाकबूल करील असें वाटत नाहीं. ह्मणून आमच्या आर्य बांधवांनीं हस्तें परहस्तें मदत करून व रोख वर्गणी देऊन आपल्या वरचा तरी दोष नाहींसा करावा. कळावें, लोभ असावा ही विनंति.

राई, भाईंदर.<br>२२–२–०४. मोरो सदाशिव मराठे.

# श्री निर्मळमहात्म्य अथवा परशुराम विजय.

पुण्यक्षेत्राची उत्पत्ती । श्रवण करितां सादरें चित्तीं ॥
पाविजेगा भुक्ती मुक्ती । अंतीं पावती मोक्षपद ॥ ९ ॥

श्री निर्मळमहात्म्य.

श्री निर्मळमाहात्म्य अथवा परशुरामविजय ह्या ग्रंथाची एक प्रत रा. रा. आठवले आणि कं० यांजडून आमचेकडे अभिप्रायार्थ आली आहे. तिचा आह्मी साभार स्वीकार करितों. निर्मळ हें क्षेत्र वसई व आगाशी यांचे दरम्यान सुमारें मध्यावर आहे. ह्या टिकाणीं जगद्गुरू 'श्रीमच्छंकराचार्य' ह्यांच्या पादुका असून सदरहु ग्रंथांत वर्णलेल्या इतर देवता आहेत, ही एक पारलौकिक सोय आहे; परंतु वृक्षाच्छादित सुंदर व हवाशीर टेंकडी व निर्मळ पाणी ह्या दोन गोष्टींच्या योगानें पहाणाराचें मन रमून जातें व त्यांस असें वाटतें कीं, सृष्टिदेवीनें आपलें सौंदर्यभांडार खुलें करून टाकिलें आहे कीं काय नकळे? ह्यामुळें ही जागा यात्रेकरू लोकांस व हल्लींच्या रीतीप्रमाणें हवा खाणाऱ्या शौकीन लोकांस खाशी सोइस्कर झाली आहे.

सदरहू ग्रंथ प्रासादिक आहे ह्मणून अंतरंगाविषयीं तर कांहींच बोलतां येत नाहीं; परंतु येवढें मात्र आश्चर्य वाटतें कीं, त्यांत आचार्यां संबंधीं कोठें उल्लेख आला नाहीं. आतां हें खरें आहे कीं, सदरहू ग्रंथ पद्मपुराणांतर्गत एका कथानकाचें भाषांतर होय तर या वेळीं शंकराचार्य

कोठून येतील? खरें आहे, परंतु भाषांतरकारानें तर या गोष्टीकडे लक्ष द्यावयास नको होतें काय? कदाचित् त्यांस तसें करण्यास शंकराचार्यांची संमत्ती नसेल? असो; आमच्या देशांतील धर्मौदासीन्यामुळें जे जे अमूल्य ग्रंथ मागें पडत आहेत त्यांपैकीं हा एक असून तो छापून सर्वांच्या नजरेस आणून दिल्याबद्दल सदरहू कंपनीचे सर्वांवर उपकार आहेतच. शिवाय त्यांतील उत्पन्नाचा $\frac{1}{4}$ भाग अत्यावश्यक जो "पैसाफंड" त्यास मिळाणार आहे. तरी सर्व भाविक लोक, आमचे सर्व वाचक व "पैसाफंड" हितेच्छु हा ग्रंथ संग्रहीं ठेवून ह्या ऐहिक व पारलौकिक कृत्यास मदत करतील अशी आशा आहे.

---

# वर्तमानसार.

लोकमान्य **बाळ गंगाधर टिळक** पैसा फंडाचे खजिनदार हे त्यांजवरील आलेल्या आरोपांतून मुक्त झाल्यामुळे त्यास गांवोगांवीं पान सुपाऱ्या होत आहेत.

येथील ताबूत कांहीं कारणानें मोहोरमच्या दिवशीं उठविलेच नाहींत! प्रेक्षक मंडळीची बरीच निराशा झाली!

खानदेशांत येवलें गांवापासून सुमारें बाराकोसांवर एक नांदूर भदमेश्वर नांवाचें खेडें आहे; तेथें पाट खोदण्याचें काम चाललें असतां वीस हात लांबीचा एक मनुष्याच्या हाडांचा सांपळा सांपडला आहे! तो मुंबईस आणल्याचें ऐकतों.

आमचे व्यवसाय बंधु **हरिकिशोर** कर्ते ह्यांनीं आपल्या प्रत्येक वर्गणीदारामागें अर्धा आणा ह्या प्रमाणें 'पैसा फंडा' स मदत करून आपल्या सुवर्तनाचा कित्ता इतरांस घालून दिला ही मोठी समाधानाची गोष्ट होय.

आजपर्यंत जमलेला फंड सुमारें रु. ४५० आहे असें केसरी वरून समजतें.

( पिवळ्या ५ व्या पानावरून पुढें चालू ).

रोजीं संध्याकाळीं नेटिव लायब्ररींत सभा भरली. रा. फडके वकील बी. ए. एल्. एल्. बी अध्यक्ष होते. कल्पना पसंत पडली. कमेटी स्थापन झाली. राव साहेब महाजनी हे अध्यक्ष ठरले आहेत. रात्रीं ८ वाजतां सभा आटपली. २ कोसांवर झोंपड्यांतून राहणारांच्या सोयीकडे लक्ष देऊन आंकडे वगैरे घेण्याचें काम मागाहून करण्याचें ठरविलें. येथें मा. पु. ला १ ही वर्गणीदार मिळाला नाहीं ! दुसरे दिवशीं दोघा तिघा मुलांनीं मिळून १ प्रत घेण्याचें ठरविलें. नंतर दुपारीं शेगांव येथें गेलों. डा. कोल्हटकर यांनीं टिकीट काढून दिलें. येथें गणपती महाराज नांवाचे एक फार प्रसिद्ध साधु राहतात. यांचें दर्शन घेतलें. हे सर्वदा ध्यानमग्न असतात. कधीं कधीं नग्नही असतात, असें ऐकलें. एक पाटील घरदार बायको मुलें सर्व सोडून यांच्या भजनीं लागलेला आढळला. याला कांहीं चमत्कार झाला असें ह्मणतात. कांहीं वेळ बसल्यावर 'पडून रहा' व आणखीं कांहीं वेळानें 'आतां जा' असे शब्द काढले ! यांतील भावार्थ परमेश्वर जाणे ! संध्याकाळीं रा. देशमूख मास्तर यांच्या सल्ल्यानें दुसरे दिवशीं सभा भरविण्याचें ठरविलें. सकाळीं कॉटन मार्केट मध्यें सभा भरली. धरून आणून बसविलेली मंडळी पाहून बोलावें असें वाटेना. तरी १५ मिनिटें बोललों, यामुळें बरोबर काम झालें नाहीं. मा. पु. ला मात्र ६ वर्गणीदार मिळाले !

रा. देशमूख यांनीं खामगांव येथें पोंचविलें. रा. तांबे

यांनीं पत्र दिलें होतें, ह्मणून रा. सहस्त्रबुद्धे यांच्या घरीं उतरलों रा सहस्त्रबुद्धे यांनीं चार मंडळींची ओळख करून दिली, व रविवारीं संध्याकाळीं सभा भरविण्याचें ठरविलें. मंडळी फार नव्हती. व्याख्यान २ तास झालें. रात्र फार झाली, याभुळें कमेटी स्थापन झाली नाहीं. पुढें करूं असें रा. आणेकर वकील यांनीं सांगितलें. रा. सहस्त्रबुद्धे यांनीं मा. पु. घेण्याचें कबूल केलें व मलकापूर येथें पोंचविलें. सार्व० कामीं जरा लक्ष्य देईल, त्यासच विशेष भार पडतो, दुसऱ्यास १ पैचीही झीज सोसावी लागत नाहीं, ही स्थिती कधीं बदलेल तो सुदीन! मलकापूर येथें आल्यावर पैसा फंडाची 'स्पेशल' सभा भरविली. सर्व लोकांस कळण्यासाठीं हस्तपत्रकें स्वयंसेवकांच्या नांवासह छापण्याचा ठराव झाला. कोणत्या स्वयं० ला कोणता ब्लॉक ( भाग ) द्यावयाचा याचा विचार करण्यासाठीं ता० १९ रोजीं पुनः सभा होणार आहे. मंडळींचा निरोप घेऊन भुसावळ येथें जाण्यास निघालों. रा. वासुदेव रावजी पिंपळीकर यांनीं टिकीट काढून दिलें. गेल्या खेपेस यांनीं चाररुपये दिले होतें! एकावर भार पडूंनये, अशी माझी इच्छा असतां अद्यापि असा प्रकार चालू आहे. मतलब सिंधु आहे, तोंपर्यंत असाच प्रकार चालणार! रा. दत्तोपंत जुवेकर वकील बी. ए. एल्. एल्. बी यांच्याकडे उतरलों. सार्व० काम असल्यामुळें हे मला सभा भरविण्याच्या कामीं साहय

करतील अशी आशा वाटत होती परंतु ती निष्फळ झाली. नंतर रा. गोकटे वकील यांची भेट घेतली. त्यांनीं नुसतें नांव ऐकूनच सभा भरविण्याची तयारी केली. एक दोन गृहस्थांच्या सल्ल्यानें गुडीपाडव्याच्या मुहूर्तानें सभा ठरली. हस्तपत्रकें छापून प्रसिद्ध झालीं. श्रीराम मंदिरांत संध्याकाळीं रा. चिंतोपंत वाड वकील यांच्या अध्यक्षतेखालीं सभा भरली, रजा असल्यामुळें पुष्कळ लोक आले होते कल्पना पसंत पडून कमेटी स्थापन झाली. आंकडेही पडले. येथील मंडळीच्या मनावर परिणाम होणें बाजूसच राहिलें, परंतु येथें सभा होईल कीं नाहीं, याचाच संशय प्रथम उत्पन्न झाला होता. परंतु रा. गोगटे व रा. वाड व रा. जोशी यांनीं मनावर घेतलें, ह्मणूनच हा योग आला! रा. गोगटे यांनीं तर फारच कळवळ्याचें भाषण करून श्रोत्यांस द्रव आणिला! मा. पु. बद्दल कोणी विचार केला असें वाटत नाहीं. १ ही वर्गणीदार मिळाला नाहीं येथून पदरमोड करून जळगांव येथें आलों. येथून उद्यां चाळीसगांव येथें जाणार आहें.

जळगांव जि. खानदेश<br>१९।३।०४ } अं. दा. काळे.

---

**पैसा फंडाची कल्पना** हें लहानसें पुस्तक छापून तयार आहे. यांत पैसा फंडाविषयीं सर्व माहिती दिली आहे. किंमत एक पैसा आहे. जास्त घेणारास योग्य कमिशन.

परचुरे, लेले आणि कंपनी, कमिशन एजन्ट्स.

चंद्रबाग, माधवबागेनजीक-मुंबई.

# संगमनेरकर दामले वैद्य

## यांचीं केवळ वनस्पतीचीं रामबाण औषधें.

पानथरी (प्लीहा) वर–हिंवतापानें होणारे पोटांतील डावे आंगचे गांठीवर हें औषध सुरू होतांच भूक लागून शक्ति येते व पानथरी ७ दिवसांत जाते. रोग जुना व मोठा असेल तर २।३ डबे लागतात. डबी किं. १२ आ.

शूल दावानल–अर्थात पोटशूळ–भोजनानंतर दुखणारे परिणाम शूळावर, व ओटी माकडहाडाचे ठिकाणचेही शूळ १४ दिवसांत बरे होतात. किंमत १ रुपया.

हिंवबाण–एक दिवसाआड, रोजचा व चातुर्थिक हिंवताप ह्या औषधानें ३ वेळांतच बंद होतात. किं. ८ आ.

मूळव्याध–रक्ती व मोडाची हटकून २१ दिवसांत दूर होते, ठणका राहून शौचास साफ होतें. रक्त तिसरे दिवशीं बंद. किंमत १ रुपाया.

शरीरमित्र–सर्व प्रकारचे धातूविकार, स्वप्नावस्था, ह्यांजवर केवळ वनस्पतीचें शास्त्रोक्त औषध मित्राप्रमाणें साह्य करितें. शौचास साफ करून धातु घट्ट होते. व सर्व व्यापार पूर्वीप्रमाणें सुरळित चालतात. २१ दिवसांचे औषधाची किंमत १ रुपया.

स्त्रियांचे सर्व प्रकारचे विकार–(धुपणी) तांबडी, पांढरी ह्यांजवर झाडपाल्याचें औषध अति उत्तम व अनुभवशीर आहे. १४ दिवसांत गुण. किंमत १ रुपाया.

परम्यावर–मूत्रेंद्रियांतील आग पहिले दिवशीं बंद. ७ दिवसांत पू बंद होऊन उत्तम गुण कायमचा येतो. १॥रु.

पत्ता—वि. बी. दामले, संगमनेरकर वैद्य;
बुधवार पेठ किब्यांचा वाडा, पुणें

रजिस्टर नंबर बी० ४५१

# ॥ सोपें औषध परी गुणवंत ॥

दासबोध.

**व्याधिहरण**—या औषधाप्रमाणें क्षयरोग व बाळंतरोग यांवर दुसरा रामबाण उपायच नाहीं. यानें बिघडलेलें रक्त शुद्ध होऊन, ताजें रक्त त्वरित उत्पन्न होतें. फार जुना जीर्णज्वर हें औषध फक्त ३ वेळ घेतल्यानें साफ बरा होतो.

व्यापारी व विद्यार्थी यांस मानसिक श्रम फार होतात, त्यांनां यापासून फार मोठा फायदा आहे. किं. १ बा. रुपया. ४ बाटल्यांस ३ रुपये. टपाल व्ही. पी. खर्च निराळा.

**आरोग्यामृत**—ह्यानें गोंवर, कांजिण्या, देवी व ताप यांपासून अंगीं राहिलेली कडकी नाहींशी होऊन शरीर सदृढ व बळकट होतें. पिण्यास हें अतिशय गोड असल्यामुळें लहान मुलें तें फार आवडीनें पितात. किं. १ बा. १ रुपया. ३ बाटल्यांची २॥ रुपये. व्यापारी लोकांस भरपूर कमिशन मिळेल.

**उपदंशारि**—गर्मी, परमा, बद, टणका, इत्यादि उपदंश संबंधी विकारावर अत्युत्तम उपाय. परमा कितीहि वर्षांचा जुना असला तरी हें औषध २ दिवस घेतल्यानें साफ बरा होतो. किं. १ बा. २ रुपये ३ बाटल्यांस ५ रुपये. शिवाय खालील औषधें आमचे कडेस मिळतील.

प्रवाळभस्म ( चंद्रपुटी ) १ तोळा.१ रुपया.

सुवर्णमाक्षिक भस्म, १ तो. १ रु.

लोहभस्म १ तो. १ रुपया.

खोकल्यावर गोळ्या ( १२ गो. ड, ) ८८.

सर्दीवर गोळ्या. ( १२ गो. ड. ) ८८.

प्रदररिपु. १ तो. १ रुपाया.

शूलदावानल ५ तो. १ रुपया.

गुळवेलसत्व ( खात्रीचें) १ तो. ८४

कचोरा सत्व १ तो. ८२

**पत्ता**—धी ग्रेट मर्कंटाईल कंपनी. गुहागर, जि. रत्नागिरी.

**सूचना**—अर्धा आण्याचें तिकिट पाठवून क्याटलाग मागवा.

वर्षाची वर्गणी ८ आणे. ट: ख. ३ आणे.
एका नांवावर ६ प्रती गेल्यास ट० खर्च माफ. फुट०ःअं० १ आणा.

# "पैसा फंड"

## मासिकपुस्तक.

वर्ष १ लें. ] मे १९०४. [ अंक ११ वा.

### विषयानुक्रमणिका.

| विषय. | पान. |
|---|---|
| व्यापार व परराज्य | १३१ |
| शेतकी | १३७ |
| स्फुट विचार | १३९ |
| पत्रव्यवहार | १४२ |

मुख्य एजंट-पुरंदरे आणि कंपनी-माधवबाग मुंबई.

हें पुस्तक अंताजी दामोदर काळे यांनीं मुंबईत
विजय छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

शेतकी पंचांग-किं. १ आणा मुंबईत विजय छापखान्यांत मिळेल.

# माझा प्रवास.

ता. १९ मार्च रोजीं जळगांव येथें किर्लोस्कर मंडळीचा खेळ पाहण्यास गेलों होतों. तेव्हां म्यानेजरांच्या परवानगीनें १० मिनिटें बोललों. गेल्या जानेवारींत येथें व्याख्यान झालें, त्यावेळीं फार थोडी मंडळी सभेस आली होती. ह्मणून दुसरें व्याख्यान द्यावें अशी कांहीं मंडळींनीं सूचना केली, ती योग्य वाटल्यावरून मी चाळीसगांवास न जातां तेथेंच राहिलों. या वेळीं येथें दोन नाटक मंडळ्या होत्या. त्यांच्या मनावर परिणाम झाल्यास पैसा फंडाला थोडी बहुत मदत मिळेल असें वाटल्यावरून मागच्याप्रमाणें प्रमुख लोकांच्या सह्यानिशीं आमंत्रणचिठ्या काढिल्या. रा. फडणीस यांनीं याही खेपेस त्या फुकट छापून दिल्या. ता. २० रोजीं किर्लो॰ च्या नाटक गृहांत माझें व्याख्यान झालें. मंडळी १५० होती. कल्पना पसंत पडली. रा. खांबेटे वकील यांनीं सुरस भाषण केलें व या प्रश्नाकडे दुर्लक्ष करूं नका अशी श्रोत्यांस विनंति केली. त्यांनीं असेंही सांगितलें कीं "सातारा येथील कान्फरन्समध्यें यांनीं हा प्रश्न काढला होता त्यावेळीं यांची कल्पना मूर्खपणाची आहे, अशी माझी समज झाली होती. परंतु कळविण्यास मला आनंद वाटतो कीं रा. काळे यांनीं दृढ निश्चयानें हें काम चालू ठेविलें यामुळें आज मी यांच्या पक्षास मिळालों आहें. असाच यांचा प्रयत्न चालू राहिला तर कांहीं दिवसांनीं बहुतेक थोर लोक यांस अनुकूल होतील, असें मला वाटतें" रा. खांबेटे हे येथील कमेटीचे चेअरमन असून प्रमुख वकील आहेत, यांच्या मागून १।२ इसमांनीं भाषणें केलीं त्यांचा सारांश, पुणें, मुंबई, येथें वजनदार लोकांची कमेटी स्थापन झाल्याखेरीज या प्रश्नाला रूप येणार नाहीं, असा होता. अध्यक्षांचे उपकार मानतांना रा. शंकररावजी मुजुमदार यांनीं सांगितलें कीं परदेशी माल वापरणारांस शिव्या न देतां सौम्य शब्दांनीं उपदेश केल्यास काम चांगलें व लवकर होईल असें मला वाटतें. तसेंच मुख्य कमेटी स्थापन होऊन याला कांहीं रूप आलें ह्मणजे मग किर्लो॰ मंडळी याही फंडास मोठ्या आनंदानें मदत करील. नंतर रात्र बरीच झाल्यामुळें सभा आटोपणें भाग पडलें. दुसरे दिवशीं नाट्य-

कला० मंडळीची भेट घेतली. त्यांनीं "पुढें पाहूं" असें आशीर्वादात्मक उत्तर दिलें. अ व ब यांनीं प्र० खर्चासाठीं १॥ रुपया दिला. येथून मी नसिराबाद येथें गेलों. हा गांव मोठा असून येथें कांच काम चांगलें होतें. ता. २३ रोजीं मोठ्या श्रमानें कांहीं मंडळी विष्णु मंदिरांत जमली. कल्पना पसंत पडली. मंडळी फंड देण्यास तयार झाली परंतु गांवापुरतें काम करण्यास कोणी स्वयं० मिळेना. रा. चौधरी पाटील यांनीं सांगितलें कीं, आमच्यापाशीं कोणी फंड आणून देईल तर तो आह्मी केसरीकडे पाठवूं. आह्मी कोणाकडे मागावयास जाणार नाहीं, हे गृहस्थ शिक्षित व समंजस आहेत. सबब यांची समजूत केली तेव्हां हे स्वयं० चें काम करण्यास तयार झाले! दुसरे दिवशीं यांनीं कांहीं वर्गणी वसूलही केली, मासिक पुस्तकाला १ ही वर्गणीदार झाला नाहीं. १२ अंक घेऊनही ८ आणे देण्याची इच्छा होत नाहीं, व नाटक व तमाशे यांच्या प्रीत्यर्थ किती पैसा खर्च होतो, इकडे लक्ष्य दिलें ह्मणजे समाजाला कसें वळण लागलें आहे व तें बदलणें किती जरूरीचें आहे, हें सर्वांच्या लक्षांत येईल. असो, येथून मी एरंडोल येथें जावयास निघालों. ग व घ यांनीं मिळून टिकीट काढून दिलें. धरणगांव स्टेशनवर रात्रीं उतरलों. सकाळीं गांवांत जाऊन रा. काळभाई शुक्ल यांची भेट घेतली. यांनीं एरंडोल गांव आटपून मग येथें या असें सांगितलें. जेवल्यानंतर त्यांच्याच गाडींतून मी एरंडोल येथें गेलों रा. चौधुले वकील ( जळगांव ) यांनीं रा. खरे वकील यांस पत्र दिलें होतें, यामुळें उतरण्याची पंचाईत पडली नाहीं. यांनीं व रा. भय्याराव काळकर यांनीं मेहेनत करून ता. २६ रोजीं सभा भरविली. कल्पना पसंत पडून कमेटी स्थापण्यांत आली रा. काळकर यांच्यासारखे तरुण, सुशिक्षित, स्वदेशभक्त स्वयं० मिळाल्यामुळें येथें काम चांगलें होईल अशी आशा आहे.

अनेक ठिकाणीं पुष्कळ स्वयं० देशकार्यास्तव मोठ्या उमेदीनें काम करण्यास तयार झाले, परंतु त्यांचा उत्साह लवकरच जिरून जाऊन ते अगदीं थंडगार पडले! तसा प्रकार रा. काळकर यांचा न होवो अशी मी परमेश्वरापाशीं विनंति करितों. रा. काळकर यांनीं १ दिवस मला

मुद्दाम ठेऊन घेतलें. दुसरे दिवशीं त्यांच्या बरोबर मी 'पद्मा-लय, तीर्थ पाहिलें. येथें गोविंदबोआ हे एक साधू राहतात. त्यांची इकडे फार प्रसिद्धि आहे. अकोल्याचे प्रसिद्ध वकील रा. देवराव बाबा हे यांचे शिष्य आहेत, इतकें सांगितलें ह्मणजे यांची योग्यता सहज कळून येईल. हे काशी येथें कावड आणण्यासाठीं गेले होते, त्यामुळें दर्शन घडलें नाहीं. हे दररोज १२०० नमस्कार घालतात, यामुळें यांचें शरीर उतार वय :असतांही तांब्याप्रमाणें खणखणीत आहे. परदेशी माल पाहून यांच्या आंगाची आग होते हें ऐकून मला फार आनंद वाटला. यांनीं भिक्षेवर अवाढव्य काम सुरू केलें आहे. यांनीं पैसा फंडाला मदत करण्याचा विचार केला तर हां हां ह्मणतां कार्य होईल. परंतु ह्या हतभागी देशाचें दैव उघडेल तेव्हां ना? रा. फाळकर यांनीं पांडवांचा वाडा दाखविला. संध्याकाळीं मी कागदाचे कारखाने पाहिले. येथील कागद अहमदाबादच्या सारखेच आहेत. परंतु हलकेपणा हा गुण यांत जास्त आहे. परंतु यांस उत्तेजन कोण देणार? रा. फाळकर यांनीं प्रवास खर्चासाठीं १ रुपया दिला व कुटुंब मदती साटीं दरमाहा ८४ देण्याचें कबूल केलें! यवतमाळ सोडल्यावर, कुटुं-बाबद्दल कळकळ दाखविणारे हेच एक गृहस्थ दिसले. यांनींच मला धरणगांवास पोंचविलें. ता. २९ रोजीं रा. काळूभाई यांच्या खटपटीनें सभा भरली. कल्पना पसंत पडल्यावर शेट हीरालाल यांस खजिनदार नेमण्यांत आलें. येथील पैसा फंडाचा वसूल ताबडतोब झाला. व काळूभाई यांनीं मंडळींत यादी करून मला प्र० खर्चासाठीं १८१४ दिले! मा. प. ला १ वर्गणीदार मिळाला. नवीन वर्षापासून आणखी कांहीं वर्गणीदार होणार आहेत. या ठिकाणीं एक जातीचा दगड अतिशय दिसला. हा कांच करण्यास उपयोगी पडेल असें मला वाटतें. डा० वागळे यांनीं इकडे लक्ष द्यावें. येथून मी अमळनेर येथें जाव-यास निघालों. कांहीं मुलें मला पोंचविण्यासाठीं मुद्दाम स्टेशनावर आलीं होतीं. यांत १ मुसलमान होता. रा. भाऊ साहेब परांजपे यांचे घरीं उतरलों. यांनीं चौघांची ओळख करून दिली. व ता. २ रोजीं

लायब्ररींत व्याख्यान करविलें. मंडळी थोडी, होती तरी काम बरें झालें. छोटीं पुस्तकें २०० वांटण्याचा ठराव झाला. नवीन वर्षा पासून मा. पु. ला कांहीं वर्गणीदार होणार आहेत. येथून मी रा. परांजपे यांच्या बरोबर पारोळें येथें गेलों. यांनीं मंडळीची ओळख करून देऊन सभा भरेल अशी तजवीज केली. शेट हिरालाल, शेट गोवर्धनदास यांच्या खटपटीनें ता. ६ रोजीं गुजराथी आळींत सभा भरली. लोक २।३ शें आले होते. कल्पना पसंत. पडून कमेटी स्थापन झाली. नवीन वर्षा-पासून कांहीं गृहस्थ मा. पु. ला वर्गणीदार होणार आहेत. शेट गोव-र्धनदास यांनीं धुळें येथें पोंचविण्यासाठीं आपली गाडी दिली. येथून १२ कोस धुळें आहे. बैलांस त्रास न व्हावा ह्मणून अर्ध्या रस्त्यावर मुकटी ह्मणून गांव आहे, तेथें उतरलों व गाडी परत पाठविली. दुपारीं कांहीं शेतकरी बोलावून त्यांस शेतीची थोडी माहिती सांगितली. रा. गट्टु पाटील यांनीं गाडी देऊन धुळें येथें पोंचविलें. रा. माधवराव गद्रे माजी सरकारी वकील यांच्या घरीं उतरलों. यांनीं आपलें लक्ष देश कार्या-कडे लावण्याचा निश्चय केला आहे, हें ऐकून बरें वाटलें. यांनीं कांहीं गृहस्थांच्या घरीं जाऊन त्यांस असें सांगितलें कीं, सेंट्रल कमेटी कधीं होईल ती होवो. परंतु खानदेश जिल्ह्यांत लोकांनीं खटपट केली तर आपणांस सगळ्या जिल्ह्यामधून वार्षिक ३ हजार रुपये वसूल करतां येणें कठीण नाहीं. व असें झालें तर जपानांत जाणाऱ्यास ५० रुपये दरमाहा स्कालर्शिप देऊन तो मनुष्य शिकून परत येत आहे, तों कारखाना काढण्यासाठीं लागणारें भांडवल तीन चार वर्षांत १० हजार सहज जमेल, या महत्वाच्या कामीं सुशिक्षित लोकांनीं जास्त लक्ष्य दिलें तर कार्य लवकर होईल. या फंडापासून इष्ट कार्य न झाल्यास ज्याचे पैसे त्यास परत देण्याची मी हमी घेतों. खात्री नसेल तर स्टांपा-वर लिहून देतों. यानेंही खात्री नसेल तर ६० हजार रुपयांचें इस्टेट जामीन देतों! यांनीं असे शब्द काढतांच दोन तासांत दरमाहा १ रुपया देणारे ८ इसम मिळाले!! पुढारी लोकांनीं लक्ष्य दिल्यावर कोणत्याही कार्यास किती जोर येतो, याचें हें उत्कृष्ट उदाहरण होय. रा. गद्रे यांनीं कुटुंबाच्या मदतस्तिव ५ रुपये दिले शिवाय चाळीस

गाडीचें टिकिट काढून दिलें, व रा. रा. नारायणराव परांजपे यांस पत्र देऊन माझी उतरण्याची सोय केली. रा. बाबाजीराव राणे यांनीं खेळ कबूल केला होता, ह्मणून मी मुद्दाम येथें आलों. रा. यशवंतराव देशपांडे, गणपतशेट भावसार वगैरे मंडळीच्या खटपटीनें ता. १३ रोजीं सभा भरली. थोडे गृहस्थ सभेला आले होते. कल्पना पसंत पडल्यावर कमेटी स्थापन झाली. दुसरे दिवशीं कांहीं लोकांचे आंकडे पडले. ६ इसमांनीं मा. पु. घेण्याचें कबूल केलें. रात्रीं रा. राणे यांची भेट घेतली. त्यांनीं सांगितलें कीं, 'सेंट्रल कमेटी स्थापन करा, ह्मणजे आह्मी खेळ देऊं. केसरीकर्त्यांचा जसा कल वास्तविक असावा तसा दिसत नाहीं. यामुळें कळकळ उत्पन्न होईल असा त्यांचा लेख येत नाहीं. यासाठीं आतां पुढं कोठें न जातां पुणें येथें जाऊन व्याख्यान द्या.' एकदम इतकें लांब जाण्याची अडचण पडूं नये, ह्मणून त्यांनीं पुण्यापर्यंतचा खर्च दिला. रविवारीं शिवजयंती असल्यामुळें त्या गडबडींत माझें व्याख्यान होणार नाहीं, असें वाटल्यावरून मी निफाड येथें उतरलों. रात्रीं कुंदेवाडीस देवळांत सभा भरवून शेतीची माहिती दिली. सकाळीं पिंपळगांव येथें जाऊन रा. मुके वकील यांच्या घरीं उतरलों. यांची माझी पूर्वीची ओळख होती. यांनीं संध्याकाळीं चार संभावित गृहस्थांची ओळख करून दिली. ता० १७ रविवार रोजीं येथील लायब्ररींत रा. भिडे वकील यांच्या अध्यक्षते खालीं सभा भरून प्रथम शिवस्तुतीपर दोन पद्यें ह्मटल्यावर माझें भाषण झालें. माझ्या मागून एकदोन इसमांनीं भाषण केल्यावर कल्पना पसंत पडून कमेटी स्थापण्यांत आली. जागच्या जागीं वार्षिक १५ रुपयांचे आंकडे पडले. आणखी कांहीं आंकडे पडणार आहेत बाजारचा दिवस असल्यामुळें पुष्कळ मंडळीस सभेला येववलें नाहीं. त्यांच्यासाठीं

दुसरे दिवशीं दुसरें व्याख्यान झालें. पुष्कळ लोकांनीं कल्पना पसंत करून मदत करण्याचें कबूल केलें. रा. भिडे वकील यांनीं स्वयं से० चें काम पत्करिलें. रा. मुके वकील यांनीं प्र. खर्चासाठीं २ रु. दिले. येथून मी बैलगाडींतून नाशिक येथें आलों. रा. काळे, नाशिककर

( पुढें चालू. )

# पैसा फंड

मासिक पुस्तक.

वर्ष १ लें. ]        मे, सन १९०४.        [ अंक ११ वा.

## व्यापार व परराज्य.

" Upon the extermination of a native State, ...... the little Court disappears—trade languishes—the Capital decays—the people are impoverished—the englishman Flourishes and acts like a sponge, drawing up riches from the banks of the Ganges and Squeezing them down up on the banks of the Thames" *

A Plea for the princes of India P. 67.

आमच्या राष्ट्रास जर उन्नतावस्था प्राप्त होणार असेल तर त्यास केवळ व्यापार व शेतकी हींच महा साधनें होत अशी आतां सर्वांची खात्री झाली आहे. पोटाच्या मागें लागलेल्या प्रत्येक मनुष्यास अशा इच्छा उत्पन्न होऊं

* " एतद्देशीय संस्थानची इति श्री झाल्यावर ..... तेथील छोटेखानी दरबार ' राम ' ह्मणतें, व्यापारास उतरती कळा लागते, राजधानीही त्याच पंथास लागते, प्रजाजन भुके बंगाल होतो, व इंग्लिश मनुष्याचा ( कमिशनराचा ) वरचष्मा होऊन तो एखाद्या आगांतुका-प्रमाणें सारखा पैसा उकळून स्वदेशाची धन करित असतो."

लागल्या आहेत कीं, देशांत आतां कारखाने निघावेत, धनिकांनीं गरिबांस हातांशीं धरून आपलें व त्यांचें हित करून घ्यावें, मेघ राजानें वेळच्यावेळीं पडून शेतकीस योग्य ती मदत करावी, तीस ताजीतवानी करून एकंदर प्रजाजनांची दैना घालवावी व त्यांस सुखाचे चार दिवस तरी दाखवावे. सारांश, क्षुधितांस जसें गोळाभर अन्न अगर तृषितांस जसें घोटभर पाणीच पाहिजे असतें त्याप्रमाणें साक्षात मृत्यूच्या कराल दाढेंत सांपडलेल्या आमच्या देशास हातपाय हालविण्यास **व्यापार** व **शेतकी** हीं दोन साधनें योग्य आहेत.

त्या पैकीं आज दुसऱ्या साधनाचा विचार कर्तव्य नाहीं तर, पहिलें साधन जें **व्यापार** त्याविषयीं थोडा बहुत उहापोह करावयाचा आहे; कारण त्याचा उपयोग करण्याचें जर मनांत आलें तर आमच्या व्यापाराचें बस्तान नीट बसणार नाहीं, त्यांत आह्मांस योग्य तो नफा होणार नाहीं तसेंच आमचें सरकार परकीय पडल्यामुळें आमच्या व्यवसायांत त्या कडून कांहीं अडथळे येतील अशा शुष्क शंका आमच्या लोकांच्या मनांत येत चालल्या आहेत, तरी त्यांचें निराकरण करून व्यापारास प्रोत्साहन देणें हें आमचेंच काय पण प्रत्येक देशहितेच्छुचें आदिकर्तव्य आहे.

आमच्या व्यापाराची सांप्रत कशी स्थिति आहे ह्याचा विचार आह्मी त्रोटक रीतीनें मागें केलाच आहे. आमच्या

देशांत ईस्ट इंडिया कंपनी येण्यापूर्वी येथें लक्ष्मी सर्वत्र सारखी नांदत होती, पीकपाणी योग्य असे व चोहोंकडे आबादानी होती ही गोष्ट परकी लोक सुद्धां कबूल करितात. कंपनी बया इकडे आल्यावर एतद्देशीय वस्तूंनीं परदेशीयांची अन्तःकरणें आकर्षित झाल्यामुळें तर आमचा व्यापार वाढूं लागला ही गोष्ट मागील अंकीं सांगितलीच आहे; पुढें इकडील धंदे बुडविण्यास त्यांचेपाशीं नोकरी हा खासा उपाय होताच. दोनतीन इंग्रजी "बुकें" झालीं कीं चाळीस पन्नास रुपयांची नोकरी मोठ्या प्रतिष्ठेनें मिळे. ह्यामुळें सोनार, सुतार, कासार, कोष्टी वगैरे सर्व धंदे वाल्यांनीं आपापले धंदे टाकून देऊन ह्या पैसा मिळण्याच्या अल्प–साधनाची पाठ धरली. अशा रीतीनें आमच्या देशांतील एकेक धंदा बुडाल्यामुळें सर्वांसच नोकरी—परकीयांची अखंड गुलामगिरी—पत्करावी लागली. व तिचा अनिष्ट परिणाम आह्मांस कसा भोंवतो आहे तर साधारण सुशिक्षित गृहस्थास सुद्धां अन्नानें दिवस घालविणें जड जात आहे. ज्या कोष्ट्याचा बाप आपला हातमाग चालवून आपल्या कुटुंबाचा चरितार्थ चांगला चालवीत असे व वेळानुसार पोराबाळांकरितां चार पैसे मागें टाकित असे त्याच कोष्ट्याची आजची स्थिति पहा बरें! हातमाग तर हातांतून गेला; बरें, एखाद्या गिरणींत नोकरी धरावी तर तीही दुर्मीळ! आमच्या हातांतून व्यापार गेला मात्र, तोंच आह्मांस वरच्यासारखी भयंकर स्थिति प्राप्त होऊन तिचा

परिणाम असा झाला कीं, आह्मांपैकीं शेकडां २९ लोकांस पोटभर अन्नही मिळत नाहीं! एकंदरींत आतां नोकरीही नाहीं व व्यापार करूं ह्मटल्यास भांडवल नाहीं, जर कांहीं थोडें बहुत असलेंच तर व्यापाराची चांगली माहिती नाहीं, ह्यामुळें हेंही नाहीं व तेंही नाहीं अशी आमची सांप्रत स्थिति आहे!!!

येथवर भांडवलाविषयीं व्यक्तिविषयक गोष्ट झाली; ह्मणजे कोणा एका मनुष्याजवळ एखाद्या परकीय व्यापाराशीं टक्कर मारण्यापुरतें भांडवल नाहीं. ह्मणून राष्ट्रांतल्याराष्ट्रां-तच भांडवल जुळवून नंतर त्या उद्योगास लागलें पाहिजे. तें भांडवल जमविण्यास पैसाफंड हाच उपाय आहे, तरी त्या उपायानें भांडवल जुळवून परकीय मालास चित करण्याचा प्रयत्न केला तर तो केवळ फुकटच जाईल असें आह्मांस वाटत नाहीं. परंतु हें काम करण्यास आमच्या देशबंधूंची —कीं ज्यांस आपल्या मातृभूमीचा थोडा तरी अभिमान असेल, तिची सांप्रतची हलाखी पाहून ज्यांची अंतः-करणें फाटून जात असतील व देश बंधूंची शोचनीय स्थिति पाहून ज्यांस रडें कोसळत असेल व काळिजाचें पाणी होऊन दुःस्थितीचा परिहार करण्याची ज्यांस इच्छा असेल त्यांची,—पूर्ण मदत असली पाहिजे, ह्मणजे "दसका लकडी एकका बोजा" ह्या न्यायानें ह्या अत्यावश्य कामाचा

बोजा तेव्हांच उठून भूमातेचे थोडेतरी हाल कमी होतील, देशबंधूंस उपाशी मरण्याची पाळी न येतां त्यांनीं काबा-डकष्ट करून उत्पन्न केलेल्या अन्नाचा कांहींतरी भाग त्यांच्या पोटांत जाईल व भोज विक्रम यांच्या वेळची स्थिति जरी नाहीं तरी त्यांस चार घांस सुखानें खातां येतील इकडे त्यांनीं लक्ष्य द्यावें.

आतां आमच्या कांहीं देशबंधूंच्या अशा कल्पना निघतात कीं, आम्ही इकडे पुष्कळ फंड जमविला, कारखाने उभारिले व देशी माल उत्पन्न करून परदेशी मालास चित् करण्याचा सारखा तडाखा चालविला तरी उपयोग काय? सरकार थोडेंच आह्मांस सहाय करणार आहे? व सरकार जोंपर्यंत आमच्या कामांत हात घालणार नाहीं तोंपर्यंत आमचें कोणतेंही काम नीट चालणार नाहीं! (आमेन्!) वरील कल्पना वरवर खरी दिसते, परंतु तींत कांहीं हांशील नाहीं. कारण, आमचें सरकार जरी आह्मांस औद्योगिक बाबतींत विशेष मदत करीत नाहीं तरी आम्ही कांहीं कारखाने काढून आपलें व आपल्या पोराबाळांचें हित करून घेण्याचा प्रयत्न केला तर दयाळु इंग्रज सरकार त्यांत कांहीं मोडता घालील, असें मुळींच नाहीं; उलट पक्षीं तें आह्मांस शक्य ती मदतही करील हें पुण्याच्या गिरणीचा कागद वापरावा ह्या ठरावावरून दिसतें. त्यांतून जरी कदाचित् सरकारनें तिकडे दुर्लक्ष्य केलें तरी आम्हीं आपले हातपाय कां गाळावे? आह्मांस

स्वतःच्या पायांवर उभे राहतां येऊं नये काय? पुढें मागें इंग्रज सरकार आह्मांस राजकीय पूर्ण मुकत्यारी देऊन स्वदेशीं जाण्याचाही संभव आहे, (निदान कित्येक न्यायप्रिय इंग्रज मुत्सद्दी तसें बोलून तरी दाखवतात) व तशी कदाचित् वेळ आली तर आमचा हा राज्यशकट कसा हांकला जाईल बरें? व्यापारासारख्या बाबतींत सुद्धां जर आमचे देशबंधू एका विवक्षित वर्गाच्या तोंडाकडे पाहून त्यांच्या उमेदीवर आपली कंबर बांधणार व त्यांनीं मौन स्विकारलें तर आपले हातपाय गाळणार तर पुढें व्हावें कसें? कॉंग्रेस सारखे समारंभ ज्या गणपतीच्या पूजनानें निर्विघ्नपणें पार पडतात त्याच्याच पूजनानें सर्व गोष्टी सिद्धीस गेल्या पाहिजेत. परंतु हें व्हावें कसें? आमच्या लोकांस फुकाचा मान मिळविण्याची जी एका प्रकारची विलक्षण हौस आहे ती जर जाईल, देशहिताकरितां स्वतःच्या पदरास खार लावण्याची बुद्धि जर त्यांस सुचेल व आर्यभूच्या पोटीं उत्पन्न झाल्याचा जर त्यांस यत्किंचितही अभिमान असेल तर त्यांनीं ही नसती हौस सोडून देऊन देशहिताच्या एखाद्या कृत्यास जातीनें खांद घातला पाहिजे. सारांश इंग्रज सरकारनें जरी आह्मांस मदत केली नाहीं तरी आमच्या देशबंधूंनीं हवालदील होऊन न बसतां नेटानें उद्योगास लागावें व तुकाराम महाराजांचें "निश्चयाचें बळ तुका ह्मणे तेंचि फळ" हें ह्मणणें खरें करून दाखवावें.

आतां असें करितांना त्यांस अनेक अडचणी येतील हें खरें आहे. म्यांचेस्टरवाले सरकारचे देशबंधू पडल्यामुळें त्यांचें उखळ ह्या देशांत पांढरें—पिंवळें ह्मटलें तरी सुद्धां चालेल—झालेंच पाहिजे, ह्मणून ग्लासगोवाल्यांस; जकात माफ करा, म्यांचेस्टर वाल्यांस कमी करा, त्याच मानानें इकडे मात्र वाढवा अशी कांहीं नसतीं कुलंगडीं मध्यें येतील खरीं, परंतु तीं व्यर्थ आहेत. कारण, ह्या कामास जरी आह्मांस सरकारचें पाठबळ नसलें व आम्ही जरी आपली कंबर बांधून पुढें सरसावलों तरी सुद्धां बरेंच काम होणार आहे. ती कंबर बांधणें ह्मणजे देशांत होणारा माल—मग तो चांगला असो वा वाईट असो—वापरून देशी कारखानदारांस उत्तेजन दिलें पाहिजे व अशा रीतीनें देशी मालास (व्यापारास) उत्तेजन मिळालें व देशाभिमानाची ज्योत सर्वांच्या अंतःकरणांत एकदां पेटली ह्मणजे आमचें काम झालें. मग आम्ही ग्लासगोवाले, म्यांचेस्टरवाले अगर इतर परदेशी व्यापारी अशा शेंकडो जणांस सुद्धां भीक घालणार नाहीं.

---

# शेतकी--भाग १ ला.

(मागील अंकावरून पुढें चालू)

त्यामुळें जमिनींत निरनिराळे पदार्थ तयार होतात व त्यांचा उपयोग झाडांस होतो. वाळूचा झाडांस कांहीं उप-

योग होत नाहीं. व वाळूचें वर्गीकरणही हवा, प्रकाश, पाणी, खत वगैरे पदार्थांनीं होत नाहीं. जमिनींत वाळूचें प्रमाण जास्त असल्यास त्या जमिनींत कमी कस असतो.

माती—माती मध्यें मुख्य—तत्वें म्हटलीं म्हणजे अभ्र, सिक, प्राण, व उज्ज हीं होत. ह्या शिवाय त्यांत आरज तत्वही बऱ्याच प्रमाणांत सांपडतें. शुद्ध मातींत फक्त जड पदार्थ असतात. व अशुद्ध मातींत प्राणी, वनस्पती वगैरे पदार्थांची जड माती वगैरे पदार्थ सांपडतात.

खडू—हा मुक्त ( Calcuim ) धातूचा पदार्थ बहुतेक सर्व जमिनींत असतो. पृथ्वीचे १०० भाग केल्यास त्यांत १४ भाग मुक्त धातूचे सांपडतील. ह्या वरून ह्या धातूनें पृथ्वीचा किती भाग व्यापला आहे हें सहज समजेल. खडूचा उपयोग जमिनीस फारच होतो. ह्याचे योगानें जमिनीचा गोळा होत नाहीं व ती भुसभुशीत रहाते. ह्याचे योगानें जमिनींत पाणी राहून इतर हवेंतील व खतांतील क्षारही जमीन शोषून घेते. ह्याचे योगानें वनस्पतीज व प्राणीज पदार्थांचे जड वस्तूंचें वर्गीकरण होऊन उत्तम खत तयार होतें. खडूमध्यें बहुतेक स्फुर तत्व अशुद्ध रूपानें असल्यामुळें त्या पासून खतास मदत होते. ह्याप्रमाणें खडूचे अनेक उपयोग होतात.

कूज ( Humus )—प्राणी व वनस्पती नष्ट झाल्यावर त्यांचे जे शेष ( Remainings ) पदार्थ राहतात त्यावर हवा पाणी जमीन वगैरे पदार्थांचा परिणाम होऊं लागला म्हणजे त्या कुजूं लागतात म्हणजे त्यांचें वर्गीकरण होऊं

लागतें. अशा स्थितीस त्यांस कूज असें ह्मणतात. या कुजीचा उपयोग खताकडे फार होतो. वनस्पतींच्या कुजी पेक्षां प्राण्यांची कूज खतास फार चांगली. कुजीच्या योगानें जमीन् फार रेताळ असल्यास मऊ होते. ह्याच्या योगानें जमीन फारच भुसभुशीत होत. कुजीमध्यें नत्र वायु फार असतो. व तो खताचे कामीं फार उपयोगीं पडतो. वनस्पतीस नत्रवायूचा पुरवठा कुजी पासूनच होतो. ज्या जमिनींत कूज नसते त्या जमिनींत नत्रवायु अगदीं कमी असतो. खडू प्रमाणेंच कुजीचाहि जमिनीचें पिकावर फारच उपयोग होतो. ह्याप्रमाणें जमिनींतील पदार्थांचा साधारण विचार झाला. आतां ह्याचा जमिनीवर काय परिणाम होतो तें पाहूं.

## स्फुट विचार.

गेल्या महिन्यांत विशेष महत्वाचा दिवस ह्मटला ह्मणजे ज्या नरश्रेष्ठानें आह्मां महराष्ट्रीयांस किंबहुना एकंदर हिंदूंस म्लेंच्छांच्या खडतर त्रासांतून सोडवून हिंदुंची चिरनष्ट राज्यसत्ता पुन्हां स्थापित केली व हिंदुधर्माच्या अवनतीच्या काळीं त्यास हात देऊन गोब्राह्मणांचें प्रतिपालन केलें व अशा रीतीनें "देह त्यागितां कीर्ति मागें उरावी" ह्या समर्थोक्तीचें यथार्थत्व सिद्ध केलें त्या नरपुंगवाचा—**श्री शिवाजी छत्रपतीमहाराजांचा**—जन्म दिवस होय. आमच्या देशाची सांप्रतची हलाखी मनांत येतांच

ह्या थोर पुरुषाविषयीं एकदम पूज्यबुद्धि उत्पन्न होते, अभिमान जागृत होतो व अशा तऱ्हेचा एक नरश्रेष्ठ आमच्यांत उत्पन्न होऊन त्यानें सद्गुरूंच्या कृपेनें आपल्या आर्य भूमीचें पांग फेडिले व आपल्या निर्मळ आचरणानें इतरांस उत्तम वळण घालून दिलें ह्मणून हल्लींच्या स्थितींत सुद्धां मोठें समाधान होतें. ह्या थोर विभूतीचे कृतज्ञ बुद्धीनें थोडें तरी उतराई होणें हें आह्मां सर्वांचें आदि-कर्तव्य होय; व ह्याप्रमाणें आमच्या देशबंधूंचें ह्या अत्यावश्य गोष्टीकडे लक्ष्य जात आहे व ते अज्ञानी लोकांस त्याची यथावकाश व यथाशक्ति माहिती करून देऊन त्यांसही त्याचें चरित्रामृत पाजीत आहेत ही मोठी समाधानाची गोष्ट होय.

आमच्या मुंबईकर बंधूंनीं प्लेगचे दिवस असतांही योग्य ती तयारी करवून शनवारीं सायंकाळीं रा. रा. **रामचंद्र हरी देवधर** बी. ए. ह्यांचें " **शिवचरित्रा पासून भारत वर्षीयांस उपयोग** " ह्या विषयांवर व्याख्यान करविलें. वक्ते स्वत: बहुश्रुत असून त्यांनीं आपल्या नेहमींच्या पद्धतीनें–श्रोत्यांच्या मनांवर आपल्या भाषणाची छाप बसविण्याच्या पद्धतीनें—सुरस व चटकदार व्याख्यान दिलें. दुसऱ्या दिवशीं दांडपट्टा वगैरे मर्दुमकीचे खेळ झाले. रविवार रात्रौ ह. भ. प. **काशीकर बोवांचें** किर्तन झालें. बोवांनीं आपल्या अस्खलित रसाळ व वीररस परिप्लुत वाणीनें छत्रपतिच्या वाडि-लांचे–शहाजीमहाराजांचे–पुष्कळ युद्ध चमत्कार वर्णिले.

# पैसा फंड.

आह्मी या फंडा बद्दल व्याख्यानें देतच आहों, फंड गोळा होतोच आहे. परंतु **केसरी, काळ** वगैरेसारख्या वजनदार पत्रांनीं आपल्या समर्थ लेखणीनें जोंपर्यंत ह्यांत तादृश मन घातलें नाहीं तोंपर्यंत त्यास विशेष स्वरूप येणार नाहीं ह्मणून पुष्कळ लोकांनीं **केसरीकारांस** सुचविलें त्या प्रमाणें त्यांनीं फंडासंबंधानें गेल्या पांच एप्रीलच्या अंकांत जवळ जवळ अर्धा रकाना मजकूर लिहून एकंदर लोकांस दोन. सूचना केल्या आहेत. त्या अशा—ह्या अवाढव्य कामाकरितां एक स्वतंत्र खातें निघून. त्याची जिल्हेवार निरनिराळी पोट खातीं काढावीं. "व ठिकठिकाणीं पगारी नोकर, कामगार किंवा उपदेशक उपद्देश करीत राहिले पाहिजेत. व अशारीतीनें हें स्वतंत्र खातें होऊन फंड गोळा केला पाहिजे." अशा तऱ्हेचें खातें नीट चालेल किंवा नाहीं ही शंका आहे. परंतु अनुभव घेतला पाहिजे. पार्शी लोकांत सुद्धां अशी संस्था (पार्शी पंचायत खातें) नीट चालून तींतून अनेक लोकोपयोगीं कृत्यें होतात तर तीं आमच्यांतच कां होऊं नयेत? तर इकडे सर्वांनीं लक्ष्य द्यावें; तसेंच **केसरीकारा** प्रमाणें **प्राव्हिन्शिअल कान्फरन्स**च्या पुढाऱ्यांस आह्मीही तूर्त सूचना करतों कीं त्यांनीं ह्या गोष्टीचा ह्या वर्षी जरूर विचार करावा.

# पत्रव्यवहार.

## रा. रा. पैसा फंड मा० पुस्तक कर्ते यांस,

वि. वि. आपण देशोद्धारार्थ चालविलेला स्तुत्य प्रयत्न, जिवापाड मेहनत व कार्याचें महत्व पाहून आह्मांस फार आनंद होत आहे. तरी अशा देशोपयोगी फंडांत अंशतः तरी मदत व्हावी असें वाटल्यावरून आमचे **बालामृताचे** प्रत्येक बाटलीमागें ०१ आणा पैसा फंडांत देण्याचा निश्चय केला आहे. तरी ज्यांना पैसा फंडाची अवश्यकता कळून चुकली आहे त्यांनीं अनायासें आलेली ही संधी दवडूं नये अशी आमची सर्वत्रांस आपल्या मार्फत विनंति आहे. तसेंच आपला स्वार्थत्याग, स्वदेशप्रीति, निरालस्य वगैरे गुण पाहून **आपल्या कुटुंबाचे** मदती करितां ह्मणून दरसाल १ रुपया देण्याचें ही आह्मी कबूल करतों. कळावें.

**विश्वनाथ केशव लोंढे.**

**रबर स्टँप मेकर,** जनरल मर्चंट एन्ड कमिशन एजंट.

गिरगांव पोष्ट मुंबई.

# वर्तमानसार.

—महाराष्ट्र-राज्य संस्थापक "**श्री शिवाजी महाराज**" ह्यांच्या जन्म दिवसा निमित्त ठिकठिकाणीं उत्सव चालले आहेत.

—आजपर्यंतचा (मार्च अखेर) पैसा फंड ४९१ रुपये जमला आहे, तरी आतां **इलाखा कमेटी** नेमण्याच्या तयारींत असावें अशी आह्मी पुढाऱ्यांस सूचना करितों.

—अमेरिकेंत रोमचा धर्मगुरु पोप ह्याचा खून करण्याचा कट झाल्याचें खुद्द पोप महाराजांस व इटालियन सरकारास समजलें आहे. पाश्चिमात्य सुधारणेचा कळस!!

—श्री क्षेत्र काशी येथें कोणा मनुष्यानें प्लेगवर एक वनस्पती शोधून काढली आहे. तिचा रस पोटांत घेणें. आणि गांठीवर लेप देणें. ईश्वर करो व प्लेग हा कायम जावो!

पिंवळ्या ५ व्या पानावरून पुढें चालु.

छापखान्याचे मालक, यांच्या घरीं उतरलों. गांवांत प्रमुख वकील मंडळी रहात नाहीं, यामुळें सभा होईल असें वाटलें नाहीं. ह्मणून मी तेथून निघण्याचा बेत केला. इतक्यांत • वडो; येथील माझे स्नेही रा. महेश्वरपंत गोऱ्हे भेटले. त्यांनीं कांहीं मंडळीची भेट घेऊन दुसरे दिवशीं सभा भरविण्याचें टरविलें. रा० नवें यांनीं हस्तपत्रकें ताबडतोब फुकट छापून दिलीं. गुरुवार ता. २१ रोजीं रा. दाजीसाहेब कतकर वकील यांच्या अध्यक्षते खालीं सभा भरली. कल्पना सर्वानुमतें पसंत झाली. जिल्हा सभेपुढें हा प्रश्न ठेवावा असें ठरलें. तिनें नाकारल्यास दुसरी सभा भरविण्याचा ठराव झाला. यासाठीं २ महिन्यांची मुदत मागून घेतली आहे, तेथून मी भगूर येथें आलों. रा० हरीभाऊ धोपावकर यांची भेट घेतली. त्यांनीं ता० २२ रोजीं रात्रीं सभा भरविली. कल्पना पसंत पडली. वार्षिक ५ रुपये जमले. नवीन वर्षापासून ३ वर्गणीदार होणार आहेत. तेथून मी देवळाली येथें आलों. रात्रीं सभा भरावी असा विचार होता, परंतु क्यांटोन्मेंट म्याजिस्ट्रेटच्या परवानगीशिवाय व्याख्यान देऊं नका असें पोलिस अम्मलदार यांनीं सांगितलें. यामुळें तेथें व्याख्यान झालें नाहीं. नंतर मी इगतपुरी येथें आलों. रा. जोग यांनीं टिकिट काढून दिलें. दुसऱ्या एका गृहस्थानें 'मी दोन आणे देतों त्याचा स्वीकार करावा' असें सांगितलें. रा० ब्रह्मे वकील. यांच्या घरीं उतरलों. रविवार असल्यामुळें संध्याकाळीं रा. मोघे, रा. भाटवडेकर, रा. खांबेटे वगैरे मंडळीनीं मेहेनत घेतल्यामुळें राम मंदिरांत पुष्कळ मंडळी जमली. कल्पना पसंत पडली. पुष्कळांनीं आणा दोन आणे व कित्येकांनीं ८४ **दरमाहा** वर्गणी देण्याचें कबूल केलें! नवीन वर्षापासून मा. पु. ला ६ वर्गणीदार मिळाले, त्यानीं वर्गणी सुद्धां देऊन टाकली! बरीच मंडळी मुद्दाम स्टेशनवर पोंचविण्यास आली होती. मंडळीनीं प्र. खर्चासाठीं १॥ रुपया दिला. मंडळीचें प्रेम पाहून मला गहिंवर आला. सहा महिन्यांत ,असा प्रकार कोठेंच झाला नाहीं. येथें २।४ दिवस राहून मी व्याख्यान देण्यासाठीं पुण्यास जाणार आहें.

मुंबई. } अ. वा. काळे.
ता. १६।४।०४

# वर्गणीदारांस सूचना.

१ मुंबईतील व बाहेरगांवच्या वर्गणीदारांस अंक वेळेवर मिळत नाहींत, अशा ब-याच तक्रारी आमचेकडे आल्या आहेत. अशा तक्रारी पुढें न येतील अशी व्यवस्था केली आहे. चुकीबद्दल उदार आश्रयदाते क्षमा करतील अशी आशा आहे.

२ चालू वर्षाचे ११ अंक निघाले. अद्याप ब-याच वाचकांकडून वर्गणी आली नाहीं. त्यांनीं ती या महिन्यांत जरूर पाठवावी. वर्गणीदारांचा $\frac{1}{10}$ रोख रुपये बक्षिस देण्याचा विचार आहे. सबब त्यांचीं नांवें रजि० नंबरासह छापणें जरूर आहे. ज्यांची वर्गणी या महिन्यांत येणार नाहीं, त्यांची बुडित वर्गणीदारांत गणना करून तीं नांवें १२ व्या अंकांत प्रसिद्ध केलीं जातील.

३ या मा. पु. ची वर्गणी अगदीं थोडी असून वर्गणीदारांस नफा पुष्कळ होणार आहे.

क राष्ट्रीय फंडाची चळवळ चालविल्याचें श्रेय.

ख स्वदेशास आजन्म वाहून घेतलेल्या एका सत्गृहस्थाच्या कुटुंबास अंशतः मदत केल्याचें श्रेय.

ग राष्ट्रीय "ऑर्गन" आपल्या देशांत एकही नाहीं. सबब हें घेतलें तर ती मोठी उणीव भरून काढण्याचें श्रेय.

घ जपानांत रसायन शास्त्राचा अभ्यास शिकून आलेल्या गृहस्थाकडून शेतीची नवीन तऱ्हेची माहिती.

ङ या शिवाय "जपानची मर्दुमकी" पुस्तक ०४ कमी, 'कृषी कर्म विद्या' (राजे कृत) ट. ह. माफ. वगैरे किरकोळ नफे होणार असून दैवाची परिक्षा पाहतां येते.

४ व्ही. पी. परत करूं नका अशी आगाऊ विनंति केली असतां कित्येकांनीं अंक घेऊन व्ही पी परत केल्या व आह्मांस विनाकारण खर्चांत घातलें हें पाहून आह्मास परमावधीचें दुःख होत आहे.

**साभार पोंच** म. ना. गोऱ्हे, बडोदे १ रु; मा० ना० गद्रे धुळें ५ रु; (ब) धुळें १ रु; किर्लो० सं० मंडळी धुळें २ रु. ना. के. परांजपे, चाळीसगांव २ रु; भया० काळकर एरंडोल ०४; बंडोपंत मुनशी शेगांव ०४; ग० भा० निमकर १ रु; ज० बा० निम० १ रु; पां. रा. निम० १ रु; तु० भा० निम. १ रु; रा० वा० सोहोनी १ रु; महा० बळ. मोघे ०८; दत्ता० वासु० निमकर कोल्हापूर ५ रु; येणें प्रमाणें २२ रु. कुटुंबाचे मदती करितां आले ते पोंचले. त्यांचे अत्यंत आभारी आहों.

---

आमच्या एजंटांचीं नांवें पुढील अंकीं देऊं.

अं. दा. काळे.

# वर्गणीची पोंच.

| | |
|---|---|
| **उमरावती.** | |
| श्रीमंत ग. श्री. खापर्डे. | ८ |
| रा. रा. वा. ग. तांबे | ८ |
| ,, पां. ग. पिंगळे | ८ |
| ,, नरहर गोविंद | ८ |
| ,, शाम. केशव | ८ |
| ,, अनंतराव व्यंकटराव | ८ |
| **मूर्तिजापूर.** | |
| रा. रा. अ. वि. रतनपारखी | ८ |
| ,, दे. ह. अकोटकर | ८ |
| ,, के. गो. देशमुख | ८ |
| ,, ल. अंबादास | ८ |
| ,, रा. वि. आठवले | ८ |
| ,, नागेश बाळकृष्ण | ८ |
| ,, राघोबा बाबूराव | ८ |
| सय्यद हुसेन सय्यद | ८ |
| रा. रा. आ. पांडुरंग | ८ |
| ,, का. चि गडबोले | ८ |
| ,, वा. कृ. खरे | ८ |
| ,, श्रीनिवास शाहू | ८ |
| शेट गोकुळदास डोसा | ८ |
| रा. रा. कृ. सो. वेलणकर | ८ |
| ,, वि. रा. देशपांडे | ८ |
| ,, बी. ए. पालकर | ८ |
| ,, गुरुनाथ व्यंकटेश | ८ |
| ,, व्यंकटेश मार्तंड | ८ |
| ,, हरी खुशालसिंग | ८ |
| रा. रा. वे. जयवंत | ८ |
| शेट सोराबजी इंजनीअर | ८ |
| रा. रा. महादेव रावजी | ८ |
| शेट जमनादास नरसी | ८ |
| ,, वीरजी घेलाभाई | ८ |
| रा. रा. वेनी मा. दिक्षित | ८ |
| ,, श्री. घोडकी | ८ |
| ,, मु. रामचंद्र वेणी | ८ |
| ,, मा. प्र. संगित मंडळी | ११ |
| रा. रा. वि. ना. बढे | ८ |
| शेट बा. रु. मारवाडी | ८ |
| ,, शा. जेठा लधा | ८ |
| **भुजवाडे.** | |
| रा. रा. तुकाराम पाटील | ११ |
| **मोरगांव.** | |
| रा. रा. पांडूरंग बाळकृष्ण | ११ |
| **मुंबई.** | |
| रा. रा. बंडोपंत भाजेकर | ८ |
| ,, ना. बा. भागवत | ८ |
| ,, इंडिया लिथोप्रेस म्यानेजर | ८ |
| ,, वा. पु. दांते | ८ |
| ,, शं. ना. भागवत | ८ |
| ,, का. कृ. पंडीत | ८ |
| ,, अ. चिं. काळे | ८ |
| ,, ल. व्यं. राळे. | ८ |
| ,, ग. का. हळदवणेकर | ८ |
| ,, कृ. वा. सावंत | ८ |

,, वि. ल. साठे ८
,, गो. स. ढवळे ८

पनवेल.

रा. रा. विष्णु कृ. पुराणीक ८

आपटे.

रा. रा. सि. वि. लळीत ११

सुरत.

रा. रा. रा. चिं. गोळे ८
रा. रा. ग. रा. कालेकर ८
,, स. के. पुणेकर. ८
,, म. ठा. परांजपे ८
,, रा. व्यं. तेलंग ८
,, सि. जयराम ८
,, वा. गो. बाळ ८
,, अ. गो. कमळापूरकर ८
,, त्रि. ग. घोलप ८
,, गो. आ. सार्टट ८
,, ल. गं. काळे ८

का..

रा. रा. ल. प. आठवले ११

नवसरी.

रा. रा. व. स. वकील ११

अलिबाग.

रा. रा. चिं. म. काळे ८
,, ग. ज. कामत ८
,, अ. दा. पटवर्धन ८

जांबरूण.

रा. रा. रा. ब. शितुत ११

महाड.

रा. रा. वा. पां. चांदे ८
,, दा. वा. आठवले ८
,, गो. गो. टिपणीस ८
,, ब. वि. वीरकर ८

वीर.

रा. रा. भा. रा. वीरकर ११

नारगोळ.

रा. रा. शा. भि. पाटील ८

मुरुड.

रा. रा. भि. म. कर्वे ११

मालगुंड.

रा. रा. रा. ना. मेहेंदळे ११

नेवरे.

रा. रा. के. ज. बरवे ११

ह्रसाळा.

रा. रा. वि. कृ. टिळक ११

एरणडोल.

रा. रा. वा. भि. काळकर ११

जयगड.

श्रीमंत पु. स. जोग ११

रतलाम.

रा. रा. के. जी. मुसळे ११

केसपुरी.

रा. रा. ग. ब. काणे ११
,, गो. बा. गद्रे ११

निवेंडी.

रा. रा. गो. म. धोपटकर. ११

## चाफे.

| | |
|---|---|
| रा. रा. स. म. मुळे. | ११ |

## चाटावा

| | |
|---|---|
| रा. रा. बाळासाहेब मोरे | ११ |

## उज्जन.

| | |
|---|---|
| रा. रा. धुं. कृ. आष्टेवाले | ११ |

## उंब्रगांव.

| | |
|---|---|
| रा. रा. वि. स. निमकर | ८ |
| ,, शं. ना. काहळकर | ८ |
| डॉ. एल्. पी. यादव. | ८ |

## डिग्रस.

| | |
|---|---|
| रा. रा अ. कोमटी | ८ |

## यवतमाळ.

| | |
|---|---|
| रा. रा. गो. ना. भट | ८ |
| ,, स्व. हि. मंडळी | ८ |
| ,, रा. ग. मुंडले | ८ |
| प्रोफेसर ज. आ. द्रवीड | ८ |
| रा. रा. प. रा. हळवे | ८ |
| ,, स. मो. देव | ८ |
| ,, कृ. ल. पेशवे | ८ |
| ,, या. सां. ड्राऊ | ८ |
| ,, ह. वि. सुभेदार | ८ |
| ,, ल. रे. कोडोळ | ८ |
| ,, वा. ना. सवाई | ८ |
| ,, मारुती हरी | ८ |
| ,, ग. भी. देशपांडे | ८ |
| ,, के. दे. गुप्ते | ८ |
| ,, यज्ञेश्वर दिवाकर | ८ |
| ,, भाऊ विठ्ठल | ८ |
| ,, गोपाळ मेराळ | ८ |
| ,, ल. अ. पोतदार | ८ |
| ,, या. ना. मोडगांवकर | ८ |
| ,, कासिनाथ गिरमाजी | ८ |
| ,, सोभागलाल माणेकचंद | ८ |

## अकोला.

| | |
|---|---|
| रा. रा. त्रिं. व. कुळकर्णी | ११ |

## शेगांव

| | |
|---|---|
| रा. रा. द. ह. पेणसे | ८ |

## पातुर्डा.

| | |
|---|---|
| शेट सुकलाल भोजराज | ११ |

## वरवट खंडेराव.

| | |
|---|---|
| शेट सेखर व॥ सेख गुलाब | ११ |

## खामगांव.

| | |
|---|---|
| रा. रा. वि. कृ. सहस्रबुद्धे | ११ |

## मलकापूर.

| | |
|---|---|
| रा. रा. या. कृ. डोरले | ८ |
| ,, गो. के. एदलाबादकर | ८ |
| मि. शिराज हुसेन | ८ |
| रा. गो. भा. फडणीस | ८ |
| ,, स. म. दांडेकर | ८ |
| ,, वा. वि. शिदोरे | ८ |
| ,, दा. ना. आत्रे | ८ |
| ,, दा. ह. रानडे | ८ |
| ,, देवळे मास्तर | ८ |
| ,, गोळवडेकर मास्तर | ८ |

## फलटण.

| | |
|---|---|
| रा. रा. रा. के. निमकर | ११ |

बाकीची पो र पुढील अंकीं.

वर्षाची वर्गणी ८ आणे. ट. ख. ३ आणे.
एका नांवावर ६ प्रती गेल्यास ट० खर्च माफ. फुट० अं० १ आणा.

# "पैसा फंड"

## मासिकपुस्तक.

वर्ष १ लें. ] जून १९०४. [ अंक १२ वा.

### विषयानुक्रमणिका.

विषय. पान.

'पैसा फंड' वर्ष पहिलें............. १४३
शेतकी ............................ १५१
स्फुट विचार........................ १५३
वर्तमानसार ........................

मुख्य एजंट-पुरंदरे आणि कंपनी-माधवबाग मुंबई.

हें पुस्तक अंताजी दामोदर काळे यांनीं मुंबईंत
विजय छापखान्यांत छापून प्रसिद्ध केलें.

विविधकलाशतक-किं. ८८ ट, ख. २ विजय छापखाना, मुंबई.

# माझा प्रवास.

ता० २६ एप्रिल रोजीं मी मा. पु. ची व्यवस्था बघण्यासाठीं मुंबईस आलों. मे महिन्याचा अंक प्रसिद्ध झाल्यावर मुंबईस एक व्याख्यान देऊन मग पुणें येथें जावें असा बेत केला. मरीन लाइन्सजवळ रा० ब० वैद्य यांच्या क्यांपमध्यें दक्षिणी मंडळींचा समुदाय बराच दिसला, ह्मणून तेथील कांहीं चांगल्या मंडळीस माझें व्याख्यान करवाल तर बरें होईल अशी विनंति केली. तेव्हां 'बरें आहे,' असें कित्येकांनीं सांगितलें. ता० १ मे रविवार रोजीं व्याख्यान नक्की होणार असें भविष्य मला दिसून आलें. परंतु शनिवारीं रात्रीं रा. गोखले यांनीं येथें व्याख्यान होणार नाहीं असें सांगितलें. यावेळीं माझी किती निराशा झाली असेल याची वाचकांनींच कल्पना करावी. मा. पुस्तकाची एकंदर व्यवस्था लावून मी ता० ५ रोजीं पुणें येथें जावयास निघालों. रा. गोपाळ वासुदेव आणि कंपनीकडून प्रवास खर्चासाठीं १॥ रुपया मिळाला. रा. कृष्णाजी हरी केळकर, हायकोर्ट वकील यांची गाडींत दैवयोगानें ओळख झाली. यांना ही कल्पना इतकी आवडली कीं, ते आपल्या पदरच्या खर्चानें मला बेळगांव येथें नेत होते. परंतु मला सवड नसल्यामुळें मी गेलों नाहीं. तरी त्यांनीं पैसा फंड मा. पु. च्या ५ प्रती घेऊन उदार आश्रय देण्याचें कबूल केलें आहे! यांच्या बरोबर मी. डा० गर्दे यांच्या घरीं उतरलों.

श्रीमज्जगद्गुरू शंकराचार्य यांची स्वारी तेथें आली होती. शिवाय गांवांत लग्नसराईची गडबड असल्यामुळें तूर्त व्याख्यान होईल असा रंग दिसेना. तेव्हां मीं कांहीं गांव फिरून परत यावें असा विचार केला. प्रथम भोर येथें जावें, असा बेत केला, इतक्यांत खबर लागली कीं, तेथील वडी वडी मंडळी लग्नासाठीं पुणें येथें आली आहे. तेव्हां भोरचा बेत रहित करून सासवड येथें जाण्यास निघालों. निघतांना एका देशभक्तानें नको नको ह्मणत असतां दोन रुपये हातांत दिले! सासवड गांव स्टेशनापासून लांब आहे व रात्रीं गाडी मिळणार नाहीं असें कळलें. तेव्हां फलटण येथें जाण्यासाठीं लोणंद स्टेशनावर आलों. सरकार स्वारी तेथें नाहीं, अशी खबर स्टे. लागली, तेव्हां मग सातारा येथें जाण्याचा विचार केला. मास्तर यांनीं तिकीट दिलें. रा. दादासाहेब करंदीकर वकील यांच्या घरीं उतरलों. यांच्या घरीं कांहीं कार्य होतें नगराहून व्याही मंडळी घरीं त्याच दिवशीं आली होती. तात्पर्य, त्यांस घटकेची फुरसुद नव्हती. तरी पण त्यांनीं युनि० क्लबांत जाऊन शनिवार ता. १४ रोजीं माझें व्याख्यान ठरविलें. दुसरे दिवशीं गावांतील चार संभावित गृहस्थांच्या सह्यानिशीं हस्तपत्रिका काढविल्या. शनिवारीं संध्याकाळीं ५ वाजतां दादासाहेब करंदीकर यांच्या अध्यक्षतेखालीं माझें व्याख्यान झालें. मंडळी पुष्कळ होती. रा० ब० पाठक व श्री. तात्यासाहेब मुतालिक वगैरे थोर गृहस्थ सभेला आले होते.

यामुळें सभेला रंग आला होता. माझें भाषण झाल्यावर रा॰ ब॰ पाठक यांनीं भाषण करून कल्पना चांगली आहे, व रा. काळे यांचा स्वार्थ त्याग वर्णनीय आहे, असें आपलें मत दिलें. मुख्य कमेटी, तिचे नियम वगैरे जरूर ती व्यवस्था लावून मग रा. काळे फिरले असते, तर काम चांगलें व लवकर झालें असतें. तशी कांहीं व्यवस्था नाहीं याबद्दल त्यांनीं दिलगिरी प्रदर्शित केली. व कांहीं तरी मदत देणें जरूर म्हणून दरसाल १ रुपया देण्याचें कबूल केलें. इतर मंडळींनींही असेंच कांहीं तरी आंकडे घातले. डा॰ भिडे, यांनीं स्वयं॰ चें काम पत्करलें. यांसच सेक्रेटरी व खजीनदार नेमण्यांत आलें आहे. एकंदर रक्कम जमेल, त्याची पोंच प्रेक्षक मधून येणार आहे. १ वर्ष पर्यंत ही रक्कम अनामत म्हणून डा॰ भिडे यांच्या घरीं राहणार आहे. - या मुदतींत मुख्य कमेटी झाली नाहीं, तर मग हे जमलेले पैसे येथील प्रदर्शन कमेटीच्या स्वाधीन करावे, असें ठरलें. मुख्य कमेटी होण्याची किती गरज आहे, हें यावरून कळून येईल. मा. पु. ला ८ वर्गणीदार मिळाले. डा॰ भिडे यांस एजंट नेमण्यांत आले आहे. तेथून निघतांना दादासाहेब करंदीकर यांनीं एक पागोटें व ३ रुपये देऊन सप्रेम अंतःकरणानें निरोप दिला. तेथून मी कोरेगांव येथें आलों. रा. काळे मास्तर यांच्या घरीं उतरलों. ता. १९ रोजीं रा. नानासाहेब वोकील यांच्या घरीं सभा भरली. कल्पना पसंत पडून वार्षिक ९ रुपये जमले. नानासाहेब यांस दर-

साल० १२०० रुपये इनाम असतां त्यांनीं फक्त ०८४ देण्यांचें कबूल केलें! यामुळें दुसरें आंकडे अगदीं भिकार पडले यांत नवल कसलें? मा. पु. ला ४ वर्ग० मिळाले. प्रवास खर्चासाठीं ०=॥ मिळाले तेथून मी रहिमतपूर येथें आलों. रा. गोपाळराव परांजपे, वकील यांनीं खटपट करून ता. १७ रोजीं रा. नाना साहेब माने यांच्या अध्यक्षतेखालीं सभा भरविली. व्याख्यान झाल्यावर कल्पना पसंत पडली. सगळ्या गांवा तर्फे १० ते १५ रुपये पर्यंत दरसाल मदत देण्याचें ठरलें. प्रथम जी वर्गणी द्यावयाची त्याचा योग्य उपयोग झाला अशी खात्री झाली तरच दुसरे वर्षाची वर्गणी द्यावी, असें ठरलें; असा प्रकार आजपर्यंत दुसऱ्या कोणत्याही गांवीं झाला नाहीं. रा. परांजपे वकीलयांनीं प्र. खर्चा साठीं ०८ दिले येथें मा. पु. बद्दल कोणीं विचार केला नाहीं. तेथून मसूर येथें यावयास निघालों. गाडींत एक स्नेही भेटला, त्यानें जबरदस्तीनें १ रुपया खिशांत घातला! मसूर येथें ता. १९ रोजीं वेद० रा. काशिनाथ बोवा मसूरकर यांच्या अध्यक्षते खालीं सभा भरून व्याख्यान झालें. १०० पेक्षां जास्त मंडळी जमली होती. कल्पना पसंत पडली. कांहीं आंकडे ही पडले. मा. पु. बद्दल कोणीं विचार केला असें वाटलें नाहीं. येथें प्र. खर्चासाठीं २ रुपये मिळाले. येथून मी आज कऱ्हाड येथें जात आहें.

मसूर जि० सातारा. }
२०।५।४. } अं. दा. काळे.

# वर्तमानसार.

वऱ्हाडांत अंदुरें गांवीं खुशालराव देशमुख नांवाचे गृहस्थ राहातात त्यांनीं पुणें येथील डे. ए. फंडास २००० रु. दिले! पैसा फंडास अशी मदत होईल तर राष्ट्रीय कार्यास लागलाच आरंभ होणार आहे !!

विलायतेंत ब्रिटिश कॉटन ग्रोईंग असोशिएशन नांवाची एक संस्था स्थापन झाली आहे. एक पौंडाचा १ शेअर ( भाग ) ह्या प्रमाणें पांच लक्ष पौंड जमणार आहेत. जवळ भांडवल असल्यावर औद्योगिक चळवळ वाटेल तेव्हां करितां येते!

क्रोन्स्टाड येथें रशियाचा दारूखाना आहे तो उडवून देण्याचा कोणी कट केल्याचा समजतें. हजामतीचे केंस राकेलांत भिजवून, जेथें दारू सांटविली होती तेथें पेटवून ठेवलेले आढळले. ( के. )

कोणत्याही मनुष्यास कांहीं ठराविक संख्येपेक्षां जास्त मुलें झालीं तर कांहीं ठराविक कर द्यावा लागतो. अशी फ्रान्समध्यें चाल आहे. सर्वच विचित्र!!

आज पर्यंतचा ( एप्रील अखेर ) जमलेला फंड रु. ५४२ आहे असें केसरीवरून समजतें. सें. कमेटी नेमण्याची आतां सर्वांनीं उचल करावी.

हिंदुस्थानांतील मोठे सावकार पारशी ज्ञातींतील प्रसिद्ध व्यापारी व मि. दादाभाई नौरोजी ह्यांच्या सारखे खरे देशभक्त मि. टाटा. ह्यांस जर्मनीमध्यें कांहीं दिवसांपूर्वी देवाज्ञा झाली हें कळविण्यास आह्मांस अत्यंत वाईट वाटत आहे.

# पैसा फंड

मासिक पुस्तक.

वर्ष १ लें. ]  जून, सन १९०४.  [ अंक १२ वा.

## 'पैसा फंड' वर्ष पहिलें.

सृष्टिक्रमांत विशेष अडथळे न आले तर लावलेलें झाड यथाक्रम वाढून लावणारास अगर निदान इतरांस तरी सुखप्रद होतें, अथवा अफाट समुद्रांत नौका हांकारल्यावर वादळादि संकटें नसून वारा अनुकूळ असेल तर ती नौका जशी इष्ट ठिकाणीं जाते, व नाविकाच्या श्रमाचें सार्थक्य होतें, त्याप्रमाणें अनेक हितेच्छुंची मदत असल्याकारणानें आमचें हें छोटेंखानी मासिक पुस्तक आज वर्षभर नियमितपणें चालून आह्मांस आमच्या परम प्रिय आश्रयदात्यांची दुसऱ्या वर्षाची नवी भेट घेण्याचा सुदीन लवकरच येणार! याबद्दल आह्मी परम कृपाळू परमेश्वराचे अंतःकरण पूर्वक अत्यंत उपकार मानतों.

सन १९०१।०२ सालीं आमच्या हातून पैसा फंडाचें जें काम झालें तें जगापुढें यावें तसें आलें नाहीं. शिवाय स्वतःला व कुटुंबाला फार त्रास सोसावा लागला. या

कारणामुळें एखादें मा. पु. काढावें अशी कल्पना मनांत आली. प्रो. रानडे बी. ए. प्रि० देवधर बि. ए. रा. वामनराव जोशी बी. ए. इत्यादि विद्वान गृहस्थांनीं लेख रूपानें मदत करण्याचें कबूल केल्यावरून सन १९०२ च्या आक्टोबरमध्यें तशा उद्देशाचीं हस्तपत्रकें छापून प्रसिद्ध केलीं. परंतु तीं बाहेर गांवीं पाठवावीं कशीं हा विचार पडला! इतक्यांत फडणीस उत्सव बोर्डाचे सेक्रेटरी रा. के. बा. जोशी यांनीं कै. नाना फडणीस यांच्या उत्सवासंबंधाच्या हस्तपत्रकांबरोबर हीं हस्तपत्रकें पाठविलीं. यामुळें कांहीं सह्या मिळाल्या. याबद्दल रा. जोशी यांचे आभार मानणें गैर होईल काय? असो, वर्षाची वर्गणी फक्त ०८ असतां ५०० सह्या मिळण्यास आठ महिने लागले! प्रथम आह्मांस किती त्रास पडला याची कल्पना करण्यास ही गोष्ट साधनीभूत होईल. देशकार्यास सर्वस्वीं वाहून घेणारास वर्षाचे १२ अंक घेऊनही ८ आणे देणारे ५०० इसम मिळण्यास इतका वेळ लागला हें लहान आश्चर्य काय? अशी स्थिती होती, तरी पण परमेश्वरावर भरंवसा ठेऊन सन १९०३ च्या जुलई पासून 'पैसा फंड' मा. पुस्तक सुरू करण्याचा बेत केला इतक्यांत भरंवसा दिलेल्या लेखकांनीं कांहीं तरी—दिसण्यांत वाजवी—सबबी सांगून मा. पुस्तकांत लिहिण्याचें नाकारिलें! तेव्हां नाइलाजास्तव रा. एकनाथपंत भांडारे यांची भेट घेऊन त्यांस संपादकाचें काम देणें भाग पडलें पहिल्याच खेपेस रा.

भांडारे यांनीं काम पतकरून मजकूर लिहून दिला. त्याबद्दल त्यांनीं कांहीं घेतलें नाहीं. दुसऱ्या महिन्यापासून त्यांस दरमहा पांच रुपये देण्याचें आह्मीं कबूल केलें. पैसा फंडाच्या रिपोर्टाचें परीक्षण या मा० पुस्तकांत नको, अशी आमची इच्छा असतां रा. भांडारे यांनीं परीक्षण केलें, इतकेंच नव्हे तर तें करतांना 'रा. काळे यांचा जन्म राष्ट्राकरितां आहे कीं काय असें वाटूं लागतें' असें वाक्य घातलें. हें वाचून पुष्कळांस सखेदाश्चर्य वाटलें. कित्येकांनीं तर रा. काळे यांनीं आपल्या तोंडा भोंवतीं दिवा ओंवाळून घेण्याची चांगली युक्ति काढिली, असेंही बोलून दाखविलें. तेव्हां आह्मीं रा. भांडारे यांस निक्षून सांगितलें कीं, 'पैसा फंडाबद्दल तुह्मी वाटेल तें लिहा, परंतु आह्मा संबंधानें निदान स्तुत्यात्मक लेख तरी लिहूं नका. मरेपर्यंत आमच्या हातून देशसेवा झाली तर मग मेल्यावर पाहिजे तें लिहा.' खरा प्रकार असा असतां रा. भांडारे यांनीं थोड्या दिवसांपूर्वीं 'पैसा फंडांत' पैसा फंडाची हकीकत द्यावयाची नाहीं तर कशांत द्यावयाची असा केसरी मधून प्रश्न केला आहे. केसरी कर्त्यांस चकविण्याची किंवा त्यांच्या हजारों वाचकांच्या डोळ्यांत धूळ फेंकण्याची अजब हातचलाखी आह्मांस साधली नसल्यामुळें आह्मीं त्यांस उत्तर दिलेंच नाहीं! असो, पहिला अंक प्रसिद्ध केला तेव्हां फक्त ११ इसमांची वर्गणी आली होती. अशा स्थितींत अठरा विश्वे दरिद्री मनुष्यानें मा. पुस्तक सुरू करणें हें लहान धाडस

असें कोण ह्मणेल? हा अंक पाहून अनेकांनीं अनेक तर्क केले! रा. बकुल कर्ते यांनीं आठ आण्यांत वेष्टण सुद्धां १६ पानें देणें ही फसवणूक आहे असें ह्मटलें. रा. केसरीकर्ते यांनीं मात्र लोकांनीं उदार आश्रय द्यावा अशी शिफारस केली. याचा उपयोग होऊन बरेच वर्गणीदार वाढले. तेव्हां चार पानें वाढविलीं. वर्गणीदारांनीं उदार आश्रय दिल्यामुळें उत्तेजन येऊन तिसऱ्या अंकांत आणखीं चार पानें वाढवून मा० पुस्तकाचीं २४ पानें कायम करून टाकिलीं. मा पुस्तकाचें काम वाढत चाललें तसा खर्चही वाढत चालला. त्यामुळें परिणाम व्हावयाचा तोच झाला. ह्मणजे सगळ्या वर्षांत २५ रुपये सुद्धां नफा झाला नाहीं. शेतकी संबंधानें उपयुक्त माहिती रा. सदाशीवराव परांजपे यांनीं आपला अमूल्य वेळ खर्चून केवळ परोपकारास्तव लिहून पाठविली, ती तिसऱ्या अंकांत दिली. पैसा फंडावर कविता करवून त्याही प्रसिद्ध केल्या. पुढें आह्मी प्रवासास गेल्यावर चार व पांच असे दोन अंक निघाले. त्यांत पैसा फंड व रा. काळे या खेरीज विषय नाहीं! तेव्हां अनेकांची तक्रार आली, पोस्ट खातें दिडकींत अंक पाठविण्याची सवलत देईना. आमच्या तर्फे काम पाहणारांचें व रा. भांडारे यांचें पटेना! रा भांडारे यांचें लक्ष मा. पु. कसें चालेल इकडे असण्याऐवजीं पांच रुपये पुढील महिन्याचे आगाऊ हातीं कसे येतील इकडे असलेलें स्पष्टपणें दिसून आलें. तेव्हां रा. भांडारे हे

आणि त्यावेळीं आपल्या उपयोगीं पडले, हे त्यांचे उपकार आठवून त्यांची निंदा न करितां आह्मीं त्यांजकडून काम काढून घेण्याचें कारण जगापुढें असें ठेविलें कीं, तें पाहून कोणासही वाईट वाटूं नये! रा. भांडारे यांच्या नांवामुळें पोष्टाकडून सवलत मिळत नाहीं, अशी वदंता आह्मीं ऐकिली ती जगापुढें मांडिली नव्हती. एका खाजगी पत्रांत लिहून त्यांस कळविली होती. यांत कांहीं अर्थ नाहीं असें रा. भांडारे यांनीं केसरी मार्फत सर्व जगाला कळविलें. परंतु लागोपाठ तीन अर्ज केले त्यांची दाद न लागतां रा. भांडारे यांजकडून काम काढून घेतल्या बरोबर सवलत कशी मिळाली? तेव्हां त्या वदंतेंत मुळींच अर्थ नव्हता असें निदान आह्मांस तरी वाटणें शक्य नव्हतें. आतां पैसा फंडांत नांवाप्रमाणेंच लेख आले पाहिजेत, असें रा. भांडारे यांचें मत आहे. या संबंधानें आमचें मत काय आहे तें जगापुढें ठेविल्यास अयोग्य होईल असें वाटत नाहीं. एकाच प्रकारची हाकाटी एकसारखी चालू ठेवणें हें कितीही योग्य असलें तरी वर्गणीदारांच्या केवळ आश्रयावरच ज्यांचें अस्तित्व अवलंबून आहे त्यांस हें तत्व लागू करणें बरोबर नाहीं, असें आह्मांस वाटतें. 'इंडिया' पत्राला जसा कायमचे वर्गणीदारांकडून आश्रय मिळत आहे किंवा 'इंजीनियर' पत्राला एका विवक्षित वर्गामध्यें मान आहे, तसा पैसा फंडाला उदार आश्रय मिळाला ह्मणजे मग रा. भांडारे यांचें ह्मणणें अमलांत आणण्यास कांहींच अडचण

पडणार नाहीं. तोंपर्यंत तिकडे लक्ष्य देतां येत नाहीं. असो, रा. भांडारे यांजकडून काम काढून घेतल्यावर आह्मीं 'पैसा फंडोत्तेजक' मंडळीच्या मदतीनें हें मा० पुस्तक स्वतःच चालविण्याचा बेत केला, इतक्यांत आमच्या एका चांगल्या होतकरू स्वयंसेवकानें रागाच्या आधीन झाल्यामुळें आह्मांस मदत करण्याचें एकदम बंद केलें; तेव्हां पुनः काळजी उत्पन्न झाली. परंतु कळविण्यास अत्यानंद वाटतो कीं, रा. जोशी रा. रायकर व रा. देवस्थळी या उत्कट स्वदेश भक्त स्वयं-सेवकांनीं जीवापाड मेहनत करून मदत करण्याचें कबूल केलें, यामुळें आमची काळजी दूर होऊन आह्मांस निर्वेध-पणें प्रवास करतां आला. यांनीं हिंमत केली नसती, तर आमच्या हातून इतकी चळवळ झाली असती कीं नाहीं याचा संशय आहे. यासाठीं या त्रिवर्गाचे या ठिकाणीं आह्मी जाहीर रीतीनें फार फार उपकार मानतों.

सहाव्या अंकापासून अंकांत शेतीची माहिती दिली आहे. व्यापाराकडे दुर्लक्ष्य केल्यामुळें आपली कशी स्थिति झाली, याचेंही मधून मधून विवेचन केलें आहे. प्रवासवृत्त सविस्तर देण्यांत कांहीं इतकें अनमान केलें नाहीं। यामुळें जाहिरातीचे पैसे बुडाले, पण त्याचीही पर्वा केली नाहीं. ११ व्या अंकांत बारीक अक्षरें घालून दीडपट मजकूर प्र-सिद्ध होईल अशी तजवीज केली. तात्पर्य, मा. पु. सर्वांग सुंदर होण्या विषयीं आह्मीं शक्य तितकी काळजी घेतली आहे. आमच्या उदार आश्रयदात्यांनीं आपला कृपा

जलौघ कायम ठेविल्यास आह्मीं या मा. पु. ची पुष्कळच सुधारणा खात्रीनें करूं असें स्पष्टपणें सांगून ठेवितों. आह्मीं पुढील वर्षी पांढरीं २४ पानें करणार असून देशी कागद वापरण्याचा निश्चय करणार आहों.

आतां शेवटीं वर्गणीदारांस एक दोन गोष्टी विषयीं सुचना देऊन हा रिपोर्ट पुरा करीतों. आमचें घड्याळ बारा कांटे फिरून आल्यामुळें आतां त्यास किल्ली देण्याची फारच अवश्यकता आहे. तरी ज्या कोणाकडे मागील वर्षाची बाकी राहिली असेल त्यांनीं ती व पुढील सालची वर्गणी ताबडतोब पाठवून देऊन फंड सजीव ठेवल्याचें श्रेय घ्यावें नाहीं तर फंडाचे एकदम बारा वाजतील ! व तें पाप त्यांच्या कपाळीं बसेल इकडे त्यांनीं लक्ष्य द्यावें.

या अंकांत त्रुटित वर्गणीदारांचीं नांवें प्रसिद्ध करकरण्याचा विचार होता, परंतु ही एकंदर हकीगत वाचून ज्यांचें मन द्रवेल, त्यांजकडून या महिन्यांत मागील वर्गणी तरी खात्रीनें येईल असें वाटल्यावरून या अंकांत नांवें प्रसिद्ध केलीं नाहींत या महिन्यांत वर्गणी न आली, तर ते मात्र खरे **त्रुटित** वर्गणीदार समजून त्यांचीं नांवें पुढील महिन्यांत प्रसिद्ध करूं. मग कोणाची अब्रू गेली तर त्यांनीं आह्मांस दोष देऊं नये.

मागील वर्षापासून हातीं घेतलेलें काम नेटानें कसें चालविलें आहे हें आमच्या सूज्ञ आश्रयदात्यांस कळून चुकलेंच असेल **डॉ० देशमूख** यांची कृपादृष्टी नसती तर

आह्मांवर व आमच्या कुटुंबावर केवढा भयंकर प्रसंग गुद-रला असता, याची कल्पनाही करतां येत नाहीं. यासाठीं त्यांचे उपकार न मानणें ह्मणजे कृतघ्नपणाची कमाल करणें होय असें आह्मी समजतों. तसेंच मुंबई सारख्या महागाइच्या शहरांत ज्यांनीं आह्मांस अनेक तऱ्हेनें मदत केली, त्यांचेही उपकार मानणें योग्य नाहीं असें कोण ह्मणेल? रा. विष्णुपंत शेवडे, प्रो. रानडे, रा. टोकेकर, रावसाहेब बर्वे, प्रि० देवधर, रा. बोरवणकर, रा. खरे. रा. डोंगरे, रा. मुळे, रा. परचुरे यांचीं नांवें प्रसिद्ध करण्यास आह्मांस अत्यानंद होत आहे. तसेंच गांवोगांवच्या आमच्या एजंटांनीं निरपेक्षपणें आह्मांस मदत केली, त्याबद्दल त्यांचे ही आह्मी मनापासून उपकार मानतों. तसेंच पुरंदरे आणि मंडळीनें केवळ देशकल्याणाचें काम समजून आमच्या मासिक पुस्तकाचे मुख्य एजंट होऊन जमाखर्चाचें त्रास दायक काम पतकरलें त्यांचे उप-कार न मानणें ह्मणजे सगळें मुसळ केरांत घालविल्यासारखें होणार नाहीं काय? तसेंच विजय छापखान्याचे मालक व्यवस्थापक आणि इतर लहान थोर मंडळी यांनीं आळस किंवा दुर्लक्ष्य न करितां होईल तितकी मदत केली, याब-दल त्यांचेही उपकार मानणें योग्य आहे. ज्यांची नांवें देणें जरूर होतें, अशीं पुष्कळ नांवें येथें अनेक कारणास्तव देतां आलीं नाहींत, त्यांचे अंतःकरण पूर्वक उपकार मानून व त्यांच्या मनांत परमेश्वर अशीच प्रेरणा करो व केवळ

देशहिताकडे नजर देऊन हातीं घेतलेल्या राष्ट्रीय कार्यास कोणत्याही तऱ्हेचें विघ्न न येतां तें तडीस जावो अशी त्या भक्तकाम कल्पद्रुम परमेश्वराची अनन्य भावें प्रार्थना करून ह्या बराच लांबलेला-सगळ्या वर्षाच्या कारभाराचा लेख आटोपतों.

# शेतकी--भाग १ ला.

( मागील अंकावरून पुढें चालू )

पाणी शोषण ( Hygroscpicity )

हवेंतून पाणी शोषण करून घेण्याची शक्ति कित्येक जमिनींत असते; वाळूचे अंगीं हवेंतून पाणी शोषून घेण्याची शक्ति नाहीं. जमिनीमध्यें कूज व माती ह्यांचें प्रमाण ज्यास्त असल्यास त्या जमिनीचे अंगीं पाणी शोषून घेण्याची शक्ति येते; ह्मणजे कूज व माती ह्यां मध्यें पाणी शोषून घेण्याचा गुण आहे. १०० भाग माती असल्यास ती पाणी शोषून घेऊन १०३ होतें, ह्मणजे तीन भाग पाणी आयते हवेंतून मिळालें. १०० कूज असल्यास ती पाणी शोषून घेऊन १०५ पर्यंत होते तरी ह्या पाण्याचा दुसऱ्या पाण्याशिवाय झाडाचे वाढीस कांहीं उपयोग होत नाहीं. जमिनींत जितकी उष्णता कमी असेल तितकें तिच्यामध्यें पाणी ज्यास्त शोषतें. घरावर कौलाचे ऐवजीं पत्रे असल्यास त्यावर सकाळीं पाणी पडलेसें दिसतें; कारणे रात्रीं उष्णता

कमी असल्यामुळें पत्रे कौलापेक्षां लवकर गार होतात व मग हवेतील पाणी त्यांवर पडूं लागतें.

वाळूमध्यें पाणी फार रहात नाहीं., परंतु कुजीमध्यें पाणी फार रहातें. वाळूंत पाणी शेंकडा ७ भागावर रहात नाहीं. पण कुजींमध्यें शेंकडा ३०—४० भाग-पर्यंत रहातें; ह्मणून पीक चांगलें येण्यासाठीं व जमीनींत ओलावा राखण्यासाठीं जमिनींत वाळूचें प्रमाण ज्यास्त असल्यास, त्यांत कूज वगैरे फार घालतात.

जमिनींत वाळू फार असल्यास उघड्या उष्ण हवेंत जमिनींतून वर पाणी कमी येते, व जमिनींत माती कूज फार असल्यास वर पाणी पुष्कळ येतें. एकंदरींत चांगल्या जमिनींत वाळूचें प्रमाण कमी असून, कूज, खत वगैरे पदार्थ ज्यास्त पाहिजेत.

बाष्प भवन—Evaporation चुलीवर पाण्याचें भांडें ठेविल्यास व खालीं विस्तव पेटविल्यास त्या भांड्यावर वाफ दिसूं लागेल व ती वर जाऊन हवेंत मिसळून जाईल अशा रीतीनें पातळ पदार्थाची वाफ होऊन तो पदार्थ नाहींसा करणें ह्यांस 'बाष्पभवन' असें ह्मणतात ही बाष्प भवनाची कृती सर्वत्र चाललेली असते, ओली जमीन वाळणें, ओलीं धोतरें वाळणें, ओलें गवत वाळणें, हीं बाष्प भवनांचीं उदाहरणें होत. ह्याचप्रमाणें जमिनींतील पाणीही कमी कमी होत असतें. ज्या जमिनींत पीक उभें आहे तेथें बाष्पभवन फार चाललें असतें. जमिनीवर लहान लहान

खडे पुष्कळ असल्यास त्या त्या भागांतील पाणी नाहींसें होत नाहीं. नांगरलेल्या जमिनींत बाष्पभवन फार होत नाहीं कारण वरची माती चांगली वाळलेली असते व ती नांगरली गेल्या मुळें वर सर्व जमिनीवर पसरते ह्यामुळें त्या खालच्या ओल्या जमिनींतील पाणी वर येत नाहीं व ह्मणून त्याचें बाष्पभवनही नाहीं.

---

## स्फुट विचार.

सुमारें दोन तीन वर्षांपूर्वी जेव्हां आमच्या मनांत सदरहू फंडाची कल्पना आली, व ती लोकांस समजावून सांगण्याकरितां आह्मी बाहेर गांवीं फिरण्यास सुरवात केली, तेव्हांपासून आतांपर्यंत या कल्पनेला सर्वमान्य' स्वरूप यावें ह्मणून आह्मीं काय काय केलें, हें आतां सर्वांस कळून चुकलें आहे. **नाशिक, सातारा** या शहरीं देखील या वर्षी या कल्पनेस टेंका मिळाला आहे. लोकमान्य रा. **बाळ गंगाधर टिळक** यांनीं पैसाफंडाची बाजू उचलून धरून रा. नारायण विष्णु गोखले यांच्या रुपया फंडाबद्दल प्रतिकूळ मत दिलें आहे. तसेंच त्यांनीं जुन्नर येथें ३ हजार लोकांसमोर पैसा फंडाची कल्पना अमलांत आली तर आपल्या देशाचा अतिशय फायदा होईल, असें शिवजयंतीच्यावेळीं जाहीर रीतीनें सांगितलें ! 'वेडा' ही पदवी मिळून शिवाय पदरिस्तर मारून घेण्याची वेळ येईल,

अशा भीतीनें आजपर्यंत आह्मांस मदत करण्यास ज्यांनीं अनमान केला, अगर अद्यापाहि जे करीत आहेत, त्यांनीं आतां बेलाशक पुढेंच येऊन आमच्या कल्पनेचा प्रसार करावा. गांवोगांवीं नेमलेले स्वयंसेवक एकेक वर्षाचा वसूल करून केसरीकडे पाठवितील तर मोठ्या लोकांच्या मनावर तात्काल परिणाम होऊन 'मुख्य संस्था' स्थापन करण्यांत येईल. आम्ही घरदार, बायको पोरें यांच्याकडे दुर्लक्ष्य करून जिवाचें रान करीत आहों, तसें आमच्या स्वयं०स करण्याची जरूर नाहीं. त्यांनीं आपापल्या गांवापुरतें काम केलें ह्मणजे झालें. मातृभूचा ज्यांस यत्किंचीत् अभिमान असेल व भाविप्रजा उपाशी मरूंनये अशी ज्यांची खरोखर इच्छा असेल, त्यांनीं आतां हयगय न करतां शक्य तितकी खटपट करून फंड जमवावा, व तो गांवातल्या खजीनदारापाशीं द्यावा अगर नांवनिशीसह केसरी ऑफिसमध्यें पाठवावा. असें केलें तर दोन तीन वर्षांत आपण बरेंच पुढें जाऊं यांत शंका नाहीं. परमेश्वर करो व या लेखाचा स्वयं०च्या अंतःकरणांत थोडातरी उजेड पडो!

---

रा. नारायण विष्णू गोखले व रा. माधवराव बोडस या उभय विद्वान हायकोर्ट वकिलांनीं पैसा फंडाची कल्पना अमलांत येणें अशक्य असें केसरीमधून जाहीर रीतीनें प्रसिद्ध केलें आहे, हें पाहून आह्मांस परमावधी चें दुःख होत आहे. मदरहू दोन गृहस्थ विद्वान व स्वदेश

हितचिंतक आहेत, यांत काडीमात्र शंका नाहीं. परंतु या कल्पनेबद्दल यांनीं जितका विचार करावयास पाहिजे तितका केला नसल्यामुळें व स्वार्थाला धक्का न बसतां देशहित व्हावें, अशी यांची इच्छा असल्यामुळें यांच्या अभिप्रायाला महत्व देणें आह्मांस रास्त दिसत नाहीं. ते आपली योग्यता घटकाभर बाजूस ठेवून आह्माबरोबर काम करण्यास तयार होतील तर पैसा फंडाची कल्पना शक्य कीं अशक्य याची त्यांस खात्री करून देऊं. वर्तमानपत्रांत एखादा लेख लिहून होईल तितकी चळवळ करावी, अशी यांची इच्छा असल्यामुळें आमचे विचार त्यांस रुचणार नाहींत, हें आम्ही जाणून आहों. परंतु कर्तव्य बजावताना जें बाजवी दिसल तें लिहिणें आह्मांस भाग पडलें आहे. याच संबंधानें आह्मी 'काळ' पत्रांत थोड्या दिवसांपूर्वी एक पत्रव्यवहार प्रसिद्ध केला आहे तो आमच्या वांचकांनीं जरूर वाचावा अशीं आह्मी शिफारस करितों..

---

आमचे परमहितचिंतक व कट्टे स्वदेशभक्त रा. हरी परशराम केतकर राहणार बिवली ता० चिपळूण यांस थोड्या दिवसांपूर्वी देवाज्ञा झाली, हें कळविण्यास आह्मांस पराकाष्ठेचें दुःख होत आहे. चिपळूण मुक्कामीं आमचें व्याख्यान शें दोनशें लोकांनीं ऐकलें, परंतु देशाभिमानाच्या निर्मळ ज्योतीनें यांच्याच अंतःकरणांत पेट घेतला।

वरचें १० खंडी उत्पन्न असून देशकार्यास वाहून घेणाराच्या कुटुंबास मदत करणें हें आपलें पवित्र कर्तव्य समजून यांनीं भिक्षापात्र केवळ परोपकारास्तव हातीं घेतलें व दरमहा ९ रु. प्रमाणें ६० रुपये आमच्या कुटुंबाच्या रक्षणासाठीं पाठविलें, हें लहान सहान आश्चर्य नव्हे! दरमहा ६ रुपये देण्याचें त्यांस सामर्थ्य होतें, परंतु सार्व० मनुष्यांचें पोषण सार्व० पैशानेंच झालें पाहिजे असें ते ह्मणत. चिपळूण येथें देशी आग पेट्या बरेच दिवस पडून राहिल्या होत्या, त्या यांनीं आया बायांस चुलीपाशीं जाऊन बोध करून व देशाभिमान जागृत करून खपविल्या! मनाप्रमाणें यांचें शरीर जोमदार असतें तर यांनीं कमालच करून सोडली असती! ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांति देवो, व त्यांच्या दोन बंधूस स्वदेशहिताकडे लक्ष्य देण्याची बुद्धि देवो, इतकें सांगून हा मृत्यु लेख पुरा करितों.

## वर्गणीदारांस सूचना.

पूर्वी प्रसिद्ध केल्याप्रमाणें व खालीं नांवें दिलेल्या एजंटांकडे त्या गांवच्या वर्गणीदारांनीं वर्गणी भरावी.

**रत्नागिरी**—दामोदर गोपाळ लिमये दुकान बाजारपेठ.

**अहमदाबाद**—आनंदराव कवडे फोटोग्राफर.

**बडोदें**—गजानन विनायक पटवर्धन.

**सुरत**—परशराम त्र्यंबक दांडेकर ब्रदर्स भागातलाव.

**नंदुरबार**—मराठे आणि सन्स.

वरील व इतर पुष्कळ ठिकाणीं वर्गणी येणें आहे तरी तेथील एजंट वसूल करून लवकर पाठवितील अशी आशा आहे. बाकीचीं नांवें पुढील खेपेस देऊं.

**अंताजी दामोदर काळे.**

## पत्रांचा सारांश व त्यांस उत्तरें.

रा. निळकंठ ना. क्षीरसागर, इंदूर—दुसरा वार्षिक रिपोर्ट कधीं प्रसिद्ध करणार असें विचारतात, व जून महिन्यांत कालेज उघडल्यावर येथें व्याख्यान देण्यासाठीं यावें असें ह्मणतात. मा. पु. प्रसिद्ध होऊं लागल्यामुळें रिपोर्ट छापण्याची अवश्यक्ता उरली नाहीं. तथापि पैशाची तजवीज होईल तर अवश्य प्रसिद्ध करूं. फंडांतून १ पै घेणें नाहीं. व मा. पु. ची शिल्लक नाहीं, तेव्हां रिपोर्ट कसा प्रसिद्ध करावा बरें? इंदूर येथें सवड झाली तर येऊं.

---

रा० त्रिंबक जयराम प्रधान, जूचंद्र—पैसा फंडाची कल्पना सर्वमान्य कशी होईल याचा विचार करून 'केसरी'कडे एक लेख पाठविला तो प्रसिद्ध झाला नाहीं, याबद्दल दुःख प्रदर्शित करतात, व तो लेख त्यांजपासून मागून घेऊन त्याची विल्हेवाट लावावी असें ह्मणतात. पुणें येथें गेल्यावर विचार करूं.

रा. ना. ह. खानोलकर, सफाळा—सतत तीन दिवस श्रम करून पैसा फंडाची मोठ्या कष्टानें जमविलेली वर्गणी ३ रुपये केसरीकडे पाठविली असें ह्मणतात व या कामीं आपणांस बरेच वेळां नाउमेद होण्याचा प्रसंग आला असें कळवितात. पुष्कळ लोकांचें अज्ञान व कित्येकांचें फाजील शहाणपण यामुळें असें होणें साहजिक आहे. तरी धीर न सोडतां योग्य दिशेनें प्रयत्न करणें जरूर आहे.

रा. वामन शास्त्री वैद्य, अंकली (बेळगांव) आह्मीं येथें

पैसा फंडाची रकम ८१२ जमविली आहे, व आणखी रकम जमविण्याचें काम सुरू आहे, असें कळवितात. लोकांस विषय समजला नाहीं, तर फंड जमणार कसा? यासाठीं 'पैसा फंडाची कल्पना' हीं पुस्तकें परचुरे, लेले कंपनी माधवबाग मुंबई यांजकडून मागवावीं, ह्मणजे काम चांगलें होईल.

---

**साभार स्वीकार**—आर्य महादेव चिं. पेंडसे, राह० आगाशी जि. ठाणे यांजकडून ज्ञान दान ग्रंथ मालेचे 'भिक्षुक होणारा अर्जुन' व 'पाद्री भटाची खटपट' असे दोन ग्रंथ (!) आले ते पोंचले. प्रत्येक ग्रंथ लहान ८ पानांचा आहे तरी पण किंमत फक्त १ पै आहे. चिनी ब्राह्मणाचीं पत्रें ज्यांनीं वाचलीं असतील त्यांस या ग्रंथांतील विचार सरणीची ओळख तात्काळ पटेल. अगदीं स्वस्त किंमतीस ग्रंथ देण्याचा हा पहिलाच प्रयत्न दिसतो. तरी मंडळी उदार आश्रय देऊन ग्रंथ कर्त्याच्या श्रमाचें चीज करील अशी आह्मी आशा बाळगितों.

**विविधकला शतक**—हें आठ ८ आणे किंमतीचें पुस्तक रा. रा. ग. ना. जोशी ह्यांचे कडून आलें आहे. कला शतकाचे लेखक रा. रा. स. वा. परांजपे आहेत. त्यांनीं आपल्या ज्ञानाचा इतरांस फायदा व्हावा व उद्यमोत्कर्ष पत्राची सेवा (निरपेक्ष) बजावली जावी ह्मणून हें पुस्तक काढलें आहे. तें प्रत्येक मनुष्यास उपयोगी पडण्यासारखें असल्यामुळें संग्रहीं ठेवण्यास योग्य आहे.

---

# वर्गणीची पोंच.

## मुंबई.

रा. रा. गणेश नारायण जोशी. ८

## जळगांव.

रा. रा. म्या. किर्लोस्कर सं० मंडळी ११

## सिंधखेड.

रा. रा. वि. श्री. पुराणीक ८
,, य. व्य. कुळकर्णी ८
,, कृ. पु. जोशी ८
,, म. मै. कुळकर्णी ८
,, कि. भगीरथसींग ८
,, ना. दा. जोशी ८
,, शं. के. जोशी ८

## मुधोळ.

रा. रा. से. ने. ज. लायब्ररी ११

## वरवली.

रा. रा. टि. पी. करंदीकर ८

## पिंपळगांव.

रा. रा. वि. भि. भिडे ११
,, वा. चिं. मुळे ११

## तारापूर.

रा. रा. कुंडा हरी ८
,, का. प. बरवे ८

## भिंवडी.

रा. रा. मो. त्रि. कर्वे ११

## शिनोर.

रा. रा. जांभेकर ११

## बिरवाडी.

रा. रा. भाऊसाहेब आवक[illegible] ११

## खेड.

से. वाचन मंदीर. ११
रा. रा. एल् ए. पराडकर ११

## नाशीक.

रा. रा. वा. र. ढालकर ११
,, ल. पा. चौघुले ११

## पुणें.

रा. रा. अनंत ग. गद्रे ११
,, पु. शि. गद्रे. ११

## हर्णई.

रा. रा. बा. भा. जोशी ११
,, वि. चौघुले ११

## दाभोळ.

रा. रा. दा. स. गुजर ११
,, मा. ना. वाबट ११

## केळशी.

रा. रा. रानडे मास्तर ११
,, स. वा. केळकर ११

## केसपुरी.

रा. रा. भि. बा. चव्हाण ११

## चाफेरी.

रा. रा. भि. बा. जुवेकर [illegible]
,, भा. गो. जुवेकर ११
,, वा. र. जोशी ११

## शिरळ.

रा. रा. वा. का. साठे ११

## खोडदें.

रा. रा. र. अं. चौघुले ११

,, श्री. बा. वद्यै ११

वरवानी.

रा. रा. त्रिं. व. कोतवाल ११

द्वारका.

रा. रा. ना. शि. गोऱ्हे ११

विन्नूर.

रा. रा. रा. ग. गाटमगांकर ११

तळवली.

रा. रा. शं. गो. मुळे ११

वेळास.

रा. रा. शि. रा. ओक ११

धोपावें.

रा. रा. रा. भि. निमकर ११

,, ज. भा. निमकर ११

तेटलें.

रा. रा. स. गो. थडसावले ११

रत्नागिर.

रा. रा. ना. ग. शिंदे ११

पंढरपूर.

रा. रा. गो. वि. काळे ८

,, भा. अ. खिस्ते. ८

पोलादपूर.

रा. रा. कृ. चि. पेंडसे ११

आंजलैं

वे. शा. सं. कृ. त्रिवलकर ११

सुरत.

वा. रा. वा. अ. जोशी ८

बडोदें.

रा. रा. शं. म. गोऱ्हे ८

मलकापूर.

रा. रा. दा. अ. कुळकर्णी ८

,, मा. धर्मराव ८

शेट शा. मेगजी. ८

,, गो. गोवरधनदास ८

,, कि. रामजी ८

,, ना. नरसी ८

,, र. लालजी ८

,, श. रतनसी ८

,, न. शोजपाट ८

डहाणू.

रा. रा. ह. म. दिवेकर. ८

,, वा. ब. वैद्य ८

,, गो. द. बंदरकारकून ८

,, म. म. वैद्य. ८

,, ब. ह. करणीक ८

,, भि. वा. पाटील ८

,, रा. ग. करंदीकर ८

शेट त. द्वा. आडिया ८

,, आ. माणीकलाल ८

,, पी. एल्. आडिया. ८

चिपळूण.

रा. रा. का. कृ. जोशी. ८

,, बा. पि. पाटेकर ८

,, घों. बा. खाडविलकर ८

,, त्रिं. कृ. पेंढारकर ८

,, गो. वि. कडवईकर ८

,, भा. वि. वैरेलकर. ८

शेट स. न. बा. कासकर ८